म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ६३८
REFBK-0024048

प्रेस्टीज
प्रकाशन

संदर्भ भू प्रवास
६३८
२४०४८
११/११/८३

# आनंदव्रत

REFBK-0024048

रवींद्र पिंगे

आनद्व्रत

ANANDVRAT

रवींद्र पिंगे

©
सौ. शुभदा (कमल) पिंगे
७७, जय हनुमान सहनिवास (६)
हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७

मुद्रक :
सर्जेराव जी. घोरपडे
प्रिंटेक्स्ट
४६१/१, सदाशिव पेठ
टिळक मार्ग
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
प्रेस्टीज पब्लीकेशन्स
४६१।१ सदाशिव पेठ
टिळक मार्ग
पुणे ४११ ०३०

प्रथमावृत्ती :
१ मार्च १९८२

किंमत
२५ रुपये

गेल्या पाच-सहा वर्षांत दिवाळी अंकाच्या निमित्ताने मी बरीच प्रवास वर्णनं लिहिली. ह्या संग्रहात त्यातली काही घासूनपुसून, थोडी रंगरंगोटी करून, एकत्र आणली आहेत. मी प्रवास का, कसा करतो, गावोगावी काय पाहातो, नि ते लिहून का काढतो याचा खल 'आनंदमेघमंडप' ह्या पहिल्याच लेखात केलेला आहे. तो लेख अगोदर वाचावा.


'श्री अरविंदांच्या पाँडिचेरीत' हा लेख लिहून मी माझ्या प्रवासवर्णनात्मक लेखनाला शुभारंभ केला. तो लेख ह्या संग्रहात मुद्दाम घेतला आहे. तो वगळून, त्या अगोदरचं माझं प्रवासविषयक निवडक लेखन 'आनंदाच्या दाही दिशा' ह्या माझ्या पुस्तकात आलेलं आहे. प्रस्तुतचं पुस्तक ही त्याच्यापुढची पायरी.

हे सारे लेख मूळात प्रसिद्ध करणाऱ्या संपादक मित्रांचे आभार. वाचकांनीही टाळी दिली. त्यामुळे दिव्यात तेल घालून वात तेवती ठेवणं प्राप्त झालं.

सर्जेरावांचेही आभार. आमचा सहप्रवास सुखात चालू आहे.

पुन्हा एकदा : ही नुसती स्थलवर्णनं अजिबात नाहीत. एकाकी माणूस, समाजाचे व्यवहार, अथांग निसर्ग, आणि अलिप्त, थंड नियति, ह्यांचं उलटसुलट वीणकाम मी जागोजागी निरखलं. आणि त्याची नोंद केली. अर्थात, लालित्याच्या अंगाने.

हे माझं अकरावं पुस्तक मी आईच्या पायावर ठेवीत आहे.



७७, जय हनुमान सहनिवास (६)
हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७.

## अनुक्रम


९ आनंदमेघमंडप
१४ श्रीरामकृष्ण परमहंसांचा गांव
२० मद्रासची सुप्रभात
३४ अहमदाबादेचा संधिप्रकाश
४६ हैदराबादेची दिवेलागण
५४ त्रिवेंद्रमची रात्र
६६ विवेकानंदांचा उदो !
७४ गणपती पुळे
७९ शुक्र रामेश्वर
८७ दुसऱ्या महाराजांची वसति
९८ श्रीवर्धनचा प्रारब्धयोग
१०३ श्रीअरविंदांच्या पाँडेचेरीत
११६ सोलकढीचं गांव मालवण
१२३ गोमंतकाची चक्रधून
१२७ गांधीजींच्या गांवी
१३७ आनंदव्रत

## पूर्वप्रसिद्धी

नवनीत, दिवाळी १९७७

नवनीत, दिवाळी १९७५

दिपावली, दिवाळी १९७९

केसरी, दिवाळी १९८०

दिपावली, दिवाळी १९७७

नवनीत, दिवाळी १९७८

विवेक, दिवाळी १९७८

सह्याद्री, दिवाळी १९७८

विवेक, दिवाळी १९७९

रसिक, दिवाळी १९७७

महाराष्ट्र टाईम्स ६।११।१९७७

सत्यकथा, सप्टेंबर १९५७

सोबत, दिवाळी १९७५

महाराष्ट्र टाईम्स ७।३।१९७६

वीणा, सप्टेंबर १९६१

रविवार–केसरी, दिवाळी १९७७

ग्रंथालय ठाणे
६३८
भू-प्रवास २४०४८

# आ नं द मे घ मं ड प

थोरोन विचारलं आहे, झांझिबारातली मांजर मोजण्यासाठी पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याचा खटाटोप करण्यात काय हशील आहे ?

तात्पर्य : फुस्कट, फालतू कामासाठी पायपीट कुटवर करायची, ह्याचा माणसान हिशेब केलेला बरा.

अर्थात, हे झाल थोरोच मत. आश्रमीय संस्कृतीची तहान लागलेला थोरो मुदलात बैठा माणूस होता. सडा होता. अलोलुप होता. त्याला गरजा अशा जवळपास नव्हत्याच. तासन् तास तो एकाच जागी निश्चळ बसे नि डोळे मिटून सगळी सुख तो कल्पनेन बसल्या जागी अनुभवे. असा चमत्कारिक गडी. तशात, काही अलौकिक विद्याच वरदानही थोरोला निसर्गाकडूनच लाभलेल होत. वाहत्या झऱ्यातले मासे जाळ न वापरता तो नुसत्या हातानंच पकडे ! आपण दिवसाउजेडी फिरतो, तसा तो कसलही साधन बरोबर न घेता अनोळखी रानातल्या वाटा गाढगूढ अंधारातून रात्ररात्र तुडवायचा. भय त्याला माहीत नव्हत आणि काळोखातल अवघ आसमंत त्याला लख्ख ओळखता यायच. वर्षातले फक्त दोन महिनेच तो काम करायचा; मात्र करी, ते इतक नि इतक्या झपाट्यान, की त्या कामावर मिळालेल्या पारिश्रमिकावर वर्षाचे उरलेले दहा महिने तो निवातपणे गुजराण करायचा नि निवातपणे टिपण लिहायचा. ती पुन्हा पुन्हा सुधारायचा. अशी लोकोत्तर दृष्टी नि शक्ती लाभलेल्या माणसाचा सल्ला आमच्या काय बरं कामाचा ?

थोरोकडे अभिजात असं अवलियेपण अंगचच होत माझ्यापाशी त्या विद्येच

ठणठणाट आहे. बैठा असूनही क्रियावान, असा त्याचा न्यारा ढंग होता. तेही अंग माझ्यापाशी नाही. उंडारण्यात, हिंडण्यात आमच्या गोनीदांना मोक्ष लाभतो. मोक्ष काही नव्हे, पण मला आनंद तरी निश्चितच लाभतो. आणि दुसऱ्याच्या सुखाच्या आड योजनापूर्वक न येता आपला आनंद अखंडपणे ह्याच जन्मी भोगून घेणं, हा तर सर्व विवेकी प्राणिमात्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. तर, त्यापासून वंचित का व्हा ?

आनंद, सुख, समाधान ह्या भावना म्हणजे अंती एकाच डोहातलं स्वच्छ पाणी आहे. आणि देवाच्या ह्या अफाट दुनियेत साध्या, सोज्ज्वळ सुखाचा केवळ सुकाळ आहे. फक्त आपल्यापाशी वास्तव मान्य करणारी कृतज्ञ नजर हवी आणि सवादी सुरात कबुली देणारं प्राजळ, मोकळं मन हवं केवढी अफाट आहे ही दुनिया ! अथांग आकाश, पाणीच पाणी, विपुल वनस्पती, फुलं, किरणांच्या लखलखीत जाळ्या, पावसाचे मोती, दऱ्या, डोंगर, पशुपक्षी, मासे, धिप्पाड कासवं, सळसळते सर्प, विराट वाळवंटं, त्या वाळवंटावरल्या सूर्योदयांचे हिशेब ठेवणारे सोनेरी विंचू, सोनेरी मुंगूस, चंद्र, सूर्य, तारे, नक्षत्रांचे नजराणे आणि दिगंताचे किनारे भिजवणारी नादलहरींची कायमची तुडुंब भरती.

हे सारं कौतुक पाहणं हीच मुळी मेजवानी. ही सुखं भोगायला काय रोकड हजर करावी लागते ?

देहभान हरपून टाकणारी सारी सुखं माणसाला फुकटात मिळतात, असे हार्डीचे लाखमोलाचे दिलासादायक शब्द आहेत.

तुमचे अनुभव तुम्ही तपासा, माझा पाढा मी वाचतो.

पोटासाठी सर्वांनाच कुठं ना कुठं खपावं लागतं. आकाशवाणीवरलं भरलेलं ताट दैववशात माझ्या वाटणीला आलेलं आहे. माझी कांदा-भाकरी मी रेडिओवर कष्टपूर्वक कमावतो. आमचं रेडिओचं जग म्हणजे नुसता रामरगाडा ! आम्ही तिथले अष्टाधिकारी अष्टौप्रहर घेरलेले असतो: माणसांनी, आवाजांनी नि पाचोळा झालेल्या कागदपत्रांनी. कुणी गातो. कुणी रडतो. कुणी बोलतो. कुणी बोंबलतो. कुणी ओरडतो.'कुणी ओरबाडतो. एक वाचतो. दुसरा मख्ख बसतो. कोण गळा काढतो, तर कोण गळ घालतो, तर कोण गळ टाकतो. असा रहाट सतत चालू असतो. आम्ही रेडिओवाले सदाचेच पायरहाटावर बसलेले असतो कधी मोटे रिकामेच वर येतात. कधी भरभरून. रहाटावर बसलेल्यानं चिंता करायची नसते. खुशाल असायचं असतं. आडात डोकवायचं नसतं. त्यानं नुसते पाय मारायचे. रहाट चालू ठेवायचा.

—आणि अखेर पायच ना ते ? ते आपोआप दमतात. आपलं देणं मागतात म्हणतात, 'आम्ही कंटाळलो, विश्रांती द्या.' सुरुवातीला मी जरा आखडून धरतो. आढेवेढे घेतो. मग पाय आक्रोश करतात. तेव्हा मात्र विरघळतो. शरण जातो. गुरुशर्ट अडकवतो. बॅग भरतो. वही-पेन्सिल घेतो. घड्याळ अगदी आठवणीनं विसरतो. अगदी गरजेपुरतेच

पैसे घेतो नि बाहेर झुकाडतो.

बाहेर मी निरंकुश असतो

गेल्या दहा-बारा वर्षांत मी कुठं कुठं हिंडलो, भरकटलो !

पूर्व सरहद्दीवर पद्मेच्या प्रवाहात मी मजेत पावलं भिजवली आणि थेट ब्रह्मदेशातल्या रबराच्या जंगलांवरून तरंगत येणारे गरम वारे अंगावर घेतले. काचेसारख्या स्तब्ध, निळ्याभोर सिंधुसागरावरचा थंड सूर्यास्त एडनच्या रोखान निघालेल्या युद्धनौकेच्या डेकवरून डोळे भरून पाहिला. पहाडाच्या माथ्यावर शांतपणे चरणारी एकाकी गुरं विमानातून पाहून चकित झालो. आभाळात घुसलेले डेहराडूनचे कभिन्न कडे पाहिले आणि त्याच्यावरची उंच वृक्षांच्या मशालींची मिरवणूक पाहिली. परार्ध सूर्यफुलांच तेज तोकडं पडेल, अशी पंजाबी कालव्यांचं पाणी पिऊन तट्ट फुललेली गव्हाची ताटं पाहिली. राजस्थानातल्या निर्मेघ, गार रात्री पाहिल्या. पंचमहाल जिल्ह्यातली ललेलाल फुलांनी पेटलेली जंगलं पाहिली. मध्य प्रदेशात सांबराचे कळप दौडताना पाहिले. गोवळकोंड्याच्या बुरुजावरल्या त्रिप्पाड ब्राह्मणवारी पाहिल्या. क्षिप्रेकाठचा कोवळा सूर्योदय पाहिला. नर्मदेचं नि तापीचं पूरपाणी पाहिलं. कन्याकुमारीच्या लडकावर सागरलाटांचा कल्लोळ पाहिला. चंद्रग्रहणाचा घोर अंधकार त्रिचनापल्लीच्या सुळक्यावरून पाहिला. उन्हाचा तोबरा ही काय जालीम चीज आहे, ते इटारसीत पाहिलं. माणसाचा पायरव न ऐकलेली केरळातली पुरातन जंगलं पाहिली. बाळबोध संस्कृतीचा अर्क, असा मंगेशीचा शुचिर्भूत परिसर पुन्हा पुन्हा पाहिला. बाणकोटपासून तेरेखोलपर्यंतचे मोजून सगळे हिरवेगार खाडीकाठ निरुद्देश हिंडून पाहिले. औदुंबरचे सावल्यांचे डोह पाहिले. स्वामी महाराजांनी जिथं लहरी वस्ती केली, ते उष्ण अक्कलकोटचं उद्ध्वस्त स्मशान पाहिलं. महाबळेश्वरची हिरवीकंच मखमली वनश्री डोळे भरून सुखात पाहिली आणि पाखरांच त्यांच्या मातृभाषेतलं अद्भुत स्तोत्रपठन पंच पंच उषःकाली, दवात न्हालेल्या रायगडावरल्या महाराजांच्या समाधीसमोर ऐकून श्रवणेंद्रिय कृतार्थ झाली. पंढरीच्या वारीबरोबरही चार पावलं चालून आलो. ढळक अशा शेकडो नद्यांत पोहलो

आनंदाचे हे भरलेले द्रोण माझ्या हातात आहेत. असा कितीसा खर्च आला, हे अक्षय सुखाचे यंत्र गोळा करण्याकरिता ?

फारच थोडा. मिळालेल्या आनंदाराशींच्या तुलनेत तर जवळपास नगण्यच. अतूट चकाट्या पिटण्यात वेळेचा जो आपण भुगा करतो आणि वरिष्ठांच्या नि खुशामतखोरांच्या चहाचिवड्यावर आपण जी सततची पदरमोड करीत सुटतो, त्यामानानं निसर्गाकडे जाण्यासाठी लागणारा वेळ अन् खर्च म्हणजे रुपयात दहा-पंधरा पैसे समजा. शिवाय आनंदतत्त्वात एक जादू आहेच. द्रोण समोर असतात ते फक्त प्यायचे. कितीही प्या, आनंदाचे द्रोण आपले पुन्हा काठोकाठ भरलेलेच असतात. कारण स्मृती हा बुद्धीचा घटक आहे.

लाव निघा किंवा जवळच जाऊन या, मन मोहोरणारी सुखं वेचायला पैसे बिलकूल लागत नाहीत. अजून तरी आकाशात ओथबलेले पावसाळी ढग पाहायला तिकीट काढावं लागत नाही तुळशीच्या मजऱ्याचा नि माळाच्या जावळाचा मंद गंध मन क्षणात पुलकित करतो, त्याला काय पैसे पडतात ? संत सोहिरोबाच कुठलही पद वाचून अतरीच्या दिव्याची काच स्वच्छ होऊ शकते. तुकारामाच्या कुठल्याही चार ओळी विनावेच वाचून, आजवर सांभाळीत आणलेलं विद्वत्तेच डबोलं पळभर विसरायला होत. श्रीमाताजींची किंवा अवतार मेहेरबाबाची विमल नजर पाहून जागच्या जागी विरघळायला होत. ती उमललेली नेत्रकमळं पाहायला काय पैसे लागतात ? केशवसुताची वा दुर्गाबाईंची कुठलीही चार पानं तुमच गर्वहरण लीलया करू शकतात. त्यासाठी किती खर्च येतो ? तुमच्या मनाला साद घालण्याच अमोघ सामर्थ्य डोंगरवाटात आहे नि टपोऱ्या चांदण्याचे किरण तुमच्यावर गारूड करू शकतात. जरा आठवून पाहा. आणि हेही आठवून पाहा, की तुम्ही विनबोभाट भोगलेले अवघे रेशमी स्पर्श, निरपेक्ष नजराणे म्हणूनच तुम्हाला नियतीकडून लाभलेले होते. त्यावेळी तुम्ही काय पैसे मोजले होतेत ? की श्रीमंतीच अवसान आणल होतत !

हार्डी खरच शहाणा. देहभान हरपून टाकणारी सारी सुख माणसाला फुकटात मिळतात, हे त्यानं ठीक ओळखलेलं होत, पण अहकारी आपण नीट न्याहाळून पाहत नाही, हा वांधा आहे.

रस्किनचे शब्द आहेत

To see clearly is poetry, prophecy and religion, all in one !'

आनंद अनाग्रत आहे. सुख आजूबाजूला तुडुब भरलेलं असत. येताजाता विना सायास कानावर पडलेले कुमार गधर्वांचे वा किशोरी अमोणकराचे दोन लख्ख स्वर अतः-करणात दिवेलागण करू शकतात. सुब्बलक्ष्मीच ' वेंकटेश सुप्रभातम् ' तुम्हाला विश्वातल्य-उच्चतर अतींद्रिय शक्तीच भान आणू शकत. दयाळ पक्ष्याची शीळ अजूनही हातातला काम विसरायला लावते. चांदणं मती गुंग करून टाकतं. बाळाची हाक मागे बघायला लावते. आपल्याजवळ मात्र हवी मोकळी नजर, कृतज्ञतेन ओसंडून वाहणार स्वागतशील हृदय आणि सगळ्या अनुभवाचा मेळ दैवी सकेताशी घालायला लागणारी क्षणाची कृतार्थ उसत.

ती उसत मला लाभली. मी भरपूर हिंडलो. फिरलो. आजूबाजूला पाहिलं. सार टिपून ठेवल. नि परतल्यावर शानपणे सगळ कागदावर उतरवलं. लेखक दुसरं काय करणार ?

दहा वर्षापूर्वी मी पद्मा ओलांडून पूर्वेकडे भटकून घेतलं. खूप दूरवर तळ्याच्या नि कमळाच्या मुलुखात पोहोचलो त्या श्रमंतीबद्दल मी नतर लिहिल होतं

'इतके पैसे, इतके दिवस, इतके श्रम वेचून आणि इतक्या हिकमती लढवून मी इथवर का आलो ? सृष्टीच हे सनातन रूप न्याहाळायला ? की नियतीला मला साक्षात दाखवून द्यायच होत, की कुठही जा, अगदी सरहद्दीवरच्या शेवटच्या वाडीमधल्या पाण्यात घुसलेल्या मातीच्या शेवटच्या ढेपळापर्यंत जा, माणसाची धडपड सर्वत्र एकच आहे ' शात, सहज आणि साध जीवन त्याला देवाच नाव घेऊन जगायच आहे. माणसं आपली शेती कसतील, मासे पकडतील, शिकार करतील, कोतवाली करतील, राबतील, खोपटात दिवा लावून चहा विकतील. देवाच भय आणि त्याच्या अमोघ कृपाप्रसादाची शक्यता ह्याची बेरीज-वजाबाकी करीत, साधं, युगानुयुग चालत आलेल शांतिप्रिय प्रार्थनामय आयुष्यच माणसं जगतील. दोन हजार निश्चित मैल मागे टाकून मी पूर्वेच्या पेटलेल्या सरहद्दीवर येऊन ठेपलो, ते केवळ माणसाच्या शांतिप्रिय, साध्या, सरळ जीवनाचा जयजयकारच सरहद्दीवरल्या आभाळात दुमदुमत असलेला ऐकायला.'

भटकतीतल्या माझ्या अनुभवाचा अर्क हाच आहे.

सृष्टीत पावलापावलाला जीवनाचा जयजयकार चालू आहे नि जगण्याचा ध्यास घेतलेल्या माणसाच्या खांद्यावर आनंदाच निशाण आहे.

☘ ☘ ☘

# श्रीरामकृष्ण परमहंसांचा गाव

♧ ♧ ♧

डोळे अनंत प्रकारचे असतात. विलक्षण वाचाळ असतात आणि पक्के अबोलही असतात. पाण्यासारखे पारदर्शकही असतात आणि शाळीग्रामासारखे गोंडस, पण थिजलेलेही असतात. कमळासारखे उमललेले असतात आणि संध्याछायांसारखे कोमेजलेलेही असतात. लपवणारे असतात आणि भलतेच ठकवणारे असतात. डोळे श्रावणातल्या कोवळ्या ओलसर उन्हासारखे आल्हाददायक असतात नि वैशाख-वणव्यासारखे रौद्र, प्रखरही असतात. काही डोळे जागच्या जागी बंदिस्त करणारे असतात, गारूड करणारे असतात. काही भेदरून टाकणारे असतात, काही जिवाला दिलासा देणारे— शहाळ्याच्या पाण्यासारखे असतात. डोळे असे अनंत छटा मुखरित करणारे असतात.

जन्मभर असे लाखो प्रकाशणारे डोळे बघत आलो; पण वाटचालीत फक्त दोनच डोळे असे भेटले, की ज्यांनी आपलं देवाबरोबरच जन्मोजन्मी गुंफत आलेलं नातं पहिल्या विमल कटाक्षातच मूकपणे सांगितलं. त्या डोळ्यांचे परमहंस धनी होते कलकत्ते-वाले श्रीरामकृष्ण.

गेली तीस-चाळीस वर्षं तरी फोटोतल्या त्या प्रमुदित नजरेनं मला अडवलेलं आहे, कुठं चाललास, म्हणून शंभरदा विचारलेलं आहे! मलाच नव्हे, तर अनेकांना जागं करायचा प्रयत्न केलेला आहे. तुमच्याकडून काहीही न मागणारी ती एक प्रकाशणारी, निरपेक्ष, वत्सल नजर आहे. कुठल्याही शूरवीराची वा महामुनीची नजर घ्या. कुठं ना कुठं आपला नि त्यांचा साधा जुळतो कुठं ना कुठं त्यांच्या नि आपल्या हृदयाची

स्पंदन सारखी उमटतात. नाडीचे ठोके सारखे पडतात. आपण सामान्य पोटभरू, संसारकरू, बाळबोध माणसं आणि ते अचाट बलशाली, हा ठळक फरक सोडला, तर विविध प्रकारच्या क्षुधांच्या पातळींवर तरी त्यांची नि आपली नातीगोती जमतात, कुळकुंडली जुळते.

दवात भिजलेल्या प्राजक्तासारखी कळीकोमल नजर लाभलेले श्रीरामकृष्ण परमहंस मात्र आपल्यापासून नुसतेच अलग पडलेले दिसत नाहीत, तर योजनेच्या योजने उल्लंघून पार पलीकडे थेट देवाच्या दरबारातच टेपी पोचलेले दिसतात. म्हणून ते परमहंस !

हा चालता बोलता परमहंस जिथे वावरला, ते दक्षिणेश्वर गाव आज ना उद्या पाहायचच, अशी खूणगाठ केव्हापासून मनाशी मारली होती.

कल्पनेतल दक्षिणेश्वर भलतच वेगळ होत, कलकत्त्यापासून शेकडो कोस दूर रानात सावल्यांच्या मंडपात पहुडलेलं होत. बोलून चालून श्रीरामकृष्ण पडले साधुपुरुष. त्याच शहरातल्या हजारपगड वस्तीत कामच काय असणार ? तुकारामाला होते, तसे डोह आणि डोंगरच त्याचे सखेसोबती. रानातले कावळे-कुत्रे त्याचे सोयरे आणि डोक्यावरच चद्रसूर्यांकित आभाळ त्याच एकमेव विश्रांतिधाम.

साधू राहतो आडरानी, हे मनान गृहीतच धरलेलं होतं. त्यामुळं कलकत्त्यातल्या बाजारात 'दक्षिणेश्वर' अशी पाटी लावलेली सिटीबस पाहिली, तेव्हा धक्काच बसला. वाटलं, दक्षिणेश्वर दोन-चार असतील. ही बस कलकत्त्यातल्याच त्याच नावाच्या भागात ये-जा करीत असेल. रामकृष्णाच पुस्तकात भेटलेल दक्षिणेश्वर शेकडो कोस दूर असेल; पण मनाचा हिय्या होईना. भीतभीतच कंडक्टरला विचारल,

'ही बस कुठ जाणार आहे ?'

'दॉक्षिणेश्वॉर.'

'कालिमाता मदिर जिथ आहे, नि रामकृष्ण परमहस जिथे पुजारी होते, तेच दक्षिणेश्वर ?'

'आता उत्तर द्यायला वेळ नाही. बसणार, तर बसा, नाहीतर बस चालली...'

ती बस मी चक्क सोडली !

कलकत्त्यात सगळीकडे असच आहे. कुणाला धड कसली माहिती नसते नि कुणी धड उत्तरंही देत नाही. सगळे वैतागलेले असतात. आपल्यालाच पाणी कापाव लागतं. बसअड्ड्यावर फुगीर गालाचा आणि बारीक डोळ्याचा एक सूटबूटवाला बंगाली दिसला. त्याच्याजवळ विषय काढला. तेव्हा त्यान अगत्यपूर्वक सांगितले,

'श्रीरामकृष्णाच दक्षिणेश्वर हा कलकत्ता शहराचाच एक भाग आहे. तो साधू होऊन गेला शे-पाऊणशे वर्षांपूर्वी. त्यावेळी दक्षिणेश्वर एक नदीकाठच खेड होत. आता काळ बदलला. आता तो कलकत्त्याचाच एक वॉर्ड झाला आहे. तुम्ही बसन अर्ध्या तासात तिथं पोहोचाल. वास्तविक, त्या कंडक्टरन तुम्हाला समजावून सांगायला हवं होतं. पण

बंगाल्यासारखे नालायक, घमेंडखोर दुनियेत दिसणार नाहीत.'

'एका बंगाल्यानंच असं सर्टिफिकीट द्यावं, म्हणजे जरा जास्तच वाटतं' मी म्हटलं.

त्यावर तत्परतेनं त्यानं उत्तर दिलं,

'मी आसामी आहे. मला बंगाली म्हणू नका. आम्ही तो आमचा अपमान समजतो.'

त्या सूटबूटवाल्याची क्षमा आणि आभार दोन्हीही मानून नंतरच्या बसनं दक्षिणेश्वरला निघालो.

माझगाव, रे रोड, डॉकयार्ड वगैरे बंदरपट्टीचा भाग दिसतो, तसाच आजूबाजूचा भाग ये-जा करणाऱ्या कामगारांनी आणि लॉऱ्यांनी गजबजलेला दिसला. क्षणभर मुंबईतच्या जी.पी.ओ.च्या पिछाडीच्या भागात आहोतसं वाटलं. हवा तशी, वातावरण तसं, उन्ह तसं, आणि बकालवस्तीही तशीच!

खुद्द दक्षिणेश्वर हे ठिकाण हुगळी नदीच्या तीरावर वसलेलं आहे. नदीचं विस्तीर्ण पसरलेलं तुडुंब पात्र कालिमातेच्या मंदिराच्या थेट अंगणातूनच वाहत आहे, म्हटलं, तरी चूक होणार नाही, इतकी नदी देवस्थानाला अगदी खेटून आहे. सभोवताली, नदीच्याकाठी नेहमी असते, तशी झाडी आहे. मधोमध साधं देऊळ आहे.

गर्दी अजिबात नव्हती. फुलविक्ये आणि चपला सांभाळणारे गरीब बंगाली गिऱ्हाइकांवर तुटून पडण्याचा मोका साधण्यासाठी अगदी टपून बसलेले दिसले.

रामकृष्णासारखा साक्षात्कारी तपोनिधी ह्या पावन अंगणात वावरत होता, हे खरंच वाटत नाही. कदाचित शंभर वर्षांपूर्वी हा भाग मोठा शुचिर्भूत आणि रम्य वनश्रीनं वेढलेला असेल आज तो बाणगंगेसारखा भक्त आणि पुजारी ह्यांच्यामधल्या आर्थिक देवाण घेवाणीचा आणखी एक अड्डा झालेला वाटला. देवळातल्या देवीची मूर्तीही इतर देवळातल्या देवतांच्या मूर्तींसारखीच बटबटीत वाटली. माझं मन तिथं मिनिटभरसुद्धा रमलं नाही.

समोरचा काठोकाठ भरलेला नदीचा भरघोस प्रवाह मात्र हाका मारीत होता. तिथं जाऊन नदीत पाय सोडून बसलो. क्षणार्धात मन फुललं. प्रवासाच्या कटकटीमुळं आणि देवस्थानातल्या बकालपणामुळं वाटलेला वैताग लुप्त झाला. नदीच्या पात्रातून मंदिराकडे पाहिलं. ती बाळबोध वास्तू आता शांत, सोज्ज्वळ दिसू लागली.

मनात आलं, शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वी ह्या भूमीवर काय प्रकार घडला असेल? रामकृष्ण नेमके इकडेच कसे ओढले गेले असतील?

श्रीरामकृष्ण परमहंस हे आपल्या महात्मा फुल्यांचे समकालीन आहेत. १८३६ मध्ये जन्म. १८८६ मध्ये निर्वाण. जेमतेम पन्नास वर्षांचं आयुष्य त्यांना लाभलं. पैकी

पहिली वीस वर्षं सामान्य पुजाऱ्यासारखी गेली. शाळेत गेले होते. रमले नाहीत. परत फिरले. जवळपासच्या धर्मशाळेत उतरणाऱ्या गोसाव्यांची सेवा करू लागले. त्यांना पाणी भरून दे, त्यांच्यासाठी लाकडं फोड, वगैरे. बदल्यात गोसाव्यांनी लहानग्या रामकृष्णांना भजन गायला शिकवली. ती विद्या त्यांना जन्मभर पुरली. रामकृष्ण हा गाणारा पुजारी होता. थेट मरेपर्यंत गाणं त्यांना साथ करीत होतं. मुळात ते ह्या दक्षिणेश्वराचे नव्हतेच. इथं त्यांना पुजारी म्हणून नोकरीला बोलावून आणलेलं होतं.

दक्षिणेश्वराचं मंदिर ही प्राचीन, स्वयंभू वास्तू नाही. रामचंद्रदास आणि रासमणी ह्या श्रीमान कोळी दांपत्याला देवीने स्वप्नात दृष्टान्त दिला, की 'गंगेकाठच्या कासवाच्या आकाराच्या ह्या भूमीच्या तुकड्यावर माझी प्रतिष्ठापना कर.' त्याप्रमाणे १८५५ मध्ये हे देऊळ बांधण्यात आलं. कुणी तरी पुजारी हवा, म्हणून रामकृष्णांना त्यांच्या आतांनी बोलावणं पाठवलं. ते आले नि म्हणाले,

'मी देवीची सेवा करेन, पण देवीच्या अलंकारांची जबाबदारी माझ्यावर नको. ती तुमची तुम्ही पाहा. मी फक्त आराधना करेन.'

रामकृष्णांच्या निरिच्छपणाचा हा पहिला टप्पा दाखला. तेव्हा ते वीस वर्षांचे होते.

तिथून पुढची तीस वर्षं त्यांची साधना प्रखर होत होत तिचं रूपांतर अलौकिक सिद्धीत झालं.

अहंकार वजा करीत करीत चैतन्यस्वरूपाचं सच्चिदानंद दर्शन घेणं आणि बाह्य-ज्ञानशून्य अशा समाधिस्थ अवस्थेत डुंबणं, असं त्यांच्या साधनेचं ढोबळ मानानं वर्णन करता येईल.

त्यांना एकदम, एकाएकी परमेश्वर वश झाला, असा प्रकार नाही. त्यांनी जबरदस्त किंमत मोजली. अहंकार गळून पडावा, म्हणून जानवं तोडलं, शौचकूप झाडले, पैसे नदीत फेकून दिले, वस्त्र पेटवून दिली. लग्न केलं, पण कडकडीत ब्रह्मचर्य पाळलं नि पत्नीलाही तिच्या अंगी वास करीत असलेल्या चिच्छक्तीची जागृती आणून दिली. रामकृष्ण हा एक असा अलौकिक संसारी साधू होता, की ज्यानं आपल्याबरोबर आपल्या पत्नीचंही दिव्य उन्नयन साधलं. ते तिची प्रत्यक्ष पूजाअर्चा करीत! म्हणत,

'देवी शारदे, तू त्या जगन्माऊलीचंच रम्य रूप आहेस.'

वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षापर्यंत रामकृष्णांची ही एकेरी साधना चालू होती. त्याच वर्षी तोतापुरी नावाच्या परमहंस साधूनं त्यांना समाधि-विद्येची दीक्षा दिली. गुरू तोतापुरींनं अकरा महिने दक्षिणेश्वरात वास्तव्य करून रामकृष्णांना गुरुपदेश केला. इथून, म्हणजे त्रेचाळिसाव्या वर्षापासून रामकृष्णांचं नवं आयुष्य सुरू झालं. पंचेचाळिसाव्या वर्षी नरेंद्रनाथ भेटला. तोच पुढे स्वामी विवेकानंद म्हणून प्रख्यात चेला झाला. स्वामी

ब्रह्मानद म्हणून दुसरा एक चेला होता. स्वामी विवेकानंद आणि स्वामी ब्रह्मानद ह्या दोन शुद्धाचरणी व्रती शिष्यासमवेत रामकृष्णानी शेवटची पाच-सहा वर्षं साधना बळकट करण्यात काढली. विशेष म्हणजे समाधिकाळातले आपले अनुभव, तेजाचा दिसलेला झोत, सच्चिदानदाची प्राशनक्रिया, वगैरे ते सर्वांना सविस्तर सागत.

पन्नासाव्या वर्षी त्याच्या गळ्याला गळू झाल. दुखण विकोपाला गेल. १८८६ साली त्यानी कलकत्त्याला देह सोडला. रामकृष्णाच उणपुर पन्नास वर्षांच आयुष्य हे अस सगळसोट आहे.

त्याचा उपदेश अगदी साधा आहे. ते सागत

मन नेहमी ईश्वराकडे लावा. सुरुवातीला कष्ट पडतील, पण प्रयत्न करीत राहा, म्हणजे मग भरपूर पेन्शन भोगायला मिळेल. देव सर्वांना दर्शन देईल. फक्त मार्गातले अडथळे बाजूस सारा. लाज, घृणा आणि भय ह्या तिन्ही अवस्था सोडून द्या. कांचन-कामिनीचा त्याग करा. पाप करू नका. ईश्वर तेवढा एक सत्य आहे. तो भेटावा, म्हणून नामस्मरण करा. तो जरूर भेटेल.'

आजच्या दक्षिणेश्वरात ह्या उपदेशातल एकही अक्षर कुणी गिरवीत असेलसं वाटल नाही. देवळांच्या सभोवार बाजार असतो, तसाच इथ आहे. इथल्या वातावरणात कुणाला साधना करण्याला बळ येईल, असाही भाग नाही. आणि देवाच्या दर्शनाची साधना करण्याचा विचार कुणाच्या मनात येईल, असा सध्याचा चचल काळही नाही. देव देवाच बघून घेईल, देश देशाच बघून घेईल, आपण आपल पाहून घ्याव नि मोकळ व्हावं, असा पायाखालून भरभर सरकणारा भगभगीत कोरडा काळ आज आलेला आहे. ह्यात दोष कुणी कुणाला द्यायचा ?

काळाच पाणी बदललं, पण नदीच पाणी मात्र रामकृष्णाच्या व्रती काळात होत, तसंच आहे. तट्ट फुगून नदी सागराच्या दिशेन वाहत आहे. तिच्या आरस्पानी प्रवाही पात्रावर सूर्यास्ताचे तिरपे, पोपटी-पिवळसर किरण पहुडले आहेत. प्रवाहावर लाटा आहेत. त्या लाटांच्या खळग्यात किरण पडतात आणि क्षणात तिथं तेजाचा थरथरता झगझगीत द्रोण तयार होतो. दुसऱ्या क्षणाला तो लुप्त होतो दुसऱ्या ठिकाणी मग दुसरा तेजोद्रोण तयार होतो. तेजाचे असे हजारो सळसळते लखलखीत लोलक वाहत्या पाण्यावर चकचकतात.

सूर्यकिरणाचा तो खेळ बराच वेळ पाहून घेतला.

मग सूर्य मावळला. फुलं कोमेजावीत, तसे किरण निमाले. तिन्हीसाजा झाल्या. परतण्याची वेळ झाली होती, म्हणून पुन्हा एकदा मंदिरात गेलो.

आता भाविकांची वर्दळ वाढली होती. रांगेत उभं राहावं लागलं. राहिलो. देवीच

रूप निरखून पाहिलं. ते रौद्र वाटलं. परत फिरलो

काळोखातल्या नदीचं दर्शन घ्यावं, म्हणून पुन्हा नदीकाठावर आलो, तर अवघ्या पंधरा-वीस मिनिटांत तिथं साऱ्या चराचर सृष्टीचा कायाकल्प झालेला होता. दूर क्षितिजावर नारिंगी रंगाचं चंद्रबिंब तरंगत तरंगत आलं होतं आणि त्याच्या शीतल चांदण्याचा सौम्य चंदेरी शिडकावा त्या विमल जलौघावर बरसलेला होता.

पाण्यावर पसरलेल्या त्या अद्भुत, अपार्थिव तलम चांदण्याचं आणि रामकृष्णाच्या शांत, वत्सल, पारदर्शक नजरेचं अगदी जिवाभावाचं नातं असल्याचं मला क्षणात जाणवलं.

मी नमस्कार केला.

* * *

# मद्रासची सुप्रभात

पहाटेच्या भगव्या प्रकाशात मद्रास जवळ जवळ येत आहे.

मी खूश आहे. कारण समोरच ओल ऐलपैल तृप्त दिसत आहे. पावसाची एक हलकी सर नुकतीच येऊन गेलेली असणार.

वाटलं, कुठल्याही शहरात प्रवेश करावा, तर ऐन रामप्रहरीच. सारं वातावरण कसं तुपक वाटतं त्यावेळी. भगभगीचं नाव नसतं. प्रकाशाच्या मंदरंगी पाकळ्या दूर कुठं तरी तुमच्या नकळत उमलत असतात. दिशा डोळे उघडीत असतात. वस्तीतली घरं जागी झालेली नसतात. फक्त पाखरं तेवढी तरतरीत झालेली असतात. अशा पारदर्शक वेळी ते निरव शहर तळ्यातल्या टवटवीत कमळासारखं आपल्याला खुणावू लागतं. आपण त्याच्याकडे स्वेच्छेनं ओढले जातो. स्वेच्छा आहे, तिथं निःशब्द सुखाचं अभिवचन आहेच. आणि उभयपक्षी तल्लीन राजीखुशी आहे.

यालाच शास्त्रात स्वर्गसुख अशी निष्कारण बाऊ केलेली संज्ञा आहे.

गोड क्षण आठवून पाहा.

गाडी उपनगरं ओलांडत चाललेली आहे. खुद्द मद्रासच्या अलीकडे घरांची गिचमीड नसलेली आटोपशीर गावं आहेत. वस्त्या भाताच्या खाचरांनी वेढलेल्या आहेत. झाडामाडांनी त्याच्यावर विरळ सावल्या धरलेल्या आहेत. शेतांच्या पावटण्या पार क्षितिजाला भिडल्या

आहेत. ह्या गावातून ढेगभर चालायचं म्हटलं, तरी पाण्यानं डबडबलेली एक दोन तरी शेतं ओलांडावीच लागतील. भोवताली पाहावं, तिथं भातशेतीच दिसत आहे. शेतात गुरं, गुरामागे गायबगळे. वर स्वच्छ आभाळ पूर्वेला शेंदरी प्रकाशाचे सुईनळे. कुठं कुठं शेतकरी शेताकडे निघालेले दिसले. पिकाऊ भूमीचं सतेज आव्हान आणि बाहुबली नागऱ्याचं पिढ्या-पिढ्यातून झिरपत आलेलं शहाणं कसब ह्यांचा मीलनक्षण समीप आला आहे. तसा तो येताना मला चक्क दिसत आहे.

चकाकत्या क्षितिजाखालच्या ह्या विपुल भूमीबद्दल आणि अवघं भवितव्य सर्वस्वी पाऊसपाण्याच्या मर्जीवर अवलंबून असलेल्या इथल्या कफल्लक ग्रामस्थाबद्दल तामिळ लेखकानी दंग होऊन लिहिलं असणार. डोक्यावर तरंगणाऱ्या ह्या ढगानी, ह्या शेतानी, ह्या तृणपर्णांनी नि पशुपक्ष्यांनी त्या तामिळ सारस्वताना लेखनाकडे वळवलं असेल. इथल्या देशप्रेमी कवींनी ह्या भूमीची गौरवगाणी आणि भूमिपुत्रांची गोपाळगाणी लिहिण्यात जन्म वेचला असेल.

मला महाकवी सुब्रह्मण्य भारतींची आणि त्यांच्या तामिळ भाषेतल्या ‘ वंदेमातरम् ’ची दाटून आठवण आली. भारतींनी समस्त भारतीयांच्या भाग्याबद्दल लिहिलं, तरी प्रत्यक्षात त्यांच्या नजरेसमोर होता कष्टाळू नि सोशीक तामिळ ग्रामस्थ आणि हीच समोरची काळी माती आणि निळे नदीनाले.

शुष्क शून्यातून थेट परार्धाकडे, हाच लोकोत्तर लेखकाच्या नजरेचा अवक्र प्रवासमार्ग असतो. समोर प्रकाशाचा पिंपळ सळसळत आहे, शेतं पाण्यासारखी पसरली आहेत, मंजुळवाणी पाखरं देवाच्या राज्यातले कृपाभोग यथेच्छ भोगताहेत नि माणसं घाम गाळताहेत, ह्या घमघमीत दृश्यानं जातिवंत लेखक पालवलाच पाहिजे. जसं तलाव पाहिल्यावर पोहावसं वाटलं पाहिजे, मोकळा माळ दिसल्यावर वारा पीत हुंदडावंसं वाटलं पाहिजे, तसं सृष्टीचा पेरता हात दिसल्यानंतर लिहावंसंच वाटलं पाहिजे

आगगाडीत माझ्या समोरच्या बाकावर बसलेलं तामिळ दांपत्य, मद्रास समीप आलं, म्हणून आनंदित झालं आहे. बांधून ठेवलेले बोजे परत परत मोजीत तो गृहस्थ बायकोला काहीतरी सांगत आहे नि दरवेळेला ती आकाशाकडे बघून हात जोडते आहे. स्टेशनवर आपला लेक उतरवून घेण्यासाठी आला, तर बरं होईल, बुवा, असं काहीतरी तो सांगत असणार आणि देव जे काय करेल, ते खरं, असं त्याची बायको म्हणत असणार, असा माझा तर्क आहे. सहज बोलायचं, म्हणून मी विचारलं,

‘ गाडी ठिकाणावर लवकर पोचते कधी नि आपण कामावर रुजू होतो केव्हा, अशी काळजी लागलेली दिसत्याय् तुम्हाला ! ’

‘ नो–नो ’ तो सांगू लागला, ‘ नुकताच मी सेवानिवृत्त झालो. चीफ इंजीनियर होतो. ’

‘ चीफ इंजीनियरच्या हुद्द्यावरचा अमलदार ह्या दुसऱ्या वर्गाच्या बाकड्यावर

कसा काय ? ' मी आश्चर्य व्यक्त केलं.

उत्तर :

' पेन्शन ! इंग्रजीत एक कविता आहे—डेथ दि लेव्हलर. मृत्यू सर्वांना एकाच पातळीवर आणतो. त्याच्या अगोदरची पायरी म्हणजे पेन्शन ! पेन्शन सर्वांचाच नशा उतरवते. चीफ इंजीनियर असो, नाहीतर ग्रेड टू क्लार्क असो, पेन्शनीत निघाल्यावर दोघेही चूपचाप समान होतात. दोघेही नगण्य होतात. '

' चीफ इंजीनियर म्हणून काम करताना कसं वाटलं ? '

' उत्तराला अनेक पदर आहेत. मी ब्राह्मण. राज्यकर्ते बहुजनसमाजी. तेव्हा माझी जात ही त्यांना एक कायमचीच डोकेदुखी होऊन बसली. तशात, हरामाच्या पैशाला स्पर्शही न करण्याची मी शपथ घेतलेली. आणि तुम्ही जाणताच, पी.डब्ल्यू.डी.मध्ये चाकरी करायची नि गैरव्यवहारांपासून दूर राहायचं, म्हणजे समुद्रात पोहून पुन्हा अंग सुकं ठेवण्याचा पराक्रम करण्याचाच प्रकार ! '

' मग तुम्हांला धकलं कसं ? '

' उत्तम रीतीनं धकलं ! मी एक पायवाट काढली. प्रत्येक खात्यात काही बिलंदर खटपट्ये असतात. ते कामाला वाघ असतात नि शिवाय त्यांना पापपुण्याच्या फारसं विधिनिषेध नसतो. असा एखादा फक्कड माणूस मी हेरायचा नि त्याला विश्वासात घेऊन सांगायचा, की बाबा, रे, तू सगळी व्यवधानं सांभाळ; जो काही प्राप्त व्यवहार करायचा असतो, तो कर नि टक्केवारी कुठं पोचवायची असेल, तिथं पोचव. फक्त मला सांगूही नकोस नि त्या लफडेबाजीत गुंतवूही नकोस. पाप वाचाळ असतं; तुझी करणी माझ्या कानावर येईलच, पण मी तिकडं साफ दुर्लक्ष करेन. मात्र सर्व जमाखर्चाची जबाबदारी तुझ्यावर. तुम्ही लोक मनसोक्त राज्य भोगा. फक्त ह्या ब्राह्मणाला शुचिर्भूत राहायचं आहे, तर तेवढी मुभा द्या नि माझा नोकरीतला शेवटचा दिवस गोड करा ! ' '

' छान. '

' आणि, अशी छत्तीस वर्षं काढली, महाराजा ! मी निष्कलंक आहे. आता चरकातून मोकळा झालो, म्हणून ह्या पत्नीसमवेत देवधर्म करून आलो. अमरावेला गेलो होतो. '

' इतक्या उच्च पदावर काम केल्यावर देशाच्या एकूण भवितव्याबाबत तुम्हांला काय वाटतं ? ' मी विचारलं.

' सांगतो, ऐका. लाचलुचपत लोकांच्या अंगवळणी पडेल संस्कृतीची पडझड होईल, शेतकरी बंडारतील. ब्राह्मण अलग पडलेच आहेत दिवसेंदिवस त्यांचा जास्त द्वेष केला जाईल. पैशासाठी नव्हे. ब्राह्मणाच्या उदंड उपभोगक्षमतेबद्दल उरलेले सारेजण डाफरतील. देखणेपण, गुणवत्ता, शांत कार्यपूर्ती, मध्यममार्गी चाल, शुचिर्भूत राहणी, सभ्य भाषा, वेळेचा सदुपयोग आणि सख्त धार्मिक कर्मकांड, हे ब्राह्मणाचे किल्ले अबाधित राहतील. सरकारी नोकरीत ब्राह्मण शोधूनही सापडणार नाहीत. पण खाजगी उद्योगधंद्यात ते हरळीसारखे सर्वत्र पसरतील. यापुढे कायद्यानं जो जाईल, त्याला हात

चोळत बसावं लागेल. म्हणून गैरव्यवहार फार होतील. आंध्र फार पुढं जाईल. कारण आंध्रात पाण्याची लयलूट आहे. पुढेमागे तिथं कालव्याचं जाळं दिसेल. वीजनिर्मितीही होईल. शेती आणि यंत्रोद्योग ह्या दोन्ही आघाड्यावर आंध्राचा पहिला क्रमांक राहील. तामिळनाडूत वाळू फार, म्हणून तामिळ मागे पडतील. पण पुळणीवरल्या खेकड्यासारखे ते नव्या नव्या बिळात शिरतील.'

इंजीनियरसाहेब बिलकूल भाबडे वाटले. विषम समाजरचना आणि सरंजामशाही मूल्यं, हीच आपल्या साऱ्या अनर्थकारक दुःखाची मुळं आहेत, हे त्यांच्या गावीही नाही! चोरटे व्यवहार मात्र ह्या देशात बेफाम वाढणार, अशी लक्षणं आजच आहेत. हरामी निश्चितपणे वाढेल. पण माणसंही इतकी वाढतील, की कुणावर पाळत ठेवणं अशक्यप्राय होईल खाणारे खातील. न खाणारे न खातील. आणि दोन्ही गोष्टींत नवलाई नसेल. कारण इतक्यांची मोजदाद कोण करणार? तामिळनाडूत असो, बंगालात असो अगर पंजाबात असो, रूप जातीवर अवलंबून नसेलच, असं नाही. आपण उष्ण कटिबंधातली माणसं. त्यामुळं गोऱ्या, सडसडीत, रूपवान माणसाची ह्या देशात नेहमीच सरशी असेल. पैसा, सत्ता, मग्रूरी आणि चातुर्य ह्यांचा जगजग पछाडून घडवून आणलेला मिलाफही देखणेपणातली कसर भरून काढण्यात लंगडाच ठरेल. बिलंदर पैसे मिळवू शकतील, वरकड सुखं लुटतील; त्यांचा डामडौल असेल; तात्पुरता उदो होईल. पण रूपवान माणसासमोर किंवा रूपवानांच्या विशिष्ट जातींसमोर एरव्हीचे सारे चतुर शक्तिमान चक्क नांग्या टाकून न्यूनगंडाचे धनी मात्र होतील. गोड रूप ह्या विषम देशात सतत बाजी मारत राहील, ही दगडावरची रेघ!

अर्थात, इंजीनियरसाहेबांच्या बोलण्यातला ठोकळेबाजपणा वजा करता, तळाशी चमचाभर सत्य उरतंच. तामिळनाडूत वाळूनं नुसता उच्छाद मांडला आहे. प्राय. प्रत्येक शेतात वाळूचा एक हलका तवंग साचलेला दिसतोच. वाऱ्याबरोबर वाळूचे सूक्ष्म कण वाहून येतात. तिला अटकाव करण्यासाठी जागोजाग सुरूच्या घनदाट बागांच्या फळ्या लावलेल्या तामिळनाडूत पावलापावलाला दिसतात.

मद्रासच्या वेशीत शिरताना सुरूच्या बनांचा हा तारणहार सर्वत्र दिसत आहे.

भल्या सकाळी मद्रास सेंट्रल स्टेशनापासून जवळच असलेल्या महाराष्ट्र मंडळाच्या प्रशस्त जागेत चबूतवाळ टाकलं. मद्रासमधल्या मराठी मंडळींनी महाराष्ट्रातल्या पाहुण्या बांधवांच्या सोयीसाठी उभी केलेली रॅण्डॉल मार्गावरली ही अद्ययावत इमारत म्हणजे एक चित्ताकर्षक वास्तू आहे. ह्या स्वच्छ वास्तूचा पताकागुण म्हणजे तिथं पाऊल पडताच पाथस्थाच्या मनावर समाधानाची लाट दुडदुडत येऊन बिलगते. शांत, निरव टापू, ऐसपैस क्षेत्र, स्वच्छ परसू, उंच झाडांची दाट छाया, शहरात राहणाऱ्या मराठी नोकरदारासाठी सोईस्कर खोल्यांची इमारत, मोकळी हवा, भरपूर उजेड, प्रवाशासाठी विश्रांतिगृह, सर्व बाजूंनी मोठ्या लांबरुंद ओवऱ्या काढलेला प्रशस्त हॉल, मोकळं स्वयपाकघर आणि

एकूणच घरगुती मराठी वातावरण, ह्या सर्वांची गोळाबेरीज म्हणजे मद्रासचं महाराष्ट्र मंडळ.

आम्ही गेलो, तेव्हा अंगणात पिवळ्या नाजूक फुलांचा सडा पडलेला होता नि झुपकेदार धीट खारींचा लपंडाव निर्धास्त चालला होता. मद्रासेत आल्या आल्या फुलांनी, खारींनी आणि प्रभातीच्या प्रकाशलोटांनी स्वागत केलं. जिवाची कळी खुलून गेली.

आपल्या कल्पनेपेक्षा मद्रासेत मराठी मंडळी अधिक आहेत. जवळपास पन्नास हजार मराठी कुटुंबं इथं स्थायिक झालेली आहेत. पण त्यांच्या पाच-पंचवीस पिढ्या इथं राहिल्यामुळं त्यांचं मूळचं मराठीपण आता पार लुप्त झालं आहे. तीनशे वर्षांपूर्वी तंजावरला व्यंकोजीराजे आले, तेव्हा त्यांच्या आश्रयानं हे मराठी दळ इथं आलं. काम झाल्यावर ती मंडळी माघारी वळली नाहीत. ते इथंच बामधाम करीत राहिले. त्यांनी द्राविडी रीतिरिवाज स्वीकारले आणि पचवले. आपली आपटे, भोसले, दळवी, रेगे वगैरे आडनावं झटकून टाकली. त्याऐवजी दाक्षिणात्य पद्धत्यनुसार रघुनंदन आपटे आता ए. रघुनंदनराव असं नाव लावतो. शंकर भोसले, बी. शंकरराव आणि विनायक दळवी, डी. विनायकराव अशी नावं लावतात. ज्यांच्या नावापुढे 'राव' आहे, ते पूर्वाश्रमीचे मराठेच. अशी कात टाकलेली मराठी मंडळी तामिळनाडूत हजारांनी आहेत. काळाच्या ओघात ती घराणी पूर्णपणे तामिळी झाली आहेत. फक्त घरात तेवढं मोडकं तोडकं जुनं मराठी बोलतात. ह्या एक-दोन पिढ्यांत तेही संपेल.

ह्या तमाम मराठी मंडळींचा नि महाराष्ट्र मंडळाचा काडीमात्र संबंध दिसत नाही. अलिकडच्या काळात दोनएकशे मराठी कुटुंबं व्यवसाय-धंद्यानिमित्त मद्रासला मांड मारून बसली आहेत. कुणी व्यापारी, कुणी यंत्रविशारद, तर दादा मिराशींसारखे कुणी तरबेज सिनेमावाले. ह्यातल्याच ठळक, मनमिळाऊ मंडळींचा नि महाराष्ट्र मंडळाचा कारणपरत्वे संबंध येतो. ते सालोसाल सार्वजनिक गणेशोत्सव वगैरे करतात. नाटकं, खेळ, गाणी, वगैरे प्रसंगोपात्त होतात. ह्यातल्या फडके, पटवर्धन, मिरजकर, दांडेकर, वगैरे कारभारी मंडळींनी ह्या महाराष्ट्र मंडळासाठी बरीच झीज सोसली. त्यांच्या मोठ्या तसबिरी मंडळात लावल्या आहेत. पैकी मिरजकर फार दानशूर धनिक होते, म्हणे. सध्या जोग, सूर्यंकर, श्रीधर लिमये, वगैरे मंडळी मंडळात काम करतात.

सूर्यंकर मंडळाचे व्यवस्थापक चिटणीस आहेत. माणूस अगदी साधा. गरीब. नागपुरी

'नागपूरवाले तुम्ही इथं मद्रासला कसे काय आलात?' मी विचारलं.

'इथं मद्रासेत मराठी कुटुंबं आहेत. त्यांच्या मुलाबाळांसाठी मद्रास नगरपालिकेनं एक मराठी प्राथमिक शाळा कर्तव्यबुद्धीनं चालवली आहे. तिथं मी प्राथमिक शिक्षक म्हणून लागलो. सुरुवातीला तात्पुरता म्हणून आलो. त्या गोष्टीला तीस वर्षं झाली! आता इथंच स्थायिक झालो.'

'तुमची मराठी शाळा नीट चालली आहे?'

' पूर्वी इथली मराठी मंडळी आपल्या मुलांना कटाक्षानं मराठी शाळेत घालत. तेव्हा आमची शाळा तेजीत होती. आता कॉन्व्हेंटच फॅड आलंय्. साहजिकच आमची मराठी शाळा ओस पडल्याय्. इमारतही मोडीतच निघाली आहे. पण कायद्याप्रमाणे एक मराठी शाळा चालवलीच पाहिजे. अल्पसंख्याकांचा तो अधिकार आहे, म्हणून मराठी शाळा आहे, म्हणायचं. पण जवळ जवळ ती नसल्यातच जमा आहे. मी एकटाच शिक्षक इथं शिकवतो. इथली मराठी मुलं बघता बघता तामिळ शिकतात. मग मराठी शाळा हवीच कशाला ? पण मराठी शाळा नाहीसं म्हटलं, तर आंदोलनाची भाषा सुरू होते ! म्हणून तूर्त ताकापुरतं रामायण चालू आहे. '

' नोकरी संपल्यावर तुम्ही नागपूरला परतणार ? '

' कशासाठी परतायचं ? आणि तिथं जाऊन खायचं काय ? त्यापेक्षा इथं टीक चाललंय् माझं. मुलंबाळं इथंच रुळली आहेत. उत्तम तामिळ बोलतात, वाचतात, लिहितात. ती इथंच नोकऱ्या करतील. तसं मद्रास राहायला फार छान आहे. मुख्य म्हणजे शांत आहे. कटकटी नाहीत. बऱ्यापैकी स्वस्ताई आहे. भगभग नाही. वर, आधाराला मराठी मंडळीही भरपूर आहेत. नि इथं मंडळात तर आपल्या लोकांची सारखी ये-जा चालूच असते. मद्रासमध्ये मी सुखी आहे.

>

महाराष्ट्र मंडळाच्या आवारात पाण्याच्या बेगमीसाठी विहीर खणायचं काम निघालं आहे. त्यानिमित्तानं मंडळातले म्होरके कारभारी आपापल्या गाड्या घेऊन हजर झाले. सगळे उत्तमपैकी सुखवस्तू वाटले. बोलण्यातून बोलणी निघाली. एक मराठी तरुण गृहस्थ इथं मद्रासला वरिष्ठ खातेप्रमुख म्हणून बदलून आले आहेत. मद्रासी अंमलदार आणि इतर प्रांतातले मदतनीस, हे चित्र तसं सर्वत्र दिसतं. मात्र मराठी अधिकारी आणि मद्रासी कारकून त्यांच्या हाताखाली मान मोडून काम करताहेत, असं दृश्य कधी पाहिलेलं नव्हतं. म्हणून हा नवा नातेसंबंध कसा वाटतो, असं त्यांना विचारलं.

ते म्हणाले,

' इथला तामिळी माणूस प्रांत सोडून बाहेर पडला, की कामाला मोठा वाघ असतो. मद्रासी कारकून मुंबईत मान मोडून काम करतो, कारण त्याला तिथं स्पर्धेत टिकायचं असतं. इथं मद्रासमध्ये तो जणू आपल्या घरीच असतो. तेव्हा आपण काम केलं काय नि न केलं काय, सारखंच, अशी त्याची भावना असते, त्यामुळं इथले तामिळ कारकून कामचुकार नि कागाळखोर असतात. सारखे एकमेकाविरुद्ध तक्रारी आणतात नि केबिनीबाहेर पडले, की गळ्यात गळा घालतात. ते आपापसांत काय बोलतात, मला कळत नाही. मला घोर लागलाय्, की कचेरीची कामं निपटायची तरी कशी ? एकतर हे ऑफिसात नेहमीच उशिरा उगवणार. आल्यावर प्राथमिक विश्रांती घेणार. मग किरकोळ कागाळ्यांना सुरुवात होते. फायली उघडण्यात पहिला तास जातो. मग टिफिन इथं दक्षिणेत टिफिनींचं भलतंच प्रस्थ आहे. जो तो टिफिन खात असतो. बंगलोरमध्ये नि

हैद्राबादेत तर ह्या टिफिनींनी नुसता उच्छाद माडलाय्. बंगलोरात कुठल्याही कचेरीत जा नि विचारा 'नागेश्वरराव कुठाय्?' उत्तर मिळेल, 'टिफिनला गेलाय्.' हैद्राबादेत जा नि विचारा सेतुपति कुठाय्?' उत्तर मिळेल, 'टिफिनला गेलाय्.' टिफिन-टिफिन-टिफिन. टिफिन संपल्यावर हे कामचुकार कर्मचारी डेस्कवरच डोकं टेकून डुलकी काढतात. मग थोडस काम केल्यासारखं करतात. सगळा नुसता देखावा. आणि नंतर घरी जाण्याची सर्वांना एकच घाई! तुम्हाला सांगतो, ह्या आपल्या देशात आजकाल कुणी मुळी कामच करीत नाहीत! नुसता पगार खातात. आणि काही सांगायला गेलं, तर काहीच्या काहीच आर्ग्युमेंट करतात! त्यापेक्षा असं वाटत, की आपण गप्प राहावं नि स्वत:च काम करावं.'

मद्रासमध्ये उन्हं लवकर होतात. मी टक्क उन्हातून चक्कर मारायला बाहेर पडलो. दोन पावलं चाललो नाही, तोच एका भिंतीवर 'NO GOD' अशी घोषणा लिहिलेली दिसली. आजवर मी अनेक घोषणा पाहिल्या चळवळींच्या दिवसात काही स्वतःच लिहिल्या. पण देवाधर्माला टपली मारणारी ही पहिलीच घोषणा दिसली.

त्या भिंतीच्या समोर पेरियार स्मारकाची उंच इमारतही दिसली. त्या इमारतीच्या दर्शनी भागावर काचेचे रंगीत खडे बसवून रामस्वामी पेरियारच डोळ्यात भरणार चित्पाड भित्तिचित्र मोठ्या कसबी हाताने तयार केलं आहे.रामस्वामी पेरियार म्हणजे द्रविड कळघम् ह्या तामिळी सत्यशोधक चळवळीचे भडक संस्थापक आणि उग्र प्रसारक.

मद्रासला ऐन उन्हाळ्यात येण्यात माझे काही हेतू आहेत. तामिळनाडूतली ब्राह्मणेतराच्या अस्मिताजागृतीची द्वेषमूलक स्फोटक चळवळ कशी कशी वळण घेऊन किती प्रकाराने फणा उभारीत आहे, पिढ्यान् पिढ्याच्या पराभूताच्या मनात दबा धरून बसलेल्या भीतीचे स्फोट अवसर मिळताच हिंमक मार्गाने विध्वस कसे करीत आहेत आणि ह्या सर्व दाहक दिव्यातून माणस आपली वेळ कशी निभावून नेत आहेत, हे सार महाकाव्य वाचण हा प्रधान हेतू. पूर्वेच्या हिरव्या समुद्रात होणारा भगवा सूर्योदय पाहणं आणि विपुल ऊन-पाऊस पिऊन तरारलेली उंच रानं पाहण, हे दुसरे अस्पष्ट हेतू. खरं म्हणजे मला सामान्य तामिळी माणसाच्या ऐहिक सुखदुःखाची नाडी तपासायची आहे. तेव्हा सलामीलाच 'NO GOD'ने दचकवलं, हे उचित झालं.

आपल्याकडे महाराष्ट्रात सत्यशोधक समाज हा हरामी वृत्तीच्या लुटारू पुरोहित वर्गाचा वरचश्मा झुगारून देण्यासाठी जन्माला आला. मद्रासेत परिस्थिती वेगळी आहे. दाक्षिणात्यांना उत्तरेकडून आलेल्या आर्यांचं सांस्कृतिक आक्रमण आणि ब्राह्मणी कर्मकांडाच फाजील स्तोम फेकून द्यायच आहे. कारण आपण पक्के द्रविड आहोत, आपली सस्कृती भिन्न आहे, भाषा स्वयंभू आहे आणि रीतिरिवाज अगदी वेगळे आहेत, अशी त्यांची तीव्र भावना आहे. दक्षिणेत एका पिढीपूर्वी सोवळ्या-ओवळ्याचा कहर होता. चाळ एक,

नळ दोन, हे गणित वज्रलेप होत. एक नळ फक्त ब्राह्मणासाठी. दुसरा उरलेल्या सर्व क्षुद्रांसाठी! एक गाव, एक पाणवठा, ही स्थिती कल्पनेतसुद्धा दक्षिणेत अशक्य. चांडाळ-विटाळाच्या कटकटी पावला-पावलाला. हरिजनांना तर जनावरापेक्षाही हीन जीवन जगायला लावायचे. शेवटी ह्या दांभिक पोथीनिष्ठांच्या क्रूर अन्यायाविरुद्ध दंड थोपटण्यासाठी बहु-जनसमाजातूनच दोन समर्थ बाहुबली उभे राहिले. केरळात नारायणगुरु, तामिळनाडूत रामस्वामी पेरियार.

रामस्वामी पेरियारांचा उभा जन्म म्हणजे एक वणवाच होता. शंभर वर्षांपूर्वी ते सधन बहुजनकुटुंबात जन्मले. आयुष्याची पहिली चाळीस वर्षे ते काँग्रेसचे कार्यकर्ते होते. परंतु पुढेपुढे सदैव वर्धमान अशा सर्वव्यापी ब्राह्मणी साम्राज्यवादाच्या सरळसोट दडपणाचा त्यांना उबग आला आणि अवघ्या ब्राह्मण्याला सुरुंग लावण्यासाठी ते आखाड्यात उतरले. त्यांनी ब्राह्मणांना सर्व प्रकारचे पेच घातले. देवपूजेवर बहिष्कार, मंदिर-प्रवेशावर बहिष्कार, पुरोहितावर बहिष्कार, कर्मकांडावर बहिष्कार, हिंदी भाषेवर बहिष्कार, अशा सख्त नकारात्मक चळवळी त्यांनी जन्मभर समरसून केल्या. परदेशात स्थायिक झालेल्या तामिळ मळेमजुरांमध्ये ब्राह्मण्याचा तिरस्कार निर्माण करण्यासाठी परदेशी दौरे काढले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची बृहद् चळवळ उभारली. हिंदीविरुद्धच्या आंदोलनात दोन वर्षे कैद भोगली. घटना जाळली. गणेशाची यथेच्छ टिंगलटवाळी केली. रामाची नि रामायणाची अगदी ऐसीतैसी केली. जन्मभर फार साधेपणाने शेतकऱ्यासारखे जगले. काळा, पायघोळ खमीस, पिकलेल्या दाढीचं जंगल, भव्य टकलाचा घुमट, डोळ्याला चष्मा आणि हातात भक्कम काठी हा त्यांचा कधीच न बदललेला वेष होता. इथे आपल्या कर्मवीर भाऊराव पाटलांची आठवण येते.

पुढे ह्या विरागी लोकयोद्ध्याचा तोल ढळला. जनहितरत अशी ह्यातीची सत्तर वर्षे टक्कर देत देत ढकलल्यानंतर एकाहत्तराव्या वर्षी त्यांनी मणिअम्माईबरोबर लग्न केलं. वास्तविक पाहता लग्न करायचं, की न करायचं, केव्हा, कुठं करायचं, कुणाबरोबर करायचं, हे रामस्वामींचे बिलकूल खाजगी प्रश्न होते. त्याबाबत निर्णय घेण्याला त्यांचे ते मुखत्यार होते पण त्यांच्या चेल्यांना गुरूचं हे उतारवयातलं लग्न म्हणजे त्यांचं नैतिक स्खलनच वाटलं! अण्णादुराई वगैरे पट्टशिष्य, गुरुमाऊलीच्या ह्या विवाहानंतर खतावून फार दूर गेले, कळपातून फुटले आणि भीडभाड न बाळगता उजळ माथ्यानं त्यांनी गुरूच्या छाताडावर बसून स्वतंत्र पक्षाचं तोरण बांधलं.

तरुण, निःस्वार्थ, निष्कलंक आणि वाणीचा चित्ता असलेल्या लेखनपटु अण्णा-दुराईंच्या सरसर उदयानंतर पेरियारगुरुजी पूर्णतः निष्प्रभ झाले. त्यांचा सूर्य मावळला. अर्थात गप्पगार पडून राहणं पेरियारांच्या रक्तातच नव्हतं. त्यांनी नवी पाऊलवाट शोधली. बुद्धधर्माशी प्रेमवळण सुरू केलं. ब्रह्मदेशात पॅगोडांना भेटी दिल्या. विहारांमधून जळजळीत प्रवचनं केली. ब्राह्मणांना वाटोवाट चावे घेतले. मुंबईला येऊन डॉक्टर आंबेडकरांच्या

तसबिरीसमोर भक्तिभावानं हात जोडले. पण कुठं तरी भिंग फुटलं, ते फुटलंच. रथयात्रेचं रूपांतर विजययात्रेत होईना. राजस वृत्तीला जन्मभर वंचित राहिलेला आणि बहुजन-समाजाला आत्मप्रतिष्ठेचे पाठ लिहून देणारा हा झुंजार पेरियार प्रदीर्घकाळ असह्य एकाकीपण सहन करून वयाच्या पंच्याण्णवाव्या वर्षी मद्रासेत काळाच्या पडद्याआड गेला. चौफेर विजयाच्या प्रमुदित लाटा आणि पराजयाच्या ओहोट्या त्यांनी एकाच आयुष्यात भरपूर पाहिल्या. पण अजूनही नाटक संपलेलं नाही. त्यांचे आखाडेबाज शागीर्द, सर्रास सौदेगिरी आणि सत्त्वहीन तडजोडी स्वीकारून, गुरुवर्यांना यथेच्छ पराजय आणि अपमान –दोन्ही गोष्टी कौशल्यानं करीत कृतार्थ होत आहेत.

श्रीधर लिमयांबरोबर मद्रासमधून गरगरा फिरताना मोठी मजा आली. कुठल्याही रस्त्यानं वळा, तिकडे मोर्चा येणार, म्हणून पोलिसांनी नाकेबंदी केलेली आढळायची! ह्या चक्रव्यूहातून सुटण्यासाठी आम्ही असतील नसतील त्या सर्व दिशा धुंडाळल्या. जितके रस्ते, तितके मोर्चे, हे समीकरण पाहून शेवटी हताश झालो. मद्रासेत एकाच दिवशी हे इतके मोर्चे कसे काय उसळले?

येटस् कवी म्हणाला, तेच शाश्वत सत्य आहे

इतःपर ह्या पृथ्वीतलावर कुणालाही शांत झोपेचं सुख लाभणंच अशक्य.

गेली पंचवीस वर्षे लिमये मद्रासेत यशस्वी तळ ठोकून आहेत. आता ते इथलेच झाले आहेत. मला ते म्हणाले,

'बहुजनसमाजाच्या चळवळीचं खरं रूप मद्रासेत तुम्हाला दिसणारच नाही. त्या-साठी तुम्हांला ग्रामीण भागात जावं लागेल नि तामिळभाषिक माणूस बरोबर बाळगावा लागेल. मी पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा इथं आलो, तेव्हा तामिळी ब्राह्मणांची सरसकट विटंबना चाललेली मी ह्या मद्रास शहरात माझ्या डोळ्यांनी पाहिलेली आहे. उघड्या अंगानं रस्त्यातून चाललेल्या ब्राह्मण पुरोहिताच्या शेंड्या नि जानवी इथली मस्तवाल पोरं भर रस्त्यात कात्रीनं कापून टाकीत. आता इथल्या सरकारी नोकरीत तर ब्राह्मण औषधाला-सुद्धा सापडणार नाही.'

तामिळ भाषा येत नाही आणि दुभाष्या ठेवणं परवडणार नाही, तेव्हा माझं संशो-धनाचं दप्तर मिटून, मी नुसतं मद्रास शहर हिंडून पाहायचं ठरवलं. मोटारीनं हिंडण्याचा नाद सोडून पायीपायीच निघालो. ते पथ्यावर पडलं. कारण मोटारीच्या बंद तावदानांआडून जाणवला नव्हता, तो प्रचंड उफाळलेला समुद्र हाकेच्या अंतरावर असलेला दिसला.

ऐन दुपार. बाराचा सुमार. उन्ह म्हणजे साक्षात ज्वाळा. पाढऱ्या शुभ्र वाळूचा लांबच लांब पसरलेला चमचमता गालिचा. संपूर्ण निर्मनुष्य. किनाऱ्यावर कोळ्यांची कुत्री तरी दूरवर हुंगताना दिसतात. इथं ह्या सागर–किनाऱ्यावर काहीही नाही. समोर फक्त त्वेषात फेसाळणारा आडदांड समुद्र, त्यावर सूर्यकिरणांची लखलखती चांदी आणि

आकाशाचा फडफडता तप्त पत्रा
सृष्टीचं शुष्क, भगभगीत सौंदर्य पाहून घेतलं. अकाळविकाळ शक्तीपुढं नमलो.

मद्रास म्हणजे मुंबईचं कालचं शरीर आणि पुण्याचा आजचा आत्मा ह्यांचा सोनमेळ. सध्या मुंबापुरीचा राक्षसच झाला आहे, ते सोडा. पण पंचवीस वर्षांपूर्वी मुंबई नगरी सुसह्य पसरलेली होती. आजचं मद्रास तसं आहे. आजचं पुणं अजूनही तसं शांतच आहे. तसंच मद्रास आहे. काही टापू वगळले, तर रस्त्यांत गर्दी नगण्य. माणसंही कमी नि वाहनांची गर्दी त्याहूनही कमी. शीख टॅक्सी-ड्रायव्हर दृष्टीलाही पडायला कबूल नाही. शहराच्या एका अंगाला 'पॅरीज्' म्हणून एक कोपरा आहे. तिथं मात्र अष्टौप्रहर जत्राच असते. एरव्ही मद्रासचे रुंद, धिप्पाड रस्ते फार शांत नि आश्वासक असतात. श्रीमंतीचा दिमाख तर जवळपास नाहीच. सर्वत्र साधेपण. चाळीही कुठं फार करून दिसल्या नाहीत. बकालपणा अल्प. झोपडपट्टी थोडीफार. दारिद्र्य मात्र अफाट. मद्रासेत मिळत नाही, असं काहीच नाही आणि मुंबईत रस्त्यात दिसायला कबूल नाहीत, अशा काही शेलक्या चिजा मद्रासेत भरपूर आहेत उदाहरणार्थ 'मोर'. मोर म्हणजे पाणीदार ताक. नाक्यावर एखादी बाई पुढ्यात ताकाचं गाडगं नि दोन गल्लास घेऊन बसलेली असते. चार आणे टाकले, की भरपेट ताक-पाणी मिळतं. चवीसाठी ताकात थोडीशी स्वादिष्ट वनस्पती टाकलेली असते. मुंबईला चारचौघांत असं गाडग्यातलं ताक ढोसायला मन अवघडेल. आपण रस्त्यात वडा-पाव चापू. भेळ तर खातोच. पण ताक पिणार नाही. तसं करणं भारीच पुळपुळीत वाटतं. पण इथं मद्रासमध्ये आपल्याला ओळखायला आहेच कोण ? आणि तसा कुणी महाभाग असो नसो, मद्रासच्या धगधगत्या उन्हात माठातलं गार ताक पिणं हा जीव शांतविण्याचा उत्तम नि सस्ता मार्ग आहे अन्यत्र कुठंही ह्या विपुल प्रमाणात मिळू न शकणार हे स्वस्तातलं सुख ढेकर येईपर्यंत ओरपून घेतलं.

ताक पिताना कोकणातलं बालपण आठवलं. कडक दुपार असायची. वाडीतलं पान न् पान निश्चल असायचं. अशा वेळी घाटी चढून येत असलेला खाकी कोटातला छत्रीवाला पोस्टमन दूरवर दिसायचा. घामानं चिंब निथळत तो झपझप गडगे ओलांडायचा मागर तुडवायचा. त्यानं चिठ्ठीचपाटी आणली, की ओटीवर त्याला कपभर ताक वहिवाटीनंच मिळायचं. कपभर ताकाच्या पुण्याईवर कोकणी पोस्टमनांनी त्या काळात कातळाचे कोसच्या कोस उन्हातान्हातून तुडवलेले आहेत. आज त्यातला ताकाचा कप तेवढा कमी झाला आहे. कोकणी पोस्टमनाचं ते तापलेलं कातळ आणि चढ्या घाट्या मिटुकमिटुकाच्या आशेनं तुडवणं वाढत्या वेगानं चालू आहे.

एका रुपयाला दोन मापटी तांदूळ पदरात अगदी हसत बांधून देऊ, हे तामिळनाडू-तल्या राजकारणी मंडळींचं निवडणुकीतलं सुंदर अभिवचन होतं. प्रत्यक्षात ती वल्गनाच ठरली मात्र, खानावळीतल्या पोटभर शाकाहारी जेवणाचा दर सरसकट पावणेदोन रुपया

वर थोपवून ठेवण्यात शासनाला संपूर्ण यश आलं आहे. तामिळनाडूत कुठल्याही खानावळीत जा, कितीही रेटून जेवा, ताकाचे लागतील तितके भुरके मारा, जेवणाचा आकार फक्त पावणेदोन रुपयेच होणार. दह्याचे पन्नास पैसे अलग पडतात. फळाचे ताजे रस तर इतर ठिकाणच्या मानान निम्म्यानं स्वस्त वाटले. सव्वाच्या ग्लासभर रसाची चैन पंच्याहत्तर पैशात करता येते. पण सामान्य कष्टकरी नागरिकाची ओढघस्त इतकी आहे, की त्याला हेही दर परवडत नाहीत. भुका मारण आणि भुक्कड राजकारण्यांच्या हातभर लब्या बाता ऐकण, हे जिथं भारतातल्या सर्वांचच प्राक्तन्य आहे, तिथ बिचारा जातिनिहाय मिळणाऱ्या वागणुकीन त्रस्त झालेला गरीब तामिळी नागरिक अपवाद कसा काय असणार ? जेवणही सगळीकडे एकाच छापाच असत. परातभर गरम भात; त्याच्यावर लाकडं झालेल्या शेकटाच्या शेंगांचे तुकडे आणि चामट भेंड्याची ढबूस काप घालून केलेलं लाल मिरच्याच साबार, भोपळ्याच रायत; गवारीची किंवा सुरणाची फळफळीत सुकी भाजी, चुरगळलेला पारदर्शक पापड आणि भुरकाल, तितकं ताकपाणी.

भूक भागवून सार मद्रास शहर मी पायी-पायीच तुडवलं. सगळीकडे व्यवहार सुस्त वाटले. माटुंग्याला दक्षिणी देवळाच्या परिसरात बारा महिने तेरा काळ दिवाळीच दिसते. पैठण्या नि जरीचे शालू घालून बायका मुरडत असतात. त्यांच्या नाकांत हिऱ्याच्या चमक्या चमचमत असतात गळ्यात रत्नहार असतात. इथ मद्रासेत एकही बाई त्या दिमाखात दिसली नाही. सगळ्या साध्या, गरीबगुरीब, काटकसरी, पोक्त गृहिणी वाटल्या. माटुंग्याला दिसतात, तसले घमघमीत फुलाचे भरघोस हारही कुठं विकायला ठेवलेले दिसले नाहीत. खास वैशिष्ट्यपूर्ण वाटले, ते मात्र नाक्यानाक्यावर असलेले सरकारी गौळीवाड्याचे गरम दुधाचे ठेले. पन्नास पैसे मोजा, कपभर साखरमिश्रित गरमागरम दूध ओठाला लावा नि पुढे चालू लागा, असा चटपटीत मामला आहे. तिथंच अस्सल खव्याच्या बर्फीचे तुकडेही फारच स्वस्तात मिळतात ह्या दूधदुभत्याची चव खमंग, किंमत स्वल्प, त्यामुळं खूश गिऱ्हाईक भरपूर. परिणामतः बेकारी-निवारण आणि ग्रामीण भागाकडे पैशाचा पन्हळ, असं सर्व काही इष्ट ते साध्य झालं आहे.

मद्रास ही सिनेनगरी आहे, असा लौकिक आहे प्रत्यक्षात त्याची साधी छटाही दिसली नाही. इतर कुठल्याही भरभराटीच्या शहरात असतात, तितपत चित्रपटगृहे मद्रासमध्येही आहेत. काही आलीशान. काही भपकेबाज काही गावठी. पण मुंबईत जसा सिनेमानं लोकांचा कब्जा घेतल्यासारखा वाटतो, तसं ह्या शहरात हिंडताना वाटलं नाही. भिंतींवरच्या अजस्र जाहिरातींनले हीरो लोक थोराड आणि ढोबळे वाटले. त्यांची डाळ आपल्याकडे मराठी चित्रपटात शिजेलशी वाटत नाही. त्यांना चक्क दादा साळवींबरोबर, नाहीतर शरद तळवलकराबरोबर मिशाळ धर्मात्म्याचा साइडरोल पत्करावा लागेल. चित्रा-तल्या नायिका गुबगुबीत, वाटोळ्या आणि बदामी डोळ्याच्या कावेबाज प्रौढा वाटल्या.

रस्त्यात एकाला हिंदीमध्ये बसचा मार्ग विचारला. तर तो तावातावानं म्हणाला,

'नो–नो हिंदी. स्पीक इंग्लिश. ओन्ली इंग्लिश.'

इंग्रजीचं प्राबल्य मद्रासेत हे असं आहे. पण आपण समजतो, तसं इथल्या हरएक ाणसाला इंग्रजी कळतंच, असं नाही. उलट, इंग्रजी न कळणारेच जास्त आहेत आणि मुसलमानानं बोध होण्याइतपत हिंदी बहुतेकानाच कळतं हिंदी चित्रपटानी केलेला हा चमत्कार आहे.

रस्त्यात एके ठिकाणी हिंदी प्रचार सभेची इमारत दिसली. तिथं पूर्ण शुकशुकाट होता. हिंदीचा प्रचार आणि प्रसार हा उत्तर हिंदुस्थानी मंडळींच्या साम्राज्यवादाचाच एक अविभाज्य भाग आहे, राष्ट्रभाषा हिंदी ही दाक्षिणात्यावर हेतुतः लादण्यात आलेली आखाड–सासू आहे, किंवा द्राविडी संस्कृतीच्या गळ्याला नख लावणारी ती लावसट आहे, अशी थोरामोठ्यांची भावना सबंध दक्षिणेत आहे हिंदीचं जाहीर खंडण रामस्वामी पेरियारानी सुरू केलं. त्यासाठी कारावास भोगून धन्यता मिळवली. त्यानंतर हिंदी-प्रचाराची दक्षिणेत फे–फे झाली. हिंदीला दक्षिणेत स्थान बिलकूल नाही. हिंदी सिनेमांनी मात्र हिंदी भाषेला सर्वदूर संचाराचा तहहयात पासपोर्ट बहाल केला आहे.

खर तर मद्रास हे भारतातल्या इंग्रजी भाषेचं पाळणाघर. लॉर्ड क्लाइव्ह इथल्याच वखारीत चाकरमान्या होता. नंतर तो साम्राज्यसंस्थापक झाला. त्याचं लग्नही इथल्याच चर्चमध्ये झालं. इंग्रजांचा व्यापार आणि राज्य इथूनच बधारलं. इंग्रजी भाषेचा वरचष्मा तेव्हापासून सुरू झाला. हिंदी भाषेची ध्वजा इथं कधी काळी मिरवेल, असं शहरातून रपेट करताना वाटलं नाही.

रात्री घरी परतण्याच्या अगोदर समुद्रावर एक चक्कर टाकली. गुडूप अंधार होता. भरतीचा समुद्र फेसाळत होता. आपल्या गणपती-पुळ्याचा किंवा बोर्डीचा अरबी समुद्र नि मद्रासचा हा बंगालचा उपसागर ह्यात काडीचाही फरक वाटला नाही. तोच तो दाट काजळासारखा गडद अंधकार, तेच ते खोलखोल गेलेलं निळंकाळं भीषण आभाळ, तोच तो अजस्र लाटांचा तुफान कल्लोळ नि तीच ती दिशादिशातून घुमणारी युगानुयुगाची घनघोर गाज !

रात्री महाराष्ट्र मंडळात परतलो. मंडळात खोल्या घेऊन राहणारे नोकरदारही तेव्हापर्यंत कामावरून परतले होते. सगळेच चांगले हुद्देदार होते. त्यांच्यातच एक देशपांडे नावाचा ठाण्याकडचा चुणचुणीत विद्यार्थी दिसला. तो इकडे कसा, म्हणून त्याला विचारलं, तर म्हणाला,

'मी इथं सरकारी इंजीनिअरिंग कॉलेजात शिकतोय. आपल्याकडे कॉलेज-प्रवेश मिळवण म्हणजे दिव्यच आहे. इकडं मद्रासमध्ये तामिळनाडूच्या बाहेरच्या विद्यार्थ्यांसाठी

इंजीनियरिंग कॉलेजात काही जागा राखीव आहेत. मी अर्ज केला. निवडला गेलो. आता इथंच शिकतो. घरून पैसे येतात.'

नंतर तो मंडळाच्या नोकरांबरोबर तामिळमध्ये अगदी सराईतासारखा बोलू लागला. त्याबाबत त्याला विचारलं, तर म्हणाला,

' तामिळभाषा बोलायला एकदम सोपी आहे. मी आल्या आल्या सहा महिन्यात शिकून घेतली. मी विचार केला, की तामिळ आली नाही, तर आपला इथं निभावच लागणार नाही. नुसतं ऐकून ऐकून शिकलो. बहुतकरून मी आता इथं कायमचाच राहणार. महाराष्ट्रात आम्हाला नोकऱ्या ठेवल्यात कुणी ? तशात इथं चार चांगल्या लोकांशी माझ्या ओळखी वगैरे झाल्या आहेत. तेव्हा मला वाटतं, इथंच नोकरीधंदा मिळेल. वर, मद्रास राहायला फार सुंदर शहर आहे. मुख्य म्हणजे शांत नि स्वच्छ आहे आणि इकडे ब्राह्मणांना राहायला जागाही पटकन् मिळतात. किंबहुना, ब्राह्मण घरमालक ब्राह्मण भाडेकरूच्या शोधातच असतात ! बिगर-ब्राह्मणांना मुळी ते जागाच देत नाहीत.'

इतका वेळ बासनबद्ध करून ठेवलेलं ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाचं दप्तर ह्या उत्तरानं पुन्हा एकदा चाळवण्याची पाळी आली ! विचार पडला, की ह्या मद्रास शहरात दाही दिशांना पसरलेल्या बिगरऐपत बहुजनसमाजातल्या गरजूंना मग जागा कोण देतो ? कोण देणार ? की मग त्यांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांशी आपापसात संगनमत करून नव्या अनधिकृत वस्त्यांची चूड लावत सैरावैरा पळायचं ? आणि ब्राह्मणांनी कटाक्षानं दूर ठेवलेल्या ह्या वस्त्यांमधून उद्या जर असंतोषाचा वन्ही फोफावला, तर त्याला जबाबदार कोण ? आणि ह्यांच्यापैकीच अजिबात जम न बसू शकलेले जर पोटासाठी परदेशाचे किनारे गाठू लागले, तर ती नैतिक जबाबदारी कोणाची ? वाढणाऱ्या वस्त्यांच्या विराट प्रश्नाचं ह्या देशात कुणाला साधं भान तरी आहे काय ?

अपार निराशेनंतर ह्या मद्रास शहराबद्दल कृतज्ञतेची एक लाट मनात फेसाळली. ह्या सुंदर शहरानं आजवर अनेक मराठी मंडळींना वेळोवेळी उदार आसरा दिलेला आहे. शंभर वर्षांपूर्वी इथं दवाखानेच नव्हते. वैद्यलोक घरच्या घरी पाळंमुळं देत. मद्रासेत सर्वांत अगोदर दवाखाने उघडले, रत्नागिरी जिल्ह्यातल्या शिपोशीच्या डॉ श्रीराम वासुदेव आठल्ये ह्यांनी ! कुठं शिपोशी नि कुठं मद्रास ! ह्या शिपोशीकर डॉक्टरांचे एकाच वेळी मद्रासेत चार दवाखाने उत्तम रीतीनं चालत होते शिवाय त्यांनी मद्रास शहरातल्या नेमस्त राजकारणाचा पाळणा जोजवला, लेखन केलं आणि ' हिंदू ' ह्या दैनिकाच्या स्थापनेच्या विचाराला एका शतकापूर्वी चालना दिली.

कै. दादासाहेब फाळक्यांचे त्यांच्या नाशिकच्या ' हिंदुस्थान सिनेटोन ' पासूनचे पट्टशिष्य मामा शिंदे, हे सगळीकडे होरपळ झाल्यानंतर आशेनं वळले, ते अखेरीस ह्या मद्रासकडेच. आणि आपल्या अच्युतराव कोल्हटकरांनीही ' संदेश ' काढण्याच्या अगोदर

दोन वर्षांचा अज्ञातवास ह्याच मद्रासेत काढला होता. ' बी. विश्वनाथन् ' ह्या टोपण-नावानं ते इथल्याच एका पेढीवर नोकरीला राहिले नि त्याच नावानं त्यांनी मराठी नियतकालिकांना इथून-मद्रासहून लेखन पुरवलं.

मद्रास नगरी ही अशी शीतल आहे.

मंडळातलं रात्रीचं जेवण हसत खेळत उघड्यावर खळ्यात झालं. वातावरण एकदम घरगुती वाटलं. लांबलचक टेबलं जोडली गेली. त्याच्या सभोवार बसून मराठी मंडळी कौटुंबिक गप्पागोष्टी करीत, घरच्या आठवणी काढीत, एकमेकांना आग्रह करीत घरच्या-सारखी जेवू लागली जेवणाचा बेतही साधा, रुचकर होता. गरमागरम फुलके, कांद्याचं पिठलं, रगाड भात, फरसबीची भाजी, काकडीची कोशिंबीर, ताक, लोणचं, पापड. मंडळाचा जुना विश्वासू नोकर कृष्णा जेवण तयार करतो कृष्णा ठेंगणा, काळा, अगलटदार आहे. तो साठीच्या जवळपास आला असेल. मूळचा तो केरळचा. मंडळाच्या सेवेत वीस-एक वर्षं तो इथे मद्रासेत आहे नि मराठी मोठ मिठ्ठास बोलतो. तो नोकरासारखा वागतही नाही. त्याला तसा वागवीतही नाहीत नि तसा तो वाटतही नाही. तो सर्वांचा पालकच वाटतो नि तसाच तो आल्यागेल्याशी मोठ्या अगत्यानं वागतो.

घरगुती जेवणानंतर परसवातल्या मोकळ्या ऐसपैस अंगणात मोहोरलेल्या आंब्याच्या सावलीत मनसोक्त शतपावली घातली. असली सुखं मुंबईत कुठली मिळायला ?

हळूहळू रात्र वाढू लागली. वारा मंद मंद वाहू लागला. सभोवारच्या घरांमधले दिवे विझले. सगळीकडे निजानीज झाली. रातराणी घमघमू लागली. त्या शांत वाता-वरणामध्ये आपण इतके दूर तामिळनाडूत आलो आहोत, हे खरंच वाटेना. वाटलं, अरे, हे तर आमचं कोकणातलंच अंगण आहे, ही आपलीच आंबराई आहे, हे आमचंच वावृबन आहे, ह्या वाऱ्याच्या खारट झुळकाही आमच्या कोकणातल्याच दर्यावरच्या आहेत. नि वर पसरलेलं हे रत्नखचित कृपाळू आभाळही थेट कोकणातलंच आहे. हाकेच्या अंतरावरली पहाट जवळजवळ येत आहे. प्रहरभरानं पक्षी जागे होतील, दिशा भगव्या होतील. आणखी काय हवं ? मी खूश आहे.

♣ ♣ ♣

# अहमदाबादेचा सधिप्रकाश

♧ ♧ ♧

पाखराची साखरझोप चाळवायला मी अहमदाबादेत दाखल झालो, असंच आता म्हटलं पाहिजे. कारण धड दिशा उजळायचीसुद्धा वाट न पाहता जनता एक्स्प्रेस पहाटे ठीक चारालाच स्टेशनात येऊन धडकली. बाहेरून धुरकटलेलं भाताचं तपेल आतून लख्ख ताजी कल्हई लावल्यामुळं लखपख दिसावं, तसं आपलं अहमदाबाद स्टेशन आतून दुधाळ प्रकाशलोटांनी भगभगलं होतं. बाहेर मात्र काळोख मिट्ट होता. सर्वत्र चिडीचूप होतं. वातावरण मख्ख होतं. हवेत उष्मा होता. सगळीच आडदांड शहरं आडरात्री निपचीत पडलेली असतात. त्या संकेताला अहमदाबादेचा अपवाद नाही. पण पहाट फुटताना निदान पक्ष्यांचं कूजन तरी कानावर पडायला हवं. आणि अहमदाबादेत तर पहाटेस कावळेसुद्धा ओरडत नव्हते. असं कसं घडलं? इथले पक्षी कुठं गडप झाले आहेत?

अहमदाबादेत आल्या आल्या पक्ष्यांची आठवण व्हायचं कारण म्हणजे हा परिसर आंतरराष्ट्रीय पक्षिनिवास म्हणून प्रसिद्ध आहे. मागच्या खेपेला माझा मुक्काम गावाबाहेर होता. माझ्या खोलीच्या समोर पिंपळाचं सळसळतं झाड होतं आणि सकाळी उठून पाहिलं, तेव्हा हिरव्यागार पोपटांनी ते आरपार फुलून निघालं होतं. पोपट थव्यांनी वसती करतात, हे खरं. तरीही एकाच हिरव्यागार झाडावर शे-पाचशे हिरवेकंच पोपट, म्हणजे अद्भुतच!

इतक्या अवघड पूर्वपहाटेसुद्धा अहमदाबादेच्या महाराष्ट्र समाजाचे कार्यकर्ते

श्री.कुलकर्णी मला उतरून घ्यायला स्टेशनावर आलेले होते, त्याचा अचंबा वाटला. त्यांनीच रिक्षा केली. रिक्षाच्या मानावरून साफ भोळा फिरवणारा कभिन्न काळोख कातरीत आम्ही मिर्झापूर रस्त्यावरल्या ' लल्लु रायजीनो वंडा ' मध्ये माणसांना जागं करायला हजर झालो.

वंडा म्हणजे कम्पौंड. प्रत्यक्षात शहराच्या ऐन मध्यावर, मुद्दाम राखून ठेवली आहे, असं वाटावं, अशी ही जुनी मोकळी वाडी आहे. आवार ऐसपैस आहे. तारेवरल्या कपड्यासारखी घरं वेगवेगळ्या आकाराची, धुपकी आणि हारीनं बांधलेली आहेत. ती सगळीच ढिगाळ, वाढत्या अंगाची वाटली. घरं कौलारू आहेत. काही छपरांवर गारवेली सोडलेल्या आहेत प्रत्येक गाळ्याला ऐसपैस पडवी आहे. आणि पडवीत झोपाळा. प्रत्येक गाळ्यासमोर रहिवाशांनी पुढे सरकता येईल, तेवढं सरकून वाडीतली जागा आपल्या अम्मलखालीत घेतली आहे आणि अशा रीतीनं तयार झालेल्या घरगुती बागांना फाटकं ठोकली आहेत. असं मंद आक्रमण होऊनही वाडीत मऊ, मातकट अशी मोकळी जागा भरपूर आहे. झाडी उंच, पुष्ट नि जुनी आहे झाडावर बगळे झोके घेताना दिसले. वाडीवर आकाशाचा निळाशार लाबोडका फाळ वरदहस्तासारखा पसरलेला आहे. फार पूर्वी मुंबईची बैठी उपनगरं होती, तसा हा भाग शांत, बैठ्या संस्कृतीचा वारसा सांगणारा असल्यामुळं तो शहरी धावडधिंग्याच्या ऐन धुमश्चक्रीत आहे, हे क्षणभर खरंच वाटत नाही. पण आहे. कारण मालगाड्यांच्या लटांबरांच्या आवाजाचे खिळखिळे दुवे हाकेच्या अंतरावरून ऐकू येत होते.

पुस्तकांनी ठच्चून भरलेल्या प्राचार्य वसंतराव जोश्यांच्या घरात पाऊल टाकल्यावर शांत तळ्याच्या काठी आल्यासारखं वाटलं. घराची पडवी लतावेलींनी आच्छादिलेली आहे आणि त्या सावलीत बैठक आहे.

शिडशिडीत, उंच अंगकाठीचे जोशी म्हणाले,

' काणेकर नेहमी इथंच, माझ्याकडे उतरायचे. ह्या ओटीवर बसून आम्ही रात्ररात्र गप्पा मारायचो. पण आता काणेकरही गेले आणि माझे डोळेही गेले. शिवाय आता माणसाची आयुष्यंही घाईगर्दीची झाल्यायत. शांतपणे वाचायला किंवा गप्पा मारायला फावतय् कुणाला ? जो तो आपापल्या धावपळीत असतो '

साठी ओलांडलेले खादीधारी वसंतराव जोशी गेली चाळीस वर्षं तरी इथंच, अहमदाबादेत तळ ठोकून आहेत. त्यांची उभी हयात महाविद्यालयात इंग्रजी वाङ्मय शिकवण्यात गेली. पुढे ते प्राचार्य झाले. आणि निवृत्त होऊन निवांतपणे वाचन-लेखन करण्याचे दिवस दिसतात, न दिसतात, तोच अदमास नसताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. ते हादरले. त्यावेळी काहीतरी गडबड होऊन मेंदूच्या एका सूक्ष्म रज्जूला धक्का लागला असावा. त्यामुळं डोळे शाबूत असूनसुद्धा त्यांची नजर एकाएकी लुप्त झाली. आता घरात ते सगळ्यानं डोळस गृहस्थासारखाच वावर करतात. परक्याला कल्पनासुद्धा येणार नाही, की आपल्याबरोबर धडाधडा बोलणाऱ्या ह्या वसंतरावांना दृष्टिमांद्य आलं आहे.

त्यांना फ्रेंच, जर्मन, इटालियन, बंगाली, तामिळ, कन्नड, वगैरे आठ-दहा भाषा अवगत आहेत. पण आता डोळेच निकामी झाल्यामुळं भाषाज्ञानाच ते तळंसुद्धा आटत चाललं आहे. पुस्तकं वाचणं बंदच आहे. भटकंती एकदम थांबली.

प्रारब्ध नाही म्हणावं, तर हे असे चक्रावून टाकणारे अकल्पित दाखले सृष्टीत दिसतात!

वसंतराव म्हणालेसुद्धा,

'अखेर, नशीब नावाची एक गोष्ट आहेच!'

त्यांच्या सुविद्य पत्नी कुमुदताई मात्र यजमानांना काही म्हणता काहीही कमी पडू देत नाहीत.

दिवस वर आल्यावर मागीलदारी डोकावून पाहिलं, तर पलिकडच्या चाळीत एक म्हातारा पारशी पडवीत बसून काहीतरी चोपडी एकटक वाचीत असलेला दिसला. त्याच्या अंगात खास पारश्याची असते, तसली मलमलची पोकळ पैरण होती आणि टाळूवर त्यानं रुमाल पसरून ठेवला होता. ह्याचा अर्थ तो काही तरी धार्मिक वाचीत होता.

दुसऱ्या खिडकीतून पाहिलं, तर चार-पाच मुलगे मुसलमानी चोळणे आणि टोप्या घालून मैदानात खेळायला उतरले होते. कुमुदताई म्हणाल्या,

'अहमदाबादेचं हे एक वैशिष्ट्य आहे. इथं वस्त्यांची सरमिसळ झालेली आहे. आमच्या ह्या वाडीत हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, ज्यू, वोहोरी, अशी सर्वांची बिऱ्हाडं आहेत. मुंबई-पुण्याकडे आहेत, तसे वेगवेगळ्या धर्मीयांचे पृथक लत्ते इकडं नाहीत. एकाच पोळात हिंदू-मुसलमान राहतात. आजचंच नाही, शेकडो वर्षं असंच आहे. गावात झगडे वगैरे होतात. तंग वातावरणही असतं. पण दिलजमाईही होते. ह्या आमच्या वंड्यात सुसंस्कृत वातावरण आहे. दिवाळीत मला मोजून सव्वीस घरात थाळी पोहोचवावी लागते नि ईदेची खीर नि हलवा तेवढ्याच घरातून माझ्याकडे येतो. लोकांना वाटतं, झाडून सगळे पारशी मुंबईत गोळा झालेले आहेत. तसं नाही. गुजरातेत पारशी बरेच आहेत आणि विशेष म्हणजे इकडल्या खेड्यापाड्यातून पारश्यांची खूप घरं आहेत सगळे बागा राखतात. फळफळावळ करतात'

सकाळीच पाय मोकळे करायला बाहेर पडलो. 'भद्र' जवळच आहे, म्हणून कळलं. म्हणून तिकडंच झुकाडलो.

'भद्र' हे साबरमती नदीच्या तीरावरल्या एका टापूचं नाव आहे. भद्रात प्रायः मराठी मंडळींची वसती आहे. फेरफटका करताना आपण पुण्याच्या एखाद्या जुन्या पेठेत आल्यासारखं वाटलं. तशीच जुनी घरं, त्यातले गरीब संसार, आडनीड अरुंद रस्ते, झाडं, रस्त्यात खेळणारी मराठी शाळकरी पोरं, दाराखिडक्यांतून रहदारी बघणाऱ्या अगदी साध्या वेषातल्या महाराष्ट्रीय गृहिणी आणि पेरूंच्या नि केळ्यांच्या टोपल्या घेऊन सावलीला टाट-

कळत बसलेले गुजराती विक्रेते.

सागतात, की जसं शिवाजीनं सुरत लुटलं, तसं गायकवाडानी अहमदाबाद लुटलं होतं, शिवाय ते त्यानी आपल्या संस्थानालाही सलग्न केलं. त्या काळात काही मराठी कुटुंब अहमदाबादेला पोटापाण्यासाठी आली. ती इथच स्थिर झाली. साहजिकच ती कळपानी राहिली. त्यानी जो नदीकाठचा निरव कोपरा पसत केला, तोच हा 'भद्र'. भद्रातली काही घरं अगदी पेशवाई वळणाची वाटली. अरुंद नि उभ्या, चिंचोळ्या खिडक्या, सर्वत्र कोरीव लाकूडकाम, माड्याची आखूड उंची, आणि छपरावरले नळे, ह्यांच्यामुळं तसं वाटल.

भद्रेत टाकलेल्या पहिल्या पावलालाच 'शतपत्रे'कार लोकहितवादींची आठवण दाटून आली. कारण सव्वाशे वर्षांपूर्वी असिस्टंट मुन्सफ म्हणून अहमदाबादेत बदलून आल्यावर, भद्रेत दिवाणाच्या घरी ५–१०–१८६२ रोजी त्यांनी पहिला मुक्काम केल्याची नोंद त्याच्या चरित्रात आहे. पुढेही १८६५ नंतर बरीच वर्षे लोकहितवादी मुन्सफ म्हणून अहमदाबादेतच राहिले. अहमदाबादेत त्यावेळी रवींद्रनाथ टागोराचा थोरला आय्. सी. एस्. भाऊ सत्येंद्रनाथ टागोर, हा न्यायाधीश होता, त्याच्या घरी लोकहितवादींची नि मिस् मेरी कार्पेन्टर हिची गाठ पडली होती. गोपाळराव देशमुखानी, म्हणजेच लोकहितवादींनी अहमदाबादेत सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणाच्या चळवळींत आत्मीयतेन भाग तर घेतलाच, पण गुजराती भाषा आत्मसात करून गुजराती भाषेतून दर्जेदार लेखनही केलं. आपण लोकहितवादींना फक्त मराठी लेखक समजतो. पण ते गुजरातीतही उत्तम लेखन करीत आणि गुजराती साहित्याच्या उषःकाली ज्या आद्य लेखकानी त्या भाषेची माडामाड केली, त्यात गोपाळराव हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, ह्याचा फार मोठा वाटा आहे. गुजराती साहित्याच्या इतिहासात त्याची तशी ठसठशीत नोंदही आहे. काका कालेलकराचा गुजराती साहित्यातला उदय लोकहितवादींच्या गुर्जर साहित्यातल्या कर्तबगारीच्या नतर पावशतकानतर सुरू होतो. जसे मराठीचे, तसे गुजरातीचेही लोकहितवादी हे पहिल्या पिढीतले उपकारी वळणाचे जागृत लेखक आहेत. खर तर लोकहितवादींच अहमदाबादेत काही तरी ठळक स्मारक व्हायला पाहिजे.

भद्रेत मराठी कुटुंब एकवटल्यामुळ 'महाराष्ट्र समाज' स्थापन व्हावा, हे रीतसरच होतं. नि तसा तो चोवीस साली झालाही. गो. रा. दाभोळकर वकील, वि. ना. पातगी भा. कृ. जामेकर, ग र. वैशंपायन, रा. ब आठवले वगैरे चळवळीत रस घेणाऱ्या मंडळींनी ती कामगिरी पार पाडली. त्याच्याही अगोदर भद्रेत स्थायिक झालेल्या मराठी मंडळींची समाजहिताची कामं चालू होतीच. व्यायामशाळा होती. प्रभातफेरी होती. श्लोकपठन होत. देवगिरीकराच टिळक वाचनालय' होत. 'सिंहनाद' नावाच हस्तलिखित होत. 'तरुण भारत मडळ' वैशंपायनाच्या अध्यक्षतेखाली चालू होतं. त्याच्या कार्यक्रमाना खुद्द महात्मा गाधी हजर राहिलेले होते!

ह्या सर्व चळवळींचा पाळणा हालवलेले, संस्कृतचे तज्ज्ञ शिक्षक, महात्माजींचे निकटवर्ती आणि गायक वि. रा. आठवल्यांचे वडील, प्रा. रा. व. आठवले तेवढे सध्या हयात आहेत.

दरम्यानच्या काळात साठ पावसाळे बरसून गेले. अहमदाबादेतली मराठी माणसाची वसती वाढली. एका महाराष्ट्र समाजाच्या जागी आता मराठी मंडळींची आठ, नऊ विभागवार मंडळं निर्माण झाली आहेत, कारण शहराचा पसारा वाढल्यामुळं वस्त्या पांगल्या, वसाहती दूर दूर गेल्या समाजाचे एक कार्यकर्ते म्हणाले,

' अहमदाबादेची लोकसंख्या अठरा लाख आहे. पैकी दोन लाख आम्ही मराठी मंडळी असू. उद्योगधंदे वाढल्यामुळं खूप मराठी माणसं इकडं आली आहेत. मोठमोठ्या उद्योगात मराठी माणसच उच्च पदावर आहेत. पण वाईट वाटत, की त्यांचा प्रत्यक्ष समाजाशी, दैनंदिन संबंध उरलेला नाही. जो तो आपापल्या उद्योगात मग्न आहे. आणि सर्वांत वाईट परिस्थिती गिरण्यांमधील मराठी मजुरांची आहे. इथं गिरण्या फार नि त्यांत सगळे मजूर मराठी, पण त्यांचं कष्टकरी जग आम्हा पांढरपेशांच्या दुनियेपासून फार अलग पडलेलं आहे. आमच्यात ऊठबसच होत नाही. त्यांच्यासाठी काही तरी केलं पाहिजे. ती मंडळी सोलापूर, सातारा वगैरे भागातली आहेत. ते घरात मराठी बोलतात. गिरणीत आणि बाजारांत गुजराती अस्खलित बोलतात. एक लाखापेक्षा त्यांची संख्या अधिक आहे. पण त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न लोंबकाळत राहिला आहे. ते दूर नरोड्याला गिरणी विभागात राहतात. त्यांच्या मुलांसाठी आम्हाला माध्यमिक शाळा बांधायची आहे. एका दानशूर गुजराती दात्यानं तीन लाख किमतीचा मोकळा प्लॉटही आम्हाला मराठी हायस्कूलसाठी फुकट दिला आहे; पण त्यावर इमारत बांधायला आमच्यापाशी पैसा नाही!'

ही परिस्थिती आहे. महाराष्ट्र समाजानं चालविलेल्या पंधरा, सोळा मराठी प्राथमिक शाळा आणि दोन माध्यमिक शाळा, अहमदाबादेत आहेत. त्यामुळं पांढरपेशांची सोय झाली. दाटीवाटीनं झाली, पण झाली, पण मराठी मजुरांच्या लेकरांचं भवितव्य काय?

ह्या मराठी शैक्षणिक चळवळीचा पाया अहमदाबादेत कवी विठ्ठलराव घाट्यांनी घातला. तेहेतीस साली ते गुजरातचे असिस्टंट एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून अहमदाबादेत रुजू झाले. आल्या आल्या त्यांनी भद्रेत मराठी मुलांची शाळा सुरू केली. मराठी माध्यमिक शाळेला चालना दिली. पुन्हा पुढं ते इथंच बढतीवर आले. गुजरात विभागाचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून विठ्ठलरावांनी इथल्या मराठी समाजाची मनोभावे सेवा केली. घाट्यांच्या ते रक्तातच होतं. तो आकाशाकडे टक लावून स्वस्थ बसणारा कवी नव्हता. भाषाभिमानाचा निर्मळ पुळका असलेला तो कनवाळू साहित्यकोविद होता. वृत्तीनं उपकारी होता. खर्ची पडणारा होता. आयुष्यातलं श्रेयस त्याला ठीक कळत होतं. त्यांच्या अंमलदारकीतला हुद्दा त्यांच्या मदतीला आला. घाट्यांनी अहमदाबादेतल्या जवळपास दहा वर्षांच्या कारकीर्दीत मराठी मंडळींसाठी खूप काही केलं. किंबहुना लोकहितवादींनंतर अहमदाबादेतल्या मराठी जगातले कर्ते सुधारक लेखक घाटेच. ह्या सेवेची पावती पुढे त्रेपन्न साली अहमदा

बादेस भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांना मानानं देण्यात मिळालीच.

तशी साहित्यातली आपली बरीच तोलदार मंडळी इथं चाकरीनिमित्त राहून गेली. प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, कवि वसंत बापट(?) हेबळे, डॉ. गो. के. भट, डॉ. ना. ग. जोशी, अच्युत बर्वे ही त्यापैकीच काही ठळक नावं.

ह्या सर्वांपेक्षा अलग आणि अमोल वाङ्मयीन कार्य केलं कै. गोपाळराव विद्वांसांनी मूळचे ते भावनगरचे. गणितज्ञ. पुढे अहमदाबादेतल्या नवरंगपुऱ्यात ते कौटुंबिक कारणानी उतारवयात राहायला आले आणि उत्तम मराठी साहित्याचे गुजराती अनुवाद करण्याचं काम त्यांनी जणू सेवामिशन म्हणूनच अंगीकारलं, ते अखेरपर्यंत. खांडेकरांच्या 'क्रौंचवध 'पासून त्यांनी प्रारंभ केला. नंतर विद्वांसकृत अनुवादित खांडेकरी वाङ्मयावर गुजराती वाचकांच्या उड्या पडू लागल्या. खांडेकर आणि सानेगुरुजी हे दोन बहुप्रसवी, समाजहितैषी लेखक गोपाळरावांनीच गुजरातेत अंतरीच्या ओलाव्यानं नेले. रेल्वेत काम करणारे साबरमतीचे लेखक श्री. मधुकर शंकर प्रधान म्हणाले,

'विद्वांसाचा जन्मच जणू मराठी साहित्यकृती गुजरातीत पोहोचविण्यासाठी होता. पण महाराष्ट्रात त्याचं चीज झालं नाही. कुणी जाहीरपणे कृतज्ञता व्यक्त केली नाही. विद्वांसांना त्याची खंत होती. शेवटी ते जबर आजारी झाले. वयही फार झालं होतं. पण त्यांच्याविषयी कुणीच काही लिहिलं नाही. समारंभातून आपण आंतरभारतीच्या उदात्त कल्पनेचे हवे तेवढे दिवे ओवाळतो. ती अमूर्त कल्पना साकार करणाऱ्या गोपाळरावांची मात्र महाराष्ट्रात घोर उपेक्षाच झाली. ते नसते, तर खांडेकरांचं नाव तरी इकडच्या मंडळींना कळलं असतं का ?'

खरी गोष्ट अशी आहे जाणकार लेखकांच्या जगात गोपाळराव विद्वांसाचं नाव पट्टीचे अनुवादक म्हणून जरूर माहीत होतं. पण विद्वांस कधी कुठं दिसले नाहीत. चारचौघांत मिसळले नाहीत. त्यांचा एखादा फोटोही कधी कुठं पाहायला मिळाला नाही. ते नवरंगपुऱ्यातल्या आपल्या मकाणात मूकपणे लिहीत राहिले. असं कुठं चालतं ? अरविंद गोखले त्यांना आस्थेने भेटले. अहमदाबादेस जाऊन त्यांची त्यांनी माहिती जमवली. गोपाळरावांवर फार सुन्दर लेखही लिहिला. पण गोपाळरावांना ते कळलंच नाही ! शेवटपर्यंत ते, म्हणे, क्षीण आवाजात विचारायचे,

'अरविंद गोखले माझ्यावर लेख लिहिणार होते. पण केव्हा ?

अरविंद गोखल्यांच्या विद्वांसावरल्या त्या व्यक्तिचित्राचा अहमदाबादेत कुणालाच पत्ता नव्हता !

भद्रेला चिकटूनच साबरमती नदी वाहते. तिथं गेलो. नदीचं गढूळ पाणी दुथडी भरून वाहत होतं. ते पुलावरून पाहिलं. अर्थात पावसाळ्यामुळं हे रौद्र दृश्य दिसत. एरव्ही साबरमतीत चमचाभर पाणी मिळण्याची मारामार. उन्हाळ्यात तर संपूर्ण वाळवंट

तयार होतं नि त्या मऊ सपाटीवर सर्कसवाले तंबू ठोकतात.

ओसडून वाहणाऱ्या नदीचा देखावा नेहमीप्रमाणेच होता. काठावर चिखल माजला होता. राखण्यानी म्हशी आंघोळीसाठी नदीवर आणल्या होत्या. त्या यथेच्छ डुंबत होत्या. त्यांच्या शिंगावर कावळे बसलेले होते. मुलानी पाण्यात गळ टाकले होते मासे लागण्या-ऐवजी दर वेळी गळाला वाहत येणारा पालापाचोळाच लागत होता. न कातावता शांत चित्तान पोर तो वर आलेला पालापाचोळा फेकून देत. गळ साफ करीत. त्याला नवा गर टोचीत. आणि आता मासे लागोत, म्हणत तो वाहत्या पाण्यात झुगारुन देत–पुन्हा तोच अनुभव घ्यायला !

नदीच्या पलीकडे हिरव्यार्कंच झाडीत नव अहमदाबाद विस्तारत आहे. भद्रेच्या समोर नदीपलिकडचा भाग 'एलिस ब्रिज' म्हणून ओळखला जातो. उशिरा आलेली अधिक सुखवस्तू मराठी कुटुंबं त्या पर्णराजीन झाकलेल्या नव्या वसाहतीत स्थायिक झालेली आहेत. साबरमतीन अहमदाबादेची दोन शकलं केली आहेत. गिरण्यांच्या धुराड्यानी आणि मशिदींच्या मिनारानी व्यापलेलं, ते सारं जुन बंदिस्त अहमदाबाद सहकारी वसाहतींनी शैक्षणिक संस्थानी आणि गर्द वृक्षराजीन व्यापलेलं नदीपलिकडचं, ते विस्तारत चाललेलं नवं अहमदाबाद.

ही दोन अगदी भिन्न जग आहेत. जुनं अहमदाबाद हे मुळात हिंदूंच 'असावल' नावाच गाव होत. मुस्लिम सुलतानानी घेतलं अहमदशाहा हा पहिला सुलतान. म्हणून 'असावल'च अहमदाबाद झालं

पुढ मोगल बादशहा अकबरान स्थानिक सुलतानाला डिच्चू दिला नि आपला मुसलमान सुभेदार नेमला आणि गुजरातवरला आपला विजय जाहीर करण्यासाठी उत्तरेत फत्तेपूर शिक्रीला बुलंद दरवाजा बांधला ! सर्व जगातला उंचात्र उंच असा तो दरवाजा आहे आणि अहमदाबादेच त्याच असं भावनिक नातं आहे. तेव्हापासून अहमदाबादेत मुसलमानांचा वरचष्मा राहिला. प्रथम जुन्या शहराभोवती संरक्षक भिंत बांधण्यात आली. तिला बारा भक्कम दरवाजे बांधण्यात आले. अजूनही ते थाटोथाट दिसतात पडझड झालेली पाचशे वर्षांपूर्वीची भिंताडही गावातल्या जुन्या मोहल्ल्यात अधूनमधून दिसते.

जुन्या नगरात सर्वत्र पोळ आहेत. पोळ म्हणजे गल्ल्या. वसाहती. रस्त्यावरुन चालताना खूपसा मुंबईच्या काळबादेवीचा, महमदअली मार्गाचा भास होतो. तशीच गर्दी, तशीच रेटारेटी, तशीच दुकानं, तसेच फेरीवाले नि तशीच फिरणारी गिऱ्हाइकं. सर्वत्र जुनं. नवीनाची कुठं न्यूणपता का नाही. अपवाद रस्त्यावरले वाहतूकनियंत्रक हिरवे-तांबडे दिवे.

वास्तविक गावात मुसलमानांचे रोझे चालू होते. म्हणून वाटलं, सर्व बाजार बंद असेल. निदान, शुकशुकाट तरी असेल. पण डोळ्यांना दिसलं, ते उलटच. उपासाचे दिवस असूनसुद्धा मुसलमानांची मांसाहारी जेवणाची दुकानं व्यवस्थित उघडी होती. त्यात चम-

चमीत, मसालेदार पदार्थांची रेलचेल होती. सागुतीचे खमंग तिखट दर्प दरवळत होते नि मुसलमान गिऱ्हाइक शांतचित्तानं तुपकट बिर्याण्या चापीत होती! ईद जवळ आल्यामुळं ईदेच्या रंगीत शुभेच्छा-कार्डांची दुकानं लागलेली होती आणि मुस्लिम तरुण-तरुणींची तिथं खरेदीसाठी झुंबड उडाली होती. सर्वांचे कपडे रंगीबेरंगी आणि नवेकोरे होते. बहुतेक तरुणांच्या डोक्यांवर टोप्या होत्या आणि बुरखाधारी बायका नव्हत्याच. सगळ्या नट्टापट्टा करून आनंदानं खरेदीसाठी हिंदू गृहिणींसारख्याच बाहेर पडल्या होत्या. वातावरण ओत-प्रोत उत्सवी होतं.

आनंदाच्या ह्या गदारोळात दोन विसंवादी दृश्यं दिसली.

एक कंगाल वजनवाला आपलं बंद पडलेलं वजनमापकयंत्र दुरुस्त करीत रस्त्याच्या कडेला उन्हात बसला होता. यंत्राशी त्याची झटापट चालली होती. उपजीविकेचं एकमेव साधन असलेलं त्याचं ते यंत्र आज नेमकं बाजाराच्या ऐन दिवशीच ठप्प झालं होतं. त्याच्या हाताशी दुरुस्तीची अवजारं नव्हती. एका टोकदार चावीनं ते यंत्र सुरू करण्याची तो पराकाष्ठा करीत होता. समजा, ते यंत्र दुरुस्त झालंच नाही, किंवा अधिकच बिघडलं, तर त्या फाटक्या माणसाच्या आजच्या जेवणाची शाश्वती काय? मटण-मुर्गीच्या जेवणाचे आजूबाजूला जे घमघमीत वास सुटले आहेत, ते साक्षात नरकं होऊन ह्या असहाय वजन-वाल्याचा छळ आरंभतील

—आणि दुसरीकडे, चरबीच्या रोगानं अतिलठ्ठ झालेली एक कधिकाळी फुगलेली भिकारीण रस्त्यावरच आडवी पडलेली होती. परमावधीच्या शरीरभारामुळं तिला तसूभरही हलता येत नव्हतं, कूस बदलण्याची तर गोष्टच सोडा. केसाच्या जटा झाल्या होत्या. घागऱ्याला वर्षभरात पाणी लागलेलं नव्हतं, दात गेले होते. अवतीभवती चविष्ट अन्न शिजत होतं. पण त्या राशीपैकी एका कणाचाही तिला उपयोग नव्हता. ते अन्न हे त्या बापडीचं विष होतं. तिला घोटभर पाणी हवं होतं नि ते मात्र तिला मिळत नव्हतं. आणि तिच्यावर सावली धरणाऱ्या आंब्याच्या झाडाची पानं मात्र तिच्या देहावर टपकत होती! आसमंतात गरगरणाऱ्या ऋतुचक्राचं तिला काय होय? ऊन असो, पाऊस असो, चांदणं असो, वा काळोख, तिला तिथं रस्त्याच्या कडेला मरणाची वाट बघत जन्मभर लोळणं भाग होतं. आणि तिथून दोन पावलांवर, एका कळपात भवितव्याची बेगमी झालेली सुरक्षित माणसं, वर्तमानपत्रातल्या आंतरराष्ट्रीय तणावाच्या बातम्या थंडपणे वाचीत कबुतरासारखी रांगेत बसलेली होती!

सुमेळ म्हणतात, तो जगात आहे तरी कुठं? की असमतोल, विषमता, विसंवाद आणि विषाद हेच सृष्टीचं खरं शाश्वत रूप आहे?

भद्रेत भरवस्तीत लाल विटांचा एक आटोपशीर, भक्कम किल्ला आहे आणि त्याच्या अवतीभवती बाजारहाट आहेत. चपटपोळी झालेल्या लाल विटांचे माप नीट घेऊन बांध-

लेले आखीव थर, हे ह्या आकारमनोहर गढीचं वैशिष्ट्य. एक-दोन घेरेदार बुरुज, तटबंदी आणि प्रचंड दरवाजे, एवढंच वैभव आता शिल्लक उरलं आहे. त्याची निगा राखलेली आहे. पैकी बुरुजामध्ये असलेल्या जागेत शासकीय कचेऱ्या आल्या आहेत. तटबंदीच्या आतल्या अंगाला पोलिसांचे गाळे आहेत. तटबंदीतच दरवाज्याला लागून, दर्शनी अंगाला माता भद्रकालीचं पुराण मंदिर आहे. ही अहमदाबादेची ग्रामदेवता. तिच्यापुढं माथा लववल्याशिवाय कुणी गावकरी पुढं जात नाही. इथल्या मंगलकार्यांमधल्या पहिल्या अक्षतेचा मान हिचा आहे. हिच्याच आधारानं आणि हिच्याच सावलीत गेली दीडशे वर्षं मराठी मंडळींचा राबता भद्रेत सुखेनैव चालू आहे.

भटकत भटकत आम्ही नदीपलिकडच्या नव्या गावात शिरलो. तिथं हाउसिंग सोसायट्यांचं रानच दिसलं. पाहावं, तिथं गच्च झाडी, अद्ययावत बाधणीच्या सोसायट्या आणि गाळ्यागाळ्यातून दिसणारे तिथले सुरेख झोपाळे. उघडच आहे, ही बरकतदाराची वसती आहे. मराठी मंडळींचा कल जसा पैसा मिळविण्याकडं आहे, तसा गुजराती मंडळींचा ओढा पैसा वाढविण्याकडे आहे. म्हणून ते मोठ्या जागा बांधतात आणि मोठ्या भाड्यानं लावतात. त्यांचा पैसा वाढत जातो.

कुमुदताई म्हणाल्याच होत्या,

‘ इथल्या माणसाच्या लहान पगारावरून तुम्ही गणित करू नका. ज्या कारकुनाचा वा कर्मचाऱ्याचा पगार पाच-सहाशे असेल, त्याची अवांतर मिळकत जवळजवळ पगाराएवढीच असते. दिसतात, तितके ते गरीब नसतात.’

ह्या उपनगरातून पायी पायी रपेट करताना मजा वाटते, पण स्थानिक रहिवाशांना त्याचं काय होय ? त्यांची सुखदुःखं वेगळीच असतात.

प्रधान म्हणाले,

कवि-लेखक असलेल्या मराठी माणसाला अहमदाबादेतला रहिवास त्रासदायक ठरतो. एक प्रकारचं तुटलेपण जाणवतं. सर्व वाङ्मयीन जगाचं केन्द्र मुंबई. फार तर पुणं. त्या केन्द्राचा नि आमचा संबंध उरत नाही. एक तर इतक्या दूर राहून लिहिण्याचं काही सुचत नाही. लिहिलं, तरी प्रकाशकाची धास्ती वाटते. आम्ही लिहिणार केव्हा, मासिकाकडे पाठविणार केव्हा, संपादक वाचणार केव्हा नि ते साहित्य प्रसिद्ध होणार केव्हा ? नि मुख्य म्हणजे त्या खटाटोपाचं फलित तरी काय ? इथं ग्रंथालय आहे. पण नवीन मराठी पुस्तकं येत नाहीत. मराठी पुस्तकाचं दुकान नाही. मराठी पुस्तक-विक्रेते नाहीत. कुठं काय प्रसिद्ध होतंय्, कळत नाही, मुंबईच्या वर्तमानपत्राच्या डाक आवृत्त्या येतात. संध्याकाळी विमानानंही ताजा अंक मिळतो. पण ती पत्रं विकत घेण्यासाठी आम्हाला चार पाच मैल सायकली हाणत लाल दरवाज्यापाशी जावं लागतं ! गावात कुठं मिळत नाहीत. अशी चमत्कारिक घुसमट आहे. इथंही जागेच्या अडचणी प्रचंड आहेत. मांसाहारी माणसाला

ह्या अहमदाबादेत राहायला जागा मिळणं जवळजवळ अशक्यच. इथसुद्धा तंगडतोड चालूच आहे. बडोद किती लांब! पण केवळ जागा नाही, म्हणून थेट बडोद्याहून अहमदाबादला रोजच्या रोज अपडाऊन करणारे रेल्वे पॅसेंजर्स हजारानी आहेत. खुद्द मीच रोज नोकरीसाठी साठ किलोमीटर्सवरल्या विरमगामला जातो नि येतो ! आता बोला !'

दुसऱ्या दिवशी रस्त्यातून एकटाच रमतगमत चक्कर मारून आलो. तर गावातलं वातावरण तंग ! प्रत्यक्ष हाणामारी कुठं दिसली नाही. हिंदू-मुसलमानांचा वावरही मिळून-मिसळूनच दिसला. पण भरवसा वाटत नव्हता. तेलाची कढई खदखदत होती. पाण्याचा एक थेंब पडला, तरी डोंब उसळेल, असं वाटत होतं. तणाव जाणवत होता. जागोजाग मुसलमानांची प्रार्थनास्थानं होती नि तिथं ईदेच्या रोशणाईची तयारी जय्यत चालू होती. पताका फडफडत होत्या. रस्त्यानं कडेला गर्दी दिसली, म्हणून डोकावलो, तर एक म्हातारा उंटहाक्या हमसाहमशी रडत होता. चौकशी केली, तेव्हा कळलं, त्याच्या उंटाला अकस्मात बरं नाहीसं झालं होतं. चालता चालता उंटानं भर रस्त्यात पाय मुडपून थपकल मारली होती. तो जागचा हलायलाच कबूल नव्हता. मी पाहिलं, तर उंट कावऱ्याबावऱ्या नजरेनं गर्दीकडं पाहत होता नि शेजारपाजारचे कनवाळू लोक त्याच्या पाठीवर थंड पाण्याच्या बादल्या ओतीत होते. उंटवाला रडत रडत म्हणाला,

' उंटाला गरमा नडला. डॉक्टर त्याला थंडाईची दवा देऊ शकेल. पण आत्ता इथं डॉक्टर कुठं शोधू ? पैसे कुठून आणू ? '

उंटवाल्याचा निरुपाय आणि ओढग्रस्त समस्तांना कळली होती. सर्वजण थंड पाण्याच्या बादल्या नि हंडे त्या मरून बसलेल्या आजारी उंटाच्या अंगावर अधिकच उत्साहानं ओतू लागले रस्ता ओला झाला. उंटही चांगला न्हाऊन निघाला. मात्र, वाळवंटात प्रवास करून उन्हाच्या करोडो राशी पचविण्यात वंश गेलेल्या उंटाला शहरातल्या किरकोळ उष्म्याचा त्रास बाधावा, हे गौडबंगाल अनाकलनीय आहे. वाळवंटातलं हे उंच शिडाचं जहाज मात्र अहमदाबादेच्या गल्ल्याकुच्यातून मालवाहू प्रवासाला निघालेलं अष्टौप्रहर दिसतं.

सकाळची उन्हं तापल्यावर पाटील आला. हा हरिश्चंद्र पाटील माझ्याबरोबर विल्सन कॉलिजात शिकत होता. तेव्हा गरीबगुरीब, शिडशिडीत होता. वकिली करणाऱ्या आपल्या चुलत्याकडे तो इथं आला आणि वकील झाला त्याचा उत्तम जम बसला. त्याला पाहिला, तेव्हा सुखवस्तूपणाची ऐसपैस कळा त्याच्या सर्वांगावर फुललेली दिसली. म्हणाला,

' माझ्याकडे जेवायला चल. '

निघालो. मणिनगर ह्या अहमदाबादेमधल्या एका शांत टापूत त्याचा बंगला आहे. स्कूटरवरून त्यानं मला खूपच घुमवलं, पण तेच माझ्या पथ्यावर पडलं, कारण त्यामुळं

रस्त्यातल्या भयग्रस्त बकालवस्तीचं धावतं दर्शन घडलं.

दंग्याला आता कोणत्याही क्षणी सुरुवात होईलसं सारखं वाटत होतं. शिरस्त्राण घातलेल्या बंदूकधारी पोलिसांच्या तुकड्या पोळाच्या तोंडतोंडापाशी जमा झाल्या होत्या. पोळांमधली रहदारी थांबली होती. दुकानदारांनी फळ्या ओढून घेतल्या होत्या. पाटील म्हणाला,

'तू घाबरू नकोस. हे इथलं नेहमीचंच चित्र आहे. पोलीस बळाचं प्रदर्शन करतात. तरुण पोरं संतापतात. वातावरण तंग होतं. कुठं तरी कर्फ्यू लागू होतो. थोडीशी दगडफेक होते. चार लोकांना पकडतात. मग सोडतात. मग पुन्हा शांत होतं. लोक कामाला लागतात. दुकानं उघडतात. पोरं कॉलेजला जातात. बायका भाजीला निघतात. रहदारी सुरू होते. कंटाळलेले पोलीस थोडी विश्रांती घेतात.'

हे खरं आहे. सदैव तंग वातावरण ही नागरिकांना सतत परवडणारी चीजच नाही. मणिनगर मात्र एकदम शांत विभाग वाटला. मुख्य शहराच्या गदारोळापासून हा रस्ता दूर आहे. मराठी मंडळींनी इथं 'दक्षिणी सोसायटी' नावाची स्वतंत्र बंगल्यांची एक वसाहतच पंचवीस वर्षांपूर्वी स्थापली. प्रत्येकाचा छोटासा बंगला आणि पुढं घरगुती बगीचा, बागेत नारळाची झाडं. पडवीवर झोपाळा. जांभेकर, खाडेकर, अशी परिचयाची घरगुती नावं.

पाटलाच्या घरचा जेवणाचा थाट पूर्णपणे गुजराती होता. ते बरं वाटलं. वहिनींचं वरण अस्सल मराठी होतं नि चर्चा प्रसन्न होती. त्यामुळं दोन घास जास्त गेले.

पाटील म्हणाला,

आता आम्ही सगळीजणंच इथं रमलो आहोत. गुजरातेत राहणं चांगलं. इथली माणसं सर्वांना सांभाळून घेतात. इथं कुणाला काही कमी नाही. ही भूमी सोडून महाराष्ट्रात परतायचं आमच्या मनातसुद्धा येत नाही. आता आमच्या पिढ्या इथंच नांदणार.'

दुसऱ्या दिवशी शहराचा परिसर पाहायला पर्यटन विभागाच्या खास बसनं निघालो. पण पंधरा मिनिटं होतात, न होतात, तोच नदीपलिकडल्या त्या शांत भागात दंगलीचं लोण पोहोचलेलं आढळलं. जिकडं तिकडं कर्फ्यू ऑर्डर लावण्यात आलेली होती. त्यामुळं बहुतेक प्रमुख रस्ते वाहतुकीला बंद केले होते बस-प्रवासाला हा नमनापासूनच नाट लागला.

कॉलेज रोडवर वातावरण प्रक्षुब्ध होतं. रस्त्याच्या एका तोंडाला सशस्त्र पोलिसांची मालली होती दुसऱ्या टोकाला कॉलेजांना हरताळ पाडून बाहेर पडलेले विद्यार्थी घोळक्यांनी उभे होते. काही क्षणातच त्यांची आमनेसामने होणार, हे स्पष्टच होतं. बसवाल्यानं एकूण रंग पाहून काढता पाय घेतला. साबरमतीचा गांधी आश्रम पाहण्याचा बेत बारगळला.

मूळ शहरात परतलो, तर वातावरण पूर्णपणे शांत! माणसं माना खाली घालून

आपापल्या उद्योगात दंग होती. बाजारहाट नित्याप्रमाणे चालू होता. उंट गाड्या ओढीत होते. झाड पिवळं लखलख ऊन पीत होती आणि पक्षी बागडत होते.

माझा परतीचा प्रवास आज रात्रीच सुरू व्हायचा होता. म्हणून थोडा विश्रांती घेणार, तोच प्रधान आणि रमाकांत पाटील, दोघेही आले. हे पाटीलसुद्धा प्रधानासारखे रेल्वेतच आहेत. मुंबई–पुण्याच्या दैनिकांना गुजरातेतल्या मराठी जगताच्या ताज्या बातम्या, केवळ समाजसेवा म्हणून तत्परतेनं पाठवतात. त्याच बृहन्महाराष्ट्रवृत्तसार फार मोठ्या प्रमाणावर वाचलं जात. त्यांना परमुलखातल्या मराठी मंडळींविषयी अगत्य आहे. ते म्हणाले,

'इथ फार मोठा मराठी समाज आहे. पण तो हुडकून कसा काढायचा? कारण सर्वजण गुजरातीच बोलतात. अहो, इथं नदीतीराजवळ एक मोठी वस्ती आहे. ती आहे कुरुडाची. ते सगळे मराठी आहेत. गायकवाडामुळे ते इथ आले, आणि आले, ते इथं स्थायिकच झाले. पण आम्ही पांढरपेशांनी त्यांची कधी चौकशी केली नाही, की कुशल विचारलं नाही. आता ते आमचेच आहेत, ह्या म्हणण्यात काय अर्थ आहे?'

प्रधान म्हणाले,

'गुजरातेत नि काठेवाडात आपले खूप लोक विखुरलेले आहेत. ह्या अहमदाबादेत बाबासाहेब ठकार नावाचे एक इतिहाससंशोधक होते. त्यांनी ह्या बाबतीत बरच लिहिलय्. पण आजच्या पिढीला ठकारांच नावच माहीत नाही! भावनगरला मराठी मंडळी आहेत. राजकोटला आहेत. त्यांची मंडळं आहेत. ते पिढ्यान् पिढ्या गुजरातेत राहताहेत. पण एकत्र कस यायच? तुम्हाला माहीत आहे, त्या काठेवाडात एक 'विठ्ठलगड' नावाच संस्थान होत. तिथला राजा मराठी होता. त्यांच आडनाव खाजगीवाले. जातीन सी. के. पी.! दादर स्टेशनच्या बाहेर विजयनगर म्हणून जी टोलेजंग इमारत आहे, ती काठेवाडातल्या ह्या मराठी संस्थानिकाची. पण आपल्याला पत्ता नसतो!'

एकूण ह्या अहमदाबादेत मराठी माणसाची करमणूक होण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. थोडा वेळ अशाच काव्यशास्त्र-विनोदात घालवणार होतो. इतक्यात वर्दी आली, स्टेशनच्या बाजूला कर्फ्यू पुकारणार आहेत. त्यामुळं रेंगाळण्यात अर्थच नव्हता. बाडबिस्तरा गुंडाळला नि धावतपळत स्टेशन गाठल. रस्त्यात काळोख गोळा होत होता. भयभीत दुकानदार फळ्या ओढून घेत होते. रहदारी मंदावत होती. रहिवाशांनी दार–खिडक्या पटापट लावून घेतल्यामुळं काळोखात शुकशुकाट मिसळू लागला. माणस पावलं झपाझप उचलू लागली. जो तो घरच्याकडं झेपावू लागला. गल्ल्याबोळ ओस पडले. काळोख मातला. सशस्त्र पोलिसांच्या चिलखती गाड्या अंधारात दबा धरून बसलेल्या, चिडलेल्या वस्तीवर गस्त घालू लागल्या.

♣ ♣ ♣

ठाणे
६३८
भू-प्रवास २४०४८
११।११।८३
ग्रंथ शाखा

# हैदराबादेची दिवेलागण

❧ ❧ ❧

हैदराबादेविषयी बरच काही मोहक ऐकून होतो. भारतात फिरणारे परदेशी पाहुणे आल्या आल्या ह्या शहराच्या कोण्या विस्तारित भागावर लुब्ध होतात आणि वर्ष-दोन वर्षं इथच निवांत वस्ती ठोकण्याचे मनसुबे रचतात, असं कानावर होतं. ह्या मोकळ्या परिसरातील विपुल वनश्री, अलोट पाचक पाणी, कर्मकांडालाच धर्म समजणाऱ्या इथल्या कष्टाळू रयतेचा लख्ख प्रामाणिकपणा, स्वस्त धान्याची रेलचेल, थेट आभाळापर्यंत सरकलेलं सपाट अवताल-भवताल आणि केवड्याच्या पातीसारखं धम्मक पिवळं ताजं ऊन्ह, हे सगळे दुर्लभ घटक एक होतात आणि आलेल्या पाहुण्याला हैदराबादेत खिळवून ठेवतात, हे ऐकलेलंही होतं आणि अनुभवलेलंही होतं. सांगतात– जो हैदराबादेत एकदा मुक्काम करून राहिला, तो आपल्या मूळ गावाला परतण्याची भाषा सहसा काढीत नाही. हैदराबादेत घाईगर्दी औषधालाही नाही. निमूटपणे वाहणाऱ्या ढगांसारखे इथले व्यवहार संथ गतीने चाललेले असतात. चिकन-बिर्याणी खावी, तर हैदराबादेतल्या मोगलाकडचीच, असं माझं आग्रही शिफारसपत्र आहे. कारण ती मी यथेच्छ चापलेली आहे. मुखशुद्धी म्हणून वर अनाबेशाही द्राक्षं चापलेली आहेत. शिवाय सरोवराकाठचे पाच-पचवीस लखलखीत सूर्योदय आणि मंद चंद्रास्त मी हैदराबादेतच डोळे भरून पाहिलेले आहेत. हैदराबादेची भूल अर्थातच माझ्यावरही पडलीच. इच्छा एकच होती. ह्या ओढ लावणाऱ्या मुक्कामातला अखेरचा दिवस गोड व्हावा. शेवटची डिश म्हणून मोगलाई बिर्याणी हाणावी आणि मन जडलेल्या हैदराबादच्या निळ्या नभाखाली तृप्तीने निरोप घ्यावा.

घडलं उलटच.

ब्रियांगीला पोटात स्थानापन्न करून तिचा सन्मान केला. अपेक्षेप्रमाणे ती अभिजातच होती. पण माझ्याबरोबर माझी बायकोही मुसलमानाच्या खानावळीत सागुतीच जेवायला आली, हे पंगतीला आलेल्या एका धोतर-टोपीवाल्या वयस्क हिंदूला बिलकूल रुचल नाही. माझ्याजवळ येत तो नम्र स्वरात कुजबुजला,

साहेब, ही मुस्लिम खानावळ आहे. हिंदूंची नाही हिंदू खाना पलिकडच्या खानावळीत मिळतो. इथ मासमच्छी चालते. बाईंना घेऊन तुम्ही इथ चुकून आलेले दिसता.'

खाण्यापिण्यात आम्ही धर्म आणीत नाही आणि पानात पडेल त्या सकल चवदार खाद्यसृष्टीचा आम्ही चट्टामट्टा करतो, हे त्याला तितक्याच नम्रपणे सांगितल्यावर तो हिंदू कमालीचा रंजीस झाला. त्याचा चेहराच पडला. तो आपल्या जागेवर गेला. त्याची थाळी आली. तो जेवू लागला. परंतु आपल्या घडघडीत नजरेसमोर धर्म बुडताना पाहावं लागल्यामुळ त्याला झालेल दुःख त्याची क्लेशाम्ल नजर लपवू शकली नाही.

जेवण संपलं. आम्ही विडा चघळीत बाहेर रस्त्यावर आलो. तोही माझ्या मागोमाग आला नि सभ्य स्वरात म्हणाला,

'तुम्ही संसारी मंडळी धर्म पाळीत नाही, ही मोठी चूक करता. उद्या देवासमोर काय जाब द्याल ?'

– आणि क्षणात तो दूर गेला. उत्तर त्याला अपेक्षित नव्हत. काळोखात तो घड दिसलासुद्धा नाही.

तो भयग्रस्त प्रश्न कानात साठवून मी मनपसंत हैदराबादेतल्या रात्रींपैकी शेवटची रपेट करीत होतो.

सिकंदराबाद स्टेशनाबाहेरच्या राजमार्गावर दिवसा केवढी जीवघेणी खेचाखेच असते ! रात्री त्याच्या नेमकं उलटं चित्र, वर्दळ थंडावलेली. हवेत गारवा. रस्त्याच्या कडेला अर्धनग्न मजूर लवंडलेले. दुकान बंद, रस्त्यावरल्या दिव्याच्या क्षीण झोतात गोळा झालेल्या खजूरविक्याच्या, टरबूजवाल्याच्या आणि सरबतवाल्याच्या ढकलगाड्या, माश्या. एखादं-दुसर फाटक गिऱ्हाईक, रिक्शावाल्याची टाटकळती बेट. स्तब्ध झाडं. बाकी सारा सुन्न शुकशुकाट. आणि दूरपर्यंत पसरत गेलेली अंधाराची लाट.

ती अंधाराची लाट कापीत एक मशालधारी मिरवणूक समोरून चाल करीत आली. मिरवणूकवाले एकजात सारे तरुण. किरकोळ काळे. तेलकट त्रस्त. त्याच्या खडबडीत भाषेत आक्रमक पुकारे करीत निघाले होते. डिवचलेला भुजंग फुस्कारीत त्वेषान निघावा, तसे.

'हे सगळे सुशिक्षित बेकार आहेत. ते म्हणताहेत, आम्हाला रोटी नको, नोकरी द्या. भीक नको, काम द्या.' एकान सांगितल.

पाच–सहा हजार बेकाराचा ताडा मशाली पेटवून गर्जत निघालेला मला सिकंदराबादेच्या एका रस्त्यावर एका रात्री भेटला. ह्याच्या शंभरपट बेकार तरुण, म्हणे, आंध्रात गावोगाव अस्वस्थ वणवण करीत आहेत. ते बोळके करतात. मिरवणुका काढतात. घोषणा देतात. नाक्यानाक्यावर फाके मारीत उभे राहतात. स्नायूंत लुटुव बळ असलेल्या त्या भडक तरुणाना फक्त कामधदा हवा आहे. रोजगार हवा आहे. दुसरतिसर काही नको. वेदान्त तर नक्कीच नको. पण थंड रक्ताचे तरबेज शास्त्रे आणि शास्त्र्याचे हस्तक असल्याची लाज नसलेले हिकमती पुढारी त्याना सबुरीचा सल्ला देतात. क्रांतिगर्भ समाजवादाच्या पोथीतला शिळा अर्थ सागतात. अशान होत काय ? बेकाराच्या थाळ्या रिकाम्याच राहतात.

मिरवणुकीची घोडदौड विसरता येईल. धुरळा हवेत विरूनही जाईल. पण मिरवणूक विसर्जित झाल्यानतर हे बेकार निदर्शक हृदयात साचत जाणाऱ्या विराट निराशेचा निचरा कसा काय करतील ? त्याच्या हताश मनावर निराशेचे थरावर थर जर असेच साचत गेले, तर ऐटबाज समाजात कडेकडेन वावरताना पुस्तकी सयम राखण त्यांना शक्य होईल ? ह्या दिशाहीन तरगणाऱ्या तरुणाना कामधंदा देण्याच्या आड कुठल्या हिकमती गटाचे हितसबध येत असतील ? सुखवस्तू जीवशैलीची चव त्याना कुठल्या जन्मी कळेल ? त्यासाठी किती सुन्न आणि थड युगं पालटावी लागतील ? कलकत्त्याच्या रवींद्र सरोवराचा धडा काय सागतो ?

आंध्रातली विपुल सुपीक भूमी आणि हैदराबादेच्या वेशीबाहेरचे घरघरणारे प्रचड कारखाने पाहिल्यानतर पहिली ठोकर ह्याच विचारान दिली, की इथली भूमी आणि ती कसणारा, आणि इथली यत्र आणि ती हाताळणारा, ह्याच्या नातेसंबंधात नव्या दिशेनं नवनिर्माण झाल्याशिवाय इथल्या लोकजीवनाला कृतार्थतेचा साधा स्पर्शही होणार नाही. आंध्रात अंध अधारी बसतील.

अकाळविकाळ ओरडत निघालेल्या त्या निदर्शकांच्या मशालींची एक ठिणगी माझ्या मनावर पडली. मी घाबरलो. आगीची मला भ्या वाटली. हैदराबादेतल्या रम्य आठवणींवर एक जोरदार फुंकर मारून तो दिवा विझवावासं वाटलं. हैदराबाद नको, तिथल्या गार रात्री नकोत, गरमागरम बिर्याण्या नकोत नि ती टपोरी अनाबेशाही द्राक्षही नकोतसं झाल. हैदराबादेतल अमेरिकन विद्याच वर्धिष्णु केन्द्र; आर्यसमाजाच्या भागानगर सत्याग्रहाच लखलखीत पर्व, तांदळाचे खुल्या बाजारातले पिरॅमिड्स, डॉक्टर नांदापूरकराच अखंड सशोधन, निजामाच्या राडाचा काफिला, उभाडी धिप्पाड झाड आणि मराठी भाषेची समशेर कायमची म्यान न व्हावी, म्हणून कविवर्य रेव्हरंड रबुवेल लुकस जोशींसकट गोळ्यागुड्यात बुटमळणाऱ्या समस्त मराठीपुत्राच्या शर्थीचा आटापिटा, हया हैदराबादेशी समप्राण झालेल्या सर्व घटकाची एक पुरचुन्डी करून मी ती मनाबाहेर भिरकावून दिली.

मोकळा मोकळा झालो.

माझ्याबरोबर सेमिनारच्या कुरणात चरायला आलेला पंडितमित्र सांगू लागला,

'ह्या मिरवणुकांच्या रूपानं आंध्रात नक्षलवादाचा पाळणा हालतोय्. ह्या कृष्णाला आज चेचला नाही, तर आपण उद्या निवांतपणे झोपूच शकणार नाही. नक्षलवादी बळावले, तर सुखाची झोप आपल्याला विसरावीच लागेल. बोला, काय स्वीकारणार? नक्षलवाद, की सुखाची झोप?'

कृष्णाला काळोखातून मार्ग दाखवायला मशाली पेटलेल्याच आहेत. बंदोबस्तासाठी रस्त्यारस्त्यावर उभारलेली कुंपणं रातोरात पार करून ही तमाम मंडळी पोहोचायची तिथंच पोहोचतील. इच्छा एकच आहे. हा सगळा देश आपल्या सर्वांचाच आहे, ह्या भावनेनं हे धट्टेकट्टे तरुण जेव्हा पोटापाण्यासाठी लखलखत्या शहरातल्या झोपडपट्ट्यात आशेनं आश्रय घेतील, तेव्हा त्यांना निव्वळ उपरे लेखून त्यांची विटंबना होऊ नये. एरव्ही मातीखाली पुरलेलं हलाहल वजा केलं, तर हैदराबाद खरोखरच मोहक आहे. ही अफाट भूमी बहुप्रसवा आहे. पाणी पाचक आहे. दिशा मोकळ्या आहेत आणि निजामाच्या कबरीवर छत्र धरणारं आभाळ रत्नखचित आहे.

हैदराबादेपासून टेंगभर अंतरावर असलेलं गोवळकोंडा गाव आयुष्यात आता तिसऱ्यांदा भेटत होतं.

प्रथम, चोकपट्टीच्या वयात शालेय पुस्तकात गोवळकोंड्याच्या किल्ल्याची तोंड-ओळख झाली.

नंतर बरेच पावसाळे पालटले. आम्ही वयात आलो. मग ते नाव एका ब्रॅण्डीच्या बाटलीवर डौलात विराजमान होऊन समोर आलं. ती दुसरी भेट.

-- आणि तिसरी ही आत्ताची, ऐन उन्हाच्या वर्षावातली धावती भेट.

एक उंच टेकाड आहे आणि त्याच्यावर कोसळत्या उन्हापावसात पवित्रा घेऊन दंड थोपटणारा कोसळलेला भग्न किल्ला आहे. उंच कड्यावर गिधाडांचा थवा गर्दी करून बसलेला असावा, तसे त्याचे ढासळलेले बुरूज दुरून दिसत आहेत. पायथ्याला सपाट भूमीवर लष्कराचं तळ्यासारखं पसरलेलं फार मोठं ठाणं आहे. वाटाड्याला पक्कं माहीत आहे, उभ्या आशियाखंडात इतका प्रदीर्घ टापू व्यापून बसलेली उद्ध्वस्त ऐतिहासिक वास्तू गोवळकोंड्याच्या किल्ल्याव्यतिरिक्त अन्यत्र कुठंही नाही. पाहावं, तिकडं पडके बलाढ्य बुरूज, पडके पोलादी तट, प्रचंड पडके वाडे, विस्तीर्ण पडक्या विहिरी आणि कपाळावर ठसठशीत गंध असावं, तशी उत्तम अवस्थेत ठेवलेली उंच मनोरेवाली सफेद मशीद. ती परिसरातल्या मुस्लिम खेडुतांना सादही घालते आणि धीरही देते. मुसल-मानांचं हे एक व्यवच्छेदक वैशिष्ट्य आहे. त्यांचं इतर सर्व काही कोसळेल, भुईसपाट होईल, पण त्यांच्या कडव्या धर्मनिष्ठेचं आक्रमक हिरवं निशाण सदा ताडमाड उंच फडकत राहील. अखेर इस्लाम ही एक हाक आहे.

आमच्या मुस्लिम वाटाड्याकडे सगळी इत्तंबातमी आहे. तो सागू लागला,

'आपण आता टोन हजार फूट उंचीवर आहोत. गोवळकोंड्याला आठ महा-दरवाजे असून सत्त्याऐंशी बुरूज आहेत. ही भरभराट मुस्लिम राज्यकर्त्यांनी प्राप्त करून दिली. फार प्राचीन काळात ही एक मामुली बाजारपेठ होती. रुद्रम्मा नावाच्या हिंदू राणीचं हे मूळ गाव. तिला व्यवहार तो कसला जमणार ? पलीकडे गुलबर्ग्याला मुसल-मानाचं बहामनी राज्य होत. त्याचे पाच तुकडे झाले. पैकी, एक गोवळकोंडा. तुर्की मुसलमान सेनापती कुली कुतबशहा यानं ही स्वतंत्र कुतुबशाही गादी सन पधराशे-ब्रामध्ये सुरू केली. दक्षिणेत स्वतंत्र सुलतान असावेत, हे औरंगजेब बादशहाला कस पटणार ? त्यानं कुतुबशाही नष्ट करण्याचा विडा उचलला नि तो हैदराबादेत उतरला. सन सोळाशे एक्याऐंशी साली त्यानं गोवळकोंड्याच्या सुलतानावर चाल केली.'

'एका मुसलमानानं दुसऱ्या मुसलमानावर चाल करून जावं, हे जरा चमत्कारिक वाटत.' मी वाटाड्याला म्हणालो.

त्याच कारण उदात्त आहे. औरंगजेब बादशहाला राष्ट्रीय एकात्मता हवी होती. त्याला स्वार्थ नव्हता. तो साधुपुरुष होता. फक्त चार-सहा आण्यावर त्याचा दिवस जायचा. साध्या चारपाईवर झोपायचा. बायकोच्या हातची साधी डाळरोटी खाऊन तृप्त असायचा. फार साधा. पण सर्व हिंदुस्थान त्याला एका छत्राखाली आणायचा होता. म्हणून त्यानं गोवळकोंड्याच्या सुलतानावर चाल केली. मराठ्यावर चाल केली. औरंगजेब काय मराठ्याचा वैरी होता ? बिलकूल नाही. तो धर्मनिष्ठ साधू होता. पण त्याला राष्ट्रीय एकात्मता हवी होती. कुठलेही भेदभाव नको होते. सर्व हिंदुस्थानावर एकछत्री राज्य हवं होतं. आजकाल सगळेच राष्ट्रीय एकात्मतेबद्दल बोलताहेत. पण राष्ट्रीय एकात्मतेबद्दल प्रत्यक्ष कृती करून दाखवणारा महापुरुष ह्या हिंदुस्थानात फक्त एकच होऊन गेला— शहेनशहा औरंगजेब ! त्याच्या नावावर तुम्हाला दोन पैशाची अफरातफर दाखविता येणार नाही. आणि आज आपण काय पाहतो ? बोलू नये, हे बर ! वाटाड्या म्हणाला.

'ह्या हैद्राबादेत शिवाजी महाराज आले होते नं ?' मी विचारलं.

'कोण शिवाजी महाराज ? कुठले ?' त्यानं पृच्छा केली.

'तुम्ही मघाशी मराठ्याचं नाव उच्चारलंत, त्याचेच राजे. तुम्ही म्हणता, त्या औरंगजेबाला त्यानं बऱ्याच कसोट्या दिल्या होत्या.'

'असं म्हणता ? आपल्याला त्याची कल्पना नाही.' वाटाड्या हात झटकून मोकळा झाला.

'हे असंच आहे.' माझ्याबरोबरचा सहप्रवासी सांगू लागला, 'हे मुसलमान गाईडस् नेहमी एकतर्फी इतिहास सागतात. दिल्ली-आग्र्यालाही हाच प्रकार आहे. ह्यांनी कधी शिवाजीचं नाव ऐकलेलं नसतं. ऐकलेलं असलच, तर अनेक राजांपैकी एक, म्हणून. सगळी शुद्ध लबाडी आहे. मराठ्यांचे कचके ह्यांना नीट ठाऊक असतात, पण शिवाजीचं नाव घेतलं, तर ह्याचा बाप मरतो !

खरी गोष्ट अशी आहे, की रायगडावरल्या राज्याभिषेकानंतर तीन वर्षांनी दक्षिण-दिग्विजयाच्या पराक्रमी यात्रेत शिवाजीमहाराज संपूर्ण मार्च महिना हैद्राबादेत थांबले होते. तिथं त्यांच स्वागतही झाल. औरंगजेबाबरोबर संयुक्त लढा देण्याच्या शक्यतेबद्दल त्यांनी गोवळकोंड्याच्या कुतुबशाही सुलतानाशी खलबतही केली होती. हैद्राबादेहून महाराज प्रथम तिरुपतीला श्रीबालाजीच्या दर्शनाला आणि तिथून जिंजीला गेले.

गोवळकोंड्याला पूर्वी हिऱ्याच्या खाणी होत्या. त्यांची कीर्ती सातासमुद्रापार पोहोचलेली होती. इंग्लडच्या राणीच्या मुकुटातला कोहिनूर हिरा गोवळकोंड्याच्या खाणीतला आहे. इराणच्या शहाकडे असलेला हिरासुद्धा गोवळकोंड्याचाच. अनेक घराण्यांचा कर्दनकाळ ठरलेला अपशकुनी 'होप' हिरासुद्धा इथलाच. रिजेंट, पीट, ऑरलॉक ह्या जवाहिऱ्यांच्या दुनियेतल्या अलौकिक हिऱ्यांची जन्मभूमी गोवळकोंडाच आहे. गोवळकोंड्याच्या खाणीतले हिरे जगात सगळीकडे पोहोचलेले आहेत मार्को पोलो वगैरे सर्व धाडसी जगप्रवाशांनी गोवळकोंड्याच्या हिऱ्यांच्या खाणींना भेटी दिल्या होत्या. कुतुबशाहीतल्या सहाव्या सुलतानाला प्रत्यक्ष भेटलेल्या थेवेनॉट ह्या जगप्रवाशानं त्या भेटीच्या वर्णनात लिहून ठेवल आहे, की सुलतानाच्या मुकुटावरला, गोवळकोंड्याच्या खाणीत सापडलेला हिरा बारा इंच लांब आणि तीन इंच रुंद होता! तात्पर्य, ती एक रत्नाची फूटपट्टी किंवा वीट होती!

हल्ली इथं हिरे सापडतात काय?' मी वाटाड्याला विचारल.

'कसे सापडतील! हल्ली दुनियेत पाप किती वाढलंय्! वाटाड्या असहायपणे उत्तरला.

'पुढे कुतुबशहाच काय झाल?'

'काय होणार! कुठलीही राजवट सात पिढ्यांच्या पलीकड टिकणार नाही, असा वरचा कानून आहे. त्याप्रमाणे कुतुबशहाच्या सात पिढ्यांनी दोनशे वर्षं राज्य केल. साहेब लोकांनी नंतर ते निकालात काढल. त्याच्या पाचव्या सुलतानानं मुसी नदीच्या तीरावर हैदराबाद शहराची स्थापना केली. गावातल्या प्लेगचा नायनाट झाल्याच्या स्मरणार्थ त्यानंच 'चार मिनार' ही प्रचंड वास्तू बांधून काढली. उभ्या त्रिखंडात हैदराबादेच नाव दोन गोष्टींनी केलय्. 'चार मिनार' ह्या अजब वास्तूनं आणि कमालीच्या स्वस्तात मिळणाऱ्या 'चार मिनार' ह्या कडक सिगारेटींनी! 'चार मिनार'वाल्यांनी सरकारात अब्जावधी रुपयांचा नुसता कर भरलाय्! ह्यांच्या नफ्याबद्दल तर बोलूच नका!

अरे, आम्ही तर समजत होतो– हैदराबादेचा लौकिक त्रिखंडात जो दुमदुमला, तो आमच्या स्वामी रामानंदतीर्थांमुळ आणि त्यांना प्रेरणा देणाऱ्या हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेमुळं! हे विडी-तंबाखूवाले असे मध्येच कसे काय घुसले?

गोवळकोंड्याच्या डोंगरी किल्ल्याला हिरव्यागार शेतमळ्यांनी वेढलेल आहे.

शंकराच्या पिंडीवर आजूबाजूला बेलपत्राचा ढीग पसरावा, तसं हृश्य दिसत. शेतमळ्यात एका अंगाला सुलतानाची, त्याच्या मरणाच्या एकाकीपणाची झलक दाखविणारी प्रचन्ड आणि प्रेक्षणीय थडगी आहेत. एका अंगाला तोफखाना बराकी आणि पाच मैल पली-कडे सी. डी. देशमुखाच सुंदर हैदराबाद.

रस्त्यात जिकडंतिकडं खोदकाम चालल होत. घामान थबथबलेले उघडे मजूर हातोड्यानी मोठमोठे दगड फोडीत होते. ही सगळी दुष्काळी कामं निघाली असल्याच कळल. दुष्काळ आहे, म्हणतात, तर मग पोटभर पाणी पिऊन तर्रं झालेली हिरवीगार शेत कशी ?

एकजण म्हणाला,

' ही स्वराज्यातल्या बड्या बागाइतदाराची किमया आहे. ते एकजात सगळे पक्के पाणीचोर असतात. लोकाना प्यायला पाणी मिळताना मारामार. तर हे बागवाले पी. डब्ल्यू. डी.च्या मुकादमाना चिरीमिरी देऊन राजरोस पाणी लंपास करतात. बर, लोक दुष्काळी कामात इतके गर्क असतात, की वाटेल तसा पैसा पेरू शकणाऱ्या बड्या बागा-इतदाराच्या चापलूसगिरीकडे लक्ष द्यायला कुणालाच फावत नाही. आणि आपल्या सभो-वार इतकी भामटेगिरी सतत चाललेली असते, की माणूस लक्ष तरी कुठं पुरविणार ? जो तो आपल्या-आपल्या पायापुरतच पाहतो. बड्याची खाबूगिरी राजरोस चालू असते. '

डोळ्यांसमोर फुललेल्या त्या हरितक्रातीन जो आनंदाचा शिडकावा दिला, त्यात विषादाची गडद छटा अखेर मिसळलीच. ह्या देशात खेडुताच रावण मरेस्तोवर सरत नाही, हे स्पष्ट दिसत होत. गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या रियासतीत नाडलेले खेडूत हिऱ्याच्या खाणीतले दगड वेठबिगारीनं फोडीत होते; आता स्वतंत्र भारताच्या उन्हात ते दुष्काळी कामावर रोजदारीनं फोडतात. दगड फोडण काही कुणाला चुकत नाही. बिल-दरांनी अलड चरायच आणि पोटपाठ एक झालेल्या असघटित खेडुतानी दगड तासायचे, हे सरजामशाहीच्या न्यायगीताच धृपद आहे.

रस्त्यात ऊमाच एक सजवलेल वऱ्हाड मिरवणुकीन निघालेलं दिसल. अंमलदारा-वरचंच त असावं, कारण सरकारी खात्याच्या मोटारींमधून मंडळी वाजतगाजत सुखानं निघालेली होती. डोक्यावर पेट्रोमॅक्सच्या बत्त्या घेऊन निघालेले बिनीचे जय विजय हे अंमलदारसाहेबाच्या कचेरीतले चपराशी असणार, हे ओघान आलच. गोवळकोंड्याच्या दोन शतकाच्या सुलतानशाहीचे अवशेष केवळ त्याच्या शाही दक्कनभूमीतच दिसतात, अस नाही. कुठही जा, ह्या देशात सरजामशाही पावलापावलाला भेटते. किंवा आमची पाव-लच सरंजामशाहीच्या अवशेषाकडे परत परत वळतात.

पुन्हा हैदराबाद. पुन्हा रात्र.

विद्यापीठाच्या प्रचंड इमारती. गर्द बागामधल्या हवेल्या. सुजलेले तुरुंग. वस्तीच्या सोबतीन जागी राहिलेली पोलीसठाणी. मशिदींचे घुमट. मनोरे. काळाच्या थंड वाळवंटावर ही सुस्त कासवं अशी किती युगं चिपचाप पडून राहणार आहेत ?

रस्त्यात अनवाणी रिक्शावाल्याचे अनार्थी कळप. भिकाऱ्याची झोंबाझोंबी. भ्रातचित्त बेकाराची भ्रांती. सिनेमांच्या गर्दीतले उरलेसुरले थेंब-दोन-थेंब. तुरुंगातल्या निरपराध कैद्याची भयाण कुजबूज. तार ऑफिसातलं संथ कडकट्ट-कडकट्ट. रस्त्याच्या वळचणीला गार झालेले दुष्काळी मजूर. माना टाकून पडलेल्या त्यांच्या थकिस्त लेकुरवाळ्या बायका. त्यांच्याकडेन झोपलेली त्यांची नागोळी प्रजा.

ह्याच्यापैकी काही सिकंदराना तरी आश्रय देऊ करतील, असे अत्याधुनिक कारखाने हैदराबादेच्या पंचक्रोशीत उगवत आहेत, हा त्यातल्या त्यात दिलासा आहे,

उगवतीच्या बाजूला उजळत आहे. तो प्रकाश मंद आणि गार आहे, पण प्रकाश आहे, हेही काही कमी नाही.

रात्री थंड वारे वाहू लागले झाडं सळसळू लागली. बरं वाटलं. हे शांत वारे थेट श्रीचैतन्य महाप्रभूंच्या बंगाली उपसागरावरून आणि नक्षलवाद्याच्या श्रीकाकुलमच्या जंगलांवरून प्रमुदित होऊन आलेले आहेत, अशी मनाची समजूतही घातली. पण काही खरं नाही. प्रखर सत्याप्रमाणे उग्र वास्तवाचं क्षणदर्शनही झोप चाळवतं. दिशा काळवंडल्यासारख्या वाटतात. वरचा राजबिंडा वर्ख वजा केला, तर सरंजामशाहीच्या काळापासून माणसामाणसांमधला बदल टाळीत आलेल्या नातेसंबंधाना चुरगळलेल्या दमट जुन्या टोपीची अवकळा आलेली सर्वत्र दिसते.

तरीही दिवेलागण होत असलेलं हैदराबाद तसं मोहकच आहे. फक्त, पुरेसं मोहक नाही. आणि सर्वस्वी मोहक तर नाहीच नाही.

♣ ♣ ♣

# त्रिवेंद्रमची रात्र

♧ ♧ ♧

केरळच्या उंबरठ्यावर पाऊस पडायला आणि सूर्योदय व्हायला एकच गाठ पडली. मोठा शुभशकुन झाला. बघता बघता सगळं आभाळ भगवं झालं. त्या झगमगीत जरी-पटक्याच्या पार्श्वभूमीवर माडाच्या गर्द राईंचा हिरवागार पट्टा खुलून दिसला. त्याच्या झावळ्यांवरून पक्षिगण उडू लागले. माडाच्या बुंध्यापाशी ताज्या रसरशीत भातशेतीचा पुष्ट गालीचा अपरंपार पसरलेला होता. नजर भिडेल, तिथपर्यंत खाडीचं पाणी कालवे काढून खेळवलेलं दिसलं.

केरळात सलामीलाच निसर्गाच्या विमल रूपाशी गाठ पडली, तशीच ह्या हरित भूमीच्या यथेच्छ समृद्धीची खात्रीही अगदी पहिल्याच नजरभेटीत झाली. मागे कुणी तरी म्हणालं होतं, बाजारातल्या दर दहा नारळातले सात नारळ केरळातले असतात. समोरचं प्रफुल्ल दृश्य पाहताना त्याचं रोकडं प्रत्यंतर आलं. मध्येच खाडीवरल्या एका पुलावरून गाडी धडाडत निघाली. खालच्या पाण्याकडे पाहिलं, तर काही पडाव सीमोल्लंघनाला निघालेले दिसले. त्याच्यात सुद्धा असोल्या नारळाच्या राशीच भरलेल्या होत्या. केरळात कुठंही नजर टाका, दाटीवाटीनं उभे राहून टाचा उंचावून डोकावणारे झुकलेले माडच सगळीकडे दिसतात. मैलोन् मैल हे नारळींच्या बनाचं एकच एक दृश्य दुतर्फा दिसत होतं. सृष्टीची रंगीत आरास चौफेर मांडलेली होती. ती पाहून हृदय पुलकित झालं. नजर तृप्त झाली.

सांगतात, की ज्याच्या फाकड्या इंग्रजीचा आपण भरमसाट दबदबा ऐकला, त्या

चढेल सर सी. पी. रामस्वामी अय्यरन तो इथला दिवाण असताना न्याय्य हक्कासाठी उठलेल्या गरीब शेतकऱ्यावर गोळ्यांचा वर्षाव करण्याचा हुकूम फर्मावला. नतर त्या प्रेतांची विल्हेवाट अग्निडाग देऊन त्यानंच रातोरात लावली. त्या गावाच नाव वायलर. त्या बलिदानावर नतर पोवाडे रचले गेले. ह्याच हिरव्यागर्द झाडीत ते गाव कुठं तरी लपलेल असेल. इतकं निष्पाप रक्त एका साहित्यिकाकरवी सांडावं, ह्याची लाज वाटणारी आठवण आली. पण निसर्ग बलशाली आहे. कटुता निपटून काढून हर्षनिर्भर करण्याच सामर्थ्य ह्या भूमीत आहे.

पहिल्याच स्टेशनावर चहासाठी उतरलो. स्टॉलवर प्रवासी तुटून पडलेले दिसले. म्हणुन मीही डोकावलो. पाहतो, तर तिथे चपातीच्या आकाराचे तादळाच्या पिठाचे ताजे गरमागरम घावन आणि कच्च्या केळ्यांची नारळाच्या रसातली वाफा मारणारी पातळ भाजी यांची तडाखेबंद विक्री चालली होती. खास केरळीय स्पर्श असलेली ती डिश मीही मागवली. मिष्ट लागली मग खोबरेल तेलात तळलेली भरलेली पिवळीधम्मक आख्खी राजाळी केळी आली. त्याचा भक्कम आकार बघून प्रथम छाती दडपली. पण शेकडो कोस तुडवत केरळात यायच नि खास केरळीय खाण्याचा अनादर करायचा, ह्यात काय अर्थ होता ? म्हणून तोही पदार्थ चापण्याचा पुरुषार्थ केला. आजूबाजूला पाहिल. जवळपास प्रत्येकजण त्या चवदार केरळीय न्याहारीवर आडवा हात मारत होता. अगदी काल रात्रीपर्यंत सर्व प्रवासी पॅंट-बुशकोटात दिसत होते. केरळची वेस ओलांडली मात्र, सर्वत्र ट्रान्स्फर सीन झाला होता. गाडीत सर्वत्र रगीबेरगी लुंग्या दिसत होत्या. आपल्या लावण्यमयी भूमीत परतल्याचा जोश समस्त केरळीयाच्या चेहेऱ्यावर डवरला होता. केरळी लोक प्रत्यक्षात जगत असलेली ही सगळी लोभसवाणी कविता डोळे भरून पाहायला मिळाली, ही त्या प्रभातीच्या कोमल किरणांची कृपा.

भाषेची अडचण पुढे सर्वत्र नडणार, ह्याची चुणूक दिसायला लागली. केरळात बहुजनसमाज फार आणि तो फक्त मल्याळम् भाषा तेवढी जाणतो. हिंदी आणि इंग्रजी ह्या दोन्ही भाषाचा गंध नसलेलेच बहुतेकजण. केरळमध्ये साक्षरतेच मोठ पेव फुटलेल आहे आणि जो तो इंग्रजी जाणतो, असा माझा भ्रम होता. तो स्टेशनागणिक निकालात निघू लागला. केरळ साक्षरतेत पुढे झेपावल आहे, ते फक्त इतर राज्यांच्या तुलनेत. शंभर टक्के साक्षरता सोडा, उभ्या केरळात पासष्ट टक्क्यांच्या आतच काय ती साक्षरता आहे आणि इंग्रजी, हिंदी तर सोडाच, पण मातृभाषेचीही साधी अक्षरओळख नसलेले खुद्द केरळात पंच्याऐंशी लाखांच्या वर आहेत. हे सार ब्रह्मज्ञान प्रवासात भेटलेला एक केरळीय सोबती सागत होता.

आपल्या लेकीला घेऊन तो त्रिवेन्द्रमला निघाला होता. तिला ए. जी.च्या कचेरीत इंटरव्ह्यूसाठी बोलावणं आलं होतं. मुलगी फार शालीन आणि आनदी होती. मी त्याला

विचारलं,

'ब्राह्मण उमेदवारांना सरकारी नोकऱ्या मिळणं दक्षिणेत अशक्यप्राय झालंय्, म्हणे. खरा प्रकार काय आहे ?'

'तो ब्राह्मणांवरल्या बहिष्काराचा प्रकार मद्रासकडे सर्रास आहे. तिथं ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचं अघोरी शीतयुद्ध वर्षानुवर्षं चालू आहे. तामिळनाडूतून ब्राह्मणांची पद्धतशीर हकालपट्टी झालेली आहे. जे काही मूठभर ब्राह्मण तिथं खेडोपाडी देवा-देवळांच्या आधारानं जोसपणं सांभाळत बसलेले असतील, ती त्यांची शेवटची पिढी. ब्राह्मण माणूस मद्रासच्या सरकारात पाय रोवून ताठ उभा आहे, हे दृश्य पुढच्या पन्नास वर्षांत तिथं दिसणार नाही. आमचं केरळ त्यामानानं फार सौम्य आहे. अजूनही इथं ब्राह्मणांची ब्राह्मण म्हणून ससेहोलपट झालेली नाही. ह्या माझ्या जन्मसिद्ध ब्राह्मण मुलीला सरकारात मुलाखतीला बोलावलेलं आहे, ह्यात सगळं काही आलं. तामिळनाडूत असं कधीच घडलं नसतं.'

'हिला नोकरी मिळण्याची शक्यता आहे ?'

हो. मी अगोदरच बोलून ठेवलेलं आहे.'

हे वाक्य ऐकून त्या मुलीच्या डोळ्यांत आनंदाची निरांजनं फुलली. त्या वत्सल बापानं पेरलेल्या शब्दांना यथाकाल जय लाभो आणि त्याच्या लेकीला जेव्हा केव्हा नोकरी मिळायची असेल, तेव्हा ती अवश्य मिळो.

मात्र ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांविरुद्ध केरळात शस्त्र धरलेलं नाही, हे तिच्या बापाचं म्हणणं उथळ भाबडेपणाचं आहे. ब्राह्मणद्वेष केरळात सुद्धा आहे.

केरळसारख्या टीचभर भूमीत २७१ जाती आणि ४७३ पोटजाती हिंदूंमध्ये नांदताहेत, असा खुद्द त्या सरकारचाच चव्हाट्यावर मांडून ठेवलेला हिशेब आहे. त्यांचे तटेबखेडे आहेत. वादावादी आहे. केरळीयांचा जातपातींचा हा गोंधळ पाहून नव्वद वर्षांपूर्वीच स्वामी विवेकानंदांनी सर्टिफिकेट लिहून ठेवलंय्, की अवघा केरळ देश ही शुद्ध वेडप्याची छावणी आहे !

असल्या उफराट्या शेऱ्यांचे डोंगर नगण्य वाटावेत, इतकं अस्मानी गोमटं सौंदर्य ह्या केरळ देशाच्या ललाटी सुरेख कोरलेलं आहे. ही सारी किमया एका हिरव्या दाट रंगाच्या अनंत सोनरेशमी छटांनी केली आहे. पाहावं, तिथं हिरवीगार वनश्री. डोंगर हिरवे, झाडं हिरवी, मळे हिरवे, बागा हिरव्या आणि बागांमधली फळंही हिरवी. त्यात भिरभिरणारे राघूंचे थवेही गारगार हिरवे. वरती निळंभोर आभाळ आणि सभोवार वाहत्या पाण्याचे झुळझुळणारे शांत फाळ. पुस्तकात जे काही लिहिलेलं असेल, ते असो, डोळे सांगतात, केरळात ग्रामीण भाग आणि शहरवस्तीचे भाग असे अलग अलग कप्पे मुळी नाहीतच. शिवाय एक गाव संपतो कुठं नि दुसरा सुरू झाला केव्हा, हे उमगतच नाही. मनुष्यवस्तीची ठाणी एकमेकांत गुरफटलेली आहेत. खाडीचे काठ गावाची नैसर्गिक वेस म्हणून जी काही दाखवीत असतील, तेवढीच. बाकी सगळी हिरवीगर्द गावठाणं

एकमेकाना जोडलेली वाटतात. सगळी घर छोटी छोटी. दोन दोन खोल्याची. फार तर तीन खोल्याच्या गाळ्याएवढी. भोवती छोटी अगण. केरळात ऐसपैस काही नाही. मोठ्यातलं मोठं घरसुद्धा औटक घरकुल वाटतं. अधूनमधून चर्चेसच्या इमारती दिसतात. त्या मात्र भव्य नसल्या, तरी त्यातल्या त्यात मोठ्या असतात. ढोपरापर्यंत वर खोचून घेतलेल्या लुंग्या लावलेले आणि डोईस रुमाल गुडाळलेले केरळी खेडूत हातातल्या छत्रीवर भार टाकून ग्रामोपाध्यायाची प्रवचन ऐकत असलेले चर्चेसच्या वेलाटीदार दरवाज्यातून दिसले. हिंदूंची मंदिरं कुठं औषधालासुद्धा दिसली नाहीत. एखाद-दुसरं मशिदीच सफेत भिताड अधूनमधून दिसलं. चर्चेसचे कळस मात्र गावोगाव उगवलेले दिसले. कारण उघडच आहे भारतात जरी ख्रिश्चनाची लोकसंख्या अडीच टक्के असली, तरी केरळात ती जवळपास पंचवीस टक्के आहे आणि कोचीनच्या आसपासच्या टापूत तर ती जवळ जवळ तेहतीस टक्के, म्हणजे एकतृतीयांश आहे. सरळच आहे. हिंदूंच्या विस्कळलेल्या धर्मतत्त्वाना हेतुपूर्वक शिस्त लावणारे आद्य शंकराचार्य जरी खुद्द केरळातच आठव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्मले होते, तरी त्याच्या अगोदर सातशे वर्षे युरोपातला संत थॉमस, बायबल घेऊन खिस्ती धर्माचा श्रीगणेशा हिंदुस्थानात टाकण्यासाठी इथ केरळच्याच किनाऱ्यावर उतरलेला होता. त्यान गरीब खेडुताना बाप्तिस्मा देण्याचा जो आखाडा तेव्हा उघडला; त्याचा चिवट धागा गेली एकोणीसशे वर्षे अतूट राहिलेला आहे. हिंदुस्थानाच्या भूमीवरल ख्रिश्चनाच जुन्यात जुन जे सेंट फ्रॅन्सिस चर्च, तेही खुद्द कोचीनमध्येच आहे. भारतीय ख्रिश्चनाची ती गंगोत्री.

सभोवतालच्या पुलकित सृष्टीच भानहरपू पुस्तक एकटक वाचत वाचत एर्नाकुलमला आलो. केरळातल हे मोठ्यातल मोठ जक्शन. कोचीनचा फाटा इथूनच फुटतो एर्नाकुलमची वस्ती फारच दाट दिसली. पाहाव, तिकडं सावळ्या माणसाची जत्रा. त्यातले निम्मेअधिक अनवाणी. बहुतेकाच्या हातात बायकाच्या घडीच्या छत्र्या. घराच रान. घराला घर जोडलेलं. आणि नवीन घराची बाधकामं सर्वत्र चाललेली. वस्तीच्या खुणा केरळात सगळीकडे विस्तारित चाललेल्या आहेत. गोडस निसर्गावर माणूस किती क्रूर आक्रमण करतो, ते एर्नाकुलमचा गर्दीचा परिसर सागतो रुळाच्या दुतर्फा दाटीवाटीन असलेली घरं गाडीला इतकी खेटून आहेत, की समोरच्या खिडकीतल्या मुलाचा गालगुच्चाही वाटल्यास घेता यावा.

निम्मे प्रवासी एर्नाकुलमला उतरले. तेवढेच त्रिवेंद्रमसाठी चढले. पायघोळ धोतर नेसलेला एक इसम माझ्या समोरच्या बाकावर बसला. केरळी माणूस सहज ओळखता येतो. वाढवलेल्या केसाची कुरळी झुलप. गालावर कल्ले वाढवलेले. मनगटावर टपोर घड्याळ. ढोपरांपर्यंत रंगीत लुगी. जाड ओठ. राकट मुद्रा. आणि पिकलेले केस तर केरळात प्राय: कुणाचेच नसतात. एकजात सर्वांचे केस तेलकट आणि काळेकुळकुळीत.

बेताची उंची. किरकोळ यष्टी.

समोरचा माणूस तसा नव्हता. त्यानच नमस्कार करून विचारलं,

' तुम्ही महाराष्ट्रातले काय ?

मी नावगाव सांगितलं. माझं मराठीपण जाणून तो खुश झाला. म्हणाला,

' ह्या भागात मराठी माणूस भेटला, की बरं वाटतं. '

' तुम्ही इकडं कसे ? ' मी त्याला विचारलं.

' मी मूळचा नांदेडकडचा आहे. फेरी करीत होतो. चिक्की विकायचा. घरी करायची नि गावात फिरून विकायची. बरं चाललं होतं. पण घरात भाऊबंदकी झाली. मग एकदा जो चिक्की विकायला म्हणून बाहेर पडलो, तो घरी परतलोच नाही. सरळ हैदराबाद गाठलं. तिथून मद्रास. मद्रासहून आता केरळ. इथं चांगला जम बसलाय् माझा. आता इथून हलणार नाही. '

' इथं केरळात सुद्धा चिक्कीला गिऱ्हाईक आहे ? '

चिक्कीची लाईन मी मद्रासलाच सोडून दिली. आता मिठाई बनवतो. घरीच. ह्या लोकांना सुतरफेणी फार आवडते. तीच करतो नि गावोगाव खपवतो. सुतरफेणीत रुपायाला रुपाया नफा आहे. आणि धंद्यात स्पर्धा बिल्कूल नाही. गुरुवायूरच्या जत्रेत तर माणसं सुतरफेणीवर तुटून पडतात. '

' तुमचं तेजीत चाललंय् , हे ऐकून आनंद वाटला.

' आता मी स्वतः फेरी करत नाही मी घरीच माल बनवतो. पोरं ठेवल्यायत. ते तो फिरून खपवतात. '

' म्हणजे तुम्ही हलवाईच झालात. '

' हो इथले लोकही मला ' हलवाई ' ह्या नावानंच ओळखतात. माझं मूळचं नाव आहे वेलाडे. पण आता हलवाई ' झालो. माझी मुलंही तेच आडनाव लावतात.'

' म्हणजे तुम्ही केरळात संसार मांडलाय् ? '

' हे काय विचारणं, साहेब ? बायको-मुलं आहेत मला. घरदार आहे. '

' अच्छा. केरळातलीच बायको केलीत ? '

' छे. नांदेडातच लग्न झालंय माझं. बायको तिथलीच आहे. मराठी. इथं केरळला मुक्काम केल्यावर मी तिला आणायला गेलो. ती आनंदानं आली. पहिली दोन-तीन वर्षं भाषेची अडचण फार सतावीत होती. पुढं मग मल्याळी कळायला लागलं. आता आम्हाला मुलं झाली, ती मल्याळीच बोलतात. मल्याळी शाळेतच जातात. त्यानं. मराठी येत नाही नि कळतही नाही. आणि इथं त्याची गरज तरी काय आहे ?

' इथं केरळात तुमच्यासारखे मराठी लोक किती आहेत ? '

' खूप आहेत, पण सगळे कोचीनला आहेत. आपल्या नेव्हीचं तिथं यार्ड आहे. तिथं खूप मराठी ऑफिसर्स आहेत. संध्याकाळी मार्केटात गेलं, तर दहा-पाच मराठी बायका भाजीखरेदीला पिशव्या घेऊन आलेल्या दिसतात. त्यांनाही मराठी माणसं भेटली,

तर आनंद होतो. चहाला वरी बोलावतात. बापट, देव, केळकर, आपटे, दाडेकर, काळे अशी घराणीच इकडं स्थायिक झालेली आहेत. अगदी कोट-टोपी असा मराठी पेहेराव करतात. त्यांच्या व्यापारी पेढ्या पिढ्यान् पिढ्या चाललेल्या आहेत. त्यानी आपलं वळण सोडलेलं नाही नि भाषाही सोडलेली नाही. मराठी माणसाबरोबर मराठीच बोलतात.'

'म्हणजे इथ तुम्हाला एकाकी वाटायला नको.'

'कशाच एकाकी ! माझा इथं जम बसल्याबरोबर मी माझ्या मेव्हण्याला इथं बोलावून घेतला. तो आला. मग साडवाला बोलावल. तोही आला. आता आमची तीन कुटुंबं झाली मी मिठाईत आहे. मेव्हणा गवत विकतो. साडू लाकूडसामानाच्या लायनीत आहे '

'छान !'

'आम्ही इथं स्वतःची घरं बांधली. मी तर थोडी शेतीसुद्धा घेतल्याय् '

'म्हणजे आता तुम्ही इथंच पाय रोवलेत, म्हणायचे. आता काही तुम्ही महाराष्ट्रात परतण्याची चिन्हं नाहीत तुम्ही आता इथून पुढे केरळकर झालात.'

'खर आहे. हा देश राहायला खरोखरच फार चागला आहे. पाऊसपाणी विपुल आहे. धान्य स्वस्त आणि लागेल तेवढ मिळतं मटनमासळीही भरपूर आणि स्वस्त मिळते. माणसंही नरम आहेत दंगेधोपे बिलकूल नाहीत. आणि आपल्याकडच्यासारखी भांडण नाहीत. हा मराठा, हा ब्राह्मण, हा वाणी असा प्रकार नाही. आणि याचा घरटी एक माणूस मुंबईत, नाही तर दिल्लीत असतो. मुली तिकडंच असतात. तेव्हा त्याच सार चित्त तिकड असत केरळात प्रत्येक घरात मनिऑर्डरीचा शिपाई येतोय्, बघा. हा एक देश असा आहे, की जिथे सारखे बाहेरून पैसे येतच असतात. अगदी वर्षाचे बारा महिने इथं माणसाकडे पैसा असतो.'

एकूण, केरळावर तुम्ही मनापासून खूश आहात.'

'आहे. माझा चागला जम बसलाय् इथ. आता मी महाराष्ट्रात परतणार नाही, मुलाना तर महाराष्ट्र म्हणजे काय, ते सुद्धा माहीत नाही. मी बायकोबरोबर मराठी बोलतो. तेव्हा पोरं हसतात !'

एर्नाकुलमला सरकारी कचेऱ्या असणार. कारण गाडीत चढलेले बहुतेक प्रवासी सडे होते. त्यांच्या हातांत टिफीनचे चपटे डबे होते आणि वाटेतल्या लहानसहान स्टेशनावर ते उतरत नि सरावल्याप्रमाणे रूळ ओलाडून, फाटकावरून उड्या मारून, गर्द झाडीतल्या वस्तीत लुप्त होत बहुतेकजण कनिष्ठ मध्यमवर्गातले वाटले. सर्वांचा पेहेराव समान वाटला. धुमडून घेतलेली सुती लुंगी, शर्ट, मनगटावर घड्याळ, पायात साध्या रबरी वहाणा आणि हातात बायकाची घडीची छत्री ! आणि आश्चर्य म्हणजे एकाही केरळी माणसाच्या डोळ्यांवर चष्मा म्हणून कसा तो कुठ दिसला नाही ! काळे कुळकुळीत केस आणि शाबूद नजर ह्या केरळी माणसाला खुद्द निसर्गानच दिलेल्या देणग्या आहेत.

डब्यात तिकीट-चेकरची दोस्ती झाली. म्हणाला,

' ओळखा पाहू, माझं वय किती असेल ? '

तिकीट चेकर दिसायला पक्का हीरो होता. छान तब्येत, हसरे डोळे, दिलखुलास वृत्ती. त्याच्या वयाचा अदमास येईना. बर, डोईचा एक केस पिकलेला नाही नि गालावर मस्तपैकी काळे कल्ले वाढवलेले. परीटघडीचा पांढरा सफेद, स्वच्छ गणवेश. म्हटलं,

' माझ्यासारखीच तुम्हीही नुकतीच पन्नाशी ओलांडली असणार. फरक इतकाच, की तुम्ही देखणे आहात. खुद्द देवानच तुम्हाला बहाल केलेली ती देणगी आहे. '

त्याची कळी एकदम खुलली. म्हणाला,

' नो. माझं अठ्ठावन्नावं वर्षं चालू आहे. येत्या चार-सहा महिन्यात मी निवृत्तिपूर्व रजेवर जाईन पण माझी इच्छा नाही रजेवर जायची. मिळतील तेवढे दिवस पदरात पाडून घ्यायचे आहेत. '

' का ? अहो, मस्तपैकी घरी बसून पगार घ्या की. '

' अहो. तिकीट-चेकर्सच काय कुठं नुसत्या पगारावर भागतं ? मी नाईट-ड्यूट्या करतो, ओव्हर-टाईम करतो. त्याचे दोनशे-अडीचशे सुटतात. शिवाय वरकमाईही असतेच सुटी घेऊन घरी बसलो, की दरमहा गेला बाजार तीनशे रुपयाना खोट बसेल. तुम्ही एक मार्क करा, साहेब, तिकीट-चेकर्स कधी रजाही घेणार नाहीत, की बढतीही मागणार नाहीत ! बढती मिळाली, की पगार फक्त दहा रुपयांनी वाढतो नि वरकमाईला कात्री लागते ! मी तिकीट-चेकर म्हणून कण्णूरला नोकरीला लागलो आता तिकीट-चेकर म्हणून कण्णूरलाच निवृत्त होणार ! मला बढतीचे खूप वेळा योग येऊन गेले. पण मी ते सगळे तत्काळ लाथाडले. ऑफिसर व्हा नि फायलींची ओझी वाहा, हा धंदा सांगितलाय् कुणी ? '

' निवृत्त झाल्यावर काय करणार ? '

' सांगतो. आपण जन्मभर सर्वांशी प्रेमान वागलो. मोठमोठे व्यापारी यायचे बर्थ मागायचे. मी कुणाला कधी नाही म्हटलं नाही. नाराज केलं नाही. सर्वांना ॲकॉमोडेट केलं. प्रसंगी माझी सीटही मी त्याना देई नि मी असाच डब्यात हिंडून-फिरून वेळ काढी. त्यामुळं व्यापारी माझ्यावर खूश आहेत. ते मला आता उघडा पडू देणार नाहीत. मला त्याच्या धंद्यात सामावून घेतील. शिवाय रेल्वेच्या वॅगनी मिळवायला त्याना माझा उपयोगही होईल. जग अखेर दिल्या-घेतल्याचच आहे नं, साहेब ? '

बघता बघता वनवेष्टित त्रिवेंद्रम आलं. जाणकार प्रवाशानी स्टेशनाबाहेर रिक्षा, टॅक्सी पकडण्यासाठी एकच धूम ठोकली. मी मागे रेंगाळलो. प्रथम रेल्वेच्या सामिष भोजनालयात जाऊन मासळीची कढी आणि केरळीयाना विशेष प्रिय असणारा उकडा भात चापला. केरळची म्हणून काही वेगळी चविष्ट मच्छी नसतेच. मुंबईपासून कारवार पर्यंत कुठंही मुबलक मिळतात, त्या तारल्याचच कालवण होतं. केरळच्या ख्यातनाम मसाल्यामुळं ते स्वादिष्ट लागलं. मिरी, दालचिनी, लवंगा या गरम मसल्यामुळंच ही

परशुरामीय भूमी पूर्वापार काळापासून परकीयाना आपल्याकडे सतत आकर्षू शकली. अस्सल हस्तिदंत, रुचिवर्धक मसाले आणि चदन याच्या वाढत्या लोभान पश्चिमेचे पर्यटक व्यापारी केरळच्या बागायती किनाऱ्याला लागले. त्याच्या पाऊलखुणाचा माग काढत इतर धर्मीयसुद्धा आले. मोगली सत्तेच संकट खैबरखिंडीच्या खिडकीतून भारतावर प्रथम कोसळल, असा आपला पुस्तकी गैरसमज असतो. इस्लामी मंडळींचे पाय या केरळच्या हिरव्या गालिच्याला त्याच्या अगोदर अनेक शतकं लागले होते. सागतात, खुद्द पैगबर-साहेबाच्या आदेशावरूनच परतु त्याच्या मृत्यूनंतर पहिले इस्लामी धर्मप्रसारक सहाशेदहा साली अरबस्तानाहून केरळात कुराण घेऊन दाखल झाले आणि त्यानी स्थानिक रयतेची धर्मांतर केली. हिंदुस्थानच्या भूमीवरला इस्लामचा उदय अशा प्रकारे प्रथम केरळच्या भूमीवर झालेला आहे, उत्तरेत नव्हे. आणि खर म्हणजे इतर परकीय धर्मांचा उदयसुद्धा सर्वप्रथम केरळातच झाला बावन्न साली सत थॉमस बायबल घेऊन आला. त्याच्या प्रेरणेन इथ खिस्ती धर्म भारतात सर्वप्रथम सुरू झाला. त्याच्याच अलीकडे पलीकडे गोरे ज्यू आले. बुद्ध धर्मीयाचीही केरळात अलेप्पीजवळ वसती होती. हे सगळे धर्म केरळात शाततेन नादल्याच सागतात, ते धादान्त असत्य आहे, बौद्ध त्याच्या मरणानंच मेले. दुर्गाबाईना विचारा. ज्यूंमध्ये काळे-गोरे असे तट पडले. पण त्यानी कुणाची कागाळी काढली नाही. किरिस्तावानी दाडगेपणा केला नाही, कारण स्थानिक राजा हिंदू होता. मुसलमान मोप-ल्यानी मात्र सतत दगेधोपे करून हिंदूंना त्राहि भगवान् करून सोडलं. आक्रमक अस्तित्व जाणवू नये, इतके ते नव्या राजवटीत सध्या नरम आले आहेत. पण अधूनमधून ते 'मोपलास्तान'चा पुकारा देतात. नवबौद्ध तिकडे औषधालासुद्धा नाहीत. हरिजन मात्र भरपूर आहेत. केरळीय समाज हा असा केळीच्या फाटलेल्या पानासारखा आहे.

भारतात पोर्तुगीजाचा प्रवेशसुद्धा केरळातून झाला, गोव्यातून नव्हे. वास्को डी गामा हा पोर्तुगीज दर्यासारग व्यापारानिमित्त आफ्रिकेतल्या झांझिबारला उतरला होता तिथ झांझिबारात त्याला एक केरळी खलाशी भेटला. त्यान वास्को डी गामाला भारताची दिशा दाखविली. त्या केरळी खलाशाला आपल्या बरोबर घेऊनच वास्को डी गामा केरळच्या कालिकत बदरात उतरला. भारतातली पोर्तुगीज राजवट अशा प्रकारे एका केरळी-याच्या मार्गदर्शनान सुरू झाली आणि जनरल कॅण्डेथ या केरळीय सेनाधिकाऱ्यानच परवा बासष्ट साली गोव्याच्या भूमीत त्या साडेचारशे वर्षं नादलेल्या परकीय राजवटीचा दफनविधी पार पाडला!

त्रिवेंद्रम ही मडगावची मोठी आणि सुधारित आवृत्ती वाटली. झाडीन झाकलेले मोठे लाबलचक रस्ते. हॉटेल दुकान. स्टॉल्स्. स्टॉल्समध्ये प्लॅस्टिकच्या ठराविक वस्तूंची माडणी. रबरी सपाता, पट्टीच्या चटया, बॅगा, लुंग्या, केळ्याच्या पिवळ्याधम्मक वेफर्सची आणि टपोऱ्या काजूगराची पाकीट. रस्त्यावर दिसणाऱ्यापैकी जवळपास निम्मी माणस अनवाणी, निम्म्याच्या पायात स्वस्त रबरी सपाता. कातड्याच्या चपला किंवा बूट तर एकाच्याही

पायात नाहीत आणि बहुतेक सर्वांच्यात्र हातात बायकाच्या घडीच्या छत्र्या. कुणालाही कसलीही घाई दिसत नाही. दुकानात सर्वत्र एकाच मजकुराच्या पाट्या दिसतात :

'पासपोर्टचे फॉर्म्स इथं मिळतील'

लॉजमध्ये मॅनेजरला विचारलं,

'पासपोर्टच्या फॉर्मची इथं इतकी गरज असते?'

त्यानं उत्साहानं सांगितलं,

अर्थात. परदेशगमनाचं नवं युग आमच्या केरळात सुरू झालंय्. सारी चार-पाच वर्षांतली ही जादू आहे. आमचे लोक दुबईला जायला लागले आहेत. दीड लक्ष केरळीय दुबईत नोकऱ्या करताहेत करणार काय? इथं सर्वांना नोकऱ्या नाहीत मुंबई, बंगलोर, दिल्ली, कलकत्ता– कुठंही जा. आता आपल्या लोकांना केरळी नकोसे झालेयत. कारण, तिथल्या लोकांच्या पोटावर पाय येतो. मोठी कुचंबणाच झाली होती. पण हे मध्यपूर्वेचं क्षेत्र अचानक गावलय्. सध्या त्रिवेंद्रमहून विमानानं दुबईला सरळ रेषेत जाता येतं. प्रत्येक विमान गच्च भरून जातय्. आमच्या नर्सिंग झालेल्या मुली तर जगभर जाताहेत. केरळ सरकारचं नोकरीनिमित्त परदेशगमनाला उत्तेजन आहे. अरब देशात जाऊ इच्छिणाऱ्या केरळीयासाठी स्पेशल एम्प्लॉयमेन्ट एक्स्चेंज इथं उघडलय्. त्या सर्वांना पासपोर्ट फॉर्म लागतात.'

हे खरं आहे. प्रचंड संख्येनं केरळी मजूर आणि कारकून, इंजीनिअर्स अरब देशाकडे प्रतिदिन झेपावत आहेत. तिथं ते घरबांधणीच्या आणि रस्तेबांधणीच्या कामावर उत्तम रोजगार मिळवतात. काटकसरीनं एकत्र राहतात आणि उरलेल्या रकमा केरळातल्या निर्धन खेडूत नातेवाइकांना पाठवतात. केरळी मुलीही फार मोठ्या संख्येनं अरब देशात घुसत आहेत. बहुतेकजण विमानानं पटकन् जातात. ज्यांना विमानाचे दर परवडत नाहीत, ते गरीब मजूर आणि घरकामाला निघालेल्या निरक्षर, निष्कांचन तरुणी पासपोर्ट वगैरेच्या फंदात न पडता मोठ्या शिडाच्या पडावानं जीव धोक्यात घालून गुपचूप पलायन करतात. मध्य सागरात आठ-दहा दिवस हेलकावे खाऊन कधी पडाव अरबस्तानच्या वाळवंटाला लागतात. कधी मध्येच बुडतात. कधी तिकडे निराधार बायकांचे हालहाल होतात विटंबना होते. त्यांच्या बातम्याही इकडे येतात. पण जाणारे जातातच. त्यांची हिंमतबाज संख्या सतत वाढत आहे.

'ओव्हरसीज डेव्हलपमेन्ट ॲण्ड एम्प्लॉयमेन्ट प्रमोशन कन्सलटन्सी' नावाचं एक नवं खातच केरळ सरकारनं आता उघडलं असून तकदीर पणाला लावणाऱ्या बेकार केरळीय तरुण-तरुणींना अरबस्तानचा धनगर्भ किनारा दाखवण्याचं काम ते वर्धिष्णु खात चोख बजावत आहे! केरळ ते अरबस्तान ह्या एकतर्फी दिशेनं ताकदवान माणसांचा पूर वाहत आहे आणि अरबस्तान ते केरळ ह्या अपरिवर्तनीय मार्गानं मनिऑर्डरींचा लोंढा लोटत आहे. काय असेल, ते असो, पौष्टिक अरबी रुपयामुळं आकुंचित केरळची आर्थिक स्थिती गुटगुटीत होत आहे, ह्यात शंकाच नाही. ही सारी अरबाची कृपा.

अर्थात, या संपर्कामुळं चोरटा व्यापारही वाढत आहे आणि उपयुक्त वस्तूंच्या किमती आटोक्याबाहेर झेपावतही आहेत.

शहरावर उतरणारी रात्र आणि तिथल्या आभाळावर फुलणारी पहाट जर डोळे भरून निरखली नाही, तर त्या त्या शहराचं खर सौंदर्य संपूर्णपणे आकळणारच नाही.

दुपारची गोष्टच वेगळी. दुपार सगळीकडंच भगभगीत असते. दिल्लीतली दुपार, अहमदाबादेतली दुपार आणि मदुरेतली दुपार एकाच भकास जातकुळीची असते.

मात्र प्रत्येक स्वतंत्र रात्रीला प्रत्येक पहाटेसारखा स्वधर्म गाणारा प्राण असतो. कभिन्न काळोख नि पहाटेचा पुलकित करणारा भगवा प्रकाशपट्टा शहराशहरातून वेगवेगळे मुखवटे धारण करून वावरतात. त्याचं विलासी रूप ही सृष्टीची विराट वसुंधरेला मिळालेली अक्षय देणगी आहे.

त्रिवेन्द्रमची रात्र बघायला बाहेर पडलो. रस्त्यावर दिवे जेमतेमच होते. झाडांमध्ये मिट्ट काळोख गुरफटलेला होता. मुंबईप्रमाणे त्रिवेन्द्रमलाही रस्त्यावरच उभ्या उभ्या सारं आयुष्य काढणारे बरेचजण दिसले. स्टॉलच्या कडेकडेनंच लवंडून स्टॉलवाले रात्र ढकलतात. सगळे तरुण, नाडलेले अन् थकलेले दिसतात.

रात्री बारानंतर सिनेमागृहं सुटली. प्रेक्षकांचे थवेच्या थवे आरडत ओरडत रस्त्यावर आले. सगळे बकाल वाटले. बहुतेकजण अनवाणीच होते. काहीजणांच्या हातात वॅटऱ्या होत्या. धक्काबुक्की करत ते रस्त्यावर पांगले. देशात इतकी अनागोंदी, बेकारी आणि कफल्लकी आहे; पण सिनेमाना लागलेली हैदोस भरती रेसभर हटायला कबूल नाही! हीरो मंडळींनी हा चमत्कारच ह्या इहलोकी करून दाखवला आहे. ही सगळी निःसीम निराशेचीच अटळ अशी आत्मविनाशी प्रतिक्रिया आहे काय? रस्त्यावरल्या स्टॉलसूच्या आडोशानं रात्री काढून पिछाडीच्या ओसाडीत विधी उरकणाऱ्या ह्या अगतिक, अनिकेत गर्दीचं पुढं काय होणार? त्यांना भवितव्य काय आहे? त्यांनी सोन्यासारखा जन्म हॉटेलातला निःसत्त्व आमटीभात नि केळ्याच्या काचऱ्या खाऊन उभ्या उभ्या काढायचा?

त्रिवेन्द्रममधल्या रात्रीच्या एका फेरफटक्यात हे सगळे प्रश्न त्यांच्या मूळ नग्न रूपात पावलापावलाला भेटले.

दिवेलागणीच्या वेळी ग्रामदैवत पद्मनाभाच्या रूपसुन्दर मंदिरात गेलो होतो. मंदिरात आडव्या पडलेल्या शेषशायी भगवानाचं रूप किती मोहक दिसलं! त्याच्या नेत्रांच्या ठिकाणी रत्नं लखलखत होती. सोन्याच्या मुकुटानं मुखमंडलाला अनुपम शोभा आणली होती. आणि त्या राजबिंड्या भगवानाच्या प्रत्यक्ष नजरेसमोरच, भाड्यानी सफेद धोतर नेसण्याची भाविकांवर सक्ती करून पैसे उकळले जात होते. भक्तानं पँट किंवा रंगीबेरंगी

कपडे घातलेले, म्हणे, विष्णूला बिलकुल सहन होत नाहीत! लूट राजरोस चाललेली होती. पंचवीस पैसे मोजा नि अपुरा टॉवेल गुंडाळा, किंवा पन्नास पैसे द्या नि ऐसपैस लुंगी लावा. पण अगोदर पैसे टाका. देवदर्शन वगैरे नतर. असं हे कुरतडण अष्टौप्रहर आणि भगवंताच्या साक्षीन चालू आहे. गरीब आणि अज्ञ खेडुताचे कळप देवदर्शनाला येतात. त्याची तर दशा-दशा करतात. आणि राजरस्त्यावर सरकारी जाहिरातींचा आक्रोश चालूच आहे, की शासनान गरिबासाठी एक लक्ष घर बांधली नि दोन लक्ष विहिरी खणल्या!

त्रिवेन्द्रममध्ये राजा रविवर्म्याच्या अफलातून कलाकृतींची, डोळ्याची पारणी फेडणारी समृद्ध गॅलरी आहे. जन्माला येऊन ती न पाहण हा शुद्ध करंटेपणा आहे. पण डोळ्यां-समोरच माणसाच्या अस्तित्वाच हे विदारक चित्र असल्यानतर त्या महान कलाकृती डोळे कितपत निवळू शकतील? भुकेलेली माणस बाजूला तारकळत असताना आपण डोळे मिटून पगतीत पक्वान्न झोडण्यासारखं अवघडपणाच आहे.

त्रिवेन्द्रम एक टोकाकडच लहानस शहर. रात्रीचा काळोख मात्र त्याच्या रुद्र रूपाचा आक्रोश सारखा ऐकवतो. इथली झाड सुन्दर आहेत, सागर-किनारा डोळे सुख-विणारा आहे, कालवे गार आहेत, वगैरे काव्य जाहिरातींच्या मजकुरात ठीक आहे. पण त्रिवेन्द्रमच्या रस्त्यावर आयुष्य ढकलणाऱ्या अनिकेत, अनवाणी माणसांच काय? त्याचा वाली कोण? की त्याचा हा नरजन्म म्हणजे न संपणाऱ्या काळोखाची लाबच लाब रात्र ठरणार आहे?

रात्री उशिरा लॉजवर परतलो. एकचा सुमार झाला असावा. गादीवर पडल्या-पडल्या रस्त्यावरची वर्दळ जाणवत होती. प्रथम दुरून आलेली माणसं बोलत बोलत दूर गेल्याच स्पष्ट समजल. नंतर निरव पोकळी निर्माण झाली. वारा पडल्यामुळ झाडांची सळसळसुद्धा थंडावली. मग कुठून तरी गाण्याचे तुटक शब्द लहरत जवळ जवळ आले. दूर गेले. पुन्हा पोकळी. नतर एक क्षणिक हमरीतुमरी ऐकू आली. मागोमाग मोटार वेगात गेली. तोवर डोळे मिटत आले. मग खुद्द लॉजमध्येच टोकाला खुडबूड सुरू झाली. झोप चाळवली. उठलो. दिवा लावला. तिकडं गेलो. तिथं स्नानगृहाजवळ लॉजचा म्हातारा नोकर मोठ्या अजस्र चुल्यात पेटलेल सरपण ढकलीत होता. तोंडान रामनाम चाललं असावं. मी विचारल,

'इतक्या मध्यरात्री काय चाललय् हे? शांतपणे जरा झोपा की.'

त्यावर तो दीनवाण हसत म्हणाला,

'साहेब, आम्ही झोपलो, तर साहेबलोकांना सकाळी पाणी कोण देईल गरम गरम? पॅसेंजर पाच वाजल्यापासून गरम पाणी मागतात.'

त्याचही खोटं नव्हत. कुणाला तरी भल्या पहाटे गरम पाणी हवं असेल, तर कुणाला

तरी मध्यरात्रीपासून चुलीजवळ जागत असणच प्राप्त आहे आता दिवसभर उभ्यान काम केलेल्या म्हाताऱ्या चाकरावर परत रात्रीसुद्धा जागत बसण्याची सक्ती करायची काय, या नैतिक प्रश्नाला आपल्या समाजात तत्काळ मिळणाऱ्या जरामरणहीन उत्तराचा शिक्का उपलब्ध आहे •

ज्याची प्रतिकारशक्ती शून्य, त्यान निमूटपणे बळी गेलं पाहिजे

☘ ☘ ☘

# विवेकानंदांचा उदो!

☘ ☘ ☘

त्रिभुवन म्हणजे नेमकं काय अद्‌भुत चैतन्य आहे, त्याचं रोकड प्रत्यंतर कन्याकुमारी नामक भारताचा हा दक्षिणतम भूबिंदू मला उत्कटतेनं आणून देत आहे.

मागे विस्तीर्ण पसरलेला भारताचा अफाट भूखंड, समोर तीन सागरांची वाचाळ गोळाबेरीज आणि वर तळपणारं निळंभोर मौन आकाश यांचा संगम म्हणजे कन्याकुमारी.

आजवर मी काय कमी भटकलो? हिमालयाचे पापुद्रे पाहिले; सोनेरी विंचू अंगाखांद्यावर नाचवणारी वाळवंटं पाहिली, सुंदरबनासारखी सखल पाणथळं पाहिली; जंगली गाढवांचे कळप पोसणारं रण पाहिलं, पेरियारसारखी गूढगाढी जंगलं पाहिली; महानगरांतून डेरेवस्ती केली, महानद्या ओलांडल्या, उफाळलेल्या सागराचं तांडव पाहिलं आणि निद्रिस्त सागराचं तरंगहीन नीलांग अरबस्तानच्या दिशेनं खूप आत जाऊन सिंधुसागरात पाहिलं, गोडी नि खारी अशी दोन्ही प्रकारची सरोवरं पाहिली, वनं, उपवनं पाहिली आणि मैलोगणती मळे पाहिले. माळ पाहिले विमानानं आभाळात पंखही पसरून झाले. पैकी प्रत्येक ठिकाण आनंदनिधानच होतं, पण त्याची त्याची म्हणून सौभाग्यसीमा होती.

कन्याकुमारीचा चेतोहारी परिसर केवळ असीम आहे. ह्या देवभूमीचा हा अखेरचा अंश. तिथली वाळू पावलाला लागावी, असं कुणाला वाटणार नाही?

वरून ऊन मी म्हणत आहे. सूर्यानं डोळे वटारले आहेत. समुद्रावरले गरम कोरडे वारे वाहत आहेत. पण निसर्गसौंदर्यातलं चुम्बकत्व महाशक्तिमान आहे. कन्याकुमारीला माणसं आपणहून येतात. उन्हातून येतात; पावसातून येतात, थंडीवारे सोशीत येतात,

हजार कोसावरून पदरमोड करून येतात—पण येतात नि महासागराचा हा उचबळलेला त्रिवेणी संगम नि त्याच्यावरले भगवे सूर्योदय आणि शेंदरी सूर्यास्त डोळे भरून पाहतात. सर्व भारतात हा एकच एक टापू असा आहे, की जिथून तुम्ही पहाटेच्या वेळी पूर्वेला समुद्रातून सूर्यबिंब उगवताना पाहू शकता; दिवसभर सूर्य तुमच्या नजरेसमोर क्षितिजावर सरकत असतो आणि मावळतीला तो पश्चिमेला सागरात दूरवर डूब घेतो. तिन्हीसांजेचा उदासवाणा अपुरा प्रकाश ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत दिशादिशा व्यापून टाकतो. आणि नंतर सुरू होत पडलेल्या वाऱ्यातलं रात्रीचं लांबलचक राज्य.

वीस वर्षांपूर्वी मी माझ्या आईला घेऊन इथं तीर्थासाठी एक वारी केली होती. रात्र झालेली होती. खग्रास चंद्रग्रहण होतं. सगळं आभाळ काळं कुळकुळीत झालेलं होतं. आम्ही आलो, तेव्हा वेध लागलेले होते. मग ते आस्ते आस्ते संपले. मोक्षकाळ सुरू झाला. आणि त्या काळ्याकभिन्न मध्यरात्री सागरस्नानासाठी भाविकांची दर्याकिनाऱ्यावर एकच गर्दी उसळली. अक्षरशः हजारो स्त्री-पुरुषांनी नि पोराटोरांनी मूठ मूठ वाढत चाललेल्या चांदण्यात सागरात मनसोक्त डुम्बून घेतलं. ते दृश्य विलक्षण होतं.

ती चांदणीरात्र मी कन्याकुमारीला सागरतीरावरच काढली. भल्या पहाटे हिमगौर, कन्याकुमारीदेवीचं दर्शन घेतलं नि परतलो. एका हातात वरमाला घेऊन वचनबद्ध शिवाच्या येण्याची जीव लावून वाट पाहणारी तिची व्याकूळ नजर आणि एकूणच स्त्री-जातीच्या नशिबी असलेलं वाट पाहणं मला नंतर बराच काळ सोबत करीत होतं.

त्या चांदण्याच्या रात्रीही दूरवर सागरात मला दोन मोठे बोडके खडक दिसले होते. स्वामी विवेकानंदांनी तिथे त्या खडकावर आसन घालून साधना केली होती, असंही मला तेव्हा कुणीतरी म्हणालं होतं. पण त्या रात्रीचा चांदण्याचा मुक्त अभिषेक मनाचा इतका कबजा घेणारा होता, की देशभक्ती, साधना, धर्माचं पुनरुज्जीवन वगैरे चिल्लर बाबींकडे माझं लक्षही गेलं नाही. चांदणं विचार करायला सवड देतंच कुठं? ते तुम्हाला जागच्या जागी भारावून टाकतं. मी नुसता चांदण्यात फेसाळणारा तो अजब सागरमिलाफ पाहिला नि निःशब्द परतलो.

ठीक वीस वर्षांनंतर मी आज पुन्हा उगवलो आहे ह्या भुळणीवर भर दुपारी बारा वाजता पण सारं कसं सुसह्य आहे. कारण समोरच्या सागरात त्या खडकावर चमचमतो आहे निळ्या मखमली रुमालावर मांडून ठेवलेल्या रत्नासारखा एक विलोभनीय अलंकार. तो अपूर्व अलंकार म्हणजे स्वामी विवेकानंदांचं सर्वांगसुंदर भव्य स्मारक-मंदिर. खरं म्हणजे रंगाचं आणि आकाराचं संतुलित ऐश्वर्य म्हणजे काय, हे मला तिथं साक्षात दिसत आहे. त्या लांबोटक्या मंदिराची शिखरमालिका आहे फिकट लाल. उंच भिंती आहेत पिवळसर हिरव्या. बैठकांचा गुळगुळीत खडक आहे तपकिरी शेवाळी. खडकाला वेढणाऱ्या

लाटांचा फेस आहे पांढरा शुभ्र. सागरजल आहे निळसर करड. आकाश आहे निळं जांभळं. मंदिरावर फडफडणारी पताका आहे जास्वंदी भगवी. आणि वास्तूला आवरण आहे पिवळ्या धम्मक उन्हाच. इतकं विलोभनीय रंगमिश्रण आणि इष्टप्रमाण आकृती क्वचित कुठं पाहायला मिळते !

कुठं तो पूर्वीचा कासवाच्या पाठीसारखा जलवेष्टित एकाकी प्रस्तर नि कुठे ही त्याच बैठकीवर अवतार घेतलेली लोभसवाणी अलंकृत वास्तू !

माझ्यासमोर एकात एक गुंतलेल्या प्रश्नाच रान झुलायला लागल विवेकानंदाच भव्योचित कायम स्मारक ह्या सागरसंगमात उभं करण्याच दिव्य स्वप्न मुळात पडल तरी कुणाला ? कस ? नि ते साकार झालं तरी कुणाच्या एकटक यत्नांनी ? विरोधाच फडेनिवडुंग तोडलं कुणी ? इथं इतक्या टोकाच्या बिंदूवर दहा दहा टन वजनाच्या नक्षीकाम केलेल्या अखंड शिळा वाहून आणल्या तरी कशा, नि कुणी ? मुळात रंगीत दगडाच्या खाणी उपलब्ध झाल्या तरी कुठं ? कारागिरीच अंग असलेले पाथरवट कुणी धुंडून आणले ? कुठून आणले ? त्यांच्या छिन्न्या कुणी परत परत पाजवून दिल्या ? पैसा कुणी दिला ? कसा दिला ? म्हणजे ह्या वास्तूचा आराखडा कुणी काढला ? कुठल्या जीवनदानी मंडळींनी हा समस्त आखाडा घातला ? आणि अश्रद्ध कालमानाच्या नावान रडण्याच्या ह्या युगात धर्माच्या तेजस्वितेचा जयजयकार सांगणाऱ्या स्वामीजींबद्दल पुळका तरी कुणाला आला ? का आला ?

ह्या संदर्भात कन्याकुमारीच्या ह्या परिसरात ज्याच्या त्याच्या जिभेवर फक्त एकच नाव परत परत भिजत होत. एकनाथजी रानडे ! कन्याकुमारीत पाऊल टाकल, तिथ पुनःपुन्हा एकनाथजी एके एकनाथजी !

पण मी ह्या चिमुकल्या विश्वाच्या गंगोत्रीपाशी गेलो.

गुरू रामकृष्ण परमहंसाच महानिर्वाण १८८६ साली कलकत्त्यात कर्करोगान झाल. त्याना शिष्य एकूण सोळा. पैकी विवेकानंद हे एक काळजीवाहू सन्यासी. प्रत्येक गोष्टीचा साधक-बाधक विचार करून ग्राह्य-अग्राह्य ठरविणारे. म्हणून विवेकानंद. ज्याच्या पाया-जवळ बसायच, ते गुरू तर गेलेलेच होते. म्हणून त्यानी दोन वर्षं पायी भटकून संपूर्ण हिंदुस्थानच दर्शन घ्यायच ठरवलं.

भगवी छाटी, उंच सोटा, चिलीम आणि कटोरा, हा जामानिमा आणि स्वच्छ निर्भय नजर घेऊन स्वामींनी एकाकी भटकंतीला सुरुवात केली. २५ डिसेंबर १८९२ रोजी सायंकाळी ते चालत चालत कन्याकुमारीत दाखल झाले. त्यावेळी त्याच वय तीस होत. ते कालिमातेचे भक्त. शक्तीचे उग्र उपासक. साहजिकच त्याना देवी पार्वतीच दर्शन घ्यायची उत्कंठा लागली होती. त्यावेळी कन्याकुमारीचा टापू निर्जन होता. फक्त कोळी ग्रामस्थाची नि पुरोहिताची वस्ती होती. स्वामीजी जे आले, ते त्याच सायंकाळी थेट देवीसमोर दंडवत प्रविष्ट करते झाले. देवीच मुखमंडल पाहून त्याच्या नजरेची पारणं

फिटली. त्यांची जणू समाधीच लागली. नतर देवदर्शन आटोपून ते रात्री पुळणीवर आले. समुद्रातल्या त्या खडकावर देवीच पाऊल उमटलेलं आहे, कारण पार्वतीन तिथ एका पायावर उभं राहून तपस्या केली होती, असं त्यांना कळल होत. देवीच ते पद-चिन्ह पाहण्याची त्यांना आस लागली. पण नावाडी पैशाशिवाय त्याना पलीकडे नेईनात नि ह्या सन्याशाकडे पैसे कसे असणार ? शेवटी त्यानी साडेचारशे यार्डाच ते अंतर पोहून जायच ठरवल. उडी मारली नि पोहत पोहत त्याच रात्री खडकाला लागले. त्याना देवीच ते पदचिन्ह तिथ खडकावर उमटलेल दिसल. मग पोहून परत पुळणीवर येण्या-ऐवजी ते तिथच त्या पदचिन्हाकडे नजर लावून ध्यानस्थ बसले. त्याची जणू ब्रह्मानदी टाळी लागली. सतत तीन रात्री आणि दोन दिवस त्यानी ध्यान केल !

ही प्रदीर्घ समाधी ही त्याच्या सन्याशी जीवनाला कलाटणी देणारी घटना ठरली, कारण हे एकचित्त ध्यान करीत असतानाच आपल नेमक जीवितकार्य काय, ते त्याच्या-पुढे स्पष्ट झालं त्यांनी नतर सागितल,

' मला कोणती कामगिरी बजावायची आहे, हे अखेर मला कळून आलं. भारताच्या आणि जगाच्या कल्याणाकरिता व वैदिक धर्माच्या ज्ञानाचा प्रसार करण्याकरिता मला हा हिंदी महासागर ओलाडून पलीकडे गेल पाहिजे, हे मला जाणवल. '

दुसऱ्या शब्दात सागायच म्हणजे सनातन धर्माचे पुरस्कर्ते असलेले सन्यासी विवेकानंद त्या अद्भूत क्षणापासून देशोद्धारक मिशनरी स्वामी विवेकानद झाले. त्याच्या अलौकिक दिग्विजयाचा शुभारभ ह्या कन्याकुमारीच्या खडकापासून झाला.

अशा ह्या अचाटकीर्त निष्कलक स्वामींच उचित स्मारक कन्याकुमारीत व्हायला हवं, असं आलसिंघा पेरूमल ह्या मद्रासला शिक्षक असलेल्या त्याच्या दक्षिणी भक्ताला प्रथम वाटल. स्वामीजींचा नि त्याचा निस्सीम जिव्हाळा होता. मद्रासमध्ये दारोदार हिंडून त्यानी स्वामीजींच्या अमेरिकेतल्या खर्चासाठी निधी गोळा केला होता. स्वामींना बोटीवर निरोप द्यायलाही ते उपस्थित होते. स्वामींनी त्याना लिहिलेली पत्र आता प्रसिद्ध झालेली आहेत. परतु त्यांचा स्मारकाचा हेतू तेवढ्यावरच राहिला.

पुढे काही वर्षानी कन्याकुमारीत स्वामींच्या नावान एक छोटंस ग्रामवाचनालय सुरू झाल. ते अद्यापि विद्यमान आहे.

त्यानंतर थेट १९६२ साली स्वामींच्या जन्मशताब्दीचा धडाका सबध देशभर उठला. त्यातलं एक प्रमुख कारण म्हणजे चीनच भारतावर झालेलं अनाकलनीय आक-स्मिक आक्रमण आणि तशात, चीनच्या सामर्थ्याविषयी स्वामींनी साठ वर्षापूर्वीच सर्व-प्रथम देऊन ठेवलेला स्पष्ट शब्दातला इशारा. विवेकानद हे अशा अडचणीच्या वेळी भारतीय एकतेच शक्तिमान प्रतीक म्हणून पुढे केल गेलं. अर्थात सत्तेचा खेळ खेळणाऱ्या राजकीय पक्षांनी एक बेमालूम सोय म्हणून जरी स्वामीजींकडे पाहिलेलं असण शक्य असल, तरी सर्वसामान्य नागरिकाच्या अंतःकरणात गुरू रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद ह्याच्याबद्दल नितळ आदराचीच भावना वास करीत होती, यात सशय

नाही. जसे राम, जसे कृष्ण, तशीच ही द्वयीसुद्धा चालू युगातले अवतारी धर्मपुरुषच, हीच कोट्यवधींची श्रद्धा होती, आणि आहे.

शताब्दी म्हटली, म्हणजे ती साजरी करण्यासाठी समितीच सव्यापसव्य आल. तशी एक समिती अखिल भारतीय स्तरावर स्थापन झाली. श्री एकनाथजी रानडे ह्यांची समितीवर कार्यकारी चिटणीस म्हणून नेमणूक झाली. त्यांनी ह्या स्मारकाच्या कल्पनेचा दोन वर्षे पिच्छा पुरवला. अगोदर त्या खडकावर स्वामीजींच्या नावाची शिला बसवली. स्थानिक विरोधकांनी–त्यापैकी बहुतेक चिथवले गेलेले ख्रिस्ती कोळी असावेत–तिची दोन महिन्यात नासधूस केली. मग त्या खडकावर स्वामीजींचा पुतळा उभारावा, ही कल्पना पुढे आली. कल्याणचे कलावान शिल्पकार साठे यांनी वीस फूट उंचीच्या तबकावर स्वामीजींचा, किनाऱ्यावरून सहज डोळ्यात भरेल, असा पन्नास फूट उंचीचा पुतळा उभारावा, अशी शिफारस केली. मद्रास सरकारने ह्या खडकावरल्या पुतळ्याच्या उभारणीस मज्जाव केला. पुतळ्याचीही नासधूस होईल आणि धार्मिक कलागत नाहक वाढेल, अशी त्यांनी बचावाची भूमिका घेतली. केंद्र सरकारातले संबधित मंत्री हुमायून कबीरांनी युक्तिवाद केला, की सदर खडक ही निसर्गाची स्वयंभू निर्मिती आहे, तिच्यात माणसांनी ढवळाढवळ करून निसर्गसौंदर्याची हानी करू नये! नतर हे प्रकरण लोकसभेत आल. तिथे एन्. व्ही कामथांनी सरकार-पक्षाला भरपूर छेडल, तरीही प्रस्तावाला मंजुरी लाभेना अखेर लोकनायक बापूजी अणे यांनी नेतृत्व करून एक कैफियत तयार केली. तिच्यावर सर्वधर्मीय अशा तीनशे तेवीस खासदारांच्या अनुमतिदर्शक स्वाक्षऱ्या मिळवल्या आणि प्रकरण थेट पंडित नेहरूंकडे सुपूर्द केलं. सह्या देणाऱ्यांत डॉ. लोहिया, बॅ नाथ पै, जोकीम अल्वा, महंमद तारीक, असे संसदीय लढवय्ये होते. पं. नेहरूंनी ह्या स्मारक-कल्पनेला मान्यता दिली. चक्र फिरली. लागलीच मद्रास सरकारचा मंजुरीचा हुकूमही सुटला मात्र एक अट होती. खडकावरला पुतळा एकाकी उघडा असू नये, त्याच्या समोवार संरक्षणार्थ मंदिर असावं!

इथून पुढचा सहा वर्षांचा कालखंड म्हणजे झपाटलेली ध्येयासक्त मंडळी दिलचस्प एकोप्यानं कोणती निःस्वार्थ सिद्धी गाठू शकतात, ह्याचा आधुनिक काळातला भव्योदात्त आलेखच आहे. हजारो निष्णात आणि अर्पणोन्मुक हात लागून आज हे विवेकानंद स्मारक साकार झालेल आहे. ही कुणा एकट्यादुकट्याची पुण्याई नव्हे. संघकार्याचाच हा आदर्श नमुना आहे. ह्या लग्नाला अगदी गेंडी वाढवण्यापासून सुरुवात झालेली आहे खडकाला साठ फूट खोल बुराख पाडून त्याचा टणकपणा अजमावण, हे पहिल पाऊल मग प्राप्त झालं मंदिरासाठी चिरे शोधणं. ७० मैलावरल्या अंबासमुद्रमच्या खाणीतून, ९६ मैलावरल्या तुतिकोरीनच्या खाणीतून, अशा दुरून दुरून प्रचंड शिळा वाहून आणल्या. ४०० पाथरवटांनी त्यांचं तासकाम, नक्सकाम पाच वर्षे केल त्यांना रोजी ८०० छिन्न्या धार लावून पुरवाव्या लागत! त्यासाठी लोहारकामाची मोठी भट्टीच पेटवावी लागली. घडवलेल्या प्रचंड शिला खडकावर वाहून नेण्यासाठी दोन धक्के बांधावे

लागले. तराफे नि खेचबोटी आणाव्या लागल्या. खडकावर गोड्या पाण्याचा कायम साठा टाक्या बांधून करावा लागला. खडकाशी संपर्क साधता यावा, म्हणून तारायंत्र बसवावं लागलं. आणि वीज पुरवण्यासाठी समुद्राच्या खालून केबल्स् टाकाव्या लागल्या. सर्वांचा हातभार लागलेल्या ह्या मोहिमेचे सेनापती होते एकनाथजी रानडे. त्यांनी पैसे खेचून आणले नि जवाहिऱ्याच्या नजरेनं माणसं पारखून निवडली.

देवाकोट्टायी गावी एस. के. आचारी ह्या नावाने मंदिराच्या घडणावळीचे परिणतप्रज्ञ स्थपती होते. मंदिराची उभारणी करण हा त्यांचा पिढीजात व्यवसाय होता. त्यांना बहुमानानं पाचारलं. त्यांच्याकडून मंदिराचा परंपरासलग्न आराखडा करवून घेतला. त्याबाबत कामकोटी पीठाच्या श्रीशंकराचार्यांचा तज्ज्ञ सल्लाही घेतला. परंपरेचं सूत्र तुटू नये, हाच त्याचा हेतू.

दहा शिल्पकारांनी आराखडे पाठवले. त्यातल्या खारच्या शिल्पी एन्. एल्. सोनावडेकरांच्या कृतीची निवड केली. त्यासाठी चित्रकार एस्. एम्. पंडितांनी स्वामींची एक पूर्णचित्राकृती करून दिली होती. आता आठ फूट उंचीचा स्वामींचा पंचरशी धातूचा पुतळा ही एक अपूर्व कलाकृती तिथं विराजमान झाली आहे.

तडीला गेलेलं हे सांघिक काम पाहून खात्री पटली, की अखेर सत्य संकल्पाचा दाता भगवानच असतो,

स्मारकाचं बांधकाम त्रिदलीय आहे खडकावर जिथं पार्वतीचं पाऊल उमटलेलं आहे, त्या जागेवर ऐसपैस श्रीपाद मंडप आहे. त्याच्या समोरच्या उंचवट्यावर मंदिराची मुख्य वास्तू आहे. त्यात पुतळा आणि सभामंडप आहे. त्याला विवेकानंद मंडप म्हणतात. आणि त्याच्या खाली माळा बांधून तिथं ध्यानासाठी गुहेसारखी बंदिस्त निरव जागा केलेली आहे. त्याला प्रणवपीठ म्हणतात. ह्या कामाची मुहूर्ताची पहिली कुदळ ६ नोव्हें-बर १९६४ ला मारली आणि पूर्ण वास्तूचं मंगल पूजन रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी वीरेश्वरानंदाच्या हस्ते २ सप्टेंबर १९७० रोजी नादस्वरमच्या वाद्यघोषात मंत्र-पठनानं झालं. योगायोगानं त्या दिवशी स्वामींच्या शिकागोतील भाषणाचा सत्त्याहत्तरावा वाढदिवस होता. आता ढोंढी हिशेब असा निघतो, की रोजी साडेसहाशे मजूर २०८१ दिवस ह्या स्मारक-उभारणीसाठी जपले, तीस लक्ष भारतीयांनी प्रत्येकी एक रुपयाच्या देणग्या दिल्या, आणि एकूण जमा झालेली रक्कम एक कोटी सतरा लक्षांपेक्षा अधिक भरली. लाखो भारतीयांच्या डोळ्यांची पारणी फिटली. ज्याचा अविरत ध्यास घेतला होता, त्या विवेकानंद स्मारकाचा पहिला यशस्वी टप्पा आता पूर्ण झाला आहे.

स्वामींच्या एकशेदहाव्या वाढदिवशी, म्हणजे ७ जानेवारी १९७२ ला ह्याच स्मारकाचं दुसरं वर्धमान पर्व आता कन्याकुमारीला सुरू झालेलं आहे. त्या दिवशी सूर्यो-दयापूर्वी कार्यकर्त्यांनी स्वामीजींच्या पायाजवळ शपथपूर्वक ग्वाही दिली, की स्वामीजींची शिकवणूक ध्यानात घेऊन राष्ट्रउभारणीच्या कामी स्वतःला झोकून देऊ शकतील, अशा जीवनव्रती कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी ' विवेकानंद केन्द्र ' ही नवी चळवळ आज-

पासून सुरू होत आहे. हे एक सर्व्हिस-मिशन आहे. ' विवेकानंद केन्द्रा 'चे जीवनव्रती कार्यकर्ते संन्यासी नसतात, पण एकचित्त सेवाभावी असतात. इच्छा असल्यास त्यांना त्यांचा संसार थाटता येतो. मात्र देशउभारणीच्या कामात त्यांना मिळेल त्या वेतनात संतुष्ट राहून देशाच्या मागास क्षेत्रात आणि डोंगराळ प्रदेशात रचनात्मक कार्य मनोभावे करावं लागतं. नव्या कार्यकर्त्यांसाठी शास्त्रशुद्ध शिक्षणशिबिरं घेतली जातात. त्यात योगासनावर आणि व्यायामावर भर असतो. अशा शिबिरातून तयार झालेल्या तरबेज तुकड्या सध्या अरुणाचल प्रदेश, मेघालय, अंदमान, वगैरे दूरच्या जंगलमय डोंगराळ भागात देशसेवेचं काम निष्ठापूर्वक करत आहेत. ह्या कार्यात तरुणींनीही आपला हविर्भाग स्वेच्छया दिला आहे. पुन्हा, एकनाथजी रानडे हेच या योजनेचे सूत्रधार आहेत.

कन्याकुमारी हा दक्षिण भारतातला अखेरचा गाव किती चिमुकला आहे! माझ्या बाळपणी नकाशावर तो केप कॉमोरिन ह्या नावाने दाखवलेला असायचा. अजूनही कागदोपत्रीच नव्हे, तर दैनंदिन व्यवहारातही तेच नाव रूढ आहे सरकारी कचेऱ्यांवर, शाळांवर, दुकानांच्या पाट्यांवर केप कॉमोरीन असंच लिहिलेलं दिसत. गावात हरिजन खेडूत आणि ख्रिस्ती कोळी भरपूर असावेत, असा माझा अंदाज आहे, कारण ह्या हिंदू चणीच्या आणि भगव्या ध्वजाखाली विराजमान झालेल्या स्मारकाविषयी स्थानिक जन पूर्णपणे उदास वाटतात. त्यांची पोरंटोरं यात्रेकरूना नि पर्यटकांना वाळूच्या रंगीबेरंगी नमुन्यांच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या अक्षरशः अहोरात्र विकत असतात. सध्या कोपऱ्यात पडलेलं उंच मनोऱ्याचं जुनं चर्च, एक मशीद, एक प्राचीन देऊळ, सुसज्ज कोरीकरकरीत हॉटेल, उडप्यांच्या खानावळी, सरकारी निर्जन ठाणी, जत्रेतल्यासारखी वडवडणारी दुकानांची रांग, झाडाखालचा एस्. टी. चा एक गावठी थांबा आणि तीर्थोपाध्ये, ह्यांची गोळाबेरीज म्हणजे कन्याकुमारी.

ह्याच गावापासून हाकेच्या अंतरावर सागरकिनाऱ्याला लागून ' विवेकानंदपुरम् ' ही नवी आटोपशीर वसाहत उभारली आहे. अध्यात्मप्रेरित विवेकानंद केन्द्राचा हा तळ आहे. शहरातल्या फक्कड सोयी आणि गावाकडचं निसर्गरम्य वातावरण ह्यांचा मेळ घातलेल्या ह्या नगरीत पाय टाकल्यापासून मी हुरळून गेलो आहे. इथले सेवक नुसते सेवक नाहीत. ते समान विचारांचे इष्टमित्र आहेत. तळावर पाहुण्यांसाठी स्वस्त सुख सोईंची रेलचेल आहे. झापाच्या छताची प्रशस्त खानावळ म्हणजे आपलं गावाकडलं घरच वाटतं. तसंच अंगण. तशीच माती. तशीच झाडझुडपं. आणि तसाच पोटभर सारभात. अमरावतीची प्रभा देशपांडे, पुण्याची शैलजा कवी, ठाण्याची जयश्री जोशी, मुंबईचे प्रिन्सिपॉल वास्वानी, डॉक्टर नागरत्न ही सारी कार्यकर्ती मंडळी घरच्यासारखीच माझ्याशी गप्पागोष्टी करत आहेत. सगळीकडे मनमोकळेपणा आहे.

परिसर पाहून झालेली मंडळी तळाचा निरोप घेत आहेत. नवे पाहुणे येत आहेत. जाणारे असोत, येणारे असोत वा राहणारे असोत, सारेजण आपोआप एकमेकांचे होत

आहेत. माणसाप्रमाणेच काही काही वास्तूंचाही तो पायगुणच असतो. त्या एका क्षणात तुमच्या होतात नि तुम्ही त्यांचे.

मला तर क्षणभर वाटलं, त्यांच्या त्या डोळस परिक्रमेत स्वामीजी नेमके ह्याच माळावर आल्या आल्या क्षणभर थबकले असतील. सायंकाळच्या सोनेरी किरणात चमचमणाऱ्या ह्या सागरसंगमाचं नि त्यात कासवासारख्या डुबकणाऱ्या त्या खडकाचं पहिलं शुभदर्शन त्यांनी इथूनच घेतलं असेल आणि त्या भारलेल्या विभूतीचा पहिला विनम्र दंडवत ह्याच भूमीवर पडला असेल!

♣ ♣ ♣

# गणपती पुळे

꧁ ꧁ ꧁

रत्नागिरीपासून क्षेत्र गणपती पुळं सार ढेंगभर तर आहे. अंतर आहे अवघ सहा कोस. उचखळ पायवाट दर्याला बिलगूनच गेलेली आहे. स्वच्छ सकाळी दशम्या बांधून रत्नागिरी दमात सोडली, तर एक-दोन, एक-दोन करीत पुळ्यातली दुपारच्या जेवणाची पगत सहज पकडता येते. वाटेत खाड्या आहेत. खाड्याही आहेत. पण तरींच्या सोयी कोकणात कुठं नाहीत? मुसलमानांची मच्छेमारीची होडकुलं हमेशा मिळतात फक्त आपल्या कनवटीला दाम हवा संगतीला मित्रमंडळी असली, तर वाटचाल हसत-खेळत होते. गप्पाटप्पा होतात. सोबतीला दर्यावरचे समुद्रबगळे फडफडत असतात. गरूड असतात. दयाळ तर वाटोवाट असतात. आनंदयोग चारही बाजूंनी जमून येऊ शकतो. तो जमणार असल्याचं चित्रही दिसत. पण सध्या वयानं थोडे घोंचे केले आहेत.

आता पन्नाशी ओलांडल्यानंतर आणि हुद्देदारीचं न.काम लोढण गळ्यात अडकवून घेतल्यानंतर चालीचालीनं फुकटात मिळणारी इतकी निखळ निरागस सुख चुटकीसरशी घेता येईनाशी झाली आहेत. पूर्वी टक्क ऊन म्हटलं, की काळीज पालवायचं. आता उन्हाचं नुसत नाव काढलं, तरी अगोदर छत्री आठवते! पूर्वी असं कधी झाल होत? आणि अंमलदाराला सुखान श्वास सोडायला देतील, तर मग ते यजमान दक्ष कसले? अगदी तारुण्याचीच नसली, तरी जवानीतल्या रगेची ओहोटी खंतावत खंतावत आपल्याच डोळ्यानी आपल्याला बघावी लागते. आपल्या प्राक्तनाचाच तो भाग आहे. आणि आदरातिथ्याचा बेफाम मारा सरसकट सगळ्याच बिल्लेवाल्या हपीसराना मुकाट्यान सहन

करावा लागतो. आपल्या अर्गीमासी खिळलेल्या सरजामशाही समाजरचनेचा तोही एक अटळ शाप आहे. अर्थात त्यातही वेगळ्या मिजाशीची समजस मजा चाखता येते, हा भाग वेगळा.

मनाला मी तसा सोईस्कर दिलासा दिला आणि माडवाबाहेर आंब्याखाली सावलीला उभ्या केलेल्या जीपमध्ये बसलो. बर वाटल. फडफडणार वार कापीत जीप पुळयाच्या दिशेनं सड्याला वळण घालून निघाली, तेव्हा अधिक बर वाटल. गणपती पुळयालाच निघालेल एस्. टी.च एक थरथरणार जुनाट धूड वाटेत धूळ उडवताना दिसल. त्यातली बेहद्द चेंगराचेंगरी पाहून तर जीपच्या फ्रंटसीटवर रेलून बसण म्हणजे साक्षात मोक्ष वाटला.

कथा-कादंबऱ्याच्या पानापानावरून जिच्या वर्णनाचे ओहोळ वाहवलेले असतात, ती हिरवीजर्द वनश्री कोकणात सर्वत्र माजलेली आहे, अस बिलकुल नाही. शुद्ध बोडके भगभगीत भागही रगड आहेत त्यांतलाच एक क्षुण्ण तुकडा हातखंब्यापासून थेट पुळे-वाडीपर्यंत पसरलेला आहे. मातीच्या सुक्या ढेकळांच कोरडं क्षेत्र चौफेर आहे. हिरवा मखमली पट्टा कुठंच नाही. अर्थात पावसाळ्यात इथ शेतमळे बहरत असतील, हे उघडच आहे. पण एरव्ही हा लत्ता ठप्प कोरडा आहे. ह्याच शुष्क परिसरातून लांबचा वळसा घेऊन एक निर्जन सडक खेळवली आहे. तिच्यावरले गरम वाफारे सहन करीत तासभर रेटला, की नतर मात्र सृष्टी झटक्यात मनपसत रूपपालट करते. शेवटचा चढाव पार केल्यावर समोर दिसतो आभाळाचा ताणलेला लखलखीत पत्रा. त्याच्याखाली नजर पोहोचेपर्यंत पसरलेला असतो फिक्कट निळा शात समुद्र. त्याच्या पहिल्या दृष्टीभेटीतच शिणवटा गळून गेला. अथाग निळं पाणी. त्यावर फेसाळणाऱ्या लाटाच्या पाढऱ्या सफेत हसऱ्या रेषा. ऊन. दूरवर शिडाच्या होडया. मचवे. नारंगी चोचीचे शुभ्र समुद्रपक्षी. आणि उंच स्तरावर पंख विस्फारलेल्या घारींची मंडलं सपूर्ण किनारपट्टीला विळखा घालून बसलेल गच्च नारळीबन. सुरूच्या बागा. आणि पुळण. आणि उष्ण वाऱ्यात एकजीव झालेली समुद्राची घोंगावणारी गाज. किती मनोहारी आहे हा देखावा !

बघता बघता किनारा आला. अगदी जीर्ण अशा चिरेबंदी इमारतींसमोर आम्ही उतरलो. आडगावातल्या देवळाच्या धर्मशाळा नुसत्या दृष्टिक्षेपातच ओळखता येतात. जोत्याचे त्याचे गवतवेष्टित चिरे त्यांच्या शतायुत्वाची ग्वाही देतात तिथल्या विझलेल्या दीपमाळांनी किमान दोन-तीन शतकांचे तरी उदयास्त मूकपणे पाहिलेले असतात. काळाला एक कुबट वास आहे देवळाच्या नि धर्मशाळाच्या भेगाळलेल्या भिंतींत त्याची पाळंमुळ रुजलेली असतात. कोनाड्या कोनाड्यातून त्याचे तुरे उगवलेले असतात. देवळारावळाची, त्याच्या विहिरींची, धर्मशाळाची नि एकाकी दीपमाळाची वय कुणी पुकारावी लागत नाहीत. आपल्याला ती आपोआप कळतात.

आज ह्या पुळणीवर देऊळ आहे, भक्त आहेत, भगत आहेत, पुरोहित आहेत,

गुरव आहेत, वाजंत्रीवाले आहेत, प्रसादे आहेत, फूलवाले आहेत, खानावळये आहेत, उडपी आहेत आणि हौशी पर्यटक तर पोत्यानी आहेत. भाविकांसाठी धर्मशाळाच्या पडव्या आहेत आणि तीर्थोपाध्यायाची घरंही आहेत. सुखासीनासाठी अद्ययावत शहरी सोयींनी युक्त केलेली सागरसन्निध मौजमजा-कुटिर आहेत. हॉटेल आहेत. निवात किनारा आहे. तीनशे वर्षांपूर्वी ह्यातलं इथं काय होतं ? काहीही नव्हतं. फक्त वेळूबन नि किनारा तेवढा होता साधी मनुष्य-वस्तीसुद्धा नव्हती. इथं आभाळात होत्या घारी आणि पुळणीवर होते वाकडे वाकडे चालणारे खेकडे; केणकाईच म्हणजेच रानकेवड्याच काटेरी वन. सर्प आणि अहोरात्र राक्षसी डरकाळ्या फोडणारा रुद्र समुद्र.

कोकणपट्टीतल्या ह्या समस्त मुलखावर अमल होता विजापूरकर मोंगलाचा. इथं गाव असं नव्हतंच. साधी वाडीही नव्हती. शेतात एका कासाराचं खोपट होतं. तोच इथला वहिवाटदार. दूरवर दलिताच्या झोपड्या होत्या. कासार निपुत्रिक. त्याला प्रश्न पडला, आपल्या मागे ह्या पट्ट्याची वहिवाट कोण करणार ? म्हणून त्यानं पाच मैलांवरच्या उंडी गावच्या बाळंभटजी भिडयांना वसती आणि खोलीची वहिवाट करण्यासाठी ह्या भागात येण्याचं आमंत्रण दिलं. चळचळीत उत्पन्नाची सुतराम् हमी नसतानाही बाळंभटांनी कासाराचा शब्द झेलला.ते वहिवाटीला म्हणून आले. हा शुद्ध योगायोगाचा मामला आहे. पण त्यातूनच पुढं गावाचा नि त्याच्या कीर्तीचा पसारा उभा राहिला. जिथं मनुष्यवस्तीची साधी पताकासुद्धा नव्हती, तिथं उत्सवाच्या यात्रा भरू लागल्या. गावाच्या नि पुळणीच्या दिशेनं माणसं लोटू लागली.

हा चमत्कार कसा झाला ? कुणी केला ?

मोगलाईच्या धुलवडीच्या काळात ग्रामस्थांची पळापळ ही नित्याचीच बाब होती. अशाच एका पळापळींत बाळभटजींवर काही संकट आलं. ते टळण्यासाठी ते केणकाईच्या बनात मंगलमूर्तीचा धावा करीत बसले. तिसऱ्या दिवशी, म्हणे, त्यांना श्रींनी दृष्टान्त दिला, की ' आपली निराकार वसती इथंच ह्या डोंगरात आहे; तू माझं दर्शन घेऊ शकतोस बाळभटजींनी लगेच कोयत्यानं बनाचा एक भाग तोडला. पहारेनं डोंगराचा कपचा फोडला. तेव्हा त्यांना तिथं श्रींच्या द्विगण्डस्थलदंतयुक्त शांत रूपाचा आकार दिसला. त्याची खात्री पटली. संकटहरण झालं. डोंगरात खोदलेल्या त्या श्रीकारयुक्त भागावर भट-जींनी गवताचं छप्पर टाकलं. गणपती पुळ्याच्या गणेश मंदिराचा उगम हा असा ध्यानी-मनी नसताना तीन शतकांपूर्वी सागरतीरी झाला. एक सश्रद्ध तपश्चर्या आणि एक पावन दृष्टान्त सार्थकी लागला.

आम्ही फिरत फिरत मूळ मंदिरात गेलो छत्रपती शिवाजी महाराजांचे एक सचिव अण्णाजी दत्तो एकदा श्रींच्या दर्शनाला इथं आले होते. त्यांनी ते देवावरचं मूळचं गवती छप्पर उतरवून त्या जागी दगडविटांची पक्की घुमटी बांधून घेतली. त्या पुरातन घुमटीखाली आलो. पूजास्थान थोडंसं खोलात असलेलं दिसलं. मला तिथं

गणपतीची ओंकाररूपी मूर्ती काही धड दिसेना. विचारलं, तेव्हा तिथंच अभिषेकी असलेला एक मुकटधारी तरुण म्हणाला,

'इथं तशी मूर्तीचा ठळक आकार नाही. आम्ही फूलपत्रीची आरास काही विशिष्ट रेषामध्ये रचून आकार सूचित करतो. हा सगळा डोंगर आहे ना, तेच पूजास्थान आहे. तुम्ही ह्या डोंगराला प्रदक्षिणा घाला, म्हणजे खुद्द गजाननालाच प्रदक्षिणा घातल्यासारखं होईल.

घुमटीसमोर मोठं दालन आहे. दालनात पाच-पंचवीस उपासक जप पुटपुटत बसले होते. पैकी, एक धिप्पाड अमेरिकन होता. त्याचे कपडे चटेरीपटेरी होते. तो जप्या नव्हता. आपली दाढी कुरवाळीत, मंद हास्य करीत, त्या घुमणाऱ्या हास्याची मजा तो घुटक्या घुटक्यानं लुटत होता. त्याच्या हातात फक्त कोकाकोलाची बाटलीच काय ती कमी होती. ती असती, म्हणजे मग जगाची मजा बघायला बाहेर पडलेल्या खुशालचेंडू पण जिज्ञासू अमेरिकन मुशाफिराची प्रतिमा पूर्ण झाली असती.

गणपती पुळ्याचा डोंगर म्हणजे प्रत्यक्षात छोटीशी टेकडीच आहे मनसोक्त वाढू दिलेल्या हिरव्याचार झाडीमुळं आणि तिच्या एकसंध गुटगुटीत आकारामुळं ती गोमटी दिसते. तिच्या सभोवतालच्या प्रदक्षिणेच्या फेऱ्याचा मार्ग अडीच हात रुंदीच्या फरसबंद पाखाडीनं केलेला आहे. हे प्रदक्षिणा-कर्म मोठं झकास आहे. कारण फरसबंदी उचावरून वर्तुळाकार फिरवल्यामुळं चालणाऱ्याला अनायासेच सभोवारचा चलच्चित्रपट बघायला मिळतो. आखून दिलेला रस्ता सोडून दुसऱ्या पायवाटेनं कुणाला जाता येत नाही. तसं जाण्याचा संकेतही नाही. आणि इथं डोंगरभर खुद्द श्रींचीच वसती कल्पिलेली असल्यामुळं तिथं पाय लावायला कोण धजावतही नाही. निसर्गतः जी काही झाडं टेकडीवर उगवायची, तीच तेवढी तिथं डुलत आहेत. पाऊस, वारा आणि प्रकाश त्याचं रक्षण परस्परच करतात. ग्रामस्थांना तिथं मुद्दाम बागकाम करावं लागत नाही. पाऊण मैल लांबीची ही फरसबंदी बुंदेले सरदारांनी अडीचशे वर्षांपूर्वी बांधून देवाला अर्पण केली, असं इतिहास सांगतो.

आमच्याबरोबर आलेला अभिषेकी जरा तेज माणूस आहे. त्याला इथली खडा न् खडा माहिती आहे. ही धर्मशाळा श्रीमंत रमाबाई पेशविणीची, ही सरदार बुंदेल्यांची, हा नगारखाना परशराम रामचंद्र मामलेदारांचा, इथं चौघड्याचा डंका झाला, की देवाचा छबिना हालतो, ह्या जामदारखान्यात श्रींची डबी आहे, इथं कालपर्यंत बडोदेकरांचं मुक्तद्वार अन्नसत्र होतं, पण चालू सरकारनं त्याचा गळा घोटला, हा काळाकभिन्न चौथरा सांगलीच्या चिंतामणराव पटवर्धनांचा, हा नंदादीप मिरजकरांचा, तो कुरुंदवाडकरांचा नि त्यापलिकडचा तो जमखिंडीकरांचा, ही पालखी गायकवाडांची, असं त्याचं सारखं चाललं होतं. भारतातील फार मोठमोठी कीर्तिमान माणसं इथं देवासमोर नाक घासायला येतात, असं तो म्हणाला. तो नक्की सांगलीकरांचंच नाव सांगणार, हे ओळखून मी त्याला विचारलं,

गेल्या पाच वर्षांत इथं येऊन गेलेल्या एखाद्या थोर भारतीयाचं नाव सांगाल का?'
त्यानं काही सेकंद आठवल्यासारखं केलं नि पटदिशी सांगितलं,
'हो, चिपळूणचे रेडीजशेट गुदस्ता येऊन गेले.'

गणपती पुळ्याहून कोस, दीड कोसावर तिवरीची खाडी आहे. तिथली तर ओलाडली, की पलीकडं मालगुंड. कवि केशवसुताचं ते जन्मगाव. टाचा उंचावून टेपावरून पाहिलं, तर खाडीकाठावरली तिथली गपगार नारळीबनसुद्धा दिसतात. पण वाटी उतरून तिकड फेरफटका करून येण्याची उमेद इथं आलेला कुणीही धरत नाही. एक तर तिथं खुद्द केशवसुताचं असं काहीच आता बाकी नाही. पूर्वीही नव्हतं. पलीकड चिपळूणला केशवसुत वसतीलाच होते. तिथं त्यानी कविताही केल्या. पण तेही कधी मालगुंडला डोकावले असतीलसं वाटत नाही. कारण अखेर मालगुंड हे कोकणातलं खाडीकाठचं, इतर गावासारखंच, एक सुमार गाव आहे. मुद्दाम पायपीट करून गावात उतरण्यासारखं तिथं प्रेक्षणीय असं काही नाही. आणि इतकी उमेद नि कवि केशवसुताबद्दलचा इतका पुळका आहे तरी कुणाला? सध्या फक्त पाखरांनाच तेवढी उमेद आहे. त्याच्यासाठी दाही दिशा मोकळ्या आहेत. गणपती पुळ्यातले गायबगळे रोज पलिकडल्या हिरव्या मालगुंडात केशवसुताच्या कविता वाचायला उडत उडत जातात, नि मालगुंडातले कावळे अपजाप्य ऐकायला इथं गणपतीच्या पुळणीवर रोज उतरतात. बाकी इतर सर्व काही कसं अगदी रीतीन चाललेलं आहे इथं. माणसं येतात. जातात. जागजागी नमस्कार करतात, गाऱ्हाणी घालतात. देवाला ज्याचं ऐकायचं असतं, त्याचं तो ऐकतो. ज्याचं करायचं असतं, त्याचं करतो. इतरांना हेलपाटा पडतो. आणि, पोटातलं पाणीही हलू न देण्याची दक्षता बाळगणाऱ्या आमच्यासारख्या उपऱ्याचं काय होतं? ते समोरच्या सोनेरी पुळणीवर समुद्राभिमुख बसून इतक्या सुंदर सीनसीनेरीच्या सान्निध्यातसुद्धा आपल्याला कविता कशा काय सुचत नाहीत, ह्याचा अचंबा करीत राहतात!

♣ ♣ ♣

# शुक्क रामेश्वर

⁂

इतकी वर्षं झाली, तरी धनुष्यकोडीचा तो शुष्क निसर्ग अगदी थेट डोळ्यासमोर येतो. त्याच्या नुसत्या आठवणीनच डोळे निवतात.

भारताच्या अगदी एका टोकाकडच्या चिंचोळा होत गेलेला संपूर्ण वालुकामय टापू, जणू वाळूच्या देहाचा राक्षसी देवमासाच सागरात सूर मारण्यासाठी पवित्र्यात पडलेला आहे, असं भासायचं. त्या अफाट वाळवंटाच्या अंगावर करवतीसारखा निपचीत पहुडलेला लांबलचक, एकाकी रेल्वेफाटा होता. रेल्वेफाट्याच्या दोन्ही डेगेना दोन खारी निश्चळ सरोवर. त्याच्या उथळ पाण्यावर परावर्तित झालेले सरत्या उन्हाचे तिरपे कोमल किरण. सरोवरात तरंगणारी सहस्रावधी सफेद बदकं. बदकांचे ठिपके दोन्ही सरोवराना शोभा आणीत आहेत. जणू काही आपले टिपकेदार आरस्पानी दुपानी पंख पसरून यक्ष-नगरीतलं एक मोठं फुलपाखरूच या धनुष्यकोडीच्या वाळवंटावर विश्रांती घेत बसलं होतं. त्या सरोवराच्या पुढं पुन्हा वाळूचे विस्तीर्ण गुबगुबीत थर पसरलेले. अगदी टोकाला त्या सागरी रेल्वेफाट्यावरलं अखेरचं निर्मनुष्य स्टेशन समुद्रात चोच बुडवून बसलं होतं. स्टेशनाच्या सभोवार होती लिबलिबीत ओली रेती आणि चिकट दलदल; तिच्यात वळवळणारे इटुकले सागरी किडे. त्याचा चट्टामट्टा करणारे निर्धास्त पाणबगळे. पलीकडं पसरलेलं होतं सागराचं अथांग निरंकुश राज्य. पाणीही निळं आणि पाण्यात उतरलेलं तलम आभाळही निळं. जातीचा समुद्र असूनही त्याच्यावर प्रमत्त लाटांचं थैमान नव्हतं. गालातल्या गालात हसावं, तसे हलके तरंग पृष्ठभागावर लहरत होते. वाटायचं,

बावलेल्या कृष्णकमळाच्या पाकळ्याचा सडाच थेट क्षितिजापर्यंत अंथरलेला आहे. किनाऱ्यावरल्या खडकावर उमटलेल्या गणपतीच्या सख्त नजरेखालचा तो धनुष्यकोडीचा एका टोकाचा अनाघ्रात दंडा, उंच करकोचे, फिरंगी पाणबगळे, ब्राह्मण घारी आणि गुल-हौशी बदकांना जणू आंदण दिला होता. ते त्यांचच मोक्षराज्य होत.

सृष्टीच्या आदिम रूपाचा तो तुकडा वादळाच्या एका तडाख्यात पुरता नष्ट झाला ते रुद्रावतारी वादळ शांत झाल्यावर पंधरा वर्षांनी मी हा इथं आकस्मिक उगवलो आहे. पूर्वी ज्या वेळेवर मी शंखशिंपले वेचले, तिथं आता घोंघावणारा विस्तीर्ण सागर पसरलेला आहे. आता सागरपाण्याच्या पोटातल्या त्या अपेशी अवशेषाचे हुदके कोण ऐकणार ? कसे ऐकणार ? धनुष्यकोडीची ती एकाकी शांत दुनिया तिथल्या गणपतीच्या देवळासकट समुद्रात गडप झाली. रुळावर सतत साचणाऱ्या वाळूच्या ढिगामुळं रेल्वेकंपनीला डोके-दुखी झालेला तो सुना सुना रेल्वेमार्गही पाण्यात डुबला. ते अखेरचं स्टेशनही त्याच्या धाब्याच्या छपरासकट बुडालं. भारताच्या भूमीवरला कॉफीचा शेवटचा घोट प्रवाशांना देणारं तिथलं गावठी कॅन्टीनही बुडालं. शंखशिंपले वाहून गेले. बदकं पळून गेली. आता तिथं फक्त पोकळ निळं आकाश, पिवळं धम्मक कडक ऊन नि रोंरावत रारावत झेपावणाऱ्या आडव्या सागरलाटांचं रुद्रगान तेवढं उरलं आहे. आता तिथं आहे निव्वळ ऋतुचक्राचंच तेवढं सार्वभौमत्व.

रामेश्वराच्या वाळवंटातल्या एका उंच टेकडावर उभं राहून मी हे सारं पाहत आहे. इतिहास सांगतो, तंजावरला मठस्थापना करून समर्थ रामदास इथं धनुष्यकोडीला आले. इथूनच त्यांनी लंकाप्रवासाचं प्रस्थान ठेवलं. मीही माझ्यापरीनं टाचा उंचावून रामदासांसारखंच लंकादर्शनाच्या आशेनं पलीकडं पाहिलं. मला दिसला फक्त लांबच लांब पसरलेला फेसाळणारा आक्रमक सागर. कुठं पिंगट हिरवा, कुठं फिक्कट निळा, मधेच हिरवागार नि क्षितिजाच्या धारेवर कृष्णासारखा नुसता निळाशार.

वाळूच्या टेपावर किती काळ थांबणार ? माघारी फिरलो.

समोर दूरवर नारळीबनानं आच्छादिलेलं छोटंसं गाव दिसलं. बनाच्या वेटोळ्या-तून वर आलेली निमुळत्या उंच गोपुराची काळी फणा दिसली. नारळीबनाच्या शिवेवर थोडी धाब्याची बैठी झोपडीवजा घर होती. कोळ्याची अवजारही दिसली

हेच ते रामेश्वरम् ! कोरड्या शुष्क वाळूच्या खरखरीत समुद्रानं चहूबाजूंनी घेरलेलं निव्वळ देवस्थानाचं चिमुकलं गाव. हिंदुस्थानाचा सगळा पसारा एका बाजूला नि रामेश्वर गावाचं हे टिंब एका बाजूला, असा प्रकार आहे. एखाद्या लांबलचक परिच्छेदानंतर पूर्ण-विराम यावा, तशीच रामेश्वराची भौगोलिक रचना आहे. आणि पूर्णविरामाला जे आटोकाट महत्त्व, तेच रामेश्वरालाही आहे कारण थेट केदारनाथापासून काशीसकट श्रीशैलापर्यंत अकरा ज्योतिर्लिंगांची जरी कुणी यात्रा केली, तरी काशीविश्वेश्वराची गंगा रामेश्वरमच्या बाराव्या ज्योतिर्लिंगावर घातल्याशिवाय हिंदुमात्राची धर्मयात्रा परिपूर्ण होत नाही. म्हणून युगानुयुगं श्रद्धाळू भाविक हिंदूंचा दक्षिणतम बेटाच्या दिशेनं ओघ अहो-

रात्र चालू आहे. पूर्वी अगदी थेट बलुचिस्तानातूनही हिंदू यात्रेकरू रेताड रणं ओलांडण्याचे खडतर कष्ट उपसून इथवर यायचे. देवी अहल्याबाईही रान उल्लंघून या बेटावर आल्या आणि यात्रेकरूंच्या सोयीसाठी बैठी धर्मशाळा बांधून कृतार्थ झाल्या दक्षिण कोकणातून चिदानंदस्वामी येऊन देवाजवळ प्रसाद मागून गेले. टेंबेस्वामींनीही इथ साधुवस्ती केली. विवेकानंदांनी या देवळात अठराशे सत्याण्णवात उपदेश केला आणि तिबेटी पहाड ओलांडून आलेल्या दलाई लामांनीही परवा भेटीच्या वेळी प्रार्थना केली '

' हे मंदिर, जे पारमार्थिक कृपाकिरणाचं कारंजं आहे, ते सकल प्राणिमात्रांची तृषा शमवो ! '

साहजिकच आहे. वाराणशीचं गंगास्नान नि सेतुबंध रामेश्वराचं सागरस्नान हीच लक्षावधी धार्मिक हिंदूंची लौकिक आकांक्षा होती. आणि धड हेही जमत नाही, म्हणून आज अगदी या क्षणाला, खंतावलेल्या लाखो भाविकांची हृदयं गावोगाव तळमळत असतील कारण ब्राह्मण असलेल्या रावणाचा समुद्रपार लंकेत वध करून परतताना आर्यभूमीवर पाऊल टाकताच हातून घडलेल्या ब्रह्महत्येचं धर्मोक्त प्रायश्चित्त म्हणून प्रभु रामचंद्रांनी वाळूचं लिंग स्वहस्ते स्थापून त्याची इथ वाळूत पूजा बांधिली श्रीरामांनी या वालुकामय बेटावर ईश्वर स्थापिला, म्हणून हे रामेश्वरम्. हे स्थान बारा ज्योतिर्लिंगात समाविष्ट आहे. जसं केदारनाथ, सोमनाथ, तसं हे रामनाथ.

दक्षिणेला हपापलेले पुरोहित काहीही सांगोत, हे चिरेबंदी मंदिर वेदकाळातलं बिलकुल नाही. फार फार तर सातशे वर्षांपूर्वीचं ज्ञानेश्वरकालीन आहे.

मुळात हे मंदिर म्हणजे एक साधं झोपडीवजा छप्पर होत. लंकेचा सम्राट पराक्रमबाहु याने ११७३ साली देवासाठी प्रथम गाभारा बांधला. त्यानंतर अडीचशे वर्षांनी सेतूचा कोतवाल उदयन यानं मंदिरावर एक गोपुर चढवलं. आणखी एक शतक उलटल्यावर उदयनच्याच घराण्यातल्या तिरुमलाई आणि रघुनाथ पितापुत्रांनी दक्षिणाभिमुख ओवरी बांधली. १७०९ मध्ये एक राक्षसी वादळ या बेटावर आदळलं नि रामेश्वरातल्या सगळ्या सृष्टीची मोडतोड झाली. क्षेत्र उद्ध्वस्त झालं. म्हणून उदयनच्याच घराण्यातल्या मुथुराम लिंग यानं तीस वर्षं खपून, सध्याची तिसरी ओवरी बांधून काढण्याचा पराक्रम केला. थोरल्या बाजीराव पेशव्याच्या काळात बांधलेली ही देवळाची तिसरी ओवरी म्हणजे जगातला सर्वांत लांबलचक कॉरीडॉर आहे, असं सांगतात. एकवीसशे फूट लांबीच्या या सरळ प्रदक्षिणामार्गावर १२२० दगडी खांबांचं दाट अरण्य आहे.

जमिनीवर पाच फूट उंचीची चिरेबंद बैठक, तिच्यावर बारा फूट उंचीचा एकसंध तासीव दगडी नक्षीदार खांब; आणि असे ओळीने उभे असलेले, दगडी छत झेलणारे सव्वाहजार खांबच खांब ! पाहताना नजर फिरून जाते.

या संपूर्णपणे वालुकामय असलेल्या बेटावर हे इतके एकसंध दगड या कोतवाल मंडळींनी कुठून पैदा केले असतील ? इथपर्यंत कसे वाहून आणले असतील ? सक्तीची

वेठमजुरी, शक्तीपलिकडच्या असह्य श्रमाची राक्षसी वसुली, क्रूर हुकूमशाहीची जबरदस्त पकड आणि धार्मिक हेतुपूर्तीच्या मिजाशीचा अंतःस्थ खुशबू याच्या मिलाफाविना का हे अजस्र कलाकाम एका इटुकल्या बेटावर उभ राहिल ? तेव्हापासून तहत आजपर्यंत इथल्या बांधकामात काही ना काही वाढ होतच आहे. आज जे सव्वाशे फूट उंचीच, नऊ मजली पूर्वाभिमुख धिप्पाड गोपुर दर्शनीच दिसत, ते तर विवेकानंदाच्या भेटीच्या वेळीच बांधल जात होत, इतकं ते ताज आहे.

अखेर, देऊळ ते देऊळ. त्यात विशेष ते काय असणार ? द्राविडी पद्धतीच आडं माप बांधकाम, कुंद काळोख, अधूनमधून लोंबणाऱ्या प्रकाशाच्या नळ्या, चिकटाण, ओल, पूजाअर्चांच्या दराचे अवाढव्य फलक, शेवाळलेल प्रशस्त कुण्ड, देवादिकांच्या दगडी मूर्ती, लिंग, गणपती, नंदी, हत्ती, भालदार-चोपदार, तिकिटफाडू कारकून, गळेपडू मार्गदर्शक मुलं, प्रसादाचे मोतीचुराचे मोठाले लाडू आणि मालपोवे, औषधाच्या बाटल्यात विक्रीसाठी भरून ठेवलेलं धाऊक आणि किरकोळ गंगोदक, तृषार्त भाविकांच्या झुंडी, त्यांची हरवणारी लेकरबाळं आणि दाढ्यांचे खुंट वाढवलेला भस्मार्चित उघडाबंब पुरोहित-वर्ग सार काही रामेश्वरात यथास्थित आहे. यात्रेकरूंच्या राहण्याच्या सोयी खरो-खरच उत्तम आहेत. विवेकानंदाच्या नावे मंदिरानच चालविलेल एक अभ्यागतगृह आहे. ते स्वस्त, स्वच्छ आणि सर्व आधुनिक सोयींनी परिपूर्ण आहे. खाजगी कंपन्यांची काही अभ्यागतगृहं तर वातानुकूलितही आहेत. केन्द्रीय पर्यटन खात्यानं अगदी सुसज्ज अस प्रशस्त आधुनिक हॉटेल रामेश्वरात चालवल आहे. हॉलीडे होम्सही आहेत. आणि हे सर्व अगदी जवळपासच आहे.

खुद्द देवळात वर्षाकाठी दहा लक्ष रुपयांची उलाढाल होते. मंदिराच्या व्यवस्थेवर गस्त घालतो तामिळनाडू सरकारचा एक राजपत्रित अमलदार. मंदिराची एकूण व्यवस्था फार चोख आहे, अस खुद्द श्यामाप्रसाद मुखर्जींचच लेखी प्रशस्तिपत्र आहे.

मी देवळात गेलो. वीस-पंचवीस म्हाताऱ्या भैय्यांचा ओलाचिंब थवा इतस्ततः धावताना दिसला. त्यांच्यात चिंब भिजलेल्या चार-पाच जख्ख म्हाताऱ्या बायाही होत्या. एक तरणाबांड सेवेकरी हातात पाणी काढण्याची बादली आणि रस्सी घेऊन धावत होता नि हे लटांबर त्याच्या मागे धापावत होत. मंदिराच्या आवारात अनेक काळोखी विहिरी आहेत. सेवक त्यांच्यातून भसाभसा पाणी ओढायचा नि त्या थव्याच्या अंगावर फसकन् ओतायचा. त्या कृपावंताच्या पाण्याचे चार थेंब तरी अंगावर पडावेत, म्हणून त्या म्हाताऱ्याकोताऱ्यांचा एकच गलका होई. ते त्याला आणखी एखादी बादली ओढायला सांगत. तो नाही-नाही म्हणे नि पुढच्या आडाच्या कट्ट्यावर धावत धावत जाऊन पुकारा करी. एखादी बादली ओढे नि जे म्हातारे त्याच्या पावलाजवळ पोहोचू शकत, त्यांच्या माथ्यावर ती पालथी करे. फारच दया आली, तर धावण्यात फार मागे पडलेल्या म्हाताऱ्या

बायांना हाकारे, नि त्या एकत्र जमल्या, की आणखी एक बालदी पाणी त्याच्या डोईवर रिकामी करे.

चौकशी केल्यावर कळलं, की रामेश्वराच्या देवळाच्या प्राकारात बावीस नि बाहेर गावात एकवीस पवित्र विहिरी आहेत. हीच एकूण त्रेचाळीस देवाची कुण्डं. या प्रत्येक कुण्डातल्या पाण्यानं यथासांग न्हाल्याविना केलेल्या रामनाथाच्या पूजेचं पुण्य पदरात भरपेट पडत नाही. या त्रेचाळीस कुण्डाचं सालंकीस्नान करण्यासाठी पैसे मोजून दारावर तिकीट फाडावं लागतंच, पाणी ओढून देणाऱ्या सेवकाला बक्षिसी देण्यावाचून गत्यंतरच नसतं ! आणि पुढं पूजेअर्चेच्या निमित्तानं जी लूटालूट व्हायची असते, त्याची ही केवळ प्रस्तावनाच असते ! या कर्मकांडाला ठाम नकार देणाऱ्या आमच्यासारख्या जेव्हा चार मुड्या असतात, तेव्हा त्रेचाळीस पवित्र कुण्डाच्या पुण्यप्रद जलाभिषेकासाठी तळमळणारे अज्ञ भाविक चाळीस किंवा चारशे असतात ! मंदिराच्या सेवकांना हे गणित पाठ असतं. ते आमच्याकडे सुखानं दुर्लक्ष करतात.

मंदिरातच एका बाजूला मार्गदर्शक पुस्तकं विक्रीला ठेवलेली दिसली. बाकड्यावर एक तरुण बसलेला होता. त्यानं मला स्वच्छ मराठीत विचारलं,

'पाहुणे मुंबईचे काय ?'

मी होकारार्थी उत्तर दिल्यावर भाषेमुळं एकदम जवळीक साधली गेली. त्यान आपलं नावगाव सांगितलं. मी विचारलं,

'मराठी माणूस इतक्या दूरवर इकडं कसा काय उगवला ?'

'इथं रामेश्वरात शे-दोनशे मराठी कुटुंबं आहेत. हे देऊळ हाच आमचा आधार. पिढ्यान् पिढ्या आम्ही इथंच राहत आलेलो आहोत. मूळचे आम्ही सावंतवाडीच्या बाजूचे.'

तुम्ही इथं काय करता ?'

'मी ही पुस्तकाच्या विक्रीची व्यवस्था नि हिशेब बघतो. खरं म्हणजे मी आत देवळात पौरोहित्यच करायचा. पण हा स्टॉल सांभाळणाऱ्या एका भामट्यानं दहा हजारांना चाट मारली. त्याची ती हातचलाखी शोधून काढायला मला बसवलं. मी त्याचं सगळं बिंग उघडकीला आणलं. तशी व्यवस्थापक म्हणाले, 'आता एवीतेवी तुम्हाला व्यवहार कळलेलाच आहे, तर तुम्हीच हे काम पुढे न्या.' मी नाही म्हटलं नाही. काम रेटत राहिलो '

'पगार काय मिळतो ?'

'सांगण्यासारखा नाही.'

'तरी पण '

'दरमहा दीडशे. पण दीडशे रुपयांनी आजकाल काय होतयं ? हे देवाच्या सेवेचं काम आहे, असं मानून मी करतोय्. नोकर म्हणून इथं राबण्यात काहीच अर्थ नाही.'

तुम्ही मराठी कसं काय टिकवलत ? '

'आमच्या दहा-वीस पिढ्या तरी इथच गेल्या. चूलघरात मराठीच बोलतो. शिक्षण मात्र तामिळ भाषेतून झाल. इथ तामिळी शाळाच तेवढ्या आहेत. '

'महाराष्ट्राशी तुम्हा मडळींचा सबंध कितपत असतो ?

'आम्ही मराठीच ना ? मग महाराष्ट्राशी सबंध असणारच. वर्षातून इथल्या प्रत्येकाची एखादी तरी खेप त्या बाजूला होतेच. आमचे यजमान आणि नातेवाईक मुंबई, पुण, कोल्हापूर, सावतवाडी, वगैरे ठिकाणी आहेत. कोल्हापूर, मिरज, सागलीकडे फार. आमच्या मुली आम्ही त्याच भागात देतो. आणि तिकडच्या इकडे आणतो. इथ तामिळ्याना देत नाही नि त्याच्या घेतही नाही. माणसं सारखी पुण्या-मुंबईला जाऊन येऊन असतात. असलच पाहिजे. '

दक्षिणेकडच्या एका टोकाच्या बिंदूवर इतकं आपुलकीच खुलंखुलं मराठी बोलायला नि ऐकायला मिळाल, खुशाल झालो.

आत गाभाऱ्यापाशी गेलो. तिथ मोठ्या पितळी समईला टेकून एक भटजी उभे होते. ओळखीच हसले नि म्हणाले,

'पाहुणे मुबईचे काय ?

मग देवदर्शन बाजूला राहून आमच्या इकडच्या तिकडच्या कुशलगप्पा सुरू झाल्या. ते म्हणाले,

रामेश्वराच्या पूजेचे हक्क आम्ही मराठी मंडळींनी झगडून ताब्यात ठेवलेयत. आम्हाला उडवून लावण्यासाठी तामिळी पुरोहितानी जगजंग पछाडले. पण आम्ही थेट कोर्टाकडून फर्मान आणल ! आता गप्प बसलेयत '

'किती मंडळी आहात तुम्ही ? '

'तशी ह्या रामेश्वरात अनेक ब्राह्मण घराणी पिढ्यान् पिढ्याची आहेत. पण प्रत्यक्ष देवाच पौरोहित्य करणारे असे आम्ही दहा-वीसच आहोत. बापट, बर्वे, देशपांडे, अष्टपुत्रे अशी आमची आडनाव आहेत. आमचे वशपरपरागत संबंध उत्तरेच्या काशी-विश्वेश्वराशी आहेत. जे काशीयात्रेला जातात, त्याना तिकडचे पुरोहित आमचे इकडचे ह्या रामेश्वरातले पत्ते देतात नि जे इकडे येतात, त्याना आम्ही प्रयाग-काशी नि गया-वाल्याचे पत्ते देतो. त्यानिमित्तानं यात्रा सारखी चालू राहते. '

'खूप पैसे सुटत असतील तुम्हाला '

'छे, हो ! पूर्वी आमच्या जमिनी होत्या, ह्या रामनाड जिल्ह्यात. कूळकायद्यान त्याचा निकाल लावला. आता उपाध्येपणावर जेमतेम पोट सुटत. तशात, महागाई ही अशी. आमची झाडमाडं होती, नारळ होते. परवाच्या वादळात ते नष्ट झाले. पबनचा लोखडी पूलच जिथ वाहून गेला, तिथ झाडामाडाची काय कथा ! वादळान जबरदस्त तडाखा हाणला तिकड पंबनचा पूल कोसळला आणि आम्ही ह्या बेटावरचे लोक

देशापासून अलग पडलो. महिनाभर इथं दिवाबत्ती नव्हती. घासलेट नव्हतं. सगळीकडं गुडूप अंधार. नि त्या महिन्याभरात एक यात्रेकरू इकडे फिरकला नाही. पैचं उत्पन्न नाही. आमची ब्राह्मणांची तोंडं काळवंडली. काही सुचेच ना. तिकडं पुण्याच्या पेपरवाल्यांनी आम्हा मराठी वादळग्रस्तासाठी फंड काढल्याच्या बातम्या आल्या होत्या, पण त्या फंडातला एक तांबडा पैसा इथल्या लोकांना कधी दिसला नाही ! असले वेव्हार ! पूर्वी रामेश्वरात राहण्यात आनंद होता. उत्पन्न होतं. माणसं समजून देत. आता शून्य झालंय्. पण देवाची सेवा सोडता येत नाही.'

'तुमची मुलबाळं इथंच जोशपणा करणार ?'

बोलूच नका ! इथली सगळी तरणी मुलं कुठं ना कुठं नोकऱ्या पकडतात. कुणी मदुरेला, कुणी त्रिचनापल्लीला, कुणी मद्रासला, असं दूरदूर अन्न शोधतात. हा सगळा त्या तुमच्या सिनेमाचा परिणाम ! पूर्वी या रामेश्वरात सिनेमा म्हणजे काय, ते माहीत नव्हतं. देऊळ एके देऊळ होतं. आता थिएटर झालंयू. सारखे नवे नवे हिंदी सिनेमे आणतात. दाखवतात. बायकापोरं सगळी भिडतात. कर्जे काढतात, पण सिनेमे बघतात. सिनेमे पाहून त्यांची माथी भडकतात. अशांना काय रस वाटणार या भिक्षुकीत ? इथल्या वेदशाळेत चार डोस्की नाही मिळत ही आमची विद्या शिकायला. दिवस हे असे आहेत !'

हेही दिवस जातील. बेट रामेश्वरात यायचं म्हणजे पंबनचा पूल आगगाडीनंच ओलांडावा लागतो. भुईमार्गच नाही. आता ह्या बेटावर यायला एक अजस्र सिमेंटचा पूल बांधताहेत. मंडपम् ते पंबन. तो पूर्ण झाला, की मालवाहू ट्रक्स आणि यात्रेकरूंच्या बसेस थेट रामेश्वरात उतरतील. आगगाडीची अडगळ आपोआप दूर होईल. भरपूर माणसं भरपूर पैसे घेऊन येतील नि पुरवठ्याच्या नकली वस्तूही मुबलक मिळतील. रामेश्वरात तुफान गर्दी होईल. त्यांच्यासाठी सोयी होतील. हॉटेलं होतील. तिथं हौशी लोकांना नवे नवे चाळे सुचतील. सिनेमागृहं उभी राहतील. ती मंडळींना मोक्षाची दारखिडक्या दाखवतील. सिमेंटचा एक पूल ही क्रांती बघता बघता करून जाईल ! पाहालच.

तिन्हीसांजा झाल्या. काळोखी मंदिरात घुमण्यापेक्षा बाहेर मोकळ्या हवेत आलेलं बरं, म्हणून किनाऱ्यावर येऊन बसलो. मंदिराच्या समोरच हाकेच्या अंतरावर शांत समुद्र आहे. बसायला घाट आहे. तिथं टेकलो.

समुद्र काळवंडला होता. दिशा कुंद झाल्या. नभांगण खुशीत नव्हतं. वारं पडलं होतं.

समोर लंकेच्या दिशेला दूरवर दीपगृहाचा एक ठिपका क्षीण प्रकाशाची किंचित उघडमीट करीत होता. काय असेल तिथं त्या भयाण अंधकारात ? श्रीलंका तर खचितच नव्हे. कारण ह्या धक्क्यापासून श्रीलंका जवळपास पंचवीस मैल लांब आहे. दीपगृहाचे किरण इतक्या दूरवर तरंगत येणे शक्य नाही. मग हे काय प्रकरण असेल ?

एकजण म्हणाला, ते कच्छतिबु बेट आहे!

अशोकचक्रांकित ध्वजाखालच्या आपल्या सागरी सीमा निश्चित करणाऱ्या त्या निर्मनुष्य बेटाचं प्रकाशणारं स्पंदन पाहण्यात वेळ कसा निघून गेला, ते कळलच नाही.

रात्र पडली. सर्वत्र काळोख माखला. फक्त आजूबाजूला मंद दिवे लुकलुकत होते आणि मग एकाएकी रामेश्वरातला वीज-प्रवाहच क्षणार्धात लुप्त झाला! सर्वत्र काळंभोर झालं. आभाळ काळं, दर्या काळा, वनश्री काळी, गावठाण काळं नि रस्तेही काळे, हा अनुभव अगदी अनोखा वाटला.

उठलो. चाचपडत चाचपडत देवळाच्या दिशेनं निघालो. चौक गाठला. तो मिट्ट काळोखानं गोठला होता. मंदिराचं काळं ठिक्कर धिप्पाड गोपुर जातिवंत काळ्या नागाच्या उग्र फणेसारखं ताठ्यात उभं होतं. मला वासुदेवानंदसरस्वतींची, स्वामी विवेकानंदांची आठवण आली. गेल्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना ते मुमुक्षु इथं दंड घेऊन आले, तेव्हा या बाजूला विजेचं नाव नव्हतं. त्यांचं स्वागतही सृष्टीच्या याच एकरंगी हास्यानं झालं असणार. देवाच्या दारातल्या काळोखात मला भ्या वाटली. ते यतीच वेगळे नि त्यांच्या सूक्ष्मज्ञानी नजराही आगळ्या. ह्याच विपुल शांततेच्या निरंगी डोहात त्यांनी देवाच्या अंतिम सत्तेचा हुंकार ऐकला असेल!

♣ ♣ ♣

# दुसऱ्या महाराजांची वसती

❀ ❀ ❀

महाराजांचा लौकिक चमत्कारिक होता.

मुळात सस्थान दुष्काळी मुलुखातलं होत. तेव्हा उत्पन्नाच्या नावान शंख वाजवायची पाळी येई. प्रजा हिंपूट होती. वाटीभर पाण्यासाठी वणवण फिरे राजनिष्ठा वगैरे सात्त्विक शब्द पुस्तकी मजकुराला शोभा आणतात. ह्या प्रजेच्या बाबतीत त्या शब्दांचे दगड होऊन ते पुस्तकातच निरर्थक राहिले होते. कारण प्रजेचे खाण्याचेच वांधे होते. वाड्यावर भगवं निशाण अष्टौप्रहर फडफडायच, हे खरं. पण टेकीस आलेल्या रयतेला त्याच छदाम सोयरसुतक नव्हत. तिच बारा महिने तेरा काळ पाणी-पाणी चाललेल असे. अगतिक नजर सदोदित आभाळात.

अष्टावधानी चमच्यांचा महाराजाना सतत वेढा पडलेला असायचा. त्याचा कोट फोडून क्षुब्ध वास्तवाचे किरण महाराजाच्या नेत्रापर्यंत पोहोचूच शकत नसत.

त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला महाराजाच वाड्यातल कैफी अस्तित्व हे एक अलग काळोखी बेट झाल आणि रजीस आलेली दुष्काळी प्रजा हा थंड डोह झाला.

सागतात, की सूर्य चागला माथ्यावर आला, की अकराच्या नतर वाड्याला जाग येई नतरचा तोंडवळा नसलेला दिवस आळसावलेला असे. शेजारच्या निझामीतल्या कडक कट्टी चिरुटाची राख करण, तळहातावरल्या रेषांमधली अगम्य देवाक्षर चाचपणं, बॉम्बे रेसेसच्या चोपड्या चाळण, अनिच्छ सेवकांना सागाती घेऊन चिल्लर शिकारी करण आणि पहाटेच्या पहिल्या कोंबड्याला क्रीडाकर्मयुक्त इच्छाभोजनोत्तर डोळे मिटण, हे महाराजाच

लाडकं रुटिन होतं. लोक असं सांगतात. खरंखोटं मला माहीत नाही. देवाला डोळे.

अशा त्या शौकीन महाराजाचे असे ते सुस्त दिवसही एकामागोमाग ढग तरंगत तरंगत निघून जावेत, तसे गेले. मग आस्ते आस्ते त्याच्या संस्थानावर नि यथाकाळ खुद्द त्यांच्या जीवितावरही अटळ सूर्यास्त झाला. महाराज मेले. अलिप्त खांद्याच्या एकवटलेल्या बळानं चक्क वैकुंठवाटेवर ढकलले गेले.

हे पुराण झालं संस्थानाच्या एका छिलेवाल्या महाराजासंबंधी.

—आणि तिकडे त्याच संस्थानाच्या दुष्काळाच्या हद्दीत सलग पंचवीस वर्षे ओसाड माळरानावर तळ ठोकून बसलेल्या त्या दुसऱ्या अनासक्त महाराजाच्या आठवणीनं रयतेची हृदयकमळं फुलायची पळभरही थांबेनात. जो तो स्वामींबद्दल उमाळ्यानं बोलायचा; स्वामींचं स्मरण झालं, की हात हृदयाजवळ न्यायचा, त्यांची तसबीर देवघरात लावायचा. स्वामी आपल्या गावाच्या हद्दीत वसती करून आहेत, हे जो तो आपलं अमाप भाग्य मानायचा. दिवसरात्र स्वामी-स्वामी करायचा.

स्वामी साक्षात स्मशानात वेडबंबूसारखे राहायचे. प्रजा मानी, त्यांच्या कृपेच्या किरणानीच काय ते आपल्या आयुष्याचं सोनं होईल. स्वामींची कृपा हीच पुण्याई.

ह्या दुसऱ्या महाराजांपाशी भुरळ पाडावं असं काय होतं? काहीही नव्हतं. विजन-वासी उघडाबंब म्हातारा देह. लंगोटी. लांबलचक ओघळलेले हात. गळ्यात एक रुद्राक्षाची माळ. फक्त एकाच कानात भिकबाळी. दुसऱ्या कानातल्या भिकबाळीचे मणी कुठल्या तरी स्मशानवासात हरवलेले. चिलीम. गोटी. आणि समोरच्या माणसाच्या प्रारब्धयंत्राची टिकटिक ऐकणारे निरपेक्ष डोळे. त्या डोळ्यांचं हुडकणं काही थांबण्याचं लक्षण दिसेना. सारखं निरखत राहायचं. भिडायचं. आपण समोरचं पाहतो. महाराज समोरच्याला नुसत्या नजरेनं भिडायचे. ही एक कुरवाळणारी शीतल नजर सोडली, तर महाराजापाशी दुसरं काहीही नव्हतं. आणि पुन्हा हे सगळं वैभव टांगलेल्या फोटोतलं! कारण महाराजांनी आपला अवतार आटोपता घेतलेल्यालाही जवळजवळ एका शतकाचा धुरकट काळ लोटला होता. मागे उरली होती अनुगृहीताच्या हृदयात निर्माण झालेली महाराजांच्या दयेची तळी आणि महाराजांचे तल्लीन अवस्थेतले चार-दोन फोटो.

लोक त्यांना अक्कलकोटस्वामी म्हणायचे.

मी महाराजांच्या वाटेला जाण्याचं मुळीच कारण नव्हतं. मला जे हवं आहे, ते महाराजांच्या दातृत्वाच्या पल्ल्यापलिकडलं आहे, हे मी नीट ओळखून आहे आणि महाराज जे माझ्या पदरात नक्की बांधतील, त्याची तूर्तास मला वासनाही नाही.

पण एकदा मजा झाली. महाराजांचं छायाचित्र असलेला गुजराती वर्तमानपत्राचा एक चुरगळलेला कपटा एकदा रस्त्यात मला पडलेला दिसला. मला तो कागद ओलांडवेनाच. पुढं गेलेला मी चार पावलं मागे आलो, तो कागद उचलला. घरी नेला. त्यातलं महाराजांचं ते चुरगळलेलं चित्र कात्रीनं नीट कापून घेतलं नि एक मजा म्हणून तो फोटो

पैशाच्या पाकिटातल्या कप्प्यात अडकवला. तिथं तो बरेच दिवस अनाग्रही मुक्काम करून होता.

महाराज अस्मादिकाच्या पाकिटात वस्तीला आले, म्हणून येणाऱ्या पैशात कधी भर पडली किंवा जाणाऱ्या पैशांची ओहोटी थांबली, असं कधीही घडल नाही. पैसे जायचे, ते गेलेच. खिसे हलके व्हायचे, ते झालेच वर, खिशात साधुमाणसाच चित्र ठेवलं, एवढ्यावरून माझ दैनंदिन आयुष्य शुचिर्भूत झाल, असही घडल नाही माझ्या भोग-वस्त्याला आलेली ओबडधोबड खेळी माझ्या स्वधर्मी पद्धतीनं जगून घेतली. महाराजाच्या फोटोन माझ्या आयुष्यात कसलाही जादूटोणा केला नाही. ध्वनिमुद्रणासाठी आकाश-वाणीच्या स्टूडिओत आलेल्या वसुंधराबाई पटवर्धनाच्या एका परमलीन नमस्काराचा हासभास नसताना धनी झालेला तो फोटो, पुढे एका पाकिटमाराकड धावपळीत निघून गेला निरोपाचा साधा नमस्कारही घडला नाही.

कसं असेल स्वामींच गाव ? काय असेल तिथं ?

रात्र झाली आहे. पुढे हमाल आणि त्याच्यामागे मी, असे दाट काळोखाच्या कटड्याला धरून मठाकडे निघालो आहोत सगळीकडे चिंचोळे बोळ. दुतर्फा दगडी भिंतींची अगं आक्रसलेली. पेटाऱ्यासारखी घर. आत पेंगुळलेले दिवे. माणसांची जाग म्हणून कशी ती चौफेर दिसतच नाही निंबाची सळसळ तेवढी घरामागन सतत कानावर पडत आहे. वर विस्तीर्ण काळंभोर आभाळ. तिथही ताऱ्याची जाग नाही. जाग आहे फक्त बोळांतून टोळ्यानी हिंडणाऱ्या गावठी डुकराना. उघड्या गटाराचे काट हुंगत, एक-मेकांना रेटत, डुकर आमच्यासारखीच पुढं पुढं होत आहेत. सारखी रेन्दाळकर कवींची आठवण येते आहे. ' अजुनी चालतोचि वाट ! '

अमसुलाच्या गाडग्यातल्या झुरळाला जसं वाटत असेल, तसच मला वाटत. सगळीकडं काळोखाचे तट आणि आंबट वासाचा कल्लोळ. बोळ तुडवता तुडवता चित्र बदलू लागल. पायात कडमडणारी डुकराची पिलावळ सर्वांत आघाडीला. त्याच्यामागे ' साहेब, गरिबाला काय द्यायचं, ते समजून द्या अन्न भेटलेल नाही सकाळपासन. स्वामीं-समक्ष खोट नाही बोलणार. गरीबाला समजून द्या ' ही हमालाची मस्तक भडकवणारी अखंड पिरपीर. तिच्यामागे एक फर्लांगभर काळोखाचा निरव, निःस्तब्ध पन्हळ. पन्हळाच्या दुसऱ्या टोकाला पायाचे तुकडे झालेला मी. माझ्या मागे माझी पायतण हुंगत आलेली लडिवाळ कुत्री. दोन्ही अंगाना दाराच्या फळ्या ओढून घेतलेल्या काळोखी घराचे शाळिग्राम. त्याच्यावर फणा धरून बसलेले वाचाळ निंबवृक्ष. वर कातरलेल काळंकुट्ट आभाळ. पुढे अथांग शक्यताचा निराकार डोह.

मठ.

प्रवेश करण्याच्या अगोदर मठविषयक सर्व पूर्वसंकल्पनाचं गाठोडं बाहेरच्या बोळातल्या झाडावर बांधून ठेवलं. नाही म्हटलं, तरी आपल्या काही कल्पना असतातच. तशात कबीराच्या मठातल्या साधजीवनाचा लख्ख अनुभव माझ्या मनात फडफडत होताच. अनुभवान सांगतो, ज्यानं कुठल्या ना कुठल्या सांप्रदायिक मठातली मुगाच्या खिचडीची ढेकळं गारगार कढीबरोबर पोटात ढकललेली आहेत, त्याला कढीखिचडीचा तो तुपकट वास, त्याअगोदर घुमवलेल्या एकसुरी आरत्याचा धूपाच्या उग्र वासात चिंब भिजलेला उंच स्वरातला कल्लोळ आणि त्याच्याही अगोदरच प्रती महंताचं पूर्वतयारीचं अखंड घुमणं, हे दोन तासाचं विश्व मनाआड करताच येत नाही. असं, नाही तसं, ते पुनर्भेटीसाठी डोकावतंच.

स्वामींच्या मठात तसं काहीच नव्हतं.

मठ म्हणजे एका विरक्त दालनात समाधीची एक साधी शिळा, तिच्यावर तुळशीपत्र, कोपऱ्यात जपमाळ ओढत बसलेला एखादा म्हातारा साधक, हा आला–तो गेला, असली कालबाह्य न होणारी शेकडो वर्षांची ताकदवान परंपरा फक्त आपल्या विमल नजरेनं काबूत ठेवणाऱ्या मूळ महाराजांची भली मोठी तसबीर. एके काळच्या चलतीचा रोकडा पुरावा म्हणून शिल्लक उरलेल्या जीर्ण पोथ्यांच्या शिळपट थप्प्या, छताला लोंबकाळणाऱ्या दिव्यांच्या काचेच्या हंड्या, आणि मूठभर भिजलेला प्रकाश.

पहिल्या पावलालाच मठाच्या ह्या कल्पनेतल्या परिचित चित्रावरून बोळा फिरला. स्वामींचा मठ नेमका त्याच्या उलट आहे. हा मठ म्हणजे चहूबाजूंनी बंदिस्त असलेली वास्तू नसून चार-पाच इमारतींचा उघडा परिसर आहे. ओपन एअर थिएटरसारखी, रुंदी डोळ्यात भरेल अशी एक इमारत आहे, तीन बाजूंनी भिंती आणि एक दर्शनी बाजू पूर्ण मोकळी. ही समाधीची जागा. तिथं पूजाअर्चा होते.

दुसऱ्या दालनात महाराजांचं शयनगृह दाखवलेलं आहे. भला मोठा शिसवी पलंग, गाद्यागिरद्या वगैरे रचून ठेवल्या आहेत. ती आरास पाहून धक्काच बसला. विजनवासी स्वामी इतक्या सालंकृत रुबाबात झोपत ! कशासाठी ! खरंच वाटत नाही. चित्रातले विरक्त स्वामी कुठल्याही घोंगडीवर अंग टाकणारे वाटतात. मग हा भारीतला पलंग कशासाठी ? स्वामींनी हा केव्हा वापरला ? ह्या पलंगासाठी लागलेल्या किडक्या दुर्गा मोजल्या असतील ?

स्वामींच्या ह्या स्थानासमोर मोकळं अंगण आहे. अंगणात पुरातन वटवृक्ष त्याच्या छायेत कुत्री लोळत पडली आहेत. फांद्यावर अखंड चिवचिवाट. हा वृक्ष नमस्काराचं आणखी एक ठिकाण आहे. अंगणाच्या तिन्ही बाजूंनी बैठ्या चाळवजा इमारती दूरदूर आहेत. एका बराकीत कचेरी, समोरच्या खोल्यांमध्ये यात्रेकरू. तिसऱ्या ठिकाणी रसोडा, पाणवठा.

ही सगळी रचना संध्याकाळच्या प्रकाशात लोभस वाटे, रात्रीच्या काळोखात काहीच

बोध झाला नव्हता. वटवृक्ष निश्चिल होता.

हमाल काळोखातच म्हणाला,

' हीच स्वामींची जागा, तुम्ही इथंच वसती करा सामान इथंच असूंदे. लक्ष स्वामींकडे लावा. नमस्कार करा. स्वामीच तुमच्या सामानाची काळजी घेतील. तीनशे वर्षं झाली, पण इकड गवताची एक काडी कुणी पार्सल केलेली नाही. स्वामींचा पक्का बंदोबस्त आहे. अहो, स्वामींनी साऱ्या दुनियेचा बंदोबस्त केला, तिथ पॅसिंजराच्या सामानाची काय वार्ता! तुम्ही अगोदर दर्शन करा.'

दिंडीपाशी सामान टाकून मठात प्रवेश केला. सर्वत्र मिट्ट काळोख होता. फक्त स्वामींच्या जागेत दिवे लुकलुकत होते. मी सगळी चित्रं निरखून घेतली. इतक्यात एक बाळसेदार वळणाची तरुणी आली नि मऊ स्वरात म्हणाली,

' कुठल्या गावचे पाहुणे ? '

' दिल्ली. ' मी ठोकून दिलं.

' बाप, रे! म्हणजे फारच लांबून आलात. दमला असाल नं? आता असं करा. तुमची व्यवस्था लावून द्यायला मी सांगते. आपण काय घेणार? चहा, की कॉफी? नंतर जेवण तयारच आहे. '

' मला घोटभर चहा द्या. तुम्ही ही व्यवस्था पाहता काय ? '

' आमचं दुकान असं नाही. पण इथं यात्रेकरूंची चोवीस तास ये जा असते हे गाव हे असं! मग सोय काय लागणार? म्हणून आम्ही घरगुती सोय करतो. पंचवीस पैसे चहा साठ पैसे कॉफी. पन्नास पैसे तिखट पोहे. पण ते फक्त सकाळीच तयार करतो. दोन रुपये जेवण. पोटभर हं. इथ रेशनबिशन काही नाही. तुम्हाला डबल कप चहा देऊ का? फक्त पन्नास पैसे पडतील. गावात गेलात, तर साठ पैसे पडतात. इथं दहा पैसे फायदा होईल. वाटल्यास कॉफी देते. कॉफीचे साठ पैसे. डबल कपाला एक रुपया. काय घेता? '

' मला घोटभर चहा द्या '

' बर, तुमचं सामान कुठं आहे ? '

हमालानं दिंडीपाशीच ठेवलंय्. स्वामी काळजी करतील, म्हणाला '

' कसं! अहो, इथले हमाल म्हणजे पक्के बेरड आहेत. प्रत्येकजण तुरुंगात खडी फोडून आलाय्. दोन-दोन वर्षं! त्यांचं काय ऐकला तुम्ही? आत आणून ठेवा तुमचा माल. सेक्रेटरीकडून खोली मागून घ्या. कुलूप मागून घ्या. उघड्यावर ठेवलत, तर सामान पार्सल झालच म्हणून समजा. '

धावत जाऊन सामान अंगणात आणून ठेवलं.

तरुणी अदृश्य झाली होती.

काळोखात निःस्तब्ध वटवृक्षाच्या तळाशी एक डोळा सामानावर आणि एक डोळा स्वामींच्या स्थानावर ठेवून मी उभा होतो. जवळपास कुणीच फिरकेना. तेव्हा भक्तांसाठी बांधलेल्या धर्मशाळेत माझी सोय स्वतःच लावून घेतली. त्या चिंचोळ्या गावठी जागेत रात्र काढण केवळ अशक्यच वाटलं. तरीही डोळा लागायचा, तो लागलाच.

मठातली जाग पहाटेच्या काकडआरतीनं किंवा पक्ष्यांच्या किलबिलाटान आली असती, तर कसं सोन्याहून पिवळं झालं असत. योग वेगळा होता. दोन झाडूवाल्याच डाफरण उतूं जात होत. एक ताब्राताबान ओरडत होता,

'नाव स्वामींच सांगतो नि पोटाच काम करतो काय, रे? खाबूगिरी सोडून दे!'

सकाळी सगळा देखावा, पावसाळ्यात झाड रूपपालट करत, तसा बदलला होता. पूर्वेच आभाळ लालभडक झालं होत. पक्षी झेपावत होते. मठातल्या चौकातली कुत्री पसार झाली होती. कोवळे किरण वडाच्या शेंड्यावरून हात फिरवीत होते. प्रशस्त चौक स्वच्छ होता. एका भागात फरसबंदी होती आणि सफेत कपडे घातलेले एक शुभ्र दाढी-वाले म्हातारेबाबा शांतपणे बसले होते. त्याची मान लटलटत होती.

मी जवळ गेलो. माणूस नव्वदी ओलांडलेला भासला. जवळपास चौकशी केली, तेव्हा कळल, बाबाना कलादगी महाराज म्हणतात आणि त्यानी स्वामीसमर्थांना प्रत्यक्ष पाहिलेलं आहे. मठात जी फरसबंदी केलेली आहे, ती ह्या कलादगी महाराजांनीच खर्ची पडून करून घेतलेली आहे. भक्त त्याना फार मानतात.

नमस्कार-चमत्कार झाल्यावर मी विचारल,

'बाबा, आपण कुठले, कोण?'

'इथलाच म्हणायच.'

'आपण स्वामी समर्थांना प्रत्यक्ष पाहिल होतं?'

'हो. अगदी ह्या डोळ्यानी पाहिल. पूर्वी ही स्मशानभूमी होती. एकदम उजाड. स्वामी इथंच असत. त्यानी सर्व जिंकलेल होत. त्याना भूतभविष्य काही नव्हत. कुठून आले, वगैरे काही नाही. ते अयोनिज होते. उघडाबंब देह फार तेजस्वी. आजानुबाहू. लहर लागेल, तिथं टेकत. ते आपल्यातच गर्क असत. वेष फक्त एका लंगोटीचा. इथच मातीच्या ढिगात बसत त्याना कसलीही शुद्ध नसे. दिवसभर त्याचे चमत्कारिक चाळे चाललेले असायचे. बाळाप्पा नि चोळाप्पा नावाचे दोन गरीब भक्त होते. ते सारखे स्वामींच्या माग माग असत. बाळाप्पाच्या गळ्यात तर स्वामींची तसबीर असे. चोवीस घंटे स्वामी-स्वामी.'

'स्वामींच वय काय होतं?'

'म्हातारे होते. पण त्यांच वय मापता येण्यासारखं नव्हतं त्याना चराचराला असतो, तसा आदि-अंत नव्हता. भूतभविष्याच्या ते पार होते. ते त्रिकालज्ञानी होते.'

‘ उपदेश करीत ?’

‘ काही नाही. ते नुसते ‘होते’, इतकच.’

‘ त्यानी देह कुठं ठेवला ?’

‘ ह्या समोरच्या वडाखाली. ही घर वगैरे तेव्हा नव्हती हा सारा ओसाड भाग होता. कोल्हे, लांडगे इथं फिरायचे.’

‘ स्वामींनी प्रयाणाच्या वेळी इच्छा वगैरे काही सांगितली ?

‘ काही नाही. त्याच काम सपल. त्यानी देहपालट केला, इतकंच.’

‘ स्वामी मूळचे कोण, कुठले ?’

‘ कुणालाच ते कधी कळल नाही फिरत फिरत मंगळवेढ्याहून ते इथ आले. बाळाप्पा–चोळाप्पानी त्याची सेवा केली.’

‘ बाबा, तुमच स्वतःच वय काय ?’

‘ तुम्हाला कल्पनाही करता येणार नाही, इतका मी जुनापुराणा आहे.’

‘ म्हणजे किती ?’

‘ अंदाजे एकशे तेराव वर्ष असेल माझ !’

‘ खर ?’

‘ आफ्रिकेत बोअर वॉर झाल होत, त्या साली. तेव्हा ब्रिटिश सरकारन माझा खास सत्कार केला होता !’

‘ खुद्द तुम्ही कुठले ?’

‘ आता जन्म इथच स्वामींच्या चरणांपाशी गेला, तेव्हा इथलाच म्हणायचा’

‘ तुमच शिक्षण कुठ झाल ?’

‘ राजकोटच्या प्रिन्सेस् कॉलेजमध्ये. त्या वेळी फर्ग्युसन कॉलेज नुकतच कुठं सुरू होत होतं.’

‘ तुम्ही इथं कसे आलात ?’

‘ स्वामींची इच्छा.’

‘ तुमचा ससार ?’

‘ तुम्ही पाहता आहात, इतकाच’

‘ म्हणजे तुम्हाला कुणीही नाही ?’

‘ स्वामींची कृपा आहे. तेव्हा आणखी काही नको.’

‘ स्वामी समर्थांची भक्तापासून अपेक्षा काय होती ?’

‘ सर्वांनी चागल वागावं. ईश्वरशरण असावं. देवाच्या नावाखाली पोटोबाच काम करू नये. देवाची आठवण ठेवावी नि चागलं स्वच्छ जगावं. देहाचे हाल करून घ्या, पाण्यावरून चाला, अग्नीवरून चाला, असली अचाट जादूची काम करा, असं स्वामींनी कधीच सांगितल नाही. स्वामी म्हणाले, जन्म सत्कार्यी लावा.’

शभरावर तेरा वर्षं जगलेल्या म्हाताऱ्या माणसाला आणखी किती बोलक करणार ?

मी म्हटल,

'आता तुमचे आशीर्वाद असू देत मला.'

त्यावर मान लटलटवीत ते हसत हसत म्हणाले,

'आशीर्वाद आहेतच. दत्ताला विचारा.'

दोन तरुण माणसं हजर झाली. त्यांनी बगल देऊन महाराजाना हलकेच उभ केल. लटलटत्या मानेन तो वृद्ध माणूस त्या तरुणाच्या खांद्यावर भार टाकीत उभा राहिला. ते त्याना आतल्या खोल्यात स्नानासाठी घेऊन गेले.

कलादगी महाराजाची मी थोडीशी माहिती काढण्याचा यत्न केला, तेव्हा कळलं, महाराज एकशे तेरापेक्षाही थोडे अधिक म्हातारे असावेत. बहुतकरून ते सरदारपुत्र असावेत. म्हणून त्याच शिक्षण राजकोटच्या प्रिन्सेस् कॉलेजमध्ये होऊ शकलं. महाराज राजकोट भागातलेच असावेत विरक्तीच्या एका झटक्यासरशी इकडं दक्षिणेत आले. तो काळ अठराशे सत्तरच्याही अलिकडला असावा. स्वामी समर्थांच्या दर्शनान त्याचे डोळे दिपले. मग ते इथंच राहिले. स्वामींच्या पश्चात ते आजूबाजूच्या कानडी भागात देवदेव करीत हिंडले. पुन्हा इथ परतले. आता त्याचे भक्त त्याना साभाळतात. पशुपक्ष्याची सेवा करण्यात त्याचा जन्म गेला, जीवदया सघाचे ते भूतपूर्व अध्यक्ष आहेतच, पण शिवाय फार फार पूर्वी ते लोकसभेचे सभासदही होते, म्हणे! विशेष म्हणजे एका शतकापार पोहून गेलेला हा महाराज-माणूस आजानुबाहू आहे

खुद्द स्वामी समर्थ कोण, कुठले, ह्याचा पक्का ठावठिकाणा लागत नाही. त्यानी स्वत.विषयी फक्त एकच वाक्य सागितल, 'दत्तनगर, मूळ पुरुष, वडाचे झाड, मूळ मूळ.' ह्या एका सक्षिप्त सूचक वाक्यावरून स्वामी समर्थांना दत्तसप्रदायातली अवतारी विभूती मानल जात. कर्दळीवनात तीन शतकापूर्वी गुप्त झालेल्या नृसिंह सरस्वतींनी स्वामी समर्थांच्या रूपानंच पुनर्दर्शन घडवल, अस दत्तसाप्रदायिक मानतात. स्वामी समर्थ दत्तांप्रमाणेच भटक्ये होते. ते जन्मशून्य, अयोनिज, अवतारी होते, असा त्याचा लौकिक आहे.

अर्वाचीन काळातली दोन ठळक माणस त्याना भेटली. पहिल्यादा भेटले प्रखर दत्तभक्त आणि आद्य क्रातिकारक वासुदेव बळवत फडके. त्याना स्वातत्र्यसमरासाठी स्वामींचे आशीर्वाद हवे होते. स्वामींनी ते दिले नाहीत. दुसर भेटले हिंदू मिशनरी विष्णुबोवा ब्रह्मचारी. त्याच्या सोबत मुंबईचे काही पारशी गृहस्थही होते. विष्णुबोवांना स्वप्नात दृष्टान्त देऊन स्वामींनी नरम आणलं, अस सागतात.

इ. स. अठराशे अठ्याहत्तरात वडाच्या झाडाखाली स्वामींनी देह टाकला. मूळ मूळ प्रकरण संपल.

स्वामींच्या स्थानात डोळ्यानी पाहण्यासारखं असं अक्षरश' काही नाही. अतःकर-

णानं निरखण्यासारखं काही असल्यास मला ते धड उमगलं नाही. माझी परतण्याची चुळबूळ सुरू झाली.

इतक्यात रात्री किंचित दर्शन देऊन गुप्त झालेली ती तरुणी वेणीफणी करून पुन्हा हजर झाली. तिचं पातळ धुपकं होतं. चेहरा तरतरीत होता. चेहऱ्यावर पावडर मारलेली होती. नजर बापुडवाणी होती. आल्या आल्या ती उल्हासानं म्हणाली,

' मग काय बेत ठरला ? चहा, की कॉफी ? '

' काहीही चालेल.'

' असं कसं ? तुमची सेवा आम्ही करणार. तुमची इच्छा असेल, तसा माल आम्ही देणार. पंचवीस पैसे चहा. साठ पैसे कॉफी. पन्नास पैसे तिखट पोहे. डबल कप चहा पन्नास पैसे. गावात गेलात, तर साठ पैसे पडतात. शिवाय तो काढा घशात उतरत नाही, तो नाहीच. आमचा चहा घेतलात, तर आयताच दहा पैसे फायदा होईल. वाटल्यास कॉफी घ्या. डबल कपाला एकाला एक रुपया. काय आणू ? तुमची मर्जी '

' अगोदर तिखट पोहे आणि एक कप चहा आणा तो संपल्यावर पाच मिनिटांनी आणखी एक कप चहा द्या.'

' म्हणजे एकूण एक रुपया बिल होईल.'

' बरोबर. '

' मग द्या तर. '

' चहा यायच्या अगोदरच ? '

हो. आम्ही पैसे अगोदरच घेतो. नंतर हिशेबाच्या तक्रारी नकोत '

मी तक्रार करणार नाही '

' तरीसुद्धा पैसे अगोदर मिळाले, तर बरं होईल. आम्हाला जिन्नस आणायचे आहेत. आज रात्री मोठी पार्टी येण्याचा चान्स आहे. कारण उद्या गुरुवार आहे. भाजीला भोपळे आणून ठेवते. तुमच्यासारखी माणसं येणार, तेव्हा आम्हाला पैसे दिसणार. खरं, की नाही ? '

एक रुपया देऊन मी विचारलं,

' तुमची पुरुषमंडळी कुठं आहेत ? ते का नाही हा धंदा पाहत ? '

आमच्याकडे पुरुषमंडळी नाहीतच मुळी. वडील इथं मास्तर होते. ते अचानक गेले. आम्ही बायका बायका काय करणार ? आई नि आम्ही बहिणी बहिणी आता खानावळ चालवतो. झाली चार पाच वर्षं.'

बरी गिऱ्हाइकी मिळते '

' मिळते, आमचं आपलं भागतंय् जेमतेम, आई चुलीपाशी असते. मी पॅसिंजर्स सांभाळते. बहिणी बाजारहाट करतात. आपलं नशीब. खरं, की नाही ? '

ओढग्रस्तीत जन्म घालवलेल्या आणि शाळा चालवण्याच्या रामरगाड्यात पिचून गेलेल्या तालुक्याच्या अनाथ कुटुंबियापुढं नशिबानं वाढून ठेवलेलं ताट पाहत मी स्वस्थ

बसलो होतो. चहा येत नव्हता. ऊन वाढत होतं पाखराचा चिवचिवाट वाढला होता. कुत्री जमा झाली होती. समाधीच्या दर्शनाला येणाऱ्यांची वहिवाट वाढली होती. मला पुढची गाडी पकडायचे वेध लागले होते.

दुसऱ्याच एका परकरी मुलीनं लाल चहा आणून दिला तो प्यालो नि विचारलं,

' पोहे केव्हा येणार ? '

' ताई, पोहे आणायला दुकानावर गेल्यात्.' थंड उत्तर मिळाल.

दुकानदार दुकान उघडणार, पोहे मापणार, मग ते घरी येणार. नतर ते पाखडले जाणार, नंतर नतर .

मला गाडी पकडण तर भागच होत. एक रुपया देऊन फक्त पंचवीस पैशांचा चहा मी पदरात पाडून घेतला होता. उरलेल्या पंच्याहत्तर पैशाच काय ?

इतक्यात एक स्थूल, प्रौढ बाई आल्या. गरीबसं हसून म्हणाल्या,

' साहेबाच जेवण करायला घ्यायच काय ? अवघे दोन रुपये पडतील. गावात अडीच रुपये पडतात. इथ जेवलात, तर आठ आणे फायदा होईल.'

' आपण कोण ? '

' तुम्ही चहा-पोह्याची ऑर्डर जिच्याजवळ दिली होती न, तिची मी आई.'

म्हणजे आपण मास्तरांची मंडळी. '

' हो. '

' जेवणापर्यंत मला थांबता येण्यासारखं नाही. पोहे खाऊन निघेन, म्हणत होतो.'

त्यालाही वेळ लागेल. आजचा दिवस तुम्हाला वसतीला राहायच नाही जमणार ? '

' ते कसं शक्य आहे ? मला निघालच पाहिजे. माझे पैसे येण आहे तुमच्या मुलीकडून मी एक रुपया दिला आणि फक्त चहा घेतला. म्हणजे बारा आणे यायचे आहेत. '

' ते ठेवून घेईन म्हणत्ये मी माझ्या लेकींना बांगड्याना. एव्हीतेव्ही तुम्ही स्वामीं-पाशीच आला आहात. थोडी सेवकांचीही आठवण राहू दे.'

एवढी पर्वचा बोलून त्यांनी माझ्याकडे एक केविलवाण हसू फेकलं.

मी काही उत्तर देणार, इतक्यात नव्या दर्शनोत्सुक पॅसिंजरांच एक लिगाड आल. बाई तरतरल्या. जुनेर सावरीत त्याच्या दिशेन धावल्या.

मी पाठ फिरवली.

स्वामी म्हणजे संस्थानातले दुसरे महाराज, आमंत्रण वगैरे काहीही नसलेला मी स्वतःच्या पायान त्याच्या वसतीच्या मुलुखात नमस्कारासाठी आलेला. म्हणजे वास्तविक पाहता परतीच्या प्रवासात स्वामींबद्दलचे विचार मनात दुधावरल्या सायीसारखे दाटून यायला हवे होते. कृपाकिरण गोळा करण्यासाठी ओंजळ पुढं व्हायला हवी होती. प्रत्य-

क्षात मात्र माझ्या हाती काय पडलं ? एका शिक्षकाची फाटकी जिंदगी, त्याचं अचानक झालेलं प्राणोत्क्रमण, पत्रावळी गोळा करणारे त्याच्या कुटुंबियाचे हताश हात, जगाचे अनुभव घशाखाली ढकलताना त्याच्यापाशी आपोआप गोळा होत चाललेलं बिलंदरपण आणि वाढत वाढत चाललेल्या त्या पावडर लावणाऱ्या कुमारिकेच्या पुढ्यात पवित्रा घेऊन उभी असलेली अथांग पोकळी, ह्याचा मस्तक छिणून काढणारा गुंता !

♣ ♣ ♣

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३८
भू-प्रवेश २४०४९
११/११/८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# श्रीवर्धनचा प्रारब्धयोग

♧ ♧ ♧

क्रमिक पुस्तकाच्या पानांचा आक्रोश काहीही असो. श्रीवर्धन हा पेशव्यांचा गाव, ही दंतकथा आपण आता विसरलेली बरी. आजच श्रीवर्धन पेशव्यापासून कमालीचं दूर गेलेलं आहे. श्रीवर्धनी सुपारी सुद्धा आपण विसरलेली बरी. कारण बाजारात श्रीवर्धनी रोठे म्हणून जे मिळतात, ते खरे असतात पंचक्रोशीतल्या दिवे–आगरचे. सुपारीत सुपारी दिवे-आगरची. श्रीवर्धनचा नुसता डंका वाजला. खास श्रीवर्धनी अशी चीज आता उरलेलीच नाही. तरीही श्रीवर्धनची माहिती म्हणून काही आहेच. मुळात श्रीवर्धन हे नाव शुचिर्भूत, संस्कारसंपन्न, ब्राह्मणी वळणाचं वाटतं. प्रभानवल्लीसारखं बाटगं वाटत नाही आणि ज्यानं धुक्याचा पदर वर करून एकदा तरी श्रीवर्धनचं रूप न्याहाळलं आहे, तो छातीठोकपणे सांगेल, श्रीवर्धन गावाला खास स्वतःचा असा घाटदार गोमटा चेहरा आहे. पहाडावर असते, तशी चौफेर निरव शांतता, धुतलेल्या कपड्यासारखी स्वच्छ बाळबोध घरं, शिवणाच्या मशीननं टीप मारल्यासारखे मातीचे सरळ रेषेतले आखीव रस्ते आणि सभोवार हिरव्या कंच बागांचा कल्लोळ ही श्रीवर्धनची रूपसंपदा. श्रीवर्धनात कानावर अष्टौप्रहर आवाज पडतात फक्त दोन . दूरवर घोंगावणारी समुद्राची मंद पण आक्रमक गाज आणि रिंपणाच्या रहाटाची बागेबागेतून उसळणारी एकसुरी गाणी. कान टवकारले, तर आणखीही दोन आवाज अधूनमधून कानावर पडतात : पुळणीवरल्या सफेत गल पक्ष्यांचा चीत्कार आणि फर्दिले मोहोल्ल्यातल्या मशिदीतून घुमणारी सावध करणारी बांग. बाकी श्रीवर्धनात फार काही चिडीचूप आहे. दाट दह्यासारख्या जमलेल्या

दाट निश्चल शांततेच दडपण मनावर तिथं इतकं येत, की रस्त्यात मोठ्यान बोलणही गैर वाटावं. स्वर शक्तिमान आहे. लयबद्ध सुराला माणसं डोलतातच, पण प्रगाढ निःशब्दतेसमोर कमाल शांततेसमोर निमूटपणी लीन होण्यातला अन्य अनुभव तुम्हाला रायगडाखालोखाल श्रीवर्धनात घ्यायला मिळेल. मौज अशी, की श्रीवर्धनातली जुनी शाळासुद्धा समुद्राच्या किनाऱ्यावरच लोटलेली आहे. म्हणजे विद्यार्थ्यांची जी काय दंगामस्ती चालेल, तिचा आवाज परस्परच सागराच्या गाजेत विरून जातो आणि उरलेला समस्त श्रीवर्धन गाव शांततेच्या तळयात कासवासारखा संथ डुंबत राहतो.

अद्भुत वनवैभवाच आणि निरंकुश फेसाळणाऱ्या दर्याच अहोरात्र घडणार दृष्टीसुख हीच काय ती श्रीवर्धनात स्वस्तात स्वस्त मिळणारी गोष्ट. तसच, लख्ख चादण्याचे द्रोणही श्रीवर्धनात अगदी पोटभर पिता येतात. चादण्या रात्री इथं रस्त्यात दिवे नसतात. कधीमधी लुकलुकत असलेच, तर तेही जातात नि नभोवितानात फक्त फिक्कट सोनेरी चादण्याचे सूर पाझरत राहतात. बांधा इतकाच आहे, की ते ऐकून ह्या इहलोकी पोट भरत नाही. ज्यांनी पोट तुडुंब भरत, त्या वाणसामानाच्या किमतींच्या पताती श्रीवर्धनात पाहाव तिथं चढलेल्याच आहेत. अहो, रानातल रामफळसुद्धा बंदा रुपया मोजल्याशिवाय मिळत नाही. नारळ हे श्रीवर्धनातल हुकमी पीक. पण म्हणून श्रीवर्धनात नारळ पड्या भावान मिळेल म्हणता ? नाव सोडा ! रस्त्यात कुणालाही थांबवा, जो तो श्रीवर्धनकर नारळाच्या भावानं रडच गातो कारण मुंबईत नाक्या नाक्यावर वस्ती थाटून वसलेल्या ' केरळ 'कर मोपल्यांनी इथल्या नारळाच्या आगराची कंत्राटं कायमची बांधून घेतली आहेत. ते मोसमात चक्कर टाकतात. शहाळी उतरवतात. ट्रक भरतात. मुंबई गाठतात. मोपले मुंबईत श्रीवर्धनी शहाळी विकत असतात, तेव्हा त्यांचे हत्यारी राखणदार इथ आगरात सक्त पहारा करीत असतात. नारळ लंपास केले जाणार नाहीत, ह्याची दक्षता घेतात. भंडाऱ्याच्या हातात हा धंदा कधीही नव्हता. असणारही नाही. तो मक्ता मोपल्याकडे आहे. ते हिंदुराष्ट्रपती आणि त्याचे ते हिंदुत्वावर आजन्म गस्त घालणारे भाऊ डॉक्टर बाबाराव, हिन्दूंनी मोपल्यांपासून अखंड सावध राहिल पाहिजे, असा टाहो फोडत फोडत रक्त आटवून मेले. पण नारळीबनकर श्रीवर्धनकराना त्यांच्या वेदान्ताची गंधवार्ताही नसेल. मोपले टक्के मोजतात. बाजारात त्यांना उजेड पडतो. बागाईतदार संतुष्ट असतात. हा प्रश्नच मुळी धर्माच्या कळवळयाचा नाही. तो आहे सरंजामशाहीतल्या नफाधार्जिण्या नातेसंबंधाचा. बाजारात वाजणारं नाणं मोपले देतात. म्हणून त्यांच्या पायी सकलाचे विनम्र दंडवत. नारळींशी खरे संबंधित भंडारी. ते आज फक्त माडीचे धनी आहेत. माडाचा पोय कापून तिथं गाडगी बांधण्याचा धंदा भंडाऱ्याकडे वंशपरंपरेन आला आहे. पण त्यातही नीट वटणावळ होत नाही. ज्याच माडीवर पोट भरत नाही, ते श्रीवर्धनकर भंडारी चहाची दुकान गावठी अगान चालवतात. मुंबईतल्या चहाच्या हॉटेलाचा आणि झगझगीत मरणरक्शाच्या खानावळीचा धंदा पन्नास

वर्षांपूर्वी भंडाऱ्यांच्या ताब्यात होता. पण उडुप्यांनी त्यांना गचांडी दिली. भंडारी तडीपार झाले. आता अस्सल भंडारी वळणाचं अमृततुल्य मांसाहारी जेवण मुंबईत मिळणं मुश्किल झालं आहे. गायवाडीच्या नाक्यावरलं 'श्री न्यू क्षत्रिय हिन्दू' व लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनासमोरचा 'लीलाधर' असे दोन-चार सन्मान्य व्रती शिल्लक उरले आहेत- आनंदाची गोष्ट, म्हणजे ते हरेश्वरवाले म्हणजेच श्रीवर्धनच्या पंचक्रोशीतले आहेत !

सागराच्या मांडीवर श्रीवर्धन आसनस्थ आहे. म्हणजे श्रीवर्धनात ताजी फडफडीत मासळी पै-पासरी भावानं मिळायला हवी. तशी ती त्या चंद्रकोर पुळणीवर एके काळी मिळायचीसुद्धा. पण सध्या मात्र मासळीचं नाव काढू नका. कारण ट्रक्स येतात नि टनावारी मासे घाऊक भावानं उचलतात. विचारलं, तर जबाब येतो, 'एक्सपोर्ट करायचीय्.' खुद्द श्रीवर्धनकराच्या पदरात गाळसाळच पडतो. खासा मासा पाहिजे असेल, तर उन्हातान्हातून कोळीवाड्यात जाऊन करुणा भाकावी लागते. पागधारी पावला नि बरात शिल्लक असला, तर सरगा मिळेल. सुरमई मिळेल. एरव्ही पदरात शुद्ध हेलपाटाच पडेल.

मग रूपसंपन्न श्रीवर्धनात पिकत काय ? उत्तर आहे 'पैसा.' अर्थात, परसात भाजी पिकते, तसा तो खुद्द तिथं पिकत नाही. आकाशातून पाऊस पडतो, तसा तो परदेशातून राशीवारी येतो. ह्या पट्ट्यातले अनेक धाडसी मुस्लिम तरुण पूर्व आफ्रिकेत आणि मध्यपूर्वेकडल्या आखाती देशात नोकरी-धंद्यासाठी गेलेले आहेत. त्यांनी ठोठावलं आणि दैवाचं दार त्यांच्यापुरतं उघडलं. बहुतेकजण तिकडं शारीरिक कष्ट उपसतात. धो-धो पैसा कमावतात आणि इकडं त्यांच्या आठवणी काढीत बसलेल्या कुटुंबियांना पोटभर पाठवतात सांगतात, महिन्याकाठी पासष्ट ते सत्तर लक्ष रुपयांच्या परदेशी मनिऑर्डरी श्रीवर्धनच्या बँकांत जमा होतात, त्यातून बंगले उठतात. बागा फुलतात. शाळा निघतात. दवाखाने उघडतात. मशिदींना चांगले दिवस दिसतात. वाहत्या गंगेतली ही कायाकल्पकारी शक्ती ग्रामस्थ हिंदू नुसती काठावरून पाहतात आणि चक्रावतात. त्या जलौघात त्यांचे हात कधीच ओले होत नाहीत. कारण श्रीवर्धनातला विष्णु पटवर्धन किंवा बुधाजी भाटकर किंवा वसंता प्रधान इथून उठून मोंबासाला किंवा कुवेतला गेला, असं घडत नाही त्यांची झेप फारफार तर बडोद्यापर्यन्त जाते. वय झालेली आणि अधिक करून मनानं बुड्ढेपण स्वीकारलेली मराठी मंडळी श्रीवर्धनात मागं राहिलेली आहेत. 'कालचा दिवस बरा होता.' हे त्यांच्या धुमसत्या विचारशैलीचं पालुपद आहे. अशुद्ध लोहमृत्तिकेच्या राशी मध्यंतरी इथल्या डोंगरमाथ्यावर मिळत होत्या. त्यांना परदेशी बाजारपेठही मिळाली. त्यामुळं वाटलं होतं, जपानचा पैसा इकडे वळेल. श्रीवर्धन बहरेल. पण झालं मात्र उलटं. खाणधंद्याचा तो महाकाय ऐरावत मध्येच गचकला. चारी दिशांनी गावात गोळा झालेले यंत्रविशारद, धातुशास्त्रज्ञ आणि कष्टकरी, आपापल्या गावी निघून गेले. मागं उरलं शून्य आणि शुकशुकाट.

साहेबाच्या काळात ह्या वनवेष्टित भूमीवर जंजिऱ्याच्या अजिंक्य सिद्दी नबाबाची सर्वंकष सत्ता होती. श्रीवर्धन हे जंजिरा संस्थानातलं एक तालुक्याचं ठिकाण होतं. संस्थानिक मुसलमान असला, तरी त्याच्या अधिराज्याचा कवडसा हिंदू रयतेच्याही मनावर होता. कारण त्यानं धार्मिक पातळीवर हिंदूंचा ऊठसूठ अपमान केला नाही. हिंदूंच्या मंदिरांचे चिरे मशिदींच्या पायांत गाडले नाहीत. बाटवाबाटवीही केली नाही. साहजिकच स्थानिक ब्राह्मणांनी आणि कायस्थांनी सिद्दी नबाबाची सेवाचाकरी तन्मयतेनं केली. हिंदू-मुसलमानांचे धार्मिक पातळीवरले लढे इथं झाले नाहीत. किरकोळ दंगे झाले नि विझले. खरं वितुष्ट आलं ब्राह्मणांच्यात आणि कायस्थांच्यात. कायस्थांची वेदोक्त कर्मं करण्यास ब्राह्मणांनी नकार देऊन पाहिला. काटशह म्हणून कायस्थांनी तावडतोब सावंतवाडीहून आपले उपाध्याय आणले. स्थानिक भटजी मंडळी लगोलग शरण आली. झगडा संपला. नबाबाचं रामराज्य चालू राहिलं.

हे राज्य बुडवावं, म्हणून आजवर काय कमीसमी यत्न झाले ? ह्या राज्याला समुद्रतळ दाखविण्यासाठी थोरल्या छत्रपतींनी व्यूहरचना केली, कान्होजी आंग्र्यांनी अस्तन्या सरसावल्या, ब्रह्मेंद्रस्वामींच्या शब्दाखातर पहिल्या बाजीरावानं सशस्त्र चाल केली. पण नबाब शिकंदर ठरला, कारण त्याला इंग्रजांच्या कृपेचं चिलखत लाभलं होतं. मराठ्यांची प्रत्येक स्वारी त्यानं उधळून लावली. मात्र सदैव पाठीशी असलेल्या खुद्द इंग्रजांनीच ह्या भूमीतून पाय काढल्यावर त्याचा निव्वळ निरुपाय झाला. स्वतंत्र भारताच्या चेहऱ्यावरलं हे चामखीळ महाडच्या नाना पुरोहितांना प्रजा-परिषदेच्या वतीनं झटपट शस्त्रक्रिया करून छाटावं लागलं. वाऱ्याच्या उलट दिशेनं नाव हाकारून निघालेला नामोहरम सिद्दी संस्थानिक अखेर अरबी समुद्रात गलबत घालून दिशांतर करून पळून गेला. 'खोला धावे पाणी ' ह्या न्यायानं नबाबाचं हे जंजिरा संस्थान स्वतंत्र भारतात बिनबोभाट वितळून गेलं. मोठी नामी गोष्ट झाली. तिलाही आता तीस वर्षं झाली. शिल्लक उरलेल्या वयस्क श्रीवर्धनकरांचा संस्थानिकावर राग तर नाहीच. उलट, कानोसा घेतला, तर निर्वैर नबाबाच्या स्तुतीचे पडघमच कानांवर पडतील.

श्रीवर्धनचा प्रारब्धयोग जरी असा व्यस्त असला, तरी दुसऱ्या अंगानं ह्या गावाला दैवी संपत्तीच्या एका अनाकलनीय बाजूचाही सुखद स्पर्श झालेला आहे. इथलं सोमजाई देवीचं प्राचीन मंदिर हा एक चालता बोलता चमत्कार आहे. सर्पदंश झालेल्या माणसाला कुठलेही औषधोपचार न करता सोमजाई देवीच्या सभागारात नुसता बसवून ठेवला, तरी त्याच्या अंगात भिनलेलं सापाचं विष तीळ-तीळ उतरत जाऊन माणूस अखेर वेदनामुक्त होतो. खडखडीत बरा होतो. देवळात तुम्ही केव्हाही जा, साप चावल्यामुळं पाय सुजलेली दोन-चार अभागी माणसं कुठलाही औषधोपचार न करता, अंथरुण पांघरूण घेऊन तिथे देवीच्या अनुग्रहाची वाट पाहत बसलेली दिसतात.

सिद्ध करता येईल, असा श्रीवर्धनला इतिहास नाही. पेशवे, म्हणजेच भट घराण्यातले पुरुष मुळचे नजीकच्या तळेगावचे. चाकरीसाठी बाळाजी विश्वनाथ श्रीवर्धनात वसतीला आले. रियासतकाराना ह्याबाबत संशयच होता. बाजीराव कुठं जन्मला, तेही एक कोडच आहे. चिमाजीअप्पाची मुंज इथं लागली, असं कागद सांगत नाहीत.

त्यानंतरच्या पेशव्यानी ह्या गावाची दिशा कायमची वर्ज्य केली कुठलाही पेशवा ह्या गावाकडं फिरकला नाही. मात्र गावात पेशव्यांचा वाडा होता त्याला 'हवेली वाडी' म्हणत. १९१० सालापर्यंत त्याच्या पडक्या भिंतीही उभ्या होत्या. नंतर त्या जमीनदोस्त झाल्या. नुसतं जोतं उरलं. ते अजूनही ओळखता येतं. घोडे बांधायच्या त्याच्या कड्या अजूनही शिल्लक आहेत. चौथऱ्यावर पेशवे मंदिराची नवी वास्तू गावकऱ्यानी बांधून काढली आहे. पेशव्याच्या वसतीबाबतच हे पाखंड श्रीवर्धनकराना साफ नामंजूर आहे. पेशव्यांची वसती इथलीच, त्यांच्या मुलाचे जन्म आणि व्रतबंध इथलेच, असं गावकरी पिढ्यान् पिढ्या मानत आले आहेत. पेशवे हा त्याच्या अक्षय्य अभिमानाचा विषय आहे.

ते काहीही असो, आजच्या श्रीवर्धनात राहणं म्हणजे अडीचशे वर्षं मागे हटून पेशवाईच्या काळातच राहण्यासारखं आहे. श्रीवर्धनात राहणं म्हणजे पशुपक्ष्याच्या सोबतीनं गावातल्या गावात संपर्कहीन, संथ जीवन जगणं.

त्याच त्या सर्वत्र गच्च माजलेल्या हिरव्याकंच बागा, तेच ते धुळीचे सरळमार्गी नरम रस्ते, तीच ती औटकी कौलारू घरं, तेच ते अखंड रहाटगाणं. हमगीतुमरीवर आलेल्या बाहेरच्या स्पर्धिष्णु दुनियेचा उग्र कोलाहल ज्याला चार दिवस समूळ विसरायचा आहे, त्याला श्रीवर्धनासारखं अनुपम ठिकाण नाही. दिवसभर घरातून बागेत, बागेतून घरात करावं. आडाचं ताजं पाणी प्यावं. उन्ह उतरली, की पुळणीवर यावं. तिथं चिटपाखरू नसतं. समोर फक्त उफाळलेला अपरंपार दर्या असतो. पाठीशी सळसळणाऱ्या सुरूच्या राईचा पसा. अवती भवती भयाण एकांत. आणि आसमंतात तुडुंब भरलेला स्वच्छ प्रकाशाचा रुपेरी रस. चौफेर घोंगावणारा अनाघ्रात आदिम निसर्ग. आणि तुम्ही एकटे ना एकाकी. लाखो वर्षांपूर्वीच्या आदिमानवाला सृष्टीच्या रूपाचं पहिलं दर्शन कसं घडलं असेल, ह्या अचाट अनुभवाचा धक्का तुम्हांला द्यायचं अद्भुत सामर्थ्य श्रीवर्धनच्या सागरकिनाऱ्यात आहे. तो सागर प्रेमानं खुणावतो आहे, तोपर्यंत तिथं हजर व्हा. यात्रा सुफळ होईल.

♣ ♣ ♣

# श्री अरविंदांच्या पाँडेचेरीत

♧ ♧ ♧

मोरपखी डोंगराचा लोकरी तक्क्या मागील बाजूला तट्ट फुगून पहुडला आहे. समोर शतरंगी सागराचा पिसारा चैतन्यानं थरथरतो आहे नि त्या दोहोंच्या बेचकीत पाँडेचेरी शहराचा ठिपका मोरपिसावरल्या डोळ्यासारखा शोभतो आहे.

शहर तसं अगदी अद्ययावत थाटाच आहे. छोटेखानीच, पण फ्रेंच कलासक्तीचा अर्क कोळून प्यायलेलं दिसायला सूटबूटवाल्या माणसासारखं फाकडू आणि कोरीव मिशां-सारखं रेखीव, घाटदार.

ओघळत्या रस्त्याचा कणा सर्व शहरभर घातला आहे. तरवारी रस्त्याच्या भागांत खुरट्या झुडुपाची रांग पाळली आहे. दुतर्फा हिरव्या जर्द मखमली गवताचा पट्टा रुळलेला आहे. लांबच लांब. त्याच्यामागे धुराडीदार बसकट घरं बसली आहेत. क्षणभर वाटत, स्वप्नांच्या पालखीतून आपण युरोपच्या चारुभूमीवर तर आलेलो नाही ना ?

पटावर फासे पडावेत, तसे छोट्या छोट्या कॉलनीजूचे पुंजके सर्व शहरभर पसरलेले आहेत. हमरस्त्यावर कॅफेजूची गर्दी माजलेली आहे. दुकानं आणि विशेषतः त्याच्या दर्शनी बाऱ्या घोंगावत आहेत. उबगलेले, हिंपुटलेले जीव त्या कॅफेजूमध्ये श्रांत होतात, आणि बारमध्ये श्रांत जीव उल्हसित होतात. रस्त्यावरल्या वर्दळीची खळबळ त्या खिडक्याजवळ रेंगाळते. रेंगाळणारी पावलं बाऱ्यांपलीकडे दिसणारे झगे पाहून जागच्या जागी खिळतात. खाऱ्या वाऱ्याच्या झुळका अवखळपणे फेसाळतात नि बोटांची वेणी घालून डुलत मुरडत चालणाऱ्या फ्रेंच युगलांना तजेल्रित करतात. वा ! हे सारं वातावरणच कस मद्याच्या

फेसासारखं तजेलदार आहे !

मुख्य रस्त्यानं नाकासमोर गेलं, की ओली नि खारी बंदर किनार लागते. मोठ मोठ्या फ्रेंच बोटी तिथं धक्क्याला लागून उभ्या आहेत. मालवाहू गलबतं नांगरलेली आहेत. आणि त्याच्यामधून शौकिनाची होडकुली तुरुतुरू फिरताहेत. बोटीच्या डेक्सवर फ्रेंच टूरिस्ट उतारूंचा जल्लोश चालू आहे. त्याच्या हसण्या-खिदळण्याचा आवाज वाहत वाहत येतो आहे.

संध्याकाळ रांगत रांगत येते आणि लालकेशरी रंगाचं वस्त्र लेवून बंदरपट्टीवर हलकेच अंग झोकते. काळोखाचं पीस खाली उतरतं. आकाशाच्या निळ्यासावळ्या पार्श्व-भूमीवर डोलकाठ्यावरल्या हिरव्या-तांबड्या दिव्याची दीपमाळ खुलून दिसते. कातळकाळ्या दर्यात त्याची वाकडी-तिकडी प्रतिबिंबं नागमोडतात. थोड्या वेळानं डोळ्यांना दिसतं फक्त काळं काळं पाणी नि निळे-पिवळे दिवे. पाहता पाहता मन रंगाच्या दुनियेत आपसूक न्हातं. डुंबतं. पॉंडेचेरीत आल्याचं सार्थक वाटतं.

पॉंडेचेरी म्हणजे जणू एक चमचमता सौंदर्यबिंदूच ! गालावरल्या खळीत हास्य फुलावं, तसा ह्या पॉंडेचेरी नगरीत आनंद नुसता फुलतो आहे !

बोरीबंदरावरल्या भाऊगर्दीतून निसटताना डोळ्यासमोर हे मखमली स्वप्नदृश्य तर-ळत होतं ! लाल डगलेवाल्या हमालांच्या नि हवालदिल चेहऱ्यापाठीमागे पॉंडेचेरी नगरीचं हेच काय ते एक दृश्य होतं. मनाला वाटत होतं, की आता मी फ्रेंचांच्या दुनियेत जात आहे, पण गाडी मद्रासच्या रोखानं झुकझुकत गेली, तसतशी माणसं अधिकाधिक काळी दिसू लागली आणि मद्रासला वळसा घालून दक्षिणेला ओघळल्यावर तर त्या काळ्या पुटा-वर तांबरलेली झाक दिसू लागली. भूप्रदेशात तर काडीइतकाही फरक जाणवेना. तेच ते उजाड, ओके ओके माळ नि तेच ते दगडधोंडे ! मधून मधून दुतर्फा भात-वरीची शेतं, शिवार नि मध्ये मध्ये आंब्यांची डेरेदार झाडं दिसत. पण हा तर खास भारतीय भूभाग. मग ती युरोपीय भूभागाशी स्पर्धा करणारी पॉंडेचेरीची अलौकिक भूमी कधी दिसणार ?

विलुपुरम् मागे पडलं आणि पॉंडेचेरी जवळ येऊ लागली. पण फ्रेंच संस्कृतीची फिकटशी छटाही कुठं आसमंतात दिसत नव्हती. बाचाबीत, तर स्टेशनांची नावंसुद्धा खास भारतीय. 'चिन्नबाबूसमुद्रम्' ! जिथं पाहावं, तिथं आपल्यासारखीच, आपल्याच रक्तामांसाची, काळी किडकिडीत माणसं, उघडीबोडकी, झोपडीवजा घरं, पिकाळू वावरं नि हाडकुळी जनावरं, तेच ते आकाश– निळंकाळं नि तीच माती– काळी काळी !

संध्याकाळी पॉंडेचेरी आली. गाडीतून उतरून फलाटावर पाऊल टेकलं मात्र, तोच क्षणार्धात गॅसबत्तीवरील पंखील माशा घोंगावाव्यात, त्याचप्रमाणे फाटकेतुटके कपडे घात-लेले गरीब तामिळ हमाल अक्षरशः आमच्यावर तुटून पडले– नव्हे, कोसळले ! नंतर लक्षात आलं, की तो तांडा हमालांचा नसून रिक्षावाल्याचा होता ! तुम्ही रिक्षाच भाड

दिलंत, तर ते मोफत हमालीही करतात ! त्याच्या दारिद्र्याला काही सीमा असेल, काठ असतील, असं वाटतच नाही. धड असा एकही कपडा बहुधा त्यांच्यापाशी नसावा. पॉंडेचेरीत एकही स्वयंचलित वाहन दृष्टीस पडत नाही. जिथे पाहावे, तिथे माणसानी खेचायच्या रिक्षा. रिक्षा एके रिक्षा ! दुसर तिसरं काहीही नाही. टांगा नाही, की मोटार नाही. पावलांना गोणपाटाचे चिरफाळे आणि डोईला फडक्याच मुंडास गुडाळलेले दीनवाण्या चेहऱ्याचे पडवळये तामिळ तरुण अरुद रिक्षात आपल्या भक्कम देहाला कोंबून बसलेल्या एखाद्या बाईला अगर गलेलठ्ठ म्हातारबुवाला दुडक्या चालीवर ओढून नेत असताना सर्वत्र दिसतात. ते दृश्यच डोळ्यानी पाहवत नाही. एक माणूस घामान नुसता निथळत असतो आणि दुसरा गाद्याचे कोपरे कुरवाळीत असतो ! नवखा प्रवासी रिक्षा करायच टाळून स्टेशनाबाहेर येऊन टांगा धुंडाळू लागतो, तोच त्याच्या सभोवार रिक्षावाल्याच कोंडाळ पडतं. त्याच्या जिभावरली लाचार शब्दाची लाळ ठिबकू लागते,

'स्वामी, इथं दुसर कसलंच वाहन नाही. फक्त रिक्षा. अहो, बसा तुम्ही ह्या माझ्या रिक्षात. सगळेच बसतात की !'

परंतु इतकं ऐकूनही तुम्ही ढीम करीत नाहीसे पाहिल्यावर त्याचा रोख बदलतो. आर्जवं सुरू होतात,

'ह्या माझ्या रिक्षाला, बघा, कसे सोनेरी घुंगरू बांधले आहेत ! आणि गादी तर बघा, राव, कशी लालेलाल आहे ! आहे ना मनपसंत ?'

पण नवं गिऱ्हाईक हरखून जात नाही. माणसानच ओढल्या जाणाऱ्या रिक्षात बसायला मन धजत नाही. मन आक्रसून मंडळी मुक्कामाला पायीच निघतात रिक्षावाल्यांकडे पाठी वळवतात. तोंड उघडं ठेवून हताश नजरेनं बघणाऱ्या रिक्षावाल्याच्या जिभेवर मात्र लाळेचा थर साचतच राहतो ! खरोखरच ह्यांना कुणी वाली नाही का ?

कुलीच्या डोईवर सामान चढवून आम्ही हॉटेलाकडे चालू लागलो, पण मन मात्र डोळ्यात प्राण ओथंबवून दुसऱ्या गाडीची वाट बघणाऱ्या फलाटाबाहेरच्या हताश रिक्षावाल्याकडे वळून वळून पाहू लागलं. चार चवल्या कनवटीला असलेल्या आमच्यासारख्या सुखासीन प्रवाशानी जर त्या रिक्षेकऱ्याना आश्रय दिला नाही, तर त्यांना दुपारची इडली दिसणार कशी ? आमच उदंड मानवताप्रेमच ह्या केविलवाण्या कामकऱ्याच्या गळ्याला नख तर लावणार नाही ? आणि हमालाच्या डोईवर आम्ही मख्खपणे सामानाचे डोलारे देतो नि मारे छाती पुढे काढून रस्ता ऐटीत तुडवतो, हे तरी त्या उदंड मानवताप्रेमात बसत काय ? असे नानाविध प्रश्न मनाचे लचके तोडतात. त्याना सरळ आणि प्रामाणिक उत्तर नाहीत. पण एक गोष्ट खरी, की माणसानीच ओढल्या जाणाऱ्या रिक्षाकडे काही तुमचे आमचे पाय वळत नाहीत.

गाडीत एका सहप्रवाशानं सांगितलं, की पॉंडीत खास हिंदू ब्राह्मणाच असं एकच हॉटेल आहे 'आमनिवास'. तिकडेच आम्ही निघालो. दहा मिनिटात ते आलं. कापीव हमरस्त्याच्या कडेस असलेलं हे हॉटेल चांगल ऐसपैस आहे, स्वस्त आहे. दोन रुपयाला

एक खोली घेऊन बाड-बिस्तारा मांडला. हॉटेल प्रशस्त असलं, तरी खोल्या मात्र बोरभाट गल्लीतल्या खोल्यांसारख्या अरुंद नि काळोख्या वाटल्या. पण पुढ्यात प्रशस्त उघडी गच्ची आहे. प्रवासाच्या शिणलेल्या मनाला तिचं आकर्षण अर्थातच दांडगं आहे. कारण तिथं पडलं, की वर फक्त आकाशाचंच काय ते पांघरूण !

मोकळ्या गच्चीत पथारी पसरली आणि सभोंवार बघून पाहिलं मात्र, क्षणभर चमकलो. वाटलं, आपण पणजीत तर आलेलो नाही ? त्या वातावरणात नि ह्या वातावरणात काडीइतकाही फरक जाणवत नाही.

तीच बैठी गावठी घरं. झुकलेल्या माडांच्या रांगा. पाळण्याबाहेर मुलाचे हातपाय दिसावेत, तसे मध्येच उठून दिसणारे चर्चचे कळस. प्रार्थनेहून परतताना पेंगत पेंगत माळ जपत जाणाऱ्या म्हाताऱ्या खिश्चन बाया. फिरून परतणाऱ्या फोफशा पण काळ्या तरुण मुली. पाटाच्या पाण्यासारखे गुपचूप पडलेले रस्ते. आळ्या हुंगणारी बेकार डुक्करं. तारसप्तकात केकाटणारी नि क्षणात विहिरीच्या पाण्यासारखी स्तब्ध होणारी कुत्री. ओली सागरपट्टी. खारा गरम वारा

मात्र जो पाहावयास आलो, त्या आश्रमाची पुसटशी खूणसुद्धा आसमंतात कुठे दिसली नाही.

रात्री डोळा केव्हा लागला, ते कळलंच नाही. सकाळी गरमागरम कॉफीच्या डोसानं गळा शेकला नि उन्हाचा शेक चुकवत बाजारपट्टीला लागलो. बहुतेक दुकानं बंदच होती. कुठल्याही तहसिलीच्या गावाच्या बाजारपेठेसारखी ही बाजारपेठ आहे. किराणा मालाची काही दुकानं उघडी होती. रस्त्याचं वा वस्तीचं वेगळेपण कुठंच उमटून दिसत नव्हतं. दुकानावरल्या काही पाट्या मात्र फ्रेंच भाषेत होत्या नि रस्त्याची नावं सुद्धा फ्रेंच माणसांचीच होती. केळ्याचे घड विपुल प्रमाणात दिसले. एका ठिकाणी डुकराच्या मासाचं उघडं दुकान होतं. आपण भरल्या वांग्यासाठी करतो, तसे एका डुकराच्या डोक्याचे चार काप करून ते पूर्ववत एका दोरीने बांधून ठेवले होते ! विच्छिन्न मांसाचं हे बीभत्स प्रदर्शन अंगावर शहारे आणणारं आहे. पण काही तामिळी खिश्चन बायका त्या दुकानाबाहेर आशेनं पिरगत होत्या ! मथुरेला जसे दुकानात बत्तासे रचून ठेवलेले आढळतात, तसे इथे इडलीचे ढीग रचून ठेवलेले दिसले !

ऊन तापू लागलं, म्हणून इडलीसांबार रेटून आश्रमाच्या दिशेनं पावलं वळवली. हाकेच्या अंतरावर बंदर-किनाऱ्याला आश्रमाची हद्द सुरू होते. खरंच, समोर दिसते आहे, ही पाश्चात्त्य वळणाची अद्ययावत इमारत एखाद्या खिश्चन पाद्र्याची रेक्टरी आहे, फ्रेंच अधिकाऱ्याची बंगली आहे, की सनातन जीवनतत्त्वांना आधुनिक जाणिवेचा उजाळा देणाऱ्या महात्म्याच्या जपजाप्याची जागा आहे, ह्याचा मला संभ्रम पडला आहे.

आश्रम म्हटला, की गांधी, विनोबा आणि त्यांच्या झोपड्या ह्यांचीच चित्रं आपल्या डोळ्यांपुढं उभी राहतात. पण इथं सारा मामला वेगळा आहे; आलिशान आहे. आश्रम म्हणजे चार झाडाझुडपांची झोपडीवजा खोपटी अशी 'शाकुंतल' वाचून कल्पना

झालेल्या माणसांला आश्रमाच्या ह्या अद्ययावत इमारती जोरदार धक्का देतील. नव्हे, तो झीटच येऊन पडेल.

आश्रमाच्या मुख्य इमारतीच्या गंधवालावर अरविंदाश्रमाचं बोधचिन्ह जे प्रफुल्ल कमळ, त्याची मुद्रा शिल्पित केली आहे. प्रवेशद्वार ओलांडून आत गेलं, की लतावेलींचा दाट मंडप लागतो. बाजूला पुष्पमंडित बगीचा आहे. ओटीवर खुर्च्या आहेत. तिथं सुगंधाची शाल लपेटून तुम्ही खुशाल लवंडा. कितीही वेळ गुंगीत पडा. बाजूला गारेगार पाण्याचे घडे भरलेले आहेत. पलीकडे मोठा डेरेदार वृक्ष आहे. त्याच्याखाली अरविंदाची प्रशस्त समाधी आहे. तिच्यावर रंगीत फुलापानांचा अभ्रा पसरलेला आहे. फुलांची रचना रांगोळी काढल्यागत रेखीव नि कलात्मक आहे. इथं अरविंदाचा चिरशांत आत्मा पुष्पांच्या वेष्टनात पहुडला आहे. ह्या समाधीवर फुलांची नक्षीदार वाडी भरायची, म्हणजे चार बायकांना किमान चार तास तरी बैठक मारावी लागणारच.

आम्ही गेलो, तेव्हा हे दालन उघडं नव्हतं. सर्व पुष्परचना पूर्ण झाल्यावर ते घटकाभरानं खुलं करण्यात आलं. परंतु बसल्या जागेवरून मी पाहत होतो, की हळूहळू पायाखालची मुंगी न चिरडेल अशा बेतानं, सावधगिरीनं नि इस्त्री मारलेल्या नजरेनं हूं की चूं न करता साधक मंडळी येत, तेव्हा त्यांच्या एका हातात एक फुलांची जुडी असे नि दुसऱ्या हातात गावीसारखी दिसणारी वीतभर लांबीची मोठी किल्ली असे! उत्तम कमावलेली आपली सुबक पादत्राणं बाहेर काढून ती मंडळी आतल्या दालनात गुपचूप निसटत. बहुधा ती फुलं समाधीवर चढविली जात असावीत नि त्या पान्यासारख्या दिसणाऱ्या वीत वीत लांब चाव्या कुठं तरी एकत्रित केल्या जात असाव्यात. पण काही म्हणा, मुक्तीच्या मार्गावरल्या साधकांच्या हातात चाव्या शोभत नाहीत! कारण चावी म्हटली, की कुलूप आलं, कुलूप म्हणजे जपून ठेवण्यासारखं वित्त आलं. वित्तामागोमाग वित्तलोभ आणि लोभ म्हणजे चित्तशांतिनाश! म्हणजे हे सारं साधकाच्या जीवनहेतूच्या विरुद्ध दिशेनंच जातं!

ताजी तुळतुळीत दाढी केलेला, विष्णुदास शिराळींच्या चेहरेपट्टीचा, पण ठार शून्य नजरेचा एक मध्यमवयीन साधक एका स्टुलावर भिंतीला पाठ न टेकवता बाहुलीसारखा द्वारपाल म्हणून बसला होता. तो इतका शांत भासत होता, की प्रत्यक्ष जरी चिराबाजारात भेटता, तरीही हा साधकच आहे, हे कुणीही सांगितलं असतं! त्याच्याशी बोलून त्याची शांती भंग करावी, हा विचार मन अवघडू लागला. बालकाच्या तोंडातली दुधाची बाटली ओढून काढताना मन जसं विव्हळतं, अवघडतं, तसं त्याची शांती भंग करताना वाटत होतं. म्हणून मी तिथंच रेंगाळत होतो, पण त्याचंच माझ्याकडे लक्ष गेलं व चेहऱ्याची घडी न बिघडवता त्यानं मला जवळ येण्याबद्दल खुणावलं. मीही, बायका तुळशीवृंदावनासमोर जातात, त्या विनम्रतेनं त्याच्याजवळ गेलो. गृहस्थ फारच आदबशीर वाटला. मला आश्रम पाहावयाचा आहे, हे सांगितल्यावर सुखदेव नावाचे साधक वाटाड्याचं काम करीत असून त्यांची वाट पाहण्यास त्यानं सांगितलं. हा साधक खुद्द

बंगाली होता. अंदाजे सातशे साधकात बहुसंख्य भरणा बंगाली व गुर्जर साधकाचा आहे. कारण अरविंदाचा जन्म बंगालमधला व व्यावसायिक वास्तव्य बडोद्यास झालेलं, वगैरे माहिती त्यानंच पुरवली. मराठी साधक मात्र इथं हाताच्या बोटावरच मोजण्याइतके आहेत. मी हा प्रश्न जरा जास्तच रापला, तेव्हा त्यानं मला सरळ सरळ जामल,

'हे बघा, राव, इथं आत्म्याची उन्नती साधू पाहणारे सारे सेवाभावी साधक आहेत. इथं कसले आले आहेत प्रांतभेद नि वर्णभेद ?'

हे मात्र त्यानं बळेच रचलेलं मानभावी व्याजनाट्य असावं; कारण एरव्ही त्यानं सुरुवातीसच प्रांतभेदावर रचलेली माहिती पुरवली नसती.

आम्ही हे बोलतो, न बोलतो, तोच उंबरठ्यात एक साठीच्या पलीकडे झुकलेले गृहस्थ उभे राहिले. त्यांनी पांढरी विजार व बटनाचा पांढराच गजिफ्रॉक घातला होता. त्यांचं जानवं गंजिफ्रॉकाच्या गळ्यातून दिसत होतं. त्यांच्या डोक्यावर सनहॅट होती आणि पायात कॅन्व्हासचे पांढरे बूट होते. त्यांच्या चेहऱ्यावर वैशिष्ट्यपूर्ण असं काहीही नव्हतं. पुण्याचा कुठचाही पेन्शनर दिसावा, तसा हा गृहस्थ दिसत होता.

'हे महाराष्ट्रीयन आहेत. त्यांना भेटा.' ते बंगाली साधक कोमल शब्दात म्हणाले.

मी त्या वृद्ध गृहस्थांसमोर जाऊन नमस्कार चमत्कार करून विचारलं,

'आपण कोण ?'

'मी डॉ. चोळकर.' ते उद्‌गारले.

'नाव खास महाराष्ट्रीय आहे.'

'हो. मी मराठी आहे.

'वा ! मागे डॉ. कोटणीस चीनला गेले होते, तेव्हा त्यांच्याबरोबर कुणी तरी डॉ. चोळकर होते. त्यांच्याशी आपलं काही नातं-बितं ?'

मीच तो डॉ. चोळकर !'

'ऑं ?' मी स्तिमितच झालो !

भारताच्या ह्या सुपुत्राची अशा ठिकाणी गाठभेट होईल, असं स्वप्नातसुद्धा कधी वाटलं नव्हतं. त्यामुळं आनंदोर्मींनी मन उचंबळून आलं. शब्द जिभेवरच नीरव झाले. पाशवी सत्ताधीशाच्या टाचांखाली चिरडल्या गेलेल्या निःशस्त्र जनतेच्या डोळ्यातील आसवं टिपायला डॉ. चोळकर स्पेनमध्ये गेले होते. त्यांचा तो बृहद् अनुभव जमेस धरून पं. नेहरूंनी त्यांना चीनला पाठविलं होतं. तिकडे ते आजारी पडून आपलं काम संपविण्याच्या अगोदरच परत आले. असा हा उदंड अनुभव प्यालेला नि थोर अंतःकरणाचा महाराष्ट्राचा सुपुत्र इथं साधकांच्या काफिल्यात कसा काय दाखल झाला ? पाश्चात्य विद्येचं वारं प्यालेल्या नि वाऱ्यासारखा त्रिखंड गरागरा भटकलेल्या ह्या भटक्या शस्त्रवैद्याला इथं निर्मम होण्याचा कसला हा ध्यास लागला आहे ? जीवनाचे फासे असे उलटसुलट कसे काय पडतात ?

'मला त्या साऱ्या जीवनाचा उबग आला, कंटाळा आला, म्हणून म्हातारपणी

मी इथं दाखल झालो आहे. इथं उल्हसित वाटत. इथं युनिव्हर्सिटी आहे. तिथ मी शरीरशास्त्र शिकवतो. हीच माझी साधना.' डॉ. चोळकर अगदी लीनतेने म्हणाले.

कानावरून शब्दाची गार झुळूक गेली. 'परत भेटलात, तर सर्व दाखवीन', अस सागून ते आपल्या कामाला परत गेले. आश्रमातच भोजनाची सोय होते, वगैरे सागून ते गेले.

नतर सुखदेव आले. गृहस्थ अगदी तरुण आहे. नागपूरकडचा. मुळात लक्ष्मीपुत्र होता. पण वित्तलोभाकडे डोळसपणे पाठ फिरवून इथं साधना करतो आहे. त्यान एक शर्ट पेहनला होता. खाली धोतर होतं. इथं त्याच्या आवडीनुसार ग्रथालय-बाधणीच काम त्याच्याकडे आहे साहित्यादी कलाचा त्याना रस असल्यामुळे तेच आम्हाला आश्रमभर फिरवणार, हे फारच चागल आहे.

त्यानी आम्हाला अरविंदाची पुष्पमंडित समाधी दाखविली. वरच्याच माडीवर श्री राहत होते, असं कळल. सध्या माताजींच वास्तव्यही तिथच आहे. अरविंद वर्षातून चार वेळा साधकाना दर्शनलाभ देत. माताजी मात्र मला केव्हाही दिसू शकतात. सध्याकाळी त्या उघड्या क्रीडागणावर टेनिस खेळतात. वरच्या माडीतून कुणा बाईचे गाण्याचे स्वर झुळझुळत होते. पडवीत एक भला मोठा ब्लॅकबोर्ड होता. कुणाला एखादा निरोप ठेवायचा असला, तर तो इथ लिहून ठेवावा! 'Nolini wants to see Frazer!' इतकं लिहिल, की साधक ते वाचून एकमेकांना कळवतात. परत सर्व व्यवहार उघड उघड घडतो! ही सोय, बुवा, आपल्याला फारच पसंत पडली.

एका दालनात आश्रमाच्या पुस्तकाच, चित्राच विक्री-केंद्र आहे. अरविंदाचे शैशवापासून विमुक्तीपर्यंतचे सर्व अवस्थातले फोटो तिथं पाहावयास मिळाले. बडोद्यातील वास्तव्यातील अरविंदाचा चेहरा मोठा पाणीदार दिसतो. डोळे शाळिग्रामासारखे वाटतात. उतारवयातला मात्र थकलेला भासला! देहही प्रमाणाबाहेर स्थूल झालेला दिसला. नजर निवलेली भासते.

अरविंद प्रामुख्यानं रसिक कवी होते. त्याची सगळी पुस्तकं इथ विक्रीला आहेत. संस्कृत कवींच नाट्यकाव्य त्यानी इग्रजीत भाषातरिलं आहे. त्यापैकी 'विक्रमोर्वशीय' मी घेतल. त्यात त्यानी सस्कृतच स्पेलिंग 'Sanscrit' अस केलेलं आढळल. हा फ्रेंच-इटालियन भाषाच्या संस्काराचा परिणाम आहे काय? अरविंदाच्या पुस्तकाच्या अतरगाविषयी काही कल्पना नाही. परंतु बाह्याग मात्र चित्ताकर्षक आहे. त्याच्या पुस्तकाना मागणीसुद्धा, म्हणे, उदड असते!

वास्तविक पाहता सगळा आश्रम पायाखाली घालणं जरूर होतं, पण ते एकट्या-दुकट्याला शक्य होत नाही.कारण आश्रमाचा संसार पंधरा-सोळा मैलाच्या टापूवर हातपाय पसरून पहुडलेला आहे. एकसारख्या दिसणाऱ्या अनेक इमारतींचे पुंजके रागेनं दूरवर गेले आहेत. इथं रपेट करायला आश्रमाची स्टेशन-वॅगन आहे. ती भाड्यानं मिळते. पण आम्ही गेलो, तेव्हा ती दुसऱ्यानी घेतलेली होती. आश्रमाच्या दूरवरच्या भागात दुकानं,

धुलाई, शिलाई, सुतारकाम, वस्तुकाम, वगैरेंची दालनं आहेत. आश्रमीयाना लागणाऱ्या बहुतेक वस्तू इथच तयार होतात व साधकाना त्या मोफत मिळतात.

प्रश्न असा, की ह्या परीटघडीच्या विलायती आश्रमाचा डोलारा कसा काय सांभाळला जातो? मला ह्याची दोन-चार उत्तर मिळाली. कैक श्रीमंत साधकांनी आपली सर्व गडगज स्थावरजंगम इस्टेट आश्रमाच्या पदकमली निर्मल भावान समर्पित केली आहे. शिवाय अनेक धनिक आपल्या नफ्यातील भक्कम टक्केवारी आश्रमाला देणगी म्हणून सालोसाल पाठवतात. इतर देणगीदारही आहेतच. आश्रमाविषयी प्रेम बाळगणारे, पण खुद्द आश्रमात वास्तव्य न करता इतरत्र आपापल्या क्षेत्रात साधकाच्या निष्ठेन कालक्रमणा करणारे लोक आहेत तेही आपला हविर्भाग देतात. आणि आश्रमाच तयार वस्तू विकण्याच जे दुकान आहे, तिथ आश्रमीय मुलींनी लाटलेले पापड आणि घातलेली लोणची फार मोठ्या प्रमाणावर विकली जातात! तात्पर्य, हुक्का पीत पैशांच्या गंजीवर रेललेल्या माणसापासून हातात पोळपाट-लाटणं घेऊन बसलेल्या मुलीपर्यंत साऱ्यांच्या करंगळयानी हा गोवर्धन पर्वत सावरला जातो!

आश्रमवासीयाकडे पाहून त्यांचा हेवा वाटावा, इतके ते रुबाबदार भासतात. एकजात झाडून सर्वांची देहयष्टी कांतिमान आहे, बांधे ताकदवान आहेत. लक्ष्मीकडे पाठ फिरवून बसलेल्या इथल्या प्रत्येक आश्रमवासीयाच्या चेहऱ्यावर लक्ष्मीच्या शांत तेजाची प्रभा किती सुरेख पडली आहे! कारण एकत्र. बक्कळ आहार, मनसोक्त विहार. आणि शिवाय कांदे-बटाट्याच्या सांसारिक विवचनाना सरसहा फाटा दिलेला! सर्वांचे कपडे धुलाईचे, घडीदार आहेत. वस्त्रप्रावरण उत्तम बनावटीची आहेत. मनगटावर टपोरी घड्याळं शोभत आहेत. खिशाला उंची पेनं आहेत. बहुतेक बाप्यानी ढोपरावर सरकणारी पाढरी सफेद आखूड विजार घातलेली असते व पांढराच लांब्या बाह्याचा शर्ट चापचोपून घातलेला असतो बायका बव्हंशी विजार–शर्ट, सलवार–ओढणी ह्यातच दिसल्या. काही वृद्ध बायका मात्र पातळातच होत्या. दिसायला मात्र बहुतेक जणी देखण्या वाटल्या. ह्या आश्रमात कुणाही माणसाला त्याची जात, गोत, कुळ, कुंडली वगैरे लक्षात न घेता प्रवेश मिळू शकतो. अट फक्त एकच; नि ती म्हणजे तुमचे सर्वस्व तुम्ही श्री. माताजींना समर्पित करायचे व निर्विकल्प कालक्रमणा करावयाची. तुमच्या आवडीच क्षेत्र निवडा, त्यात रमा, तन्मय व्हा. मग एक दिवस तुम्ही मुक्तीचा प्रकाश पाहाल, असं हे गणित आहे. काही दंडकही आहेत, : धूम्रपान मांसाशन वर्ज्य. विषयवासना विषसमान मानायची. फक्त शुद्ध आहाराचच सेवन करता येतं. अगोदर पत्रान तुम्ही श्री माताजींसमोर तुमच्या मनाची मळमळ मोकळी करायची. जर तुम्ही प्रांजळ वाटलात, तर मग काही दिवस साधकांच्या कक्षेबाहेर तुम्हाला ठेवतात. मात्र तुमच्या मानसिक उन्नतीचा आलेख ह्याच वेळी रेखला जातो. तुमच्या तळमळीविषयी वरिष्ठ निःशंक झाले, की मगच तुम्ही साधकाच्या गोतावळयात मोडता. आपल्या जीविताच्या सगळ्या नाड्या तुम्ही सश्रद्ध भावे श्री माताजींच्या हाती सुपूर्द करता; निर्मम होता, ज्ञानचक्षु विस्फारता आणि होता

होता एक दिवस नव्या निर्व्याज जीवनाची उषा तुमच्या उंबरठ्यावर आपली प्रकाशपावले टेकते, खुद्द तुम्हीच प्रकाशमय होता!

आश्रम पाहण्याचा वेळ संपला, म्हणून आश्रमासमोरल्या बंदरावर झुकाडलो आणि इतक्या दूरवर आल्याचं क्षणात सार्थक झाल्याचं वाटलं!

अथांग सागर समोर नुसता थुईथुई नाचत होता. आपला सगळा निळा पिसारा फुलकारून उल्हसित झाला होता. ऊन तर कसं लख्ख पडलं होतं. कासवाच्या पाठी-सारखा तुळतुळीत रस्ता बाजूने ओघळला होता. समोर सिमेंटचा कट्टा होता आणि निळा दर्या त्यावर आपटून आपटून फेसाळत होता. लाटाच्या शेंड्यावर तेजाचे विळे लख-लखत होते. आभाळाची निळाई मुरळ घालीत होती हे सारं दृश्य जणू एका अलौकिक महाकाव्याचा अद्भुत स्वर्ग होता! हे तप्त उन्ह, हे निळं आकाश नि हाच मोरपंखी दर्या पाहायलाच मी हपापलो होतो. ते सारं श्रेय अजाणता नि अचानक पदरात पडलं. आनंदाच्या भरात किनाऱ्याकिनाऱ्यानं खूप दूरवर भटकलो. टोकाच्या दीपगृहापर्यंत गेलो नि तिथंच सावलीत विश्रांती घेतली. डोळ्यांवर निळ्या रंगाची घडी होतीच!

बारा वाजता पोटानंच रसोड्याचा रस्ता शोधला! आश्रमाच्या मुख्य इमारतीपासून थोड्या अंतरावर भोजनगृह आहे. मोठं प्रशस्त आहे. सारी मंडळी तिथं येतात नि ताट-वाटीसाठी रांग लावतात. मर्यादित अर्थाने 'अन्नपूर्णा' पद्धत आहे. प्रथम ताट घ्यायचं. पुढच्या टेबलावर वाटी. त्याच्या पुढच्यावर पाण्याचा ग्लास. नंतर मापानं भाताची भक्कम मूद देण्यात येते. त्याच्या पुढल्या टेबलावर त्याच मापानं काठोकाठ भरून पातळ भाजी; पुढच्यावर पुन्हा त्याच मापानं टाकोटाक भरून दही मिळतं! जितका भात, तितकीच भाजी, तितकंच दही, असं हे समप्रमाणित अन्न पाहून तुमची छाती दडपते. कारण इतकं दही तुम्ही जन्मात खाल्लेलं नसतं! पण हे झालं मुख्य अन्न. त्यानंतर पूरक अन्न परत समप्रमाणात वाटलं जातं! भाजलेले पाव, केळी, वगैरे भरपूर प्रमाणात मिळतात. हे जिन्नस घेऊन मिरवत मिरवत पलिकडच्या दालनात जायचं. तिथलं भोजनगृह प्रशस्त, स्वच्छ आणि सुशोभित आहे. इथं रांगेनं डेस्कं मांडलेली असतात. त्यासमोर मांडी मोडून, कुणालाही न विचारता, कुणाच्याही जाण्यायेण्याची वाट न बघता आणि शक्य तो कुणाशीही न बोलता भोजन उरकायचं. एकदा जेवायला बसल्यानंतर अधिक वस्तू मिळत नाहीत. काही मंडळींना नुसतं आंबट दही जात नाही. त्यासाठी पलीकडे स्टँडवर हिंगाचे बारके डबे असतात, तसे साखरेचे-मिठाचे डबे ठेवलेले आहेत. उठून त्यातली साखर घ्यायची व परत डबे जागच्या जागी ठेवायचे.

एरवी कुठंही न दिसणारे शेकडो साधक इथं भोजनगृहात कमीत कमी कपडे करून भोजनास्वाद घेताना दिसतात. काही जण उघडेच होते, पण त्यांची देहयष्टी दृष्ट लागेल अशी पोलादी, पिळदार होती! भरपूर व्यायाम व हे असलं सकस अन्न खाऊन त्यांनी देहाची आग राखली होती. बहुतेक मंडळी बंगाली, गुजरातीच दिसली मराठी तर

कुणीच दिसला नाही. शाळा-कॉलेजातील मुलींची रांग समोरच बसली होती. बहुतेक बंगाली वाटल्या त्यानी लाड्या बाह्याचे फ्रॉक्स् घातले होते. ज्या वयात त्यांनी किलबिलाट करीत, गप्पाटप्पा करीत, चेष्टामस्करी करीत सावकाशीनं जेवण फस्त करायच, त्या वयात त्या आजीबाईसारखा प्रत्येक घास हूं की चूं न करता बत्तीस वेळा चावून गिळत होत्या! त्यांचे कपडे अगदी परीटघडीचे होते. एकजात साऱ्या जणींचे केस रेशमी नि स्वच्छ होते. चेहऱ्यावर संतृप्तीचा भाव होता. पण बिनबाह्याचे फ्रॉक्स् पुरुष मंडळींसमोर घालून बसल्यावर देहाची स्वच्छता आपसुखच पाळावी लागते, हे मात्र त्याना उमगलेल नव्हत! जेवण झाल्यावर ज्याची त्याची ताटवाटी ज्यानं त्यान स्वच्छतागृहात विसळा-घासायला द्यावयाची. तिथं हाताचा स्पर्श न करता शास्त्रीय पद्धतीनं भांडी धुतली जातात. हे काम अर्थातच साधकापैकी काही जण करतात, पण आता ह्याचा बाऊ करायला नको, कारण सेवादलातील मुलं अनेक वर्षं हेच करीत आहेत.

दुपारी विश्रांती घेतली नि परत समुद्रकिनाऱ्यावरल्या प्रचंड क्रीडांगणावर आलो तिथं दररोज संध्याकाळी तासभर श्री माताजी टेनिसचे सेटस् हाणतात व ते कुणालाही पाहावयास मिळू शकते. मी गेलो, तेव्हा श्री माताजी नजर एकाग्र करून खेळण्यात रंगल्या होत्या. त्यांचे वय अंदाजे पाऊणशे असावे. त्या फ्रेंच आहेत. त्यांनी रेशमी लेहगा व त्यावर रेशमी खमीस पेहेनला होता. डोक्यावर शिखांसारखा पण सुबक फेटा होता. फेट्यावर लखलखणारा बिल्ला होता. चढत्या वयाच्या बोज्यान त्यांची काया रतिभरसुद्धा वाकली नव्हती. अगदी केवड्याच्या पात्यासारख्या ताठ उभ्या राहून खेळात त्या मग्न झाल्या होत्या. मात्र त्यांचा खेळ चाललेला नसून दोन तरुण त्याना खेळवीत होते, असच म्हटल पाहिजे कारण खेळात प्रतिस्पर्ध्याला चकवण्याची जी मजा असते, ती इथं नव्हती. प्रत्येक वेळेस चेंडू नेमका माताजींना सोईस्कर जाईल, अशा रीतीन त्यांच्या दिशेनच फेकला जाई! त्यामुळ त्याना उड्या माराव्या लागत नव्हत्या. मात्र त्यांनी हाणलेले टोले दणकट वाटले, त्यांच्या मनगटातली रग त्यांत स्पष्ट दिसत होती. पाऊण तास क्षणाचीही उसंत न घेता त्या खेळल्या आणि संपल्यावर कुणाशीही न बोलता कोर्टातून बाहेर पडल्या. एका मुलीनं त्यांच्या हातांतले मोजे काढून घेतले. दुसरीन त्याना टपोरं फूल दिलं. ते हुंगत त्या इकडेतिकडे न बघता झपझप बाहेर पडू लागल्या. डोळ्यात प्राण आणून त्याना बघत बसलेली चाहती मंडळी एकदम दुतर्फा हात जोडून उभी राहिली त्यांची मानवंदना सुहास्यवदनान स्वीकारीत दाराबाहेर उभ्या राहिलेल्या मोठ्या मोटारगाडीत त्या बसल्या.

वाटल, एक वेळ त्यांच्या हातातल ते फूल कोमेजेल, पण त्यांच्या चेहऱ्यावरल प्रसन्न हास्य कधीही कोमेजणार नाही! केवळ प्रसन्नताच नव्हे, तर त्यांच्या चेहऱ्यावर कनवाळूपणाचीही गडद छाया आहे. साधकाना त्यांचा आधार वाटत असावा! इतकं गोड हसण क्वचित कुणी पाहिल असेल!

मातार्जींचा खेळ संपल्यानंतर इतर साधकाचे विविध प्रकारचे खेळ सुरू झाले. कुणी फरीगदगा सुरू केला, कुणी दंड-बैठका मारल्या. तरुण मुलींनी बास्केट बॉल खेळावयास सुरवात केली. हा हां म्हणता खेळ रंगला, हास्यविनोदाला ऊत आला, किंचाळ्यानी तारसप्तक गाठलं. त्याचे कोवळे चेहरे घामान फुलून निघाले.

ही सारी मौज मी कट्टयावर बसून पाहत होतो.

डाव संपल्यानतर त्याच्याच खेळातली एक गुटगुटीत तरुण मुलगी त्या कट्टयावर आपल्या मैत्रिणींबरोबर येऊन बसली. ती बंगाली असावी, हे तिची फुगीर चेहरेपट्टीच सांगत होती. तिनं अर्धी पॅंट, अर्ध्या बाह्याचा शर्ट घातला होता. डोक्याला पाढरा सफेत फेटा होता. पायात कॅन्व्हासचे पाढरे बूट होते. देहयष्टीवरून यौवनाची साय कशी तवंग धरून वाहत होती! गोल गोल बंगाली शब्दाच्या गोळ्या गालात साठवत ती खदखदून हसत होती. तिचे दात दुधापेक्षाही शुभ्र होते. घामाळलेल्या कपाळावर कुंकुमतिलक चमचमत होता.

नमस्कार चमत्कारातच, ती भाबडी असावी, ' स्वीटटेंपर्ड ' असावी, हे उमगलं.

' अरविंदाबरोबर माझे वडील पॉंडीला आले. योगसाधनेत त्याची गती निश्चित झाल्यानतर अरविंदानी त्याना दूर राहण्यास सागितलं. आता ते व्यापारउदीम करतात व शुद्धाचरणी जीवन जगतात. मी लहानपणापासून प्रत्येक सुटीत इथं येते. मातार्जींची माझ्यावर अपार प्यार आहे. '

तिन धागे-दोरे पुरवले. सध्या ती कलकत्यास कॉलेजात इंटरमध्ये आहे

सकाळच्या अगडबंब जेवणाविषयी मी विचारलं, तेव्हा ती म्हणाली,

तुम्ही आयतोबासारखे पाटावरून ताटावर करता, म्हणून तुम्हाला तसं वाटतं. पण आम्ही इथ दिवसभर खेळतो, शेर शेर घाम गाळतो. त्यामुळ आमच्या पोटात नुसती आग पडते. मला तर, बाई, भीती वाटते. आय् बिल बिकम् मॅन-ईटर बन डे!'

( होय मुली, तू जे भाबडेपणान म्हणत्येस, ते एका वेगळ्या अर्थान खर होणार आहे, बर!)

' इतक खेळल्यावर मटण वगैरे रगडतेस, की नाही ? ' मी खोचून विचारल.

' छे, रे, बाबा! माताजी आम्हाला लोटा लोटा दूध देतात नि अंडी देताल. तेच खर ताकदवान नाही का ? ' तिनं सागून टाकलं, नि ताबडतोब पुस्ती जोडली, ' उघड्या हवेत पुरुषाच्या बाजूलाच खेळल, की आपोआप शरीर पिळदार होत नि मन स्वच्छ होत. '

' बायकाचे काही वेगळे खेळ आहेत का ? '

' हट्! काय कारण आहे ? मी तर सगळे खेळ पुरुषामध्ये त्यांच्या बरोबरीनं खेळते! कुस्तीसुद्धा!'

आता काय बोलणार ?

पुन्हा तिनच वाक्य साधून घेतली,

' बरं का, पण आमच्या मनात मुळी पाप-विचारच येत नाहीत!'

आपल्या मनात खरोखरीच जर कधी पापविचार डोकावत नसतील, तर त्याविषयी

असं खास करून सांगण्याची गरजच भासणार नाही! पण ती तशी अल्लडन्त होती नि पापपुण्याच्या पारंपरिक कल्पनापलीकडे ती पाहावयास शिकलेली नसणार, हे उघड होत.

'बरं आहे, बुवा, तुझं! म्हणजे लग्नाच्या जंजाळातून तरी सुटलीस म्हणायची!'

तसंच काही नाही. मी बी. ए. झाले, की लग्न करून टाकीन!'

'पण मग तुला हे आश्रमीय उन्नत जिणं जगता येणार नाही!'

'काही तरीच! मी अवश्य इथं येत राहीन.'

'असं म्हणावं लागत!'

'माझ्या मनाची पूर्ण तयारी झाली आहे!'

'हे इथले कपडे घालून कलकत्त्यात फिरण्याइतकी तरी तुझी हिंमत आहे का?'

'इरेस पेटले, तर जरूर घालीन.'

मी कलकत्ता पाहिलेलं नाही. पण पुरुष पाहिलेले आहेत! आमच्या कांदेवाडीत जर कुणी अशी अर्धी चड्डी घालून रस्त्यावर उतरली, तर तिची टर उडेल!' माझ्यातल्या पुरुषानं उत्स्फूर्त भाष्य केलं!

'वा! अहो, कलकत्त्यातही तेच! The boys will see that the dame returns to her home early! तिनं सातमजली हास्य करीत कबुलीजबाब दिला. तिचं आडपडदा न ठेवता झऱ्यासारखं खळखळत हसत चालणारं संभाषण मला फार आवडलं.

आम्ही ज्या कठड्यावर बसलो होतो, त्याच्या खाली दहा फुटावर वाळू होती. त्या दोन मैत्रिणींत उंचावरून खाली उड्या मारण्याच्या पैजा लागल्या. ती गुटगुटीत मुलगी ताडकन् उभी राहिली. पण उडी मारायला तिचं मन धजेना. जागच्या जागेवर बेचैनीनं हातपाय आपटत ती हसू लागली, किंचाळू लागली, डुलू लागली. आणि मग डोळ्यांचं पातं लवत, न लवत, तोपर्यंत ती दणकन् खाली वाळूत आदळली! आणि मग हास्याचं उंच कारंजं तिच्या त्या निरागस चेहऱ्याभोवती लखलखलं. वाळू झाडीत ती उठली नि त्या समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छंदीपणे नुसती फों फों धावत सुटली! पाखरासारखी गिरक्या घेऊ लागली.

तिन्हीसांजा झाकोळल्या. वाळू गारठली. अफाट सागर हिरवा झाला. हे सागराचं रूप फारच न्यारं आहे. क्षितिजाच्या रजतरंगी शिंपल्यात चमचमणाऱ्या सूर्याला सामोरा जाणारा पहाटेचा केशरी समुद्र, दुपारच्या उन्हात निळाई मिसळणारा निळा समुद्र नि संध्याकाळी हिरवा चुडा भरणारा हा हिरवा समुद्र–सागराची ही विविध रूपं डोळ्यांनी कोरून घेतली. क्रीडांगणावरली साधक नि चाहती मंडळी माताजींच्या कृपाप्रसादासाठी निघून गेली. सगळीकडे कसं शांत शांत झालं.

लांबच लांब कठड्यावर मी एकटाच होतो नि श्री अरविंदांनी साधनेसाठी नेमकं हेच स्थळ हुडकून काढलं, ह्याबद्दल कौतुक करीत होतो. मात्र सर्वसाधारण जनतेची जी समजूत आहे, की अरविंदांनी हे निवांत ठिकाण केवळ कार्यकर्त्यांचा ससेमिरा चुकविण्या-

साठी शोधून काढलं, ते चूक आहे. भारतातून परागंदा झालेल्या अनेक क्रांतिकारकांनी अरविंदांच्या अगोदरच पाँडीत आश्रय घेतलेला होता. राष्ट्रकवी सुब्रह्मण्यम् भारती, श्रीनिवासाचारी, श्रीकृष्णाचारी, वगैरे देशभक्त इथच आसऱ्याला होते. त्यानी आरभीच्या काळात अरविंदाना खूप मदत केल्याचा इतिहास आहे. मात्र अरविंदानी इथं फक्त साधनेचाच ध्यास घेतला. आणि ते साहजिकच आहे. जो हाडाचा कवी आहे, जो पंचेंद्रियानी रसगंध लुटतो, ज्याच मन पाण्याच्या पृष्ठभागासारखं संवेदनाक्षम आहे, तो ह्या रसरगगधाच्या साम्राज्यात अंतर्मुख होणारच. कुणाच्याही मनाच पीस व्हावं नि ते वाऱ्याबरोबर भुरूभुरू उडून जावं, अस इथल वातावरण आहे.

हळूहळू काळोखाचा पापुद्रा तवंग धरू लागला. मन शात झालं. इतक्यात समोरच्या त्या नीरव रस्त्यावरून एक तामिळी रिक्षावाला धापा टाकीत धावताना दिसला नि मग मनाची शातता कुठच्या कुठं पळून गेली मन सुन्न झाल. मानवी आत्म्याच्या विमुक्तीचा विराट प्रयोग ज्या जादुई नगरीत अहर्निश चालू आहे, तिच्या तटाला लागूनच पोटाची वीतभर खळगी भरण्यासाठी, निदान पशुतुल्य जीवन तरी कंठता यावं, म्हणून, अष्टौप्रहार धडपडही चालू आहे. मात्र एकाची दाद दुसऱ्याला नाही !

♣ ♣ ♣

# सोलकढीचे गाव : मालवण

✤ ✤ ✤

ज्याला शहरी गोंगाट विसरायचा आहे, शहरी महत्त्वाकांक्षाचं निरर्थक ओझं उतरून ठेवायचं आहे, दोन दिवस लटपटी–खटपटीमुक्त अशा निरामय समाधानात घालवायचे आहेत, त्यानं थेट मालवण बंदरातच वसतीसाठी उतरलं पाहिजे. नजर टाकावी, तिथं हिरवीगार वनश्री, अष्टौप्रहर गर्जत फेसाळणारा अफाट, अकाळविकाळ दर्या; आणि निळंभोर आभाळ साथीला. मालवणात चौथी वस्तू नाही. माझी खातरजमा झालेली आहे.

वास्तविक पाहता हे तालुक्याचं ठळक ठिकाण. म्हणजे माणसाची ये–जा किती असेल? घवघवीत बाजारपेठेच्या नावतीत मालवण कुडाळ–सावंतवाडीशी टक्कर देऊ शकत. त्या निमित्तानं सुद्धा मालवणात पै–पाहुणे रग्गड उतरतात. तेव्हा इथं चार–दोन चांगली लॉजेस् झोकात चालवायला एरव्ही मरण नसावं. प्रत्यक्षात मात्र प्रवासी सोयींच्या नावानं मालवणात ठणाणाच आहे. एक सरकारी डाकबंगला आहे. पण गावापासून तो आडनाड दूर आहे. शिवाय हल्ली सरकारचे फिरते ऑफिसर इतके बोकाळले आहेत, की त्या बंगल्यातल्या सुसज्ज खोल्या कुणाच्या वाट्याला निर्वेध म्हणून कशा त्या येतच नाहीत. मी चौकशी केली. उत्तर मिळाल,

'तुम्हाला आरसेमहाल हवा काय?'

'आरसेमहाल नको. सरकारी डाकबंगला हवा.'

'सरकारी डाकबंगल्यालाच इकडचे लोक आरसेमहाल म्हणतात. पण तो शहराच्या

अगदी एका टोकाला आहे. दोन-तीन मैल तोडावे लागतील नि साधा कपभर चहा लागला, तरी तीन रुपयाची टॅक्सी करून वर गावात चक्कर मारावी लागेल. इतकं एकोशी राहून काय मिळणार ? त्यापेक्षा गावातच समुद्रावर म्युनिसिपाल्टीचा प्रवासी बंगला आहे, तिथं जागा आहे काय, बघा. गावातच असल्यामुळं सगळया सोयी तिथं उपलब्ध होतील. गावातल्या खानावळी तुमच्या लायकीच्या नाहीत. सगळ्या कंट्री आहेत.'

हो-ना करता करता नगरपालिकेच्या विश्रांतिगृहात सुदैवानं बिस्तारा पसरण्यापुरती जागा मिळाली. ऐन पुळणीवर प्रवाशासाठी बांधलेलं हे ऐसपैस विश्रांतिधाम सर्व सोयींनी युक्त आहे. बंगला बंदरावर जवळ जवळ वाळूतच आहे. खिडकीतून हात बाहेर काढून लवंडल, तर मुठीतून किनाऱ्यावरली बचकभर वाळू उचलता येईल. खिडक्यातून सतत हेलावणारं समुद्राचं पाणी दिसत. होड्या दिसतात. आणि दूर अंतरावर सिंधुदुर्गाचे अजस्र काळे तट कराल लाटांशी सामना करीत उभे राहिलेले दिसतात. महाराजांनी बांधलेला पाणकोट सिंधुदुर्ग एका परीनं मालवण गावाचं कुंकूच बाटला. मालवणातून उतरलेला प्रत्येक पासिंजर सिंधुदुर्गाचीच उठाठेव करतो.

सूर्यास्त आणि चंद्रोदय बघावेत, तर खास मालवणातच. वाळूत हातपाय पसरून सैलसर बसायचं आणि समोरची रंगमिश्रणं पोटभर पाहायची. मावळतीचं आभाळ संध्याछाया बमून झाकोळून येतं कडा लालसर होतात. लालबुंद सूर्यगोल उतरत उतरत पाण्याचा मुका घेतो. काही क्षणाच मधुर मीलन होत. मग पाण्याला बिलगलेला सूर्य विरघळून जातो. अथांग पाण्यावर फक्त काळपट शेंदरी छटा लहरतात. काळोखाचा प्रचंड पक्षी हळूहळू पंख विस्फारतो. आभाळाच्या त्या दाट निळाईवर नंतर हलकेच चांदण्याचा शिडकावा होऊ लागतो. ही किमया कशी काय झाली, म्हणून तुम्ही मागे वळून पाहता, तेव्हा माडापोफळींच्या गर्द बागाआडून चंदेरी चंद्रबिंब सरसर वर येताना दिसत. डोळ्यासमोर जादू होते. सूर्यास्ताचे क्षीण किरण केव्हाच निमालेले असतात तिथं आता चांदण्याची मऊगार पिसं तरंगत असतात चंद्रकोरीच्या आकाराचा सागरकिनारा निर्मनुष्य होतो मागं गावात दिवेलागण झालेली असते आणि झाडीकडे झेपावत, चाललेले पक्षी तुम्हाला सांगतात,

'महाराज, उठा, निघायची वेळ झाली.'

संध्याकाळी बंदरपट्टीला अगदी बकाल स्वरूप आलेल होत. मुलींचे बोळके बटबटीत फॅशन्स् करून फिरायला आले होते. 'आम्ही खेडवळ नाही. शहरी मुलींच्या खांद्याला खांदा लावू शकतो. पाहा आमचे लेटेस्ट पोशाख नि आमच्या पावडरी, आम्हाला फक्त अजून चान्स मिळालेला नाही,' हा त्यांचा चाललेला मूक आक्रोश शहरी प्रवाशाच्या संवेदनावर आदळतोय्.

ह्या तरण्याताठ्या उमेदवार मुलींच्या नजरा मुंबईतल्या त्यांच्या उद्याच्या संभाव्य

संसारांकडे लागलेल्या आहेत, हे उघडच आहे. ह्या अविवाहित, तरतरीत मुली म्हणजे मालवणची फ्लोटिंग पॉप्युलेशन. ह्या आज इथं किनाऱ्यावर झुलताहेत. उद्या इथं नसतील. नसायलाच हव्यात, कारण ह्यांच्या धाकट्या बहिणीसुद्धा आणखी चार दिवसांनी असेच घोळके करून इथाच वाळूवर रमत गमत, शहरी संसाराची स्वप्न फुलवीत फुलवीत हिंडणार आहेत. मोठ्या बहिणींनी धाकट्या बहिणींना वास्तविक जागा मोकळी करून दिली पाहिजे, पण तसं घडणार आहे काय ? ह्या इतक्या मोठ्या संख्येतल्या मालवणी चेडवांचा प्रश्न क्षणभर तरी जीव व्याकूळ करतो. ह्यांच्यातल्या सुमार रूपाच्या बहुसंख्य मुलींना एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यातच वाहवत जावं लागणार, त्यांच्या मोहक स्वप्नांचा भुगा होणार. तस न होवो.

कोकणी मुलींचं अटळ भवितव्य आणि कोकणातल्या तरुणांचं उद्याचं जीवन ह्यात फारसा फरक नाहीं. राजेश खन्नासारखे केस वाढवलेली खूप तरुण मुलं बंदरावर पँटी घालून फिरायला आलेली दिसली ह्यातल्या प्रत्येकाची इच्छा मुंबईत स्टेट बँकेत नाहीतर सचिवालयात चिकटण्याचीच असणार. प्रत्यक्षात मात्र ह्यांच्यातली काही अभागी मुलं डोंगरापल्किडल्या प्रभानवल्लीच्या शाळेत नको ते अटळ पंतोजीपण करतील; निवतीच्या खडकावर बंदरकारकुनी करतील, आणि त्यातल्या त्यात नशिबाकडून शिकंदर पोरं कुडाळच्या कारखान्यात कुदळी-फावड्यांचे हिशेब टिपतील. उरलेले पोस्टमेन होतील, एस्. टी. चे कंडक्टर होतील. किंवा तलाठी होतील, खुद्द मालवणातच मांडी मारून बसणारे किती निघतील, देव जाणे. आणि बसणार तरी कशाच्या आधारावर ? काय खाणार ! अस्थिर भवितव्याचे ते एकाच मूक माळेचे बळी आहेत.

संध्याकाळी धक्क्यावर कोचरेकर नावाच्या तरुणाबरोबर गप्पा मारल्या. बंदरातले यांत्रिक मचवे पाहून विचारलं,

‘ ह्या सगळ्या मच्छीमारीच्या होड्या, की इथं स्मगलिंगही चालतं ?’

‘ स्मगलिंग म्हणतात ना, ते करायला जबरदस्त छाती लागते नि पाटीशी भक्कम माणसं असावी लागतात. आमच्या मालवण्याचं ते काम नाही. स्मगलिंगवाले एक तर वरती गोवा बॉर्डरवर, नाहीतर खाली मुरूड, जंजिरा, श्रीवर्धनकडे. बाणकोट ते वेंगुर्ला हा सरळ लोकांचा टापू आहे. खाणही पाहा किती साधं आहे ! फणसाची, नाहीतर वालाच्या शेंगाची भाजी. कुळथाची पिठी, बांगड्याचं तिरफळं घातलेलं सुकं नि सोलाची कढी ! गुळाचा लाडा खाणं, म्हणजे चैन ! तेच जंजिरवाले बघा ! मस्तपैकी आख्खा बोकड कापणार; त्याची मोगलाई मसाले वाटून झमझमीत सागुती करणार; कबाब करणार नि फॉरिन लिकर पिणार ! आमचे सगळे लोक कंट्रीवाले ! मालवण्याना वाली नाही, हो.’

‘ पूर्वी पोलिसांत सगळे मालवणीच असायचे. ’

‘ कारण ब्रिटिशाना डोकेबाज माणसं लागायची. आता तशी गरजच उरलेली नाही. मालवणी माणूस पाताळात जाऊन गुन्हेगार पकडायचा. आता अशी माणसं चालतील ?

आणि आता पोलिसी लायनीच कुणाला आकर्षणही उरलेलं नाही.'

मग आता इथल्या तरुणाना आकर्षण कसलं आहे ?'

'पिक्चरसंच. तुमच्या मुंबईत तिकडे नवा सिनेमा लागायच्या अगोदर इथल्या पोराना त्याची स्टोरी माहीत झालेली असते.'

'आश्चर्यच आहे, बुवा !'

'ही सगळी तुमच्या 'विविध भारती' ची कृपा !'

'पण पोटापाण्याच काय ?' मी विचारलं.

'त्याची चिंता देवाला !'

असा प्रकार आहे.

आजच्या मालवणात तस पाहण्यासारखं काहीही नाही. काळ बदलला. पण हे गाव बदललेलं नाही. म्हणजे, ह्या धुळकट गावाची रचना इंचभरसुद्धा बदललेली नाही. निम्मी घरं तर, म्हणे, मुंबईहून येणाऱ्या मनिऑर्डरींवर चाललेली आहेत. अवघी एकच एक रबराच्या नळीसारखी लांबच लांब सडक आहे आणि दिवसभर तिच्यावरून बसेस्, जिपा, लॉऱ्या सारख्या वाहत असतात. येणाऱ्याही बसेस् भरभरून येतात नि जाणाऱ्याही भरभरून जातात. मालवणात रोजच्या रोज हे इतके कोण लोक येतात ? मालवणातून रोजच्या रोज हे इतके कोण लोक जातात ? कुठ जातात ? डोकं चक्रावून जात. मालवणातून जिवाचा हिय्या करून जे लोक बाहेर पडले, त्यानी मोठं नाव कमावल. टोपीवाले देसाई घ्या, सर रामकृष्णपर्यंत भांडारकर घ्या, दामुअण्णा मालवणकर घ्या, आर्टिस्ट मुरलीधर आचरेकर घ्या किंवा डॉक्टर श्रीधर आजगावकर आणि डॉक्टर सदानंद पुणेकर घ्या. लेखक मंडळींत तर मालवणकर मंडळींचा स्वतंत्र आणि नामवंत गोट आहे. थेट अनंत काणेकरापासून आ. ना. पेडणेकरापर्यंत आणि अ. सी. केळुसकरापासून गिरणगावातल्या वसंत दुदवडकरासकट एकूण एक नाटककार पक्के मालवण्येच आहेत. मराठी बालवाङ्मयाच्या क्षेत्रातली पां. ना मिसाळ ह्या मालवणी संपादकाची सेवा विसरता येईल ? आणि हीरारत्न वसंत लाडोबा म्हापणकर ह्यानी मराठी साप्ताहिकाचा वाचकवर्ग सतत वाढीला लावण्यास काहीच्या काही हातभार लावला, हे अपरिवर्तनीय सत्य आहे !

बंदरावरून वाटतं, दर्यात दूर दिसणारा सिंधुदुर्ग अगदी हाकेच्या अंतरावर असावा, इतका जवळ आहे. आठ-बारा आणे हातावर टेकवले, तर नाखवा खुशीन किल्ला दाखवून आणील. प्रत्यक्ष परिस्थिती आटोकाट वेगळी आहे. होडीवाल्याचे दर सरकारनच बांधून दिलेले आहेत. माझ्याकडून माणशी सात रुपये वाजवून घेतले. मचव्यात आम्ही दहाजण होतो. आम्ही सामायिक सत्तर रुपये मोजले. बंदरावरल्या वाळूत चर्चा करताना दर अव्वाच्या सव्वा वाटले. प्रक्षुब्ध सागरातल्या प्रत्यक्ष प्रवासात वल्हेकऱ्याच्या जिवाचा जो आटापिटा चालला होता, त्यावरून खात्री पटली, की हे काम येरा गबाळ्याचे नोहे. सुकाणूवाला

म्हणाला,

' सगळा दर्या पावलापावलाला खडकानी भरलेला आहे. जरा नजर चुकली, की खडकावर आपटून होडी बुडालीच, म्हणून समजा ! '

ते खर होतं, कारण बंदरापासून समुद्रातल्या सिंधुदुर्गापर्यंतचा उफाळलेला जलमार्ग सर्पाकृती, वळणावळणांचा होता. नावेची दिशा बदलली, की प्रचंड लाटांच पाणी झपकन् आत येई. कपडे भिजत, तडाखे मारणाऱ्या उंच लाटा उग्र दिसल्या. पाण्याचा रंगही बंदरावरल्या करड्या मातकट पाण्यापेक्षा वेगळा, निळाभोर, तलम, पारदर्शक वाटला. नाखवाला विचारल, तर तो ऐटीत म्हणाला,

' मंग ? हा काय मालवणचा समुद्र नाय. हा अरेबियन सी हाय. ओषन सी हाय. आपुन आसाच समोर गेलो, तर अरेबियाला पोचू ! एडनला पोचू ! '

सिंधुदुर्ग ही खास शिवाजीराजाची निर्मिती. स्वराज्यातल्या कोकणी मुलुखाच्या सुरक्षिततेवर जागरूक गस्त घालण्यासाठी म्हणून हे आरमारी केंद्र राजानी त्या काळातले सोन्याचे एक कोटी होन खर्चून, तीन हजार कसबी कामगाराना सतत तीन वर्षं कामाला जुंपून पुरं करून घेतल.

भर समुद्रावर कुरटे नावाचं खळगट बेट आहे, त्या बेटावर पायात शिसं ओतून किल्ल्याचे चिरे बसवले आहेत. हा बावन्न बुरुजी गड भक्कम आहे, किल्ल्यात भातशेती आहे. नारळाच्या बागा आहेत. महाराजाच्या मुलानं, म्हणजेच छत्रपती राजारामान बांधलेलं खुद्द शिवाजी महाराजाच स्मृतिमंदिर आहे. बांधकाम म्हणजे नमुना आहे. देवळात शिवाजीराजाची पाषाणाची मूर्ती आहे मूर्तीतले हाडापेराने मजबूत असणारे उग्र चर्येचे महाराज भांडायला बसल्याप्रमाणे मांडी फाकवून, दोन पायावर दोन हात ठेवून बसलेले आहेत. गळ्यात अलंकाराच्या माळा आहेत. पायांत तोडे आहेत. मूर्तीत मात्र ते शिवाजीराजे बिलकूल वाटत नाहीत. पुराणातले गुटगुटीत देव वाटतात.

गडावर दोन अपूर्व चिजा आहेत, एका घुमटीत शिवाजीमहाराजांच्या डाव्या पावलाचा चुन्यात उमटलेला स्पष्ट ठसा आहे. हे पाऊल अमानवी, फारच मोठे वाटते. काहीतरी गडबड आहे. दुसऱ्या घुमटीत त्याच्या उजव्या हाताच्या पंज्याचा ठसा आहे. डोळे फाड-फाडून पाहिल, तरी तो धड दिसतच नाही. जवळजवळ नष्टच झाला आहे.

बाकी गडावर सर्व काही भुईसपाट झालं आहे. फक्त चार-दोन किरकोळ देवळं तेवढी आहेत. मधुर पाण्याच्या विहिरी आहेत. पंधरा-वीस शेतकरी कुटुंबाची कायमची वसती आहे. एका वसतीकराला विचारल,

' तुम्ही संसाराच सामान कुठून आणता ? '

' मालवणातून. '

'अशा खेपा टाकणं तुम्हाला परवडतं ?'

'कसं परवडणार ? पण सोय केलीच पाहिजे. कांदे लागतात, मिरच्या लागतात, राशन लागतं, तेलतूप लागतं. सगळं आम्ही मालवणात खेप टाकून आणतो.'

'पण सात सात रुपये खेपेचं भाडं तुम्हाला परवडतं ?'

'ते भाडं आम्हाला लागू नाही. आमची वेगळी सोय आहे.'

'तुम्हांला पत्रं कशी मिळतात ?'

'आठवड्यातून एक दिवस पोस्टमन येतो'

'पावसाळ्यात काय करता ? पावसाळ्यात दर्या कसा ओलांडता ?'

'पाऊस सुरू झाला, की आमचं मरण ओढवतं. दर्याला तुफान असतं. आम्ही अलग पडतो इथं शेती करतो, जिनसाची बेगमी करून ठेवतो.'

'समजा, कुणी तरी अचानक आजारी झाला ऐन पावसाळ्यात, तर मग ?'

'मग मरणार !'

'पावसाळ्यातलं सोडा, पण एरव्ही कुणी आजारी पडला, तर डॉक्टर इकडं येतात ?'

'छे ! आम्हीच माणसाला पडावात घालून गावात डॉक्टराकडे नेतो, सुई टोचतो नि परत आणतो.'

'इतका त्रास करून इथं किल्ल्यात का राहता ?'

'आमच्या वाडवडलांची भूमी आहे ना ही ! शिवाजीराजाच्या वेळेपासून वहिवाट आहे आमची भूमी आम्ही सोडायची ? नाही, नाही. देव आम्हाला ह्या किल्ल्यातच पोटासाठी देणार, बोलीच आहे तशी.'

संध्याकाळी परतलो. मासळी घेऊन परतलेल्या मच्छीमारीच्या होड्या बंदरात नांगरून पडलेल्या होत्या. त्यांनी आणलेला ताजा तडफडीत माल टोपल्या भरभरून पुळणीवर ठेवलेला होता. सगळी टपोरी जाडी कोळंबी होती. पैसे मोजूनसुद्धा इतकी तेजाळ मासळी मुंबईत दृष्टीला पडणार नाही. बंदरावरल्या एका मालवणकराला म्हटलं,

'लयलूट आहे, बुवा, तुम्हा मंडळींची ! इतकी सुंदर कोळंबी तुम्हाला मिळते ! आमच्या नशिबी बर्फातली गारगार मच्छी लिहिल्याय्.'

'विसरा, महाराज !' तो म्हणाला, 'ह्यातली एकही कोळंबी इथल्या लोकांच्या तोंडी पडायची नाही. हा सगळा माल कारखान्यात जातो. तिथं डबे तयार करतात नि अमेरिकेला पाठवतात. नाव मालवणची मासळी नि धन होत्याय् कारखानदारांची.'

'मग तुम्हाला मासे कुठचे मिळतात ?'

'उत्तम माल कारखानेवाले घेतात. उरला-सुरला गाळ आम्हांला सवाई-दिढीन देतात. गरिबाचा वाली आहे कोण इथं ? ह्या बंदरात मी रुपयाला पाऊणशे बांगडे घेतल्यायत एके काळी. तोच मी आता रुपयाला चार बांगडे मिळाले, तर देवाची कृपा

म्हणतो. कशासाठी मालवणाचं नाव घ्यायचं? कशासाठी इथं राहायचं? कारखानेवाल्याची धन झालेली बघायसाठी? त्यापेक्षा मुंबई परवडली! तिथं निदान माल मिळतो तरी. इथं पैसेही नाहीत नि मालही नाही. येऊन जाऊन हा दर्या बघायचा! तो काय चाटायचाय्?'

खर आहे मालवणात ज्याला ज्याला म्हणून भेटलो, तो इथल्या ओढघस्त कोकणी वसतीवर परमावधीचा नाराज दिसला. प्रत्येकाला दोन्ही पाय मुंबईत हवे आहेत आणि मुंबईत ज्या ज्या म्हणून मालवणकराला भेटावं, त्याचं अवघं चित्त एकवटलेलं असतं मालवणच्या बंदरातल्या ताज्या मासळीवर आणि लालेलाल सोलकढीवर! अजिंक्याच्या सिद्दीच्या छाताडावर पाय देण्यासाठी महाराजांनी सिंधुदुर्ग बांधला, तो आपला राष्ट्रीय ऐवज आहे, तो डोळे भरून पाहिला पाहिजे, वगैरे फुकाच्या गोष्टी कुणाच्या खिजगणतीतही नाहीत, त्या फक्त क्रमिक पुस्तकात पानं अडवून विराजमान झाल्या आहेत. अधूनमधून मुलं आणि त्यांचे मास्तर त्या वाचतात. मुलांच्या आया मुलांच्या बडलांना सांगतात, 'आपण कधी तरी सिंधुदुर्गाला ट्रिप काढू या.' मुलांचे बाप हो—हो करतात. नंतर सामसूम होते.

♣ ♣ ♣

# गोमंतकाची चकधून

❧ ❧ ❧

स्तब्ध रानातल्या तळ्यात कमळ उमलावं, तसं जलवेष्टित पणजी गाव कोणे एके काळी कोवळीक पांघरून प्रकाशाला सामोरं जायचं. गर्दीगोंधळाचा शाप पणजीला कधीच बाधला नव्हता. गोंगाटाचं नाव नव्हतं. दोन बाजूंना वाहत्या नद्यांचे दोन फाळ, एका अंगाला निरंकुश सिंधुसागर, दुसऱ्या अंगाला देवाच्या वस्तीचे डोंगर आणि मधोमध विरळ वस्तीच्या राजधानीचा शांत चौथरा, असा पणजीचा भूगोल आहे

पूर्वी पणजीत रहदारी अगदी तुरळक होती. रस्त्यावर माणसांऐवजी फक्त झाडांच्या सावल्या पडलेल्या असत आणि फणसाच्या फांद्यावरले गरूडसुद्धा गप्प गप्प असत. पण बाळाला जत्रेत दृष्ट लागावी नि त्याची झोप उडावी, तसं आता पणजीचं झालं आहे. पणजीचं ते तृप्त, बाळबोध रूप गेल्या पंधरा-वीस वर्षांच्या नाहक लठ्ठालठ्ठीत लुप्त झालं. आता बंदराच्या परिसरात काजूविक्र्यांचे, चटईविक्र्यांचे, पानतंबाखूवाल्यांचे गावठी स्टॉल्स् उभे राहिले आहेत. अर्थात, तेवढ्यामुळं काही रूपाला बाट लागत नाही. राजधानीचं शहर नदीतल्या वनस्पतीसारखं तरारत जाणारच. पण कंट्री स्टॉल्स्च्या आडोशाला ओरबाडलेली, संसार मांडून बसलेली तिथली फेरीवाली माणसं गचाळ आहेत. भणंग आहेत हाडकुळ्या हमालांचे हमरीतुमरीवर येणारे कळप कर्कश आहेत. त्यांची भकास चेहरेपट्टी, त्यांचे तांबारलेले रुद्र डोळे. त्यांचे रागीट स्वर सांगतात, ही माणसं स्थानिक नाहीत. स्थानिक माणसापाशी असते, ती भावनिक तृप्ती ह्या नव्या लोंढ्यापाशी औषधालासुद्धा नाही. भुकेच्या राक्षसानं ह्या उपऱ्या मंडळींचा भरधाव पाठलाग केला.

ते इथं पोहोचले, इतकंच. पण हा झाला वाटेवरचा मधला मुक्काम. इथूनही त्याना धावत पळत दुसरीकडं अन्नाचा शोध घेत जायचंच आहे. एक गोष्ट मात्र उघड आहे. ह्या मंडळींनी स्थानिक गोवेकर विक्रेत्याना आणि मजुरांना रेटत रेटत पार पिछाडीला नेलं आहे.

ह्या सर्व विपरीताचा आपल्याला नकळत त्रास होतो. आगापीछा नसलेल्या अशा उद्ध्वस्त बेकारांचा अन्नाच्या भ्रांतीत वणवणणारा नवा निराश वर्ग आता आपल्या सगळ्यात देशपातळीवर निर्माण झाला आहे. ही बेघर माणसं वरकरणी वाटतात मवाली, पण ते मवाली नाहीत. ते नुसते अन्नाला महाग होत चाललेले हताश त्रस्त जीव आहेत. दक्षिणेकडल्या कुठल्या तरी प्रस्थापित समाजानं त्यांना नाहक पिटाळून लावलेलं आहे. ते हरिजन किंवा खिस्ती हरिजन असावेत. समाजातला एक मोठा आपमतलबी वर्ग सुरक्षित कौटुंबिक जीवन चवीनं जगतो आणि आपल्या वळकट्या झाडांच्या फांद्यावर ठेवून दुसरा अपेशी वर्ग वर्षानुवर्षं रस्त्यावर एकटा-एकटा जगतो. हे क्रूर वास्तव आता फार दिवस चालण्यासारखं नाही. हे गळू आज ना उद्या फुटणारच, ही दगडावरची रेघ.

पणजीत तीन दिवस वस्ती केली. गेलो, तिथं पोर्तुगीझांच्या पूर्वीच्या शांत, सुरळीत राज्यकारभाराबद्दल उमाळ्याचेच शब्द ऐकू आले. एका जुन्या पिढीतल्या सुखवस्तू कुटुंबप्रमुखाला मी म्हटलं,

पोर्तुगीझानी गोवेकराच्या भवितव्याच्या घडणीत इण्टरेस्ट घेतला नाही. ते नुसती लॉ ॲण्ड ऑर्डर पाळत राहिले. पण तेवढ्यानं काय होणार? गोव्याला त्यानी शाळा-कॉलेज काढली? हॉस्पिटल काढली? कारखाने काढले?'

त्यानी तत्काळ उत्तर दिलं,

'कशाला शाळा-कॉलेजं काढायची? कुणाला हवी होती ती? गोव्याच्या आजूबाजूला शाळाच शाळा होत्या की! पुण्याला होत्या. बेळगावात होत्या. धारवाडात होत्या. आमची मुलं तिथं जाऊन शिकली. कारखाने अरुण ही गोव्यात कुणाचीच गरज नव्हती. गोवेकर हा मुदलात फार साधा माणूस आहे. त्याला कारखाने वगैरे नकोत. फक्त मासळीभात नि सोलकढी तेवढी हवी आणि शांतादुर्गेच्या कृपेनं गोव्यात अन्नाला कुणालाच कमी पडलेलं नाही.'

'मग इतके गोवेकर मुंबईत का आले? अन्नासाठीच ना?'

'त्याचं असं आहे, मुंबई ही आम्ही परक्यांची, असं कधी मानलेलंच नाही. गोवं काय नि मुंबई काय, एकच. गोवेकरानं मुंबईला नोकरीला जाणं ही स्वयंपाकाच्या खोलीतनं झोपाळ्याच्या खोलीत वावरण्यासारखी घरगुतीच गोष्ट आहे. पणजी आणि मुंबई ह्यांत आम्ही गोवेकर फरक करीतच नाही.'

मुंबईची अभिन्नजीव असलेल्या पणजीत पाच पावलं चालायचं म्हटलं, तरी पैसा

हवा. उठता पैसा, बसता पैसा, अशी घोर स्थिती गोव्यात सध्या विद्यमान आहे इतक्या महागड्या जमान्यात समाजाची कामं पोटं बांधून करणारे कुणी व्रतस्थ असतील किंवा यापुढं होतील, असं सुतराम् वाटत नाही. कदाचित काळाची ती गरजही नसेल. ब्रिटिशाच्या जमान्यात हिंदुस्थानी क्रांतिकारकांनी फ्रेंचाच्या वसाहतीत आश्रय घेतला होता. कुणी चंद्रपुरात, कुणी पाँडिचेरीत, काहीजण नेपाळातही दडले. पण पोर्तुगीझाच्या मुलुखात कुणा क्रांतिकारकानं आश्रय घेतल्याचं निदान आठवत तरी नाही. फक्त चोरटे व्यापारी आणि दिवाळं फुंकलेले सोदेच तेवढे गोव्यात सटकत. नाही म्हणायला ऐंशी वर्षांपूर्वी स्वामी विवेकानंद पणजीत चांगला दोन महिने तळ ठोकून होते. गोव्यातून पोर्तुगीझ पासपोर्ट मिळव आणि तिथून परस्पर अमेरिकेला छू कर, असा कानमंत्र लोकमान्यांनी स्वामीजींना दिला होता. पण स्वामीजींना नाट लागला. खुद्द गोव्यातल्या नि शेजारच्या वेंगुर्ल्यांच्या देवळात चार भजनं म्हणण्यापलीकडे स्वामीजींच्या पदरात काही पडलं नाही. ह्याच सुन्न मांडवी-तीरावर त्यांनी हताश शतपावल्या घातल्या असतील. त्यावेळच्या निद्रिस्त पणजीत विवेकानंद कुणाकुणाला भेटले असतील ? तेव्हाच्या पणजीत खरं तर फटफटलसुद्धा नव्हतं. 'गोवा हिंदु पुस्तकालय' हे पणजीत एकुलतं एक सार्वजनिक वाचनालय होतं. 'वेंप्याची शाळा' ही एकमेव मराठी शाळा होती. 'हितचिंतक प्रेस' नावाचा एकमेव मराठी छापखाना होता व त्यातून 'हितचिंतक' नावाचं एकुलतं एक मराठी वर्तमानपत्र निघत असे. तेव्हाच्या पणजीतलं मराठी सांस्कृतिक जग हे इतकं चिमुकलं होतं. सांस्कृतिक प्रबोधनाच्या स्वप्नानं झपाटलेल्या विवेकानंदांना तेच तेवढं चिमुकलं जग दिसलं असणार.

आता काळानं कुशीपालट केला आहे. पणजीतल्या मराठी विश्वाच्या कक्षा आता चांगल्याच रुंदावल्या आहेत. मात्र गोव्यात स्वतःला पुरतं गाडून घेऊन मराठी भाषेची निरत सेवा निरपेक्ष भावनेनं आजन्म करणाऱ्या गोवेकरांची कमाल उपेक्षाही झालेली आहे, हेसुद्धा फणफणणार नागडं सत्यच आहे. तुकाराममहाराजांच्या अगोदर पंचवीस–तीस वर्षं गोव्यात जन्मलेल्या तुकारामबाबा वर्दे ह्या सात्त्विक कवीची रसाळ मराठी रचना आपल्या कुठल्या क्रमिक पुस्तकात सापडते ! नायकस्वामींची करुणार्द्र कविता गोव्यातल्या देवळांतून मोठ्या उमाळ्यानं सांज–सकाळ गायली जाते. कुठल्या मराठी संशोधकानं तिचा उद्धार केला ? शंभर वर्षांपूर्वी ह्या गोव्यात सूर्याजी आनंदराव देशपांडे ह्या जबरदस्त ज्ञानोपासकानं त्रेपन्न हजार शब्दांचा पहिला प्रचंड पोर्तुगीझ–मराठी शब्दकोश तयार केला. सूर्याजीबाबांच्या ह्या जन्मभरच्या विराट उद्योगाची नोंद आपल्या कुठल्या मराठी वाङ्मयेतिहासात सापडते ? ते जाऊ द्या. बाळकृष्ण वामन सावर्डेकरांनी मराठीच्या प्रतिष्ठेसाठी गोव्यात रक्ताचं पाणी-पाणी केलं. डॉ. गोविंद पुंडलीक हेगडे-देसाई आणि ना. भा. नायक ह्यांनी संपादकीय लेखणीचं अपराजित शस्त्र क्षणभरसुद्धा कधी म्यान केलं नाही. त्यांच्या वनवासाचं आपल्याला स्मरण आहे ? हृदयाच्या पदराने कोण

घालताहे वारा ? ' अशी काळजाला कुरवाळणारी ओळ लिहू शकणाऱ्या आज घटकेच्या कविवर्य शंकर रामाणींच्या पदरात तरी आपण पुरतं माप घालतो काय ? आपली बाहेरच्याची नजर साफ नाही, हे गोमंतकातल्या गुणवंत मराठी पुत्राचं एक दुखणं आहे. आपण त्यांना हृदयाच्या पदरानं वारा घालीत नाही, म्हणून पणजीत त्यांचे अस्पष्ट हुंदके नाक्यानाक्यावर ऐकू येतात. वाऱ्याला विचारा

पणजी गाव मांडवीच्या काठावर वसलेलं आहे. बंदरावरून दिसणारा पलिकडच्या तीरावरचा हिरवागार निसर्ग शहरी डोळ्यांची साक्षात पारणी फेडतो. नदीचा झुळझुळता जांभळा फाटा, त्या प्रवाहात पावलं थूत बसलेली सरपटणारी हिरवी डोंगरमाळ, डोंगरावरल्या रानातले तांबडे रस्ते, डोईवर पसरलेल्या अथांग निळ्या डोहातल लख्ख रुपेरी ऊन आणि त्या उन्हात संथ तरंगणाऱ्या सफेत सागरपक्ष्यांच्या नारिंगी चोची, ही सारी लखलखती रंगपंचमी मन सुखी-सुखी करते.

संध्याकाळी नदीवरलं आभाळ जांभळं होतं. मग हळूहळू काळोखाचं घरटं तयार होतं. डोंगरातल्या मंद दिवेलागणीची प्रतिबिंबं नदीत शहारून लुचकळतात आणि रोमांचित तारे आभाळभर लुकलुकतात. त्यांत भर पडते मोटारींच्या पिवळ्या, तांबड्या पळणाऱ्या दिव्यांची आणि गलबतांच्या लाल—हिरव्या प्रकाशणाऱ्या डोळ्यांची. वाटतं, हा लख्ख प्रकाशणारा सहस्र ज्योतींचा रत्नदीप हाती घेऊन सृष्टिदेवता काळोखाच्या मखमली पडद्याआड रमलेल्या केशरी सूर्यनारायणाच्या स्वागतासाठीच सिद्ध झाली आहे.

नदीवरल्या धुपक्या सूर्योदयाची शोभा अगदी वेगळी असते. सगळे दीप विझलेले असतात आणि माणसाच्या वाचाळ दुनियेला जाग आलेली नसते. धुक्यात लपेटलेली झाडं पाखरांना कुशीत घेऊन गाणी गात असतात आणि त्यांना फुटलेला कंठ ऐकण्यासाठी सूर्याचे तिरपे किरण सोनेरी शेले पांघरून पणजीच्या सगळ्या सडका रोखून धरतात.

वाटतं, निसर्गाचं हे विमल वैभव लुटण्यासाठी पाण्यात तरंगणाऱ्या पणजीतला मुक्काम वाढवावा. ऋतुचक्राचे एक-दोन फेरे अनुभवावेत. नातेसंबंध सांगणाऱ्या पाखरांचा टाहो ऐकावा. खारींचा आनंदोत्साह पाहावा. पावसाचं कृपादान ओंजळीत साठवावं. प्रफुल्ल भातफुलाचा गंध हुंगावा. देवांच्या वसतीच्या डोंगरावरला ताजा वारा छातीत पोटभर भरून घ्यावा. चवदार मासळीवर मस्त ताव मारावा.

पण हे कसं शक्य आहे ? पाहुणे मंडळींनी पणजीतले आगंतुक मुक्काम असे अव्वाच्या सव्वा वाढवले, तर तिकडे मायपोट महानगरात सदाची जन्मठेप कोण बरं भोगेल ?

♣ ♣ ♣

# गांधीजींच्या गावी

♧ ♧ ♧

सेवाग्रामच्या रेल्वे-स्टेशनवर उतरणं म्हणजे साक्षात बारूआ–फेम बंगाली चित्रपटातल्या जीवनाचा एक अध्याय प्रत्यक्षात जगणं.

कथेकरी बुवांचं दोंद दुलूदुलू हलावं, तशी एक जुनी आगगाडी डुलत डुलत येते आणि एक लांबलचक आचका देऊन थांबते. निळ्या डगल्यातला पोर्टर लाल काचेचा फाणस घेऊन अंधारात बाजूला उभा असतो, त्यावरून ओळख पटवून घ्यायची, की हे स्टेशन आहे; कारण स्टेशनाला आवश्यक असलेला फलाट इथं केवळ नाममात्र आहे. गाडीतून ना कुणी उतरतो, की ना कुणी चढतो. पोर्टर ह्या डब्यापासून त्या डब्यापर्यंत मान वेळावतो नि फाणसाची हिरवी काच तेजाळतो. कवळीतला सोनेरी दात बाहेर डोकवावा, तसा गार्ड खिडकीबाहेर डोकावतो, शिट्टी फुंकून शांततेवर ओरखडा काढतो, आणि मग वरातीतल्या घोड्याच्या ऐटीनं झुकझुक गाडी मार्गाला लागते. स्टेशन कृतकृत्य होतं.

बाळंतिणीनं मूल सांभाळावं, तसा फाणस सांभाळीत पोर्टर खोलीत येतो, गरम पांघरूण लपेटून बाकावर लवंडतो. काळोखातल्या झाडाझुडपांना भुताखेताची रूपं चढवीत वेळ घालवतो.

मी हजर होतो. स्टेशनमास्तरांना सांगतो,

'बाबूजी, एक तिकीट द्या, हो, वर्धेचं.'

'चिल्लर आहे?' तो विचारतो.

'पाचाची नोट आहे.'

'माझ्यापाशी परत करायला एक दमडीही नाही.'

'अरे, रेल्वे-स्टेशन म्हणायच नि साधी पाच रुपयाचीसुद्धा मोड नाही?'

'खरच नाही, साहेब. इथं पॅसेंजर येईल नि चिल्लर देईल, तेव्हा मोड जमणार न?

'जरा शेजारीपाजारी विचारा ना.'

'शेजारी? इथं कुठला आलाय् शेजारी? इथं मला कंदील लावायला साधी काडेपेटी हवी असली, तरी गुडसूला लोंबकळत पोर्टरला वर्धेपर्यंत चक्कर मारावी लागते, साहेब!'

'पण तुमच्या स्टाफपैकी कुणाजवळ '

'साहेब, मी इथं एकटाच आहे. नि दुसरा हा पोर्टर. मीच स्टेशनमास्तर, मीच पार्सलबाबू, तिकीटबाबू, गुड्सबाबू, चपराशी नि बावटेवालासुद्धा मीच. पगार सेहेचाळीस रुपये. बोला.'

'मग सिग्नलिंग कोण करत?'

'बर विचारलंत. अहो, ह्या स्टेशनला सिग्नलच नाही.'

एकसष्ठ साल पालटायला आल, तरी सेवाग्राम स्टेशनाला सिग्नल नसू शकतो, हा चमत्कार मुळीच नव्हे. कारण, मुळात हे स्टेशन नव्हतच. दोन साल गुदस्त नागपुरास काँग्रेसचं अधिवेशन भरलं होतं. तिथल्या खादीवद शाहूंनाना गांधीबाबाच मकान बघायची तलफ येणार, हे रेल्वेनं हुडकलं नि रुळालगत पिवळ्या रंगाची एक बैठी बंगली उभारली. तेच हे स्टेशन. अवघ्या दोन खोल्याच. पैकी, एका खोलीत ट्रेनबाबू तिकिटाची पेटी पुढ्यात घेऊन घड्याळाकडे बघत वेळ ढकलतो. त्याची ड्यूटी, म्हणे, चोवीस तास आहे. मात्र, सकाळी एक नि संध्याकाळी एक अशा अवघ्या दोनच गाड्यांची इथं वर्दी असल्यामुळं ट्रेनबाबूला विश्रांतीही चोवीस तास आहे. म्हणजे ड्यूटीही जीव घेणारी नि विश्रांतीही जीव खाणारी. माणसाची रहदारीच नाही. टाकीतल्या पाण्यासारखं स्टेशन निष्कंप असत. आजूबाजूला मैलभर वस्तीच नाव नाही. नुसते भरड माळ विस्तारले आहेत. चहाकॉफी सोडाच, घोटभर पाण्याचीही वानवा आहे. इथली ही दोन सचेतन माणस आपलं सोन्यासारखं आयुष्य इथ केवळ घड्याळाकडे बघत घालवणार, ह्या बेचैन विचाराच रवथ करीत तुम्ही चालता, तेव्हा पाटीवर रेघ ओढावी, तशी एक अचेतन सडक हलकेच तुमच्या पावलाखाली आलेली असते. इथून खोलगटात दूरवर जी झाडी दिसते, ते शेगाव, गांधीजींचं सेवागाव

शेगाव हे केवळ नाममात्र गाव आहे. कोकणात वाड्या असतात, त्यातलाच हा प्रकार. तोच नग आहे. गावात पाच पन्नास उबरठे असतील, नसतील. नळ्यांच्या छपरांची झुलपं असलेल्या घराचा पतकोराएवढाला पुंजका, म्हणजेच हे बजाज कुटुंबीयाकडे सावकारीतून शिरपत आलेल शेगाव नि महात्माजींच्या पुण्याईनं वैभवलेल सेवागाव.

मूळ गावाच्या वेशीपाशीच शभर पावलावर सेवाश्रम विसावला आहे. कल्पनाही येत नाही, की डोळ्यासमोर आहेत, ह्या बैठ्या चाळी म्हणजे गांधीजींच्या आश्रमाची एक वास्तू. इतका साधेपणा आहे.

चार मैलावर वर्धेचा वर्धिष्णु परिसर, सभोवार सरपटत जाणारी असीम शिवार, नि एका कोपऱ्यात ध्यानस्थ मुनीसारखा बसलेला गांधीआश्रम.

काय आहे तिथ ?

निंबाच्या पानाची सळसळ. बैठ्या जोड-चाळी. घरी धुतलेल्या कपड्यासारखे साधे; पण बापुडवाणे दिसणारे बगीचे; झाडझुडपं. कोकणी घरासारखी शीतळ मातघर.

आश्रमाची वास्तू मोठी विश्वासू दिसते. आश्रमाच्या उंबरठ्यावर पाऊल टाकताना मनाच झुम्बर उत्कट भावनोद्रेकाच्या अनत ज्योतींनी लखलखून निघत. किती इटुकली ही वस्ती ! पण एका महात्म्याच्या पुण्यस्पर्शानं एके काळी हा आश्रम साऱ्या जागृत जगताच चित्तचुम्बक ठरला. हे उभार निंब, की ज्याच्या घनाकार छायेत रथीमहारथी पुण्यश्लोक गांधीजींच्या भेटीसाठी थाबले असतील, हे विमल वृक्ष, की ज्यांच्या वळशाळ छायेत खुद्द पुण्यश्लोकच विसाव्यासाठी थबकले असतील, हे तृप्त तरुवर, की ज्याच्या दिलासादायी सावलीत पुण्यश्लोकाच्या पावलाच क्षणदर्शन घडावं, म्हणून कृतज्ञ ग्रामवासी उभे राहिले असतील.

हे निंब !

पहाऱ्यावरल्या निंबछायेत तुमची तृषार्त नजर तीन गोष्टी टिपते खोल विहिरींमध्ये असते, तशी आश्रमात अटोकटीची भयकारक शातता आहे. आश्रमाची वास्तू दाढी-वरल्या पच्यासारखी धुपकी आहे, आणि कोकणातल्या ब्राह्मणाच्या घरासारखा आश्रम स्वच्छ पण निर्मनुष्य आणि बहुत कष्टी आहे. तुम्हाला दिसेल, की आश्रम अगदी आशेला आला आहे.

घरं मोजकीच. त्याची जोतीही अगदी टेंगणी. त्याच्या पायापाशी अगदी बडि-शेपेच्या आकाराची हिरवळीची रागोळी पसरलेली आहे. जरा काळजीपूर्वक पाहा. त्या हरळीच्या पानानी ' हरे राम ' ही साद रेखाटली आहे. ती अक्षर आहेत परमात्म्या-समोर तृणाहून लीन झालेल्या महात्म्याच्या ओठांवरला हा अखेरचा गहिवर तृणपर्णातच साकार केलेला आहे.

बाजूला कुंड्या आहेत. त्यांतल्या पुष्पहीन रोपांनी पानाचे नि देठाचे चित्रविचित्र आकार गुफले आहेत.

ही सगळी रोपटी आश्रमाला दान म्हणून सन्मानान आलेली आहेत नि त्यांच्या गळ्यात दात्याच्या नावाची मंगळसूत्रे आहेत. त्या चिठ्यावरची नावं वाचताना जणू काही आश्रमवासीयाची नामावलीच वाचल्यासारखं वाटत. बाळकोबा भावे, प्रोफेसर भन्साळी, वगैरे आत्मबली नामपरपरा तिथंही आढळली.

ही वनस्पती चरायला दिली, तर, म्हणे, गुरांचे रोग बरे होतात. प्रार्थनामय

जीवनाचे उद्गाते असलेल्या गांधीजींच्या आश्रमात मुक्या प्राणिमात्राच्या क्लेशाची आठवण ठेवणारे जागे भक्त आहेत, ह्याची साक्ष आश्रमाच्या वेशीवर अगदी सलामी लाच मिळते.

दवाखान्याला खेटूनच ग्रंथविक्रीचं भांडार आहे. त्यात 'नवजीवन ट्रस्ट 'ची ग्रंथ-संपत्ती आणि विनोबाजींची स्वस्त पुस्तकं मांडून ठेवली आहेत. तीर्थावर गेल्यावर भाविक जसं एखादं स्तोत्राचं पोथीवजा पुस्तक आणतात, तसंच इथं येणारे यात्रेकरू परतताना इथलं स्वस्त साहित्य भेटीदाखल विकत घेतात. पर्यायानं भांडाराचा योगक्षेम सुखेनैव चालतो. पण विकत नेलेल्या ह्या सात्त्विक साहित्याचं पुढं काय होतं ? घरी पूजेत जाऊन बसतं ? की दुसऱ्याकडे भेटीदाखल सरकवलं जातं ? की थोडं फार चाळलं जातं ? की नुसतं फळीवर ठेवून दिलं जातं ?

एक गरीबसा दिसणारा सेवक कीर्द लिहीत बसला होता. तो साधक म्हणून आश्रमात केव्हा आला, वगैरे चौकशी केली. तो उत्तरला,

'नाही, साहेब, मी इथला पगारी नोकर आहे. सहा तास काम टाकलं, की मी गावात माझ्या घरी जातो.'

आश्रमात पगारी नोकर असावेत, ह्याचं नवल वाटलं. पाँडेचेरीत असा प्रकार आढळला नाही. पलंगावर पडून ज्यांनी ख्यालीखुशालीत आयुष्य काढायचं ठरवलं, तर ते अगदी सहज शक्य आहे, असे लक्ष्मीपुत्र स्वेच्छेनं तिथं येतात नि पोक न काढता स्टुलावर बसून श्रीअरविंद आश्रमाची दुकान चालवतात.

दुकानालगत गांधीजींचं जुनं घर आहे. त्याचं नाव आहे 'आदिवास.'

हे घर म्हणजे एक लांबोडकी खोलीच आहे. दोन्ही अंगांना कलत्या छपराच्या पडव्या. गांधीजींचं हे निवासस्थान ही ह्या आश्रमीय वस्तीची गंगोत्री आहे.

जमनालालजींनी पाटीशी झक्कू लावल्यावर गांधीजी इथं आले. स्थिरावले. ते आणि त्यांचे धर्ममित्र इथं एकत्र राहत. त्यांच्या सर्वस्वी अलौकिक आणि बहुतांशी अनाकलनीय अशा प्रायोगिक जीवनाला ह्या पवित्र वास्तूत जोर आला.

हे मातीचं घर घरट्यासारखं मऊ आणि ऊबदार आहे. ऐन उंबरठ्याजवळची जागा, म्हणे, गांधीजींनी पटकावली होती. तिथं ते ध्यानस्थ बसत, सूत कातीत, लेखन-वाचन निरंतर करीत, तरबेज साधकांना कामं वाटून त्यांना दशदिशांत पिटाळीत.

बाहेरच्या पडवीत रसोईघर. सगळेच साधक जेवण तयार करीत. अन्न कमालीचं साधं. शेंगदाणे, साधी फळं, लापशी, दूध, दही, मध. तिखटाला आश्रमात सक्त बंदी. मीठ वर्ज्य. साखर वर्ज्य. तळण वर्ज्य. अन्न निव्वळ उकडायचं. चवीला फाटा देणारं असलं सरळसोट अन्न तयार झालं, की सर्वांनी रांगेत एकदम बसायचं, प्रभुस्मरण करायचं नि अन्नाचा कण नि कण खाऊन समाधान पावायचं.

आश्रमात जिव्हालौल्याच नावच नव्हतं. तथापि, गांधीजी अगदी साक्षात महात्मा असले, तरी बा पक्की गृहिणी होती. ती महात्मा ठरलेल्या नवऱ्याच्या नाकावर टिच्चून स्वत: निष्ठापूर्वक चहा प्यायची नि तिच्या मर्जीतल्या सेवकाना पाजायचीसुद्धा! बांच्यापुढे महात्माजींची मात्रा कधीच चालली नाही.

आडोसा नसलेल्या त्या लांबोटक्या घरात बानी कपडे कुठं नि कसे पालटायचे? तेलफणी कुठं करायची! दहा छांदिष्ट पुरुषाच्या गलबल्यात त्या गृहिणीन आडत्र कुठं व्हायच? केव्हा व्हायच? शेवटी आदर्श सामुदायिक जीवनाचा प्रयोग करण्यात देहभान विसरलेल्या महात्म्याला आपल्या हट्टी बायकोसाठी वेगळं घर बांधून द्याव लागल. तथापि, भारताच्या मध्यबिंदूवर प्रायोगिक वस्तीसाठी आलेला महात्मा हा मुळात काठेवाडी बनियाच असल्यामुळं त्यानं बा जेमतेम आडवी होऊ शकेल, इतक्या ओटक्या चिंचोळ्या आकाराच केवळ चार भिंतींचा निवारा आणि आडोसा असलेल खोपट, ' घर ' ह्या उबदार सदराखाली बांधून दिलं. त्या खोपटातही बाना संसार थाटण्याची लहर येऊन त्याच चित्त बरबटू नये, म्हणून त्या इवलाल्या खोपटाच्या भिंतीला फडताळ न बांधण्याची चोख व्यवस्था केली! आश्रमाच्या परिसरातल सर्वांत चिमुकलं घर, म्हणजे हे बाच घर

महात्माजी आले. त्याच्यामागून धूमकेतूच्या शेपटीसारखं फरारा पसरलेल राजकारण आल. राजकारणामागून मुरब्बी राजकारणी आले. त्यानी घराच सभागृह करून टाकल. पडवीचा सभामंडप झाला. वर्दळ वाढली. त्यातून गांधीजींची सुप्रसिद्ध झोपडी तयार झाली. राजकारणी त्या नव्या झोपडीत आले. काम उरकून पांगले. पण गांधीजींच्या मूल्यविवेकाचा मागोवा घेत काही निर्मम सेवक मात्र भूमीच सोनं करण्याच्या जिद्दीन आश्रमात आले. आश्रमातच मांडी ठोकून बसले. हे कणखर व्रती तपोनिष्ठ हाच आश्रमाचा कणा. आश्रम यानीच बसवला नि जोपासला.

मानव हा ईश्वरी चैतन्याचाच एक अनाद्यनंत भाग आहे आणि सत्यधर्माचरणापरता अन्य मोक्ष कुठंच नाही, हे गांधीजींच पालुपद होत. ज्यानी हे मान्य केल, त्याना त्यानुसार वागण प्राप्त झाल. परिणामत: गांधीवाद्याच जीवन आरपार प्रार्थनामय झालं. जागृती-सुषुप्तीत मन हरिचिंतनी पण कामात दंग ठेवण हे ओघानच आल. म्हणून आश्रमवासीयाना उठल्या उठल्या प्रार्थना करावी लागे. प्रार्थनेनतर दैनंदिन कर्मकांड. जागृत जीवनाचा कण-कण ईश्वरार्पण करून दिवसाअखेरीस झोपायच– तेही हरिचिंतनानतरच. म्हणजे प्रार्थनेला आश्रमात अनन्यसाधारण महत्त्व आल.

सर्व सेवकानी प्रार्थनेला एकत्र बसायच. उघड्यावर. मन अनताशी लीन झालं आहे, डोक्यावर अनताचा साक्षात्कार करून देणार नभोवितान पसरलेल आहे, नीरव शांतता नांदत आहे; आणि एका फळकुटाला टेकून हात जोडलेला अर्धनग्न म्हातारा खरखरणाऱ्या गद्गळ आवाजात म्हणतो आहे

' वैष्णवजन तो– '

कोकणात दारात खळी असतात, तसं बाऱ्या दारात खळं आहे. त्यावर माती न लागलेली बारीक गुळगुळीत खडी पसरलेली आहे. तिथं कामधाम आटोपून गांधीजी येत. त्यांच्याबरोबर कंदील असे. दोन्ही बाजूला सेवक ओळीनं बसत. आश्रमात दाखल झालेला एक शाळकरी मुलगा कंदिलाची वात सारी. हजेरीबुकात हजेरी लावण्यासाठी हाकारे :

'मोहनदास करमचंद गांधी ...'

'हजर.'

'कस्तुरबा मोहनदास गांधी...'

'हजर.'

'दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर. ...'

'हजर.'

हजेरी मांडून झाल्यावर वात बारीक होई. सर्वजण चित्त निर्मम करीत. मिटल्या डोळ्यांनी गांधीजी थाबत थांबत प्रार्थना सांगत.

प्रार्थना संपली, की प्रत्येक साधकानं आपापली रोजनिशी सर्वांसमक्ष वाचून दाखवायची! दिवसभरात काय केलं, ह्याची जणू परमेश्वरापुढं मोकळ्या मनानं जबानी द्यायची. मन कुठं मोहावलं असेल, तर कबूल करायचं, कारण देवाची क्षमा उदार आहे. शिवाय कबुली देऊन मनाचं शुद्धीकरण होतं. पापाचा निचरा होतो. शिरस्त्याप्रमाणं रोजनिशीचं वाचन होई.

एखादा सेवक सांगे,

'अमरावतीहून आश्रमासाठी संत्र्यांचं पार्सल आलं. नियम एक संत्र खाण्याचा आहे, हे मला माहीत आहे. मी नियम मोडून दोन संत्री खाल्ली. ती गोड होती.'

मग गांधीजी हळहळून उपदेश करीत,

'बेटा, रामनाम हा जिभेचा अलंकार आहे. रुचकर पदार्थ खाल्लेस, हा मोह आहे मोहमय जीवन हे पाप आहे. मोह तुला विनाशाकडे नेईल. दोन संत्री खाल्लीस, हा मोहच होय. आज दोन खाल्लीस. उद्या तीन खाशील. परवा चार. पण कुठं तरी तुला थांबावंच लागेल ना? की पन्नास संत्री खाऊ शकशील? नाही ना? मग नेमकं एकच संत्र खाऊन तृप्त का होत नाहीस? समाधान ही मनाची स्थिती आहे. ती साध. आपण सारेच साधक आहोत. रामनामापरतं दुसरं काहीही आपल्या जिभेला प्रिय असता कामा नये!

अशा विशुद्ध जीवनाची साधना अवघी सात-आठ वर्षंच चालली. साहेबावर प्रेम करणारा महात्मा साहेबावर अधिक सोज्ज्वळ प्रेम करता यावं, म्हणून त्याला ह्या देशातून हुसकावून लावायला या आश्रमाचा उंबरठा ओलांडून जो बाहेर पडला, तो पुन्हा काही इथं परतलाच नाही.

स्वातंत्र्य पदरात पडल्यावर गांधीनिष्ठेचे बिल्ले लावलेली चतुर मंडळी सत्तेच्या

मचकावर पहुडली. शभर नवरी सोनं तेवढं मागे साधनेत गर्क राहिलं. पुराच पाणी वाहून जावं आणि जलाशयाचा अमृतमय गाभा तेवढा मागे उरावा, तसं झालं. ज्याला जमलं, तो इथून निसटला. आण्णासाहेब सहस्रबुद्धे, धोत्रेजी, दिवाणबंधू, वगैरे इथंच चिकटून राहिले.

आश्रमात फिरता फिरता गांधीजींच्या प्रार्थनेच्या जागी पाय खिळून राहतात. पायाखालची रेती गार आहे, गांधींनी लावलेलं पिंपळाचं झाड डेरेदार झालं आहे. त्याची सावली मन शांत करते.

प्रार्थनेच्या मैदानाला लागूनच आपण चित्रात पाहतो, ती महात्माजींची जग-प्रसिद्ध झोपडी आहे. तिला जोत मुळीच नाही. आडोसा टाकून एका खोलीचे दोन भाग केले आहेत. उंबरठ्यालगतच्या भागात गांधीजींची बैठक असे. बैठक तीन साडेतीन फूट लांब आहे. टेकायला फळी आहे. सूत कातणं, चर्चा करणं, वाचन, मजकूर सांगणं— सारं काही ह्या साडेतीन फुटी बैठकी करून चालायचं.

बैठकीच्या उशालगत महादेवभाईंचं ' सेक्रेटरीएट ', म्हणजे डेस्काची जागा आहे. पायथ्यापाशी प्यारेलालजींचं सेक्रेटेरीएट. ' सेक्रेटरीएट ' म्हणजे अंग धुण्याच्या मोरीएवढी चिंचोळी आखीव जागा. त्यात त्यांचा सर्व पत्रव्यवहार, लेखणी, दौत, कंदील, वगैरे. डेस्क म्हणजे घडीचं बैठं मेज बसायला वीतभर चटई. गांधीजींच्या बैठकीसमोर जेमतेम तीन माणसं बसू शकतील, एवढीच अरुंद जागा आहे. देशोदेशींचे राजकारणपटू इथंच बसून चर्चा करून गेले आहेत. पंडितजी इथंच गांधीजींच्या पायापाशी बसून काम करीत असत. महात्माजींची ती प्रसिद्ध ' तीन माकडं ' इथंच आहेत. एका काचेच्या कपाटात त्यांची काठी, चपला, लेखनसाहित्य, चष्मा, वगैरे नीट मांडून ठेवलं आहे.

झोपडीचा आतला कप्पा ही गांधीजींची राहायची खोली पाणी प्यायची सुंदर भांडी आणि झोपायचा प्रशस्त पलंग आहे. ऐन उन्हाळ्यात ते अंगणातल्या निंबाखाली झोपत. पावसाची हलकी सर आली, की पडवीत येत. तुफान वृष्टी झाली, तर इथं आत झोपत. हा पलंग उशीकडच्या बाजूला जरा उंच केलेला आहे. त्यावरच गांधीजी देहाचं मर्दन करून घेत. बडोद्याच्या प्रोफेसर माणिकरावांनी त्यांना ही मर्दनदीक्षा दिली नि गांधीजींनी अखेरपर्यंत ती व्रत म्हणून चालवली.

ह्या आतल्या खोलीत आधुनिक सोयींनी युक्त असा ऐसपैस शौचकूप आहे. एका गोऱ्या इंजीनिअर साहेबानं, म्हणे, तो मोठ्या भक्तिभावानं बांधून दिला आहे. त्या शौचकूपाचा विशेष म्हणजे तो जमिनीपासून बराच उंचावर असून कल्पनेबाहेर स्वच्छ आहे. तिथंच बाजूला एक खोकडं आहे. त्यात पत्रं ठेवलेली असत. वेळेला कटाक्षानं जपणारे गांधीजी ती पत्रं देहशुद्धी करताना वाचत, नि बाहेर आल्यावर प्यारेलालांना उत्तराचा मजकूर सांगत !

एरव्ही ह्या झोपडीत काडीचाही संचार नाही. शुद्ध मठच आहे.

झोपडीला लागून मोकळ्या जागेवर बाईंचे परचुरेशास्त्री राहत. ते कुष्ठरोगी होते. त्यांची सेवा कुणी करायची ? रोगपीडित शास्त्रीबुवाना महात्माजींचा आधार वाटला. तुकोबाचे अभंग गात गात ते गांधीजींच्या दरवाज्यात हजर झाले. गांधीजींनी त्यांना उबदार निवारा आणि दिलासा दिला. त्यांची मनोभावे सेवा केली. बदल्यात कुष्ठपीडित शास्त्रीबुवानी गांधीजींना प्रार्थना–संगीतात अंतर्भूत करण्यासाठी तुकारामाचे अभंग मार्मिक नजरेनं निवडून दिले. पुढे शास्त्रीबुवानी इथंच देह ठेवला. मात्र, सेवेची एकदा प्रज्वलित झालेली ज्योत विझली नाही. मनोहर दिवाणानी स्फूर्ती घेतली. आश्रमानजीकच दत्तपूरला त्यानी कुष्ठपीडितासाठी आरोग्याश्रम काढला. सेवेन ते ईश्वरासमीप गेले आहेत. महात्माजींनी त्याचा बहुमान ' महात्मा ' ह्या पदवीनं केलेला ' दिल्ली डायरी 'त आढळतो.

मोराच अवघं वैभव त्याच्या पिसाऱ्यात, तस सेवाग्रामच्या ह्या आश्रमाचे सर्व प्राण बा–बापूजींच्या झोपड्यात आहेत. ह्या साध्या मातीच्या वास्तू म्हणजे आश्रमाचे हृदयकुंज आहेत. इतर देह केवळ नाममात्र. तशात आता आश्रमात धड दहा-बारा सेवकसुद्धा नाहीत साधकही नाहीत. ओधवजी किंवा अशाच काहीतरी काठेवाडी नावाचे एक टेकलेले गृहस्थ आश्रमाच कामकाज आणि कारकुनी पाहतात आल्यागेल्याच हवंनको बघतात आश्रमाच्या व्हिजिटबुकात नाव नोंदवायला सांगतात. त्याच्या बोलण्यावरून ध्यानात आलं, की ते आश्रमातले अगदी सुरुवातीपासूनचे तपोनिष्ठ साधक आहेत. पण आता चालू जमान्यात खचले आहेत. सत्तालोभाच थैमान पाहून कोमेजले आहेत. पण बिचारे ओधवजी तरी काय करतील ! घसरगुंडी कशी सावरतील ? कणखर माणसं जी होती, ती विनोबाच्या मागून भरड भूमी तुडवीत निघून गेली विनोबाजी म्हणजे प्रकाशणारा माणूस. त्यानी पसरलेल्या कृपेच्या वाटेवरून सश्रद्ध अंतःकरणाची मिरवणूक निघून गेली, लक्षावधी एकर जमिनीच स्वहस्ते केलेलं हेतुपूर्वक दान विश्वाच्या उत्पत्तीपासून कुणाच्या स्वप्नातही दिसलं नसेल. विनोबांनी ते जाता जाता मिळवलं ! चैतन्य महाप्रभूंनंतर, मधला एक रविशंकरमहाराजाचा क्षणिक अपवाद वजा करता, दुसऱ्या कुणी दरोडेखोर डाकूंची मनं, केवळ हृदयापर्यंत पोहोचणारे मऊ शब्द विनातक्रार बोलून नि फक्त देवाच्या अंतिम सत्तेचा हवाला देऊन, बदलल्याची इतिहासात नोंद नाही. विनोबांनी ते काम संताचे अभंग गात गात केलं. सर्वांना प्रेमवश केलं. अशा महापुरुषाच्या प्रकाशात आपली मन प्रज्वलित करून घ्यायची, की वर्षेपासून फाट्यात पडलेल्या सुन्न आश्रमात आला दिवस ढकलायचा ? साहजिकच आज आश्रम सुना सुना झाला आहे. पचवीस इमारतींत मिळून पाच माणसं असतील नसतील ! बहुतेक घराना तर टाळीच मारलेली आहेत. अर्थात, जिथं मूलोद्योग–वृत्ती आहे तिथं सरकारी आदेशावरून बाहेरून पाठवलेले शिक्षकविद्यार्थी टर्म भरण्यासाठी येतात. एक इस्पितळ आहे तिथंही राबता आहे. परंतु त्या काय आश्रमीय जीवनाच्या प्राणखुणा आहेत ?

नाही म्हणायला, जगाच्या कावेबाजीला आणि एकूण गदारोळाला उबगलेली सश्रद्ध अंतःकरणं कधीमधी एकान्ताचा आणि शांत, शुचिर्भूत जीवनाचा मागोवा घेतात. पैकी काही सेवाग्रामाकडे वळतात.

आश्रमात एक कलाभुवन आहे. तिथं मुलं मातकाम, रंगकाम शिकतात. बंगालच्या उमरावाचा एक तरुण चित्रकार मुलगा कलाभुवनात दाखल झाला होता. मी त्याचं काम पाहिलं. सुमार वाटलं. सर्वांत सुंदर वस्तू होती दारूची सुरई! नि ती तयार केली होती आश्रमात आलेल्या एका इटालियन कुंभारानं! ही एक अजब गोष्ट आहे. रंगांची दोन मिश्रणं जमली, रे, जमली, की आम्ही थेट जाहिराती रंगविण्यात भरतो आणि अमेरिकेतले लक्षाधीश कलावंत ह्या आडबाजूच्या खेडेगावात बसून प्रखर सूर्यकिरणांत न्हाऊन निघा-लेल्या वृक्षांची चित्रं काढतात. पाखरांना पाहत तासन् तास रमतात! ओंधवजी म्हणालेच होते, की गोऱ्या लोकांची इकडे रीघ लागलेली असते. मी गेलो, तेव्हा एक अमेरिकन पोरसवदा मुलगा आठ हजार मैल ओलांडून ह्या आश्रमात राहायला आला होता.

कलाभुवनाच्या समोर अतिथिघर आहे. अगदी शांत. साधं. गावाकडे एकाकी घर असतात, तसं. तिथं बाहेर खाटल्यावर बसून उतारवयाकडे झुकलेला एक उघड्या अंगाचा पुरुष एकचित्तानं चरख्यावर सूत कातीत होता. दुरून तो सही न् सही गांधीजीं-सारखाच भासला, म्हणून क्षणभर चपापलो. मांडी मुडपून बसण्याची ढब तीच, एकाग्रता तशीच, कानही फताडे, डोळ्यांवरची आरशी तशीच नि सर्वांवर ताण म्हणजे डोईची हजामतही तशीच तुळतुळीत! नंतर कळलं, की ते चरखाधारी गृहस्थ म्हणजे खुद्द महात्माजींचेच चिरंजीव आहेत. इतकं आलोच आहोत, तर कुशल विचारावं, म्हणून दोन शब्द त्यांच्यापाशी बोललो. तेव्हा उत्तरादाखल रेशमी आवाजात ते म्हणाले,

काल-परवापर्यंत मी बिझिनेसमध्ये होतो. आता रिटायर झालो. तेव्हा इथं आलो.'

संध्याकाळ उतरली आहे. दूरवर दिवेलागण झाली आहे. आश्रम काळोखात आहे झाडं निश्चल आहेत. कोमजलेल्या मनानं मी ह्या पवित्र वास्तूचा निरोप घेत आहे. आश्रमाचं कवाड ओलांडत आहे. एका सुन्दर पण काहीशा कमनशिबी जगातून बाहेर पडताना आपलं काहीतरी हरवलेलं असतं. ज्या सश्रद्ध जगात धर्मानंद कोसंबींसारखा साधुपुरुष अभ्यासाला बसला, जिथं आण्णासाहेब सहस्रबुद्ध्यांसारखा विरक्त प्रयोगवीर आज राहत आहे, जिथं ओंधवजींसारखा नम्र सेवक तुमचं निरपेक्ष स्वागत करतो, बेचैन मन ॲटलांटिक ओलांडून जिथं समाधानाचे झरे शोधायला येतात आणि जिथली झाडं सावल्यांची सोबत देतात, त्या दुनियेचा निरोप घेताना हात आपोआप जुळतात.

सेवाग्रामच्या सडकेवर येणं म्हणजे पुनरपि आपल्या चालू जगात येणं. आश्रमाच्या

बाहेर एक हॉटेल आहे. तिथं चहासाठी गेलो. हॉटेलवाला म्हणाला, 'बसा', नि इतकं विनम्र स्वागत करून त्यानं जमिनीवर माझ्यासाठी चक्क चटई अंथरली. दुकानात खुर्च्या नव्हत्याच म्हणून चटईवर बसलो.

क्षणात बाळगण धावत जवळ आलं.

विजयदुर्ग बंदरात मचव्यातून उतरलो, की आम्ही असेच कातळावरल्या ब्राह्मणकराच्या खानावळीत जाऊन थेट जमिनीवरच जाऊन बसायचे! मग पितळेच्या फुलपात्रातून जळजळीत चहाचं हाय–हुई करीत प्राशन!

सेवाग्रामच्या त्या हॉटेलवाल्यानसुद्धा असाच कोपातून चहा दिला. बशी नव्हतीच, तर देणार कुठून?

माणूस मात्र घरच्यासारखा वाटला. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. नतर लक्षात आलं, की हॉटेलमालकाच्या नि पोऱ्याच्या अंगावर हातविणीच खादीच वस्त्र होतं. वाटलं, प्रवाशासाठी आश्रमानं चालविलेल्या फराळाच्या दुकानात आपण आलो आहोत! मी विचारलं,

'आश्रमानच हे दुकान चालवलय् वाटत?'

'नाही, साहेब.'

'मग तुमच्या अंगावर खादीचे कपडे कसे?'

'हा माझा मुलगा ह्या आश्रमात लहानाचा मोठा झालाय्. पण शिक्षण झाल्यानतर उपजीविका कशी करायची? तो जे शिकला, त्याचा व्यवहारात उपयोग होईना. बरं, आश्रमात नोकरीही नव्हती. शेवटी हे चहाच खोपट टाकल. इथं हातासरशी मिळाल, म्हणून हे खादीच खमीस पेहेनलं. देवदयेनं हॉटेल बरं चाललंय्. लोक आश्रम बघतात नि इथं चहा पितात. सुटीचा दिवस असला नि पब्लिक आलेलं दिसलं, तर आम्ही चिवडा, भजीही करतो.'

आश्रमीय जीवनाच हे विपरीत पण सत्य फलित पाहून आता आपण आश्रम मागे टाकून व्यवहारी जगात आलो आहोत, ह्याविषयी मी पुरता नि:शंक झालो. दिवाबत्ती नसलेल्या काळोखातल्या सेवाग्राम स्टेशनाच्या दिशेन चालू लागलो.

सेवाग्राम रेल्वे स्टेशनाकडे तिन्हीसांजा टळल्यावर जाणं म्हणजे साक्षात बारुआ–फेम बंगाली चित्रपटातल्या जीवनाचा एक अध्याय प्रत्यक्षात जगण्यासारखंच आहे.

☘ ☘ ☘

# आनंदव्रत

❀ ❀ ❀

आमच्या जुन्या वाड्यात पुष्ट झाडामाडाची दाटी असलेली एक घनगर्द बाग आहे. बागेत सावल्यांनी झाकलेलं आणि भक्तांची आक्रमक वर्दळ नसलेलं एक शांत राममंदिर आहे. मंदिराचा सारा परिसर गार आहे. समोर दीपमाळेच्या बाजूला एक चिरेबंदी विहीर आहे. विहिरीला पान्हा दाट आहे. डोकवावं, तेव्हा गळाभर पाणी किरणांच्या कवडशांसह तिच्यात हिंदकळत असतं. त्या पारदर्शक पाण्यात एक बरंच जुनं कासव आहे. सदा न् कदा ते आपल्या तब्येतीनं संथ पोहत असतं. त्या एकमार्गी सुखी जीवाचं कुणापाशीच काही मागणं नसतं. ताजं शेवाळ खाऊन ते तृप्ती भोगीत असतं. मासोळ्या, बेडूक, कोवळी अळूमाळू वनस्पती आणि मूठभर ओली किरणं, एवढाच त्या कासवाचा गोतावळा. त्याच्या त्या चिमुकल्या जगात ते रमलेलं असतं.

आजूबाजूला मला कुणी पाहत नसलं, तर मी त्याला काठावरून शुकशुक करतो. ते ढिम करीत नाही. आपल्याच तारेत डुबत असतं.

मला मोठं अजब वाटतं. जगातली एकूण एक घाईगर्दी आणि पचाईत गोळा करून माझ्याकडे येणाऱ्या पाहुण्यांना त्या आत्ममग्न कासवाचं ते कौतुक मी मुद्दाम दाखवतो. म्हणतो,

'लेको, हा निःशब्द आनंद पाहा. असं काय मोठंसं लागतं या सुखी जीवाला? पसाभर गार पाणी, चिमूटभर शेवाळ आणि सोबतीला छोटे छोटे अहिंसक जलचर जीव. टक्क उन्हाची किंवा प्रफुल्ल चंद्रकिरणांची चादर लपेटायला मिळाली, की कासव संतुष्ट

होत. आपण असे आपल्या मर्जीप्रमाणे डुम्बू, तेव्हा खरे.'

मंडळी बोलणं हसण्यावारी नेतात. मीही नेल्यासारखं दाखवतो. पण बहाणा, तो बहाणाच. पाहुण्यांच्या पाठी वळतात आणि माझं सोंग गळपटतं. मी पुन्हा विहिरीत डोकावतो. कासव तिथं सुखात चारापाणी करीत पोहत असतं.

मी दिवसभर माझ्या व्यापात असतो. माझी धावपळ चालू असते आणि राम-मंदिराच्या थंड विहिरीत ते कासव तिथं चारापाणी करीत यथेच्छ पोहत असत. हळूहळू एका कासवाची दोन कासवं होतात. पैकी एक कासव विहिरीतच डुंबत राहत. दुसर कासव माझ्या मनात अलगद उतरत. कबजा घेत आणि चक्क पोहायला सुरुवात करतं. सागत,

' आता आवर की दुकानाच्या फळ्या. पोटापुरती गिऱ्हाइकी झाल्याय् तुझी. बेटा, असा कुठवर ताटकळत बसणार तू? अंधार पडेपर्यंत! एकदा का अंधार जमायला लागला, की पुढं सगळा अंधारच अंधार लागतो. सावध हो. बाहेर छान उजाडलंय्. चल, आपण जरा पाय मोकळे करू या.'

मला पटत. मनात पोहणाऱ्या कासवाचं बोट धरून मी प्रकाशाला सामोरा होतो.

निरपेक्ष भटकण्यासारखा मोक्ष नाही.

तीन जबरदस्त भटक्यांची दुनिया सदा साक्षीला असते पहिले आनंदयात्री रवींद्रनाथ. दुसरे, ज्ञानयात्री धर्मानंद कोसंबी. तिसरे, जीवनयात्री काका कालेलकर. हे अवलिये जन्मभर भटकले. ह्यांनी निव्वळ भटकन्ती एके भटकन्ती केली. ह्यांच्या पाऊलवाटा सर्वत्र पोहोचल्या. कधी त्या हिमालयाच्या धिप्पाड पहाडांना भिडल्या. कधी त्या महासागरावरून प्रकाशकिरणासारख्या लांबच लांब पसरत गेल्या. त्यांनी जलपर्यटनं पुन्हा पुन्हा केली. आनंद लुटला कासवासारखा. कुणी यांगत्से नदीवरचा जांभंदी सूर्योदय पाहिला. कुणी खिन्न चंद्रास्ताचा कंदील पाहिला— सारनाथाच्या पिंपळवनावर लटकलेला. आणि तिघांनीही प्राण एकवटून छातीत भरून घेतले— ब्रह्मदेशातल्या खराच्या रानावरले मांत्रिक वारे आणि कारवारच्या सोनेरी वाळवंटावर ऐकले— सिंधुसागराचे घनघोर चक्रताल —सुरूच्या बागाचे प्राण पुलकित करणारे. गावोगावची पाखरं त्यांची सोयरी झाली आणि नकाशावर नसलेल्या तळ्यातली स्वच्छंद कासवंसुद्धा.

निरपेक्ष भटकण्यासारखं सोपं काही नाही. आपण मुहूर्त वगैरे न बघता बाहेर पडावं, हेच बरं.

सूर्यास्त झालेला होता. सरपटत गेलेल्या डोंगरमाळेचा हिरवा तक्क्या संधिप्रकाशात काळपट भासू लागला. डोंगरमाथ्यावरल्या बौद्ध गुंफा काळोखाच्या कोठड्या झालेल्या दिसत होत्या. तळातल्या देवघर गावात दिवेलागण नुकतीच प्रज्वलित होत होती.लोहगड,

विसापूर, तुंग वगैरे सभोवतालचे पहाऱ्याचे गड अधूक होत होत काळयासावळया क्षितिजात विरघळून गेले होते. त्याची नावनिशाणीसुद्धा दिसत नव्हती. साखरपटाराच्या घर दूर आभाळात एखाद-दुसर नक्षत्राच फूल उमलत होत. डोंगर उतरून यात्रेकरू सडकेला लागले होते.

अशा संमिश्र वेळी मी नेमका पायथ्याला. अशा आडवेळी कुणी कडा चढत नाहीत, पहाडातल्या देवीच्या दर्शनसुखाचा लाहो फडफडीत सूर्यप्रकाशात केव्हाही घेतात.

मला विचार पडला, काय करावं ? पहाडातल्या देवीच माहेर पायथ्याच्या देवघर गावात आहे. तिथंच तिच्या वास्तूला नमस्कार करून माघारी वळावं, की काळोखात लुप्त होत चाललेली सधिप्रकाशातली डोंगरवाट तुडविण्याच क्वचित कुठं भेटणारं सुख कनघटीला लावून एका अनोख्या अनुभवाच सपन्न धनी व्हावं ?

तशी वाट अगदीच सोपी. पायऱ्या नीट बाधलेल्या, कडाही जेमतेम पाचशे फूट उच असेल-नसेल. म्हणजे पायथ्याच्या झाडीतले पारवे एका झेपेत मदिराच्या पटांगणातल्या झाडांवरच्या शेंगा फोडून माघारी परतत असतील. तेव्हा ही चढण काही फार नव्हे.

प्रश्न फक्त एकच होता : ऐन अंधारात वर गेल्यावर काय करायच ? नुसता आभाळ भरून वाहणारा गच्च काळोख निरखायचा ? मिट्ट काळोखाचा डोह झालेलं इंद्रायणीच खोरं डोळे भरून उंचावरून पाहायच ?

पुन्हा राममदिरातलं सुखी कासव आठवल. त्याच यथेच्छ पोहण आठवल.

निर्णय घेतला : डोंगर चढून जायच.

डोंगरमाथा. बाजूला दोन सहस्र वर्षांपूर्वीच्या बौद्ध लेण्याची काळोखानं तुडुंब भरलेली रिकामी दालन आहेत. घोरपडी आणि वटवाघळ ह्यांची आज सुखैनैव वहिवाट असलेल्या ह्या अभ्यासिकामध्ये एके काळी मुमुक्षु बौद्ध भिक्षूंची व्रती वस्ती होती. आता सुन्न शुकशुकाट आहे. आत्ल्या आसमंतानच काळोखाचा मळवट भरला आहे. गुंफाच्या ऐसपैस अंगणात निसरड्या छपराच अगदी छोटंसं बठं घर आहे. राजमहालाच्या बाहेर पहाऱ्याची देवडी असावी, तस. तेच पहाडनिवासिनी सती एकवीरा मातेच एकाकी मंदिर.

मदिराच्या आसपास चिटपाखरू नव्हत. आत दोन घामेजलेले पुजारी देवीजवळ फुलं वेचीत होते. कोपऱ्यातल्या अगडबंब नगाऱ्याजवळ एक याचनार्थी वृद्ध सेवक ताटकळत उभा होता. त्याची अन्नान्नदशा स्पष्ट दिसत होती.

देवीच मुखमंडल चद्रबिंबासारखं प्रसन्न होत. नजर रेशमी वाटली. देव, देवता असोत, नाही तर माणस असोत. अशा विमल नेत्राचे धनी फक्त मायेचाच वर्षाव करू शकतात. सांभाळून घेण हेच त्याच काम.

एकवीरा म्हणजे जिच्या पोटी परशुरामासारखा फक्त एकच एक वीरपुत्र जन्मला, अशी जमदग्नि ऋषींची चारित्र्यसंपन्न पत्नी रेणुका. कृष्णेच्या दक्षिणेला तिला यल्लम्मा देवी म्हणतात.

हिच्या पायापाशी प्रज्ञावान पंडित मऊसूत झाले. संतकवी एकनाथाची ही कुल-देवता भागवत लिहिताना त्यांनी पहिला नमस्कार हिला केला. विष्णुदास कवींची आणि कवींद्र परमानंदाची ही कुलदेवता. राम गणेश गडकऱ्यांचीही. कदाचित कान्होजी आंग्र्याचीही असावी. शिल्पकार म्हात्र्याचीही असेल.

हिच्या नावाच्या व्युत्पत्तीचा पंडितांनी कीस पाडला आहे. ते म्हणतात, ही देवता मूळ कर्नाटकातली. तिथं तिला 'अक्का अव्वेयार', म्हणजे पूजनीय माता म्हणतात. एकवीरा हा अक्का अव्वेयारचा अपभ्रंश. डॉ. केतकर हिच्यासमोर थबकले. त्यांनी हिच्या मूर्तीचं शास्त्रशुद्ध कालमापन केलं. निर्णय दिला, ह्या मंदिरातली मूर्ती बौद्ध लेण्याच्या अगोदरच्या काळातली आहे. हिचा मानपान राखूनच बौद्धांनी त्याचं खोदकाम केलं. हे कसं घडलं असेल? बौद्ध परम अहिंसक आणि लेण्यांच्या दरवाज्यातली ही पहारेकरी देवता तर तिखट नैवेद्याची भोक्ती पण सांगतात, की ह्या मातेला कोहोळ्याचाही शाकाहारी नैवेद्य रुचतो. ह्यावर बौद्धांचं काय म्हणणं असणार? त्यांनी फक्त हिच्या-समोर हात जोडले असणार.

माझं लक्ष वेधण्यासाठी नगारेवाल्यानं नगाऱ्यावर थाप मारली. मी ओळखलं त्याच्या हातावर एक नाणं टाकलं. कृतज्ञतेची एक झुळूक त्याच्या सुरकुतलेल्या गरीब चेहऱ्यावरून झरकन् निघून गेलेली मला त्या निमअंधारातही दिसली.

गुरवाला विचारलं,

'देवीचा हा मुखवटा केव्हा उतरवतात?'

तो म्हणाला,

'आता एका मिनिटात छोटी आरती होईल. मग पुढच्या मिनिटाला मुखवटा उतरवणार. तुम्हाला दर्शन लाभेल. थांबा, थांबणार, तर. मूळ मूर्तीचं दर्शन सहसा कुणाला लाभत नाही. सगळेजण एसट्या पकडायला दिवसाउजेडीच खाली धावतात.'

मला हा अलभ्य लाभ वाटला. राममंदिरातल्या बिहिरीतल्या सुखी कासवाची आठवण झाली. ह्या महामायेचं स्वयंभू रूप विनासायास दिसणार, ह्या कल्पनेनं मी आरपार पालवून गेलो. थांबलो.

आरती उभी राहिली. चुटकीसरशी संपली. मग गुरवांनी दारं ओढून घेतली. देवीचा शृंगार उतरवला. मग पुन्हा दारं उघडली.

तिच्या मूळ रूपात देवी एकवीरा समोर प्रकटली.

मूर्ती कातळात कोरलेली, फारच खडबडीत, शेंदरानं नखशिखांत माखलेली आहे. डोळ्याच्या खाचांत मीनाकाम केलेलं आहे. त्यामुळं नजर रौद्र वाटते. देवीचं मूर्तीतलं एकूण रूप ओबडधोबड आहे. पण अशाच रूपाचा धाक असू शकतो. अशी स्थिर नजर नीट जरब बसवू शकते. असं उग्र रूप विराट शक्तीचं कोठार असतं.

हे क्षणदर्शन म्हणजे काही क्षणांचा खेळ.

देवी एकवीरेच्या दोन रूपांचा मेळ मी मनात बसवीत असतानाच गुरवानं वेळ

टळून गेल्याचं सांगितलं. दार लावून घेतलं.

अंधाराच्या डोहातून कासवासारखं पोहत मी पायथा गाठला. मनात ते दुसरं आनंदयात्री कासव पोहत होतंच. बेत आखून आणि नवस करूनही हा अनपेक्षित आनंद मला एरवी लाभ लाभताच ना. कारण बेत तडीला गेलेच नसते. शंभर प्रलोभनं उभी राहिली असती. निरर्थक व्याख्यानाचे मी धीट होकार भरले असते. वेळेचं खोबरं झालं असतं. दोन पैसे मिळाले असते, पण ते घरापर्यंत आलेच असते, असं नाही. त्याच्या कवड्या-रेवड्या वाटेत परस्परच झाल्या असत्या आणि पैसे मिळाल्याचा आनंद हातोहात मावळला असता. किंवा मी दिवा लावून लेखनाचं दोरखंड वळत बसलो असतो. पण सध्या लेखनकार्य म्हणजे ओलं सरपण जाळण्याचाच प्रकार झालाय्. त्याचा ना धड धूर, ना धड धग. नुसतं जागच्या जागी घुसमटायचं. त्यापेक्षा निरुद्देश भटकती बरी.

राममंदिराच्या थंड विहिरीत ते सुखी कासव चारापाणी करीत यथेच्छ पोहत असतं. हळूहळू एका कासवाची दोन कासवं होतात. पैकी दुसरं कासव अलगद मनात उतरतं. कब्जा घेतं आणि चक्क पोहायला सुरुवात करतं. गळ्यात पडून सांगतं,

‘ आता आवर की दुकानाच्या फळ्या ! बाहेर छान उजाडलंय् ! चल ! ’

कासवाचं काम कासव करतं. आपण फक्त प्रकाशाला सामोरं जायचं. आनंदव्रत स्वीकारायचं.

REFBK-0024048

... ग्रंथसंग्रहालय ठाणे
प्रवेश 24048
11/11/83
... शाखा (स्थळ प्र...